महाराष्ट्र-राज्य-साहित्य संस्कृति ...

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ. पुणें

१-८

भारत इतिहास संशोधक मंडळ
१३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

घटना सुधारणा

घटनेबाबत तांतडीची सूचना

क्र. सा. न. वि. वि.

मंडळाच्या घटनासुधारणेचा विचार सध्या कारभारी मंडळांत चालू आहे. त्यासाठीं मागें मंडळसभासदांकडून सूचना मागविल्या होत्या. पण त्या गोष्टीस बराच कालावधि लोटला. मध्यंतरांत सभासदांची संख्या पुष्कळ वाढली आहे. तेव्हां कोणा सभासदास घटनेंत सुधारणा सुचवावयाच्या असतील तर त्या दि. ~~३०–९~~ २०-१०–१९६९ पर्यंत मंडळाकडे धाडाव्या. त्यांचाहि विचार करून कारभारी मंडळ घटनेची सुधारित कच्ची प्रत तयार करील. गेल्या वार्षिक सभेंत ठरल्याप्रमाणें ह्या वर्षी हें काम हातावेगळें करावयाचें आहे. तरी सभासदांनीं सहकार्य द्यावें ही विनंती.

आपले विश्वासू

दि. १५–८–१९६९ चिटणीस

त्य

ANDALA,

{ Nos. 1-8

V, Part 2

श. १८९१] किंमत १० रु. Price Rs. 10. [A. D. 1969
रा. श. २९५]

निवेदन

(१) आपल्या मंडळ त्रैमासिकाच्या ४७ व ४८ या वर्षांच्या १-८ अंकांचा हा जोड-अंक आहे. यालाच दुसरें नांव ऐतिहासिक फार्सी साहित्य ५ वा खंड, २ रा भाग असें आहे. याचा पहिला भाग १८८२ शकवर्षी प्रकाशित झाला. या जोड-अंकानें वरील नांवाचा सुमारें ४७५ पृष्ठांचा हा द्विभागात्मक ग्रंथ पुरा झाला आहे. जोड-अंक श. १८८८ व ८९ या वर्षी मंडळाचे बेबाक सभासद होते त्या सर्वांना मंडळनियमाप्रमाणें मिळेल. याचा पहिला भाग श. १८८२ या वर्षी मंडळाचे सभासद असणारांना मंडळनियमाप्रमाणें अनुक्रमें ३/४, २/३, १/२ किमतीस किंवा विनामूल्य मिळेल.

(२) या जोड-अंकाच्या संगतीनें त्रैमासिक वर्ष ४९, अंक १-४ म्हणजेच ऐतिहासिक संकीर्ण निबंध १० वा खंड प्रकाशित होत आहे. तो १८९० शकवर्षी मंडळाचे सभासद होते त्यांसाठीं आहे.

(३) हे तीन अंक काढून मंडळानें मागें पडलेलें त्रैमासिक प्रकाशन पूर्ण केलें आहे. आतां मागील शेष कांहीं राहिलेला नाहीं हें सांगण्यास समाधान वाटतें.

(४) मंडळ श. १८९१ सालीं त्रैमासिकाचे अधिक अंक काढूं शकेल असा आजचा कयास आहे. पाहावें कसें काय जमतें तें.

(५) मंडळानें १८७७ शकवर्षी नवीन सुधारित घटना संमत केली. तीमध्यें आजीव सभासद होऊं इच्छिणाऱ्यांनीं द्यावयाच्या वर्गणींत कांहीं वाढ केली व वाढीव वर्गणी जुन्या आजीव सभासदांनीं स्वसंतोषानें द्यावी अशी विनंती केली होती. ती लक्षांत ठेवून मिरज येथील प्रसिद्ध सार्वजनिक कार्यकर्ते श्री. दा. मो. भट यांनीं आपल्या पोटाला चिमटा घेऊनच म्हणाना वर्षाकाठीं दहा रुपये गांठीस बांधले व तेरा वर्षांनीं वाढीव वर्गणी देण्याचा संकल्प पुरा केला हें त्यांस खचित भूषणावह व इतरांस उदाहरणीय आहे. पुण्याचे श्री. चिं. य. मराठे व सध्यां ठाण्यास राहात असलेले श्री. कृ. वि. पेंडसे यांनींही वाढीव वर्गणी गेल्या वर्षी दिली.

श. १८९१ अक्षय्य तृतीया
इ. १९६९ एप्रिल १९

चिटणीस

महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति-मंडळ-पुरस्कृत

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ४७, ४८] त्रैमासिक [अंक १-८

१८५–१९२

ऐतिहासिक फार्सी साहित्य

५ वा खंड, २ रा विभाग

(स्वीय ग्रंथमाला क्र. १०१)

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌAḶA,
POONA

Vols. XLVII, XLVIII } QUARTERLY { Nos. 1-8

185-192

Persian Sources of Indian History, Vol. V, Part 2

श. १८९१
रा. श. २९५]

किंमत १० रु.
Price Rs. 10.

[A. D.
1969

स्थूल अनुक्रम

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशन स्थळ— भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

२ प्रकाशन काल— त्रैमासिक

३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता — दत्तात्रेय वासुदेव आंबेकर, भारतीय, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४

४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते — श्री. गणेश हरि खरे, डॉ. अनंत रामचंद्र कुळकर्णी, श्री. सदाशिव विश्वनाथ जोशी; भारतीय, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

६ मालक व पत्ता— भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें दिलेला तपशील अचूक आहे.

ता. १९।४।१९६९ ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी, स. वि. जोशी

PREFACE

1. This is the second part of the fifth volume of the series Persian Sources of Indian History that is being published by the Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Poona. It contains the Marathi summaries etc. of 170 selected Persian records in all acquired from different old historical families by me at various times as per the following details :—

(1) 1–39 : Shri Keshavrao Krishnarao Parasnis and others of Poona. These belong to two branches of the family it appears, and some of them were presented to me long ago. The exact year I do not now remember. A few others were acquired by the Mandala before 1930.

(2) 40–98 : Shri. Sidramappa Mallikarjunappa Deshmukh of Sholapur. These were acquired in the year 1953 with the help of Dr. B. V. Muley, the late Rao Bahadur Nagappa Abdulpurkar and Shri. G. P. Kulkarni, all of Sholapur.

(3) 99-112, 153-157 : Diwan Bahadur S. I. Desai of Almele (Bijapur). These were first examined by me in 1954 and subsequently acquired from the owner for study.

(4) 113-119, 158 : Central Records Office, Haidarabad (Dn). These were examined by me in the exhibitions held along with the different sessions of the Indian Historical Records Commission during the last twenty five years and subsequently acquired for study and publication.

(5) 120-122 : Shri. Krishna Gopal Ghatpande of Junnar (Poona). These were procured for me by my cousin Shri. V. P. Lawate of Junnar in 1953.

(6) 123-125 : Shri. Gurunath Hanmanta Desai of Jamgi (Bijapur). These were shown to me by Shri. Bhau Krishna Kulkarni, a pleader of Jamkhandi (Bijapur) in 1957.

(7) 126 : Shri. Madhav Vaman Deshpande of Kasegaon (Pandharpur-Sholapur). This was examined and copied by me along with some Marathi documents in 1952 and 1954.

(8) 127-137, 146-152 : Shrimati Yashodabai Chitrao of Sholapur for the Desai of Naldurga (Usmanabad). These were first examined by me in 1942; but I succeeded in acquir-

ing them only in 1953 through the good services of Dr. B. V. Muley of Sholapur.

(9) 138-145 : The late Shri. Yashavantrao Raje Mane Deshmukh of Mhaswad (Satara). These were examined and copied by me in 1952.

(10) 159 : Shri. Sayyid Amjad Qadiri Sahib *Jagirdar* of Balapur (Berar). This was copied by me in 1950 during the session of the Indian Historical Records Commission held at Nagpur in 1950.

(11) 160-162, 164-170 : The late Shri. Ramchandra Narayan Natu of Poona. These were handed over to me for study and publication in 1949.

(12) 163 : Dr. M. G. Dikshit of Bombay. I got it in the year 1947.

I thank heartily all the above—mentioned persons for their generocity of mind.

2. I have either published articles on some of the above mentioned documents by way of introduction or summarised some of them in some leaflets, a list of which I give below for the convenience of scholars :—

(2) Sholapur Deshmukh Records : Proceedings of the Indian History Congress, Waltair Session 1953.

(4) Haidarabad Records : Report on the research in the life of Shivaji, the Great, published by myself in 1953.

(5) Ghatpande Records : Proceedings of the Indian Historical Records Commission, Bhopal Session 1953.

(7) Kasegaon Deshpande Records : Proceedings of the Indian Historical Records Commission, Mysore Session 1955.

(8) Naldurga Deshmukh records : Proceedings of the Indian Historical Records Commission, Patna Session 1956.

(9) Mane family records : Calcutta Review 1955.

(10) Balapur record : Report on the research in the life of Shivaji, the great, published by myself in 1953.

(11) Natu family records : Proceedings of the Indian Historical Records Commission, Cuttock Session, 1949.

3. It is no use reproducing all these articles here as the records published in this volume are dealt with at some length in the notes.

4. After bringing these records to the Mandala, they were re-examined by me and selected ones were copied by myself and the late Shri. Abdul Aziz, the *munshi* attached to the Mandala. In the rest of the work of this volume, I have been constantly helped by my colleagues Shri. G.S. Sathe, M.A., B. T., Shri. N. K, Joshi B. Sc., LL. B. and Shri S. V. Godbole M.A.

5. Along with the Persian records, I generally got Perso-Marathi-Modi or Marathi-Modi records usually in a greater number, many out of which have already been published by me in some form or other in the Mandala publications. But editing of Persian records being rather a difficult task, their publication lagged behind. But thanks to the partial subventions given by the Governments of India and Maharashtra, Sir Dorabji Tata Trust, Maharashtra State Board for Literature and Culture and the University of Poona, the records are now being published. In the first part were given the texts of the records and their chronological index. Translations or summaries of the records, explanatory notes, introduction, etc. are included in this second part of the work.

6. Out of these documents Nos. 1-39 are news-letters from North India of the pre-Panipat and post-Panipat periods; Nos. 40, 41, 128, 129 are *farmans* and No. 127 is a letter of assurance, of ' Alī ' Ādilshāh I of Bijapur; Nos. 42–47, 101–105, 130–133 definitely and Nos. 48, 99. 100, 106, 107, 134 most probably are *farmans* of Ibrāhīm 'Ādilshāh II of Bijapur; Nos. 49–86, 108–113, 126, 136 definitely and 135 most probably are *farmans* of Muḥammad ' Ādilshāh of Bijapur and 137 is a secondary order of his time. Nos. 87–98, 114–124, 138–140 are *farmans* of 'Alī · Adilshāh II of Bijapur; Nos. 125, 141, 142 are *farmans* of Sikandar ' Adilshāh of Bijapur; Nos. 143, 159 are *furmans* of Aurangzeb · Ālamgīr I; Nos. 144, 147–152 are orders by Aurangzeb's son-most probably by Shāh ' Ālam I-dispatched during the contest of succession; Nos. 146, 153–158, 160–162 are of Aurgngzeb's pesriod written by his officers; Nos. 163–170 are letters of a later date (1748–1800).

Out of these records again, Nos. 40, 101, 102, 107, 101, 111, 112, 164–170 are copies while all the rest are originals, as they bear seals, *tughras*, signets, endorsements etc. of the persons issuing them. Again speaking chronologically, 12 documents are of the 16th century, 99 of the 17th century and 59 are of the 18th century. It is very difficult to get records of the 16th century. I doubt whether a hundred Persian paper-records issued by the highest ruling powers of the period have as yet been published. They, therefore, must be looked upon as rareties. It is not easy to get even the records of the early seventeenth century; but fortunately a few have been published here.

7. The detailed study of the records published here has been to a certain extent presented in the notes; here it will not be out of place if I indicate the importance of the documents published in this volume by referring to a few of them.

8. Nos. 1-39 are news-letters from North India ranging between 10-3-1756 and 10-3-65. Out of these Nos. 1-20 are of the pre-Panipat period and are far more important than the remaining ones, which are of the post-Panipat period. Nos. 1-14, 19 and 20 supply information about the movements and doings of Aḥmad Shāh ʻAbdālī and a number of his subordinates and partisans during his stay in North India in 1756–57 and 1959–60. It is in these news-letters that we find Maratha captains crossing the Indus at Attock and staying at Peshawar for some months and then returning back (Nos. 13, 14 and 19). We find in these news-letters, how Bhāū captured Delhi, dethroned ʻĀlamgīr II, the old Mughal emperor and enthroned ʻĀlī Gauhar or Shāh ʻAlam II even in his absence and appointed his son as heir-apparent. We know from these news-letters that both sides were trying for a peace in a meeting to be held on boats in the river Jumna which move unfortunately failed and the 3rd battle of Panipat took place (Nos. 19, 20). We also know from these newsl-etters that some people entertained an idea that there would be a Hindu Rāj after Bhāū's arrival in the Noth and Raṇjitdev, the chief of Jammu, had actually driven away ʻAbdālī's agents from his court (Nos. 19, 20).

9. The earliest records of the Adilshahi regime are to be found among those of the Sholapur and Naḷdurga Deshmukhs. It is a wonder that although the Muhammadan histories tell us that the forts of Naḷdurga and Sholapur were a bone of contension between the Adilshahi and Nizamshahi *sultans*. no traces of that contension worthy of mention are to be found among the records published here. This fact raises a doubt whether these histories were based on factual information or not. Among the Sholapur records there is one which informs that the Lingayats from the Hindu community had to pay a special tax under the name of either Gaṇāchārī or Khānakhūshī (No. 71). Another *farman* tells that Muḥammad ' Ādilshāh had ordered his officers to punish merchants in an exemplary manner who would refuse to accept the Muḥammadshāhī *hon* newly introduced by the *sultan* and made of baser gold (No. 85). A third *farman* informs us that ' Alī Ādilshāh II carried an expedition against the Nayaks of Maḷenaḍ. (No. 97). The Sholapur Deshmukh *farmans* though not much useful for tracing the political account of the 17 century of this part of the country, are very important for acquiring intimate knowledge of the Adilshahi administration, the recreations of the *sultans*, the way of paying emoluments and a number of other topics connected with social and economic aspects of history. As compared with the Sholapur Deshumkh *farmans*, the Naḷdurga Deshmukh *farmāns* are more inportant, It is in these *farmans* that we find the probable date of the construction of the Naḷdurga fort (No. 127, 129), as also orders of Aurangzeb against Marathas and of Shāh ' Ālam I during the contest of succession (Nos. 143, 149, 151, 152), The documents from the Central Records Office, Haidarabad are very important for the account of the life of Shahājī Bhosale and his third son Ekojī, and same is the case with the Gāṭpāṇḍe records (Nos. 113-122). Shivaji, the great, was such a personality of the 17th century that any collection of old records from Maharashtra is sure to possess records supplying some information or other about him. Nos. 141 and 159 substantiate the above statement. The first informs about Shivaji's activities round about Aḥsanābād i. e. Kalbarge and the second sheds some light on the policy of Shivaji's behaviour with Aurangzeb.

The Natu records though generally of a later date still supply some information about the regimes and activities of the Marathas in the South during the time of both Peshwa Mādhavarāo the elder and Mādhavarāo, the younger. There are two documents among them which explicitly point out that the Marathas were trying to establish intimate connections with the French and the Dutch powers in order to counter-act the growing British influence (Nos. 167, 168).

प्रस्तावना

(१) 'ऐतिहासिक फार्सी साहित्य' पांचवा खंड, पहिला भाग (स्वीय ग्रंथमाला क्र. ९३) श. १८८२ पौष शु. ७ (इ. १९६१ जानेवारी ९) या दिनांकीं त्या वेळचे केंद्रीय शास्त्रीय संशोधन व सांस्कृतिक कार्य खात्याचे मंत्री प्रा. हुमायून कबीर यांच्या हस्तें प्रकाशित झाला. तदनंतर तब्बल आठ वर्षांनीं त्याच ग्रंथाचा दुसरा भाग आज प्रकाशित होत आहे. पहिल्या भागांत निरनिराळ्या ठिकाणांहून मिळविलेल्या १७० फार्सी कागदपत्रांचीं प्राप्तिस्थानें, त्यांवर परिचयात्मक लेख लिहिले असल्यास त्यांचीं स्थानें, त्यांचें सामान्य स्वरूप, त्यांचें मूळ फार्सी पाठ, त्यांची कालवार सूची एवढे विषय आले आहेत. या दुसऱ्या भागांत त्या १७० लेखांचे, झाडून सारीं व्यक्तिस्थलनामें, कालनिर्देश व इतर आवश्यक तपशील असलेले सारांश, लेख बोलके करण्यास उपयोगी पडणाऱ्या त्यांवरील टीपा, लेख व त्यांतील विषय यांचा थोडक्यांत इंग्रजीमध्यें परिचय, कालवार सूची व सामान्य सूची हे विषय आहेत.

(२) हे कागदपत्र खालीं दिलेल्या तपशिलाप्रमाणें जुन्या ऐतिहासिक घराण्यांच्या सध्याच्या वंशजांकडून मी निरनिराळ्या वेळीं मिळविले आहेत. त्याचा तपशील असा—

(१) १-३९; पुणें येथील कै. केशवराव कृष्णराव पारसनीस आणि इतर. हीं पत्रें दोन शाखांतील आहेत. आणि त्यांपैकीं कांहीं बऱ्याच वर्षांपूर्वीं कै. के. कृ. पारसनिसांनीं मला दिलीं होतीं. आतां तें वर्षही मला नीट स्मरत नाहीं. यांतील कांहीं मंडळानें इ. १९३० च्या पूर्वींच मिळविलीं होतीं.

(२) ४०–९८; यांचे मालक सोलापूरचे श्री. सिद्रामप्पा मल्लिकार्जुनप्पा देशमूख. हीं सोलापूरचे डॉ. बी. व्ही. मुळे, कै. रावबहादूर नागप्पा अबदुलपूरकर आणि श्री. ग. पां. कुलकर्णी ह्यांच्या साह्यानें मला श. १८७५ (१९५३) मध्यें मिळालीं.

(३) ९९--११२, १५३–१५७; यांचे मालक कै. दिवाणबहादूर एस्. एल. देसाई आलमेले (विजापूर). हे कागद मी प्रथम श. १८७६ (इ. १९५४) मध्यें चाळले व मग अभ्यासासाठीं ते मला मिळाले.

(४) ११३–११९, १५८; (दक्षिण हैद्राबादचें=) आंध्रचें लेखागार. गेल्या पंचवीस वर्षांत झालेल्या भारतीय ऐतिहासिक अभिलेख आयोगाच्या निरनिराळ्या अधिवेशनांच्या संगतीनें भरलेल्या प्रदर्शनांत हीं मी प्रथम पाहिलीं आणि नंतर अभ्यास आणि प्रसिद्धी यांसाठीं त्यांचे फोटो मिळविले.

(५) १२०–१२२; हीं श्री. कृष्ण गोपाळ घाटपांडे, जुन्नर (पुणें) यांजकडील असून माझे मामे बंधू श्री. वा. प. लवाटे यांनीं माझ्यासाठीं मिळविलीं.

(६) १२३–१२५; हीं श्री. गुरुनाथ हणमंत देसाई, जमगी (विजापूर) यांचीं असून जमखंडीचे वकील श्री. भा. कृ. कुलकर्णी यांनीं श. १८७९ (इ. १९५७) मध्यें मला तीं दाखविलीं.

(७) १२६; हें श्री. मा. वा. देशपांडे कासेगांव (पंढरपूर, सोलापूर) यांचें असून, श. १८७४ व ७६ (इ. १९५२ व ५४) मध्यें आणखी कांहीं मराठी कागद व हें तपासून मी नकलून घेतलें.

(८) १२७–१३७, १४६–१५२; हीं नळदुर्ग (उस्मानाबाद) चे देसाई यांच्याशीं संबंध श्रीमती यशोदाबाई चित्राव यांजकडील आहेत. हीं मी प्रथम श १८६४ (इ. १९४२) मध्यें तपासलीं. नंतर सोलापूरचे डॉ. वी. व्ही. मुळे ह्यांच्या साह्यानें तीं मला श. १८७५ (इ. १९५३) मध्यें मिळालीं.

(९) १३८–१४५; हीं कै. यशंवतराव राजे माने देशमूख म्हसवड (सातारा) यांजकडून श. १८७४ (इ १९५२) मध्यें तपासून व नकलून आणलीं.

(१०) १५९; हें श्री. सय्यिद अमजद कादिरी साहिब जागीरदार वाळापूर (वऱ्हाड) यांजकडील असून श. १८७२ (इ. १९५०) मध्यें नागपुरास झालेल्या भारतीय ऐतिहासिक अभिलेख आयोगाच्या अधिवेशनप्रसंगीं भरलेल्या प्रदर्शनांतून नकलून आणलें.

(११) १६०–१६२, १७४–१७६; पुण्यांतील कै. रामचंद्र नारायण नातू ह्यांनीं मला हीं श. १८७१ (इ. १९४९) मध्यें अभ्यासासाठीं व प्रसिद्धीसाठीं दिलीं होतीं.

(१३) १६३; डॉ. मो. गं. दीक्षित यांनीं मला श. १८६९ (इ. १९४७) मध्यें दिलें होतें.

याबद्दल उपरिनिर्दिष्ट सर्व सद्गृहस्थांचे मी हार्दिक आभार मानतों.

(३) यांतील कांहींवर मी लेख लिहिले आहेत आणि त्यांत त्यांची अधिक माहिती दिली आहे; तर कांहींचे सारांश माझ्या पुस्तिकांत छापले आहेत. अभ्यासकांच्या सोयीसाठीं मी त्यांची सूची खालीं देतों–

(२) सोलापूर कागद : भारतीय इतिहास परिषदेच्या श. १८७५ (इ. १९५३) च्या वाल्टेर अधिवेशनाचें इतिवृत्त.

(४) हैद्राबाद कागद : शिवचरित्रसंशोधनवृत्त; श. १८७५ (इ. १९५३) त मीच प्रसिद्ध केलें.

(५) घाटपांडे कागद : भारतीय ऐतिहासिक अभिलेख आयोगाच्या श. १८७५ (इ. १९५३) मधील भोपाळ अधिवेशनाचें इतिवृत्त.

(७) कासेगांव देशपांडे कागद : वरील आयोगाच्या श. १८७७ (इ. १९५५) मधील म्हैसूर अधिवेशनाचें इतिवृत्त.

(८) नळदुर्ग देशमूख कागद : उपर्युक्त आयोगाच्या श. १८७७ (इ. १९५६) मधील पाटणा अधिवेशनाचें इतिवृत्त.

(९) माने घराण्याचे कागद : कलकत्ता रिव्ह्यू, श. १८७७ (इ. १९५५)

(१०) बाळापूर कागद : श. १८७५ (इ. १९५३) मध्यें मी प्रसिद्ध केलेलें शिवचरित्रसंशोधनवृत्त.

(११) नातू घराण्यांतील कागद : उपर्युक्त आयोगाच्या श. १८७१ (इ. १९४९) मधील कटक अधिवेशनाचें इतिवृत्त.

ह्या भागांत प्रसिद्ध झालेल्या सर्व सारांशांवर टीपांमध्यें शक्य तितकी सविस्तर चर्चा केली असल्यानें येथें उपरिनिर्दिष्ट लेख विस्तारानें देण्याचें प्रयोजन नाहीं.

(४) वरील सर्व कागदपत्र मंडळांत आणल्यावर मी त्यांची फेर तपासणी केली आणि त्यांतील निवडक कागदांच्या नकला मी आणि मंडळाचे मुनशी पै. अब्दुल अझीझ ह्यांनीं केल्या. ह्या भागाच्या उर्वरित कामांत माझे सहकारी श्री. गो. शि. साठे एम्. ए., बी. टी. यांचें मला सतत साह्य लाभलें आहे. सूची, स्थलनिश्चय, टीपा, इत्यादि कामांत श्री. श्या. वि. गोडबोले एम्. ए. यांचें आणि मुद्रयें तपासण्याचे कामीं मंडळाचे श्री. ना. के. जोशी यांचें साह्य झालें आहे.

(५) येथील फार्सी कागद पत्रांबरोबरच फार्सी-मराठी (मोडी) किंवा मराठी (मोडी) कागद मला बहुधा अधिक संख्येनें मिळत गेले. त्यांपैकीं बरेचसे कागद आजवर मंडळाच्या प्रकाशनांत या ना त्या स्वरूपांत मजकडून प्रसिद्ध झाले आहेत. पण फार्सी कागदांचें संपादन हें थोडें अवघड काम असल्यानें त्यांच्या प्रकाशनास दिरंगाई लागली व लागते. भारत सरकार, महाराष्ट्र सरकार, सर दोराबजी टाटा ट्रस्ट, पुणें विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ यांनीं अंशतः दिलेल्या देणग्यांनीं कां होईना हे कागद प्रसिद्ध होत आहेत. म्हणून त्या सर्वांचा येथें साभार उल्लेख करणें आवश्यक आहे.

(६) ह्यांतील क्र. १–३९ हे कागद पानिपतपूर्व व पानिपतोत्तर कालांतील उत्तरेकडील वातमीपत्रें आहेत; क्र. ४०, ४१, १२८, १२९ हीं विजापूरच्या पहिल्या अली आदिलशाहाचीं फर्मानें आहेत; तर क्र. १२७ हा कौल आहे. क्र. ४२–४७, १०१–१०५, १३०–१३३ हीं निश्चयानें आणि क्र. ४८, ९९, १००, १०६, १०७, १३४ हीं बहुधा दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाचीं फर्मानें आहेत; तर क्र. ४९–८१६, १०८–११३, १२६, १३६ निश्चयानें आणि १३५ बहुधा मुहम्मद आदिलशाहाचीं फर्मानें आहेत आणि क्र. १३७ हा त्याच्याच वेळचा दुय्यम दर्जाचा हुकूम

आहे. क्र. ८७–९८, ११४–१२४, १३८–१४० हीं दुसऱ्या अली आदिलशाहाचीं, क्र. १२५, १४१. १४९ हीं सिकंदर आदिलशाहाचीं व क्र. १४३, १५९ हीं औरंगजेबाचीं फर्मानें आहेत; तर १४४, १४७–१५२ हीं औरंगजेबाच्या मुलांत राज्यासाठीं चाललेल्या तंट्याच्या काळांतील बहुधा त्याचा थोरला मुलगा पहिला शाह आलम याचीं पत्रें आहेत. क्र. १४६, १५३–१५८, १६०–१६२ हे औरंगजेबकालीन त्याच्या अधिकाऱ्यांचे हुकूम आहेत. क्र. १६३–१७० हे कागद (इ. १७४८–१८००) पुढील कालखंडांतील आहेत. यांतील क्र. ४०, १०१, १०४, १०७, १०८, १११, ११२, १६४–१७० हे कागद नकला आहेत. बाकीचे सर्व त्यांवर पाठविणाराचे शिक्का, मोर्तब, तुघ्रा, शेरे, रुजवाती इ. असल्यानें अस्सल आहेत. कालनुक्रम पाहतां १२ सोळाव्या शतकांतील, ९९ सतराव्या आणि ५९ अठराव्या शतकांतील आहेत. सोळाव्या शतकांतील कागद मिळणें फार कठीण आहे. आजवर त्या काळांतील प्रमुख राज्यकर्त्यांचीं शंभर तरी पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत कीं नाहींत याचीच मला शंका आहे. दुर्मिळ वस्तू ह्या दृष्टीनेंही त्यांजकडे पाहावयास हवें. सतराव्या शतकाच्या प्रथम पादाचे कागद मिळणेंही सोपें नाहीं; पण सुदैवानें येथें कांहीं प्रसिद्ध करतां आले आहेत.

(७) वर जो तपशील दिला आहे त्यावरून लक्षांत येईल कीं, यांतील बहुसंख्य लेख राजपत्रें आहेत. यामुळे त्यांवर शिक्के, तुघ्रे शेरे इ. सर्व आहे. त्यांपैकीं आदिलशाही शिक्क्यांसाठीं ऐतिहासिक फार्सी साहित्य ३ रा खंड, १२५–१३३ हीं पृष्ठें पाहावी. तेथें आदिलशाही फर्मानांवर आढळणाऱ्या शिक्क्यांविषयीं आवश्यक व समजली ती सर्व माहिती दिली आहे. येथें त्यांविषयीं अधिक सांगण्यासारखें कांहीं नाहीं. या पुस्तकांतील क्र. १४३ व १५९ यांवर औरंगजेबाचे शिक्का व तुघ्रा आहेत. औरंगजेबाचे दोन शिक्के होते. एक गोल व एक चौकोनी. मी या दोन्ही कागदांच्या नकला करून आणल्या होत्या. त्यांचीं मुळें आमच्या पाशीं नाहींत. शिक्क्यांचे आकार नकलांवर नमूद केलेले नव्हते. यामुळें त्यांवरील शिक्के गोल कीं चौकोनी होते हें आतां सांगतां येणें शक्य नाहीं. उरलेले शिक्के वारंवार येणारे नसल्यामुळें ते जेथल्या तेथे दिले आहेत.

(८) काल, स्थल व व्यक्ति हे इतिहासाभ्यासाचे तीन डोळे आहेत. या डोळ्यांनीं पत्रें न्याहाळल्याविना त्यांचें स्वरूप नीट ध्यानांत येत नाहीं. येथें प्रकाशित केलेल्या पत्रांपैकीं बहुसंख्य राजपत्रें असल्यानें त्यांवर कालाचा संपूर्ण तपशील आढळला. कांहीं राजपत्रें अतिशय जीर्ण होऊन फाटल्यामुळें त्यांचे कालनिर्देश मात्र मिळाले नाहींत. बातमीपत्रांत जागोजाग पूर्णापूर्ण कालनिर्देश आल्यामुळें त्यांच्या कालांविषयींही प्रश्न उत्पन्न झाला नाहीं. शेवटीं अगदीं थोडे कागद असे राहिले कीं, ज्यांचे काल ठरविण्याचा प्रयत्न करावा लागला. तो प्रयत्न त्या कागदांत काल-

निर्णयाचीं चांगलीं गमकें मिळाल्यानें यशस्वी झाला आहे हें त्यांवरील टीपा वाचल्यास सहज ध्यानांत येईल.

(९) स्थलनिश्चयाचा प्रयत्न कालनिश्चयाइतका यशस्वी होऊं शकला नाहीं. त्याचें एक कारण फार्सी लिपीच्या सदोषत्वामुळें स्थलनामांचे अचूक उच्चार मला समजले नाहींत. दुसरें कारण स्थलांचीं नावें एकाकी आल्यानें त्यांच्या निश्चयाविषयीं तर्क करतां येईनात. तिसरें कारण आवश्यक तितके सूक्ष्म नकाशे किंवा देहझाडे उपलब्ध झाले नाहींत आणि चवथें व सर्वाधिक महत्त्वाचें कारण आवश्यक त्या सवडीचा अभाव. तथापि शक्य तितकी सवड काढून बहुसंख्य स्थलनामांचा अचूक छडा लावला आहे आणि तो त्या त्या स्थलनामापुढें दाखविला आहे.

(१०) या खंडांत विशेषतः उत्तरेकडील बातमीपत्रांत इतक्या उण्याअधिक परिचित अपरिचित व्यक्ती आल्या आहेत कीं, त्या सर्वांची येथें माहिती द्यावयाची तर फारच विस्तार झाला असता. तथापि पत्रांवरील सर्व साधारण टीपांत कांहीं व्यक्तींचीं आपसांतील नातींगोतीं समजण्यापुरती माहिती दिली आहे. आदिलशाही फर्मानांत अनेक वेळां स्थानिक स्वरूपाची माहिती येते आणि ती इतकी व अशी संदिग्ध असते कीं, तिचें निश्चित स्वरूप कळणें कठीण-नुसतें कठीण नव्हे तर कित्येकदां अशक्य-होतें. त्यासाठीं पद्धतशीर गाववार, तालुकवार, जिल्हावार, हिंडून चिठोरें नि चिठोरें जमा करणें आवश्यक होतें. पण ती वेळ आतां निघून गेली आहे. आतां पुष्कळ आटापिटा केला तरी कांहींही हातीं न लागण्याचा संभवच अधिक-असो.

(११) आज मंडळापाशीं सतराअठराव्या शतकांतील मराठ्यांच्या म्हणजेच भारताच्या इतिहासकथनास अत्यंत उपयुक्त ठरणारी, नवीन माहितीनें ओथंबलेली आणि ५।५ शे पृष्ठांचे सहा खंड सहज होतील इतकी, अस्सल, पहिल्या प्रतीची सामग्री संपादन व प्रकाशन यांची वाट पाहात पडून आहे. आणि सार्वजनिक लेख्यशालांत १०० खंड सहज निघतील एवढी सामग्री विनायास उपलब्ध होण्यासारखी आहे. तथापि तींतही शकाच्या १५ व्या (इसवीच्या १६ व्या) किंवा त्या पूर्वीची सामग्री क्वचितच आहे. ही सामग्री गावोगाव उण्याअधिक प्रमाणांत होती. वेळींच अटीतटीचा प्रयत्न झाला असता तर तीपैकीं कांहीं निश्चयानें हातीं लागती.

(१२) येथें प्रसिद्ध केलेल्या कागदपत्रांचा कांहीं अभ्यास टीपांतून आला आहे. तथापि येथें त्यांचें थोडेसें दिग्दर्शन केलें तर तें अप्रासंगिक होणार नाहीं म्हणून तसें करतों. पत्र क्र. १--३९ हीं उत्तर भारतांतील दि. १०–३–५६ते दि.१०–३ १७६५ या कालखंडांतील बातमीपत्रें आहेत. त्यांपैकीं पहिलीं २० पानिपतपूर्व कालांतील असून तीं, उरलेल्या पानिपतोत्तर पत्रांहून अधिक महत्त्वाचीं आहेत. क्र. १-१४, १९ व २०मध्यें इ.१७५६–५७ व इ.१७५९–६०या कालांत अब्दाली भारतांत असतांना

तो आणि त्याचे अधिकारी व त्याच्या बाजूचे लोक यांच्या हालचाली व कृति या गोष्टींची माहिती आली आहे. मराठी सेनानी सिंधू ओलांडून अटकेपार गेले व पेशावरास कांहीं महिने राहून परतल्याचें आपणांस या बातमीपत्रांवरून समजतें (क्र. १३, १४ व १९). ह्या अखबारांवरून भाऊनें दिल्ली कशी जिंकली, आणि दुसऱ्या आलमगीर बादशाहास पदच्यूत करून त्याचा मुलगा आली गौहर यास त्याच्या गैरहजेरींत तक्तनशीन आणि त्याच्या पुत्रास वलीअहद कसें केलें हें कळतें. यांतूनच आपणांस दोन्ही बाजू तहासाठीं प्रयत्नशील असतां दुर्दैवानें तो होऊं शकला नाहीं आणि पानिपतचें युद्ध झालें; तसेंच भाऊ उत्तरेकडे आल्यानें आतां हिंदू राज्य निर्माण होईल अशी आशा कांहींच्या मनांत निर्माण झाली आणि जम्मूचा राजा रणजितदेव यानें तर अब्दालीच्या वकिलांना आपल्या दरबारांतून काढून लावलें ही गोष्ट या बातमीपत्रांवरूनच आपल्या ध्यानांत येते (क्र. १९,२०).

आदिलशाहींतील अतिशय जुनाट पत्रें सोलापूर व नळदुर्ग देशमुखांच्या संग्रहांत आहेत. मुसलमानी इतिहासकार सोलापूर आणि नळदुर्ग किल्ले आदिलशाही व निजामशाही सुलतानांतील भांडणाचें कायमचें मूळ होतें असें सांगतात. पण या पत्रांतून त्याचे विशेष उल्लेख कोठें आढळत नाहींत ही कांहींशी आश्चर्याची गोष्ट आहे आणि यावरूनच अशी शंका येते कीं, हे इतिहास प्रत्यक्ष घटितांवर आधारले आहेत कीं नाहींत. सोलापूरच्या (क्र. ७१) एका कागदावरून हिंदू जमातींतील लिंगायतांना गणाचारी किंवा खानाखूशी नांवाचा एक कर द्यावा लागे हें समजतें. क्र. ८५ च्या फर्मानामुळें मुहम्मद आदिलशाहानें थोड्या हिणकस सोन्याचा एक नवा होन चालू केला आणि जे व्यापारी तो नाकारतील त्यांना वचक बसेल अशी शिक्षा देण्याचा त्यानें आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम केल्याचें लक्षांत येतें. दुसऱ्या अली आदिलशाहानें मलनाडच्या नायकावर स्वारी केल्याचें क्र. ९७ च्या फर्मानावरून समजतें. सोलापूर बाजूच्या सतराव्या शतकांतील राजकीय इतिहासाचा मागोवा घेण्यास सोलापूर देशमुखांचीं फर्मानें तितकीशीं उपयुक्त नसलीं तरी त्यांतून राज्यकारभार, सुलतानांचे विलास, तनखा देण्याच्या पद्धती आणि इतर आर्थिक व सामाजिक गोष्टी यांची माहिती मात्र मिळते. सोलापूर देशमुखांच्या फर्मानांहून नळदुर्ग देशमुखांचीं फर्मानें अधिक महत्त्वाचीं आहेत. ह्या फर्मानांमधून नळदुर्ग किल्ल्याच्या बांधणीच्या कालाचा अंदाज आपणांस येतो (क्र. १२७,१२९); शिवाय औरंगजेबाचे मराठ्यांविरुद्ध तसेंच पहिला शाहआलम याचे वारसा तंट्याच्या वेळचे हुकूमही आढळतात (क्र. १४३, १४९, १५१, १५२). हैद्राबादचा दप्तरखाना व घाटपांड्यांचे कागद हे शहाजी व त्याचा तिसरा मुलगा एकोजी यांच्या माहितीसाठीं फार महत्त्वाचे आहेत (क्र. ११३-१३२). छत्रपति शिवाजी महाराज ही सतराव्या शतकांतील अशी एक महान व्यक्ति होती कीं, उभ्या महाराष्ट्रांतील त्या वेळच्या कोणत्याही संग्रहांतील

कागदांत यासंबंधीं कांहींना कांहीं माहिती मिळतेच. क्र. १४१ व १५९ हीं पत्रें वरील विधानास साक्ष देतात. पहिलें अहसनाबाद उर्फ कलबर्गें परिसरांतील शिवाजीच्या हालचालींची माहिती देतें, तर दुसरें शिवाजीच्या औरंगजेबाशीं वागण्यांतील धोरणाचा किंचित् खुलासा करतें. नातू दप्तर साधारणपणें पेशवाई कालांतील असलें तरी त्यावरून थोरला माधवराव व सवाई माधवराव यांच्या कालांतील मराठ्यांच्या दक्षिणेंतील हालचाली व त्यांचा राज्यकारभार यांची माहिती मिळते. यांत दोन कागद असे आहेत कीं, ज्यांवरून इंग्रजांच्या वाढत्या महत्त्वास शह देण्यासाठीं फ्रेंच व डच सत्तांशीं मराठे अनुकूल दृढसंबंध आणण्याच्या प्रयत्नांत असल्याचे दिसतात (क्र. १६७,१६८).

श. १८९१ अक्षय्य तृतीया; इ. १९६९ एप्रिल १९ **ग. ह. खरे**

भारत इतिहास संशोधक मंडळ

ऐतिहासिक फार्सी साहित्य

५ वा खंड, २ रा भाग

[जु. ३] जवल २ रविवार } १ {श. १६७८ माघ शुद्ध ३ {इ. १७५७ जानेवारी २३

ता. १ जवल शनिवार या दिवसाच्या दिल्लीच्या खबरा.

या दिवशीं तेथेंच मुक्काम करून पुढला तंबू वझीराबादजवळच्या तुमरपूर गावीं पाठविला होता. आज ता. २ जवल रविवार रोजीं अबदाली एक घटका रात्र उरली असतां नरेलाच्या त्या बाजूनें कूच करून व दहा कोस अंतर तोडून एक प्रहर दिवस आला असतां वझीराबादेजवळ यमुनेच्या कांठीं तंबूत येऊन दाखल झाला. आणि सरदार जांबाझखान यास पांचशें स्वारांसह मोतीमहल-निजण्याची जागा व दिवाने खास यांच्या सुसज्जतेसाठीं दिल्लीच्या किल्ल्यांत पाठविलें. त्याप्रमाणें त्यानें तेथें जाऊन तेथील तोफखाना इतरत्र पाठवून दिला व किल्ल्यांत स्वतःचा बंदोबस्त केला; घरांची तयारी करीत आहे. बहादर महली करोरा शाहगंजेस गेला व त्यानें तांदूळ, तूप, मैदा, बकरें इ. मेजवानीचें सामान उपर्युक्त सरदारासाठीं किल्ल्यांत पोचविलें. रस्त्यांत इमाद, इन्तिजाम, नजीब, बहादुरखान, उबैदुल्लाहखान, जफरुल्लाहखान, इत्यादि स्वार होऊन शाहवलीखानाबरोबर अबदालीस मुजरा करण्यासाठीं जात असतांना दिसले. नंतर सर्व जण शाहवलीखानाच्या घरांत अलग अलग जाऊन राहिले आहेत. तेथें जाऊन राहिल्या दिवसापासून परत दिल्लीस आले नाहींत. किल्ल्यांत असलेला सैफुद्दीन मुहम्मदखान अबदालीच्या बोलावण्यावरून नसकचीबरोबर अबदालीच्या लश्करांत गेला. इमादनें अबदाली व शाहवलीखान यांच्या मेजवानीची आपल्या घरीं तयारी करविली होती. आज खाजासरा खोजा बसंत कांहीं लहानमोठीं अन्नपात्रें, पंचवीस थाळे व इतर मेजवानीचीं उपकरणें घेऊन अबदालीच्या फौजेकडे गेला आहे. असद बुर्जांत ठेवलेल्या आलमगीर पादशाहास त्याच्या इच्छेवरून बायकामुलांसह तेथून काढून पूर्वीच्या जागीं ठेवण्यांत आलें. बातमी आहे कीं, अबदाली एक दोन दिवसांत किल्ल्यांत दाखल होऊन तेथें एक दोन रात्रीं राहून नंतर खिजराबादेस रवाना होईल. शहरांत मोठा आकांत झाला आहे. कोणाचाही जीव शरीरांत राहिला नाहीं. अबदाली किल्ल्यांत दाखल होतांना काय होईल कोणास ठाऊक. पण शहरावर दंड बसेलच. याबाबत नजीब मुख्त्यार झाला आहे. आणि शहरांतील दुसरे सर्व हरामजादे नजीबापुढें स्तुतिस्तोत्रें गात आहेत. शाहदऱ्यामध्यें कुतबखान रोहिला यास दण्डवसुली करण्यास नेमिलें असून तो तेथील लोकांवर जुलूम करीत आहे.

[जु. ३] जवल ४ मंगळवार } **१** { श १६७८ माघ शुद्ध ५ इ. १७५७ जानेवारी २५

ता. ३ जवल सोमवार या दिवसाच्या दिल्लीतील खबरा.

काल दोन प्रहर दिवस गेल्यावर नजीबानें अबदालीकडे जाऊन सरदार जहानखान याजबरोबर मुजरा केला व दोन घटका खलबत करून उपर्युक्त सरदार व बरखूरदारखान यांसह तेथून उठला. नंतर तिघेजण एकसाथ फीरोजच्या लाटाजवळच्या मीर खुदायारखान मरहूम याच्या मुकबऱ्यापर्यंत आले. नंतर मुकबऱ्यावर उभे राहून त्यांनीं दिल्लीच्या सर्व वस्तीचें निरीक्षण केलें; आपसांत खलबत करून जहानखान व बरखूरदारखान आपल्या डेऱ्यास गेले व नजीब रस्त्यांतच वेगळा होऊन स्वतःच्या डेऱ्यास गेला.

आज अबदालीनें तुमरपूर व वझीराबाद-यांजवळ मुक्काम केला. शाही सरदार जहानखान नजीबखान, अब्दुल अहदखान, नासिरखान व १५०० स्वार यांसह अबदालीच्या हुकुमाप्रमाणें किल्ल्यास आला. त्यांतील बागा वगैरेंत हिंडला व हयातबक्ष हौदावर बसला. तेथें नसकचींनीं बोलावून आणल्यामुळें सादातखान, अहमद अलीखान, शेरजंग, रिआयतखान, मुजफ्फर हुसैनखान, हैदर कुलीखान, जाफर कुलीखान, खानाझादखान, सय्यिद नियाझखान, हाफिज जवाहिरखान, होशमन्द अलीखान, नाजिर बख्तावरखान वगैरेंनीं उपर्युक्त सरदारांजवळ येऊन जाबसाल करून खाजगी जवाहिरखाना, तोशकखाना वगैरे दाखविले. नंतर उपर्युक्तांना घेऊन चार घटका दिवस राहिला असतां किल्ल्यांतून बाहेर आला व अबदालीकडे गेला. जांबाझखानानें ३०० स्वारांसह किल्ला व दरवाजे यांचा बदोबस्त केला.

हाजी फौलादखान कोतवाल कोतवाली चवुतऱ्यापुढें सरदार जहानखानाची स्वारी काश्मीरी दरवाजाच्या त्रिपोलीच्या रस्त्यानें जात असतां...तेव्हां जहानखानानें त्यास दिलासा देऊन म्हटलें......शहरामध्यें जाहीर करा कीं, कोणी कोणावर जुलूम करूं नये व बाजारांतील दुकानें......कोतवालानें जाहीर केलें. तेव्हां शेकडा १–२ दुकानें उघडलीं व बाकी बंद आहेत.

याकूब अलीखान अबदालीच्या फौजेंतून येऊन राजा बापू पंडित, राजा जुगुल किशोर व रामप्रसाद सावकार यांसह अबदालीच्या लश्करांत गेला. चार घटका रात्र होईतों तेथेंच होते. तसेंच अबदालीचे नसकची सैफुद्दीन मुहम्मदखानाला घेऊन अबदालीच्या लश्कराकडे गेले.

इमाद, खानखानान, मीर सद्रुद्दीनखान, बहादुरखान, सय्यिद जमीलुद्दीनखान, मिहदी कुलीखान, हकीम उबैदुल्लाहखान, जफरुल्लाहखान वगैरे रिवाजाप्रमाणें शाहवलीखानाच्या डेऱ्यांत मुक्कामास होते. आज दोन चार दिवस इमादचे शाहवलीखानाचे मार्फत जाबसाल सुरू होते. तेव्हां त्यानें पन्नास हजार रुपये नकद व तितक्याच किंमतीचें जवाहीर देण्याचा करार करून त्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली.

तेव्हां शाहवलीखानानें इमादला अबदालीकडे नेलें व त्याकडून मुजरा करविल्यावर करार नजरेखालून घालविला. अबदालीनें कृपाचिन्ह म्हणून एक विलायती कुडतें इमादला देऊन निरोप दिला. शाहवलीखान त्यास घेऊन स्वतःच्या डेऱ्यावर आला. शाहवलीखानानें इमादच्या सांगण्यावरून बहादुरखानास अबदालीकडे नेऊन त्यास भेटविलें. खानानें पाच अशरफी नजर केल्यावर कृपाचिन्ह म्हणून त्यास एक कुडतें मिळालें व तो परत आला.

ता. ४ जवल रोज मंगळवार. काल समसामुद्दौला, सादातखान, अहमद अलीखान, मालीखान, खानाझादखान, मुजफ्फर हुसैनखान, शाकिरखान, नासिरखान, हिदायतुल्लाहखान, इनायतखान, फाखिरखान, मुनव्वर अलीखान, हैदर कुलीखान, जाफर कुलीखान, रिआयतखान, सय्यिद नियाझखान, शेरजंग, नाजिर बख्तावरखान, हाफिज जवाहिरखान, यूसुफखान, बहादुर महली हे अबदालीच्या बोलावण्याप्रमाणें जहानखान व नजीब यांसह लश्करांत गेले होते. आतां बरखूरदारखान अर्जबेगी व शाहवलीखान उपर्युक्तांना अबदालीकडे घेऊन गेले व एक तीर अंतरावर उभे राहून अर्ज केला कीं, हिंदुस्थानांतील उमराव उभे आहेत. हुकूम झाला कीं उभे रहावें. तेव्हां मुहम्मद सुलैमान-सह समसामुद्दौलानें मुजरा करून एक हत्ती व सात अशरफी नजर केल्यानंतर सादातखान, शेरजंग व खानाझादखान यांनीं पांच पांच अशरफी, अहमद अलीखान व रिआयतखान यांनीं दोन दोन अशरफी आणि इतरांनीं आपआपल्या ऐपतीप्रमाणें नजर गुजरली. बरखूरदारखानानें प्रत्येकाची नजर आपल्या हातांत घेऊन अबदालीकडे पोचविली. हुकूम झाला कीं, मुजऱ्याकरितां हजर असावें. अबदालीनें अजीमुल्लाहखानाचा मुलगा रिआयतखान यावर एक कुडती व एक पिवळी शाल यांची कृपा केली. सैफुद्दीन मुहम्मदखान, मिहदी कुलीखान, मुयस्सरखान, सय्यिद जमीलुद्दीनखान व किसनचंद यांवर एकएक कुडत्याची कृपा केली. सैफुद्दीन मुहम्मदखानास हुकूम झाला कीं, कुदसियाबादेची बाग, जाफरखान, अली मर्दानखान व दारा शुकोह यांच्या हवेल्या, अबुल मनसूरखान याची नवीन हवेली आणि शायिस्ताखान व असदखान यांच्या बारादऱ्या यांची तयारी करा. सहा घटका रात्र झाल्यावर सर्व जण उठले व घरोघर निघून गेले. याकूब अलीखानाबरोबर अबदालीच्या लश्करांत गेलेले बापू पंडित व जुगुल किशोर मुजरा न करतांच आपआपल्या घरास परतले. अर्जबेगी म्हणाला कीं, उद्या तुमची भेट करविली जाईल. हकीम जफरुल्लाह लश्करांत होता तो सायंकाळच्या वेळीं सय्यिद नियाझखानाच्या हवेलीस आला.

आज ता. ४ जवल मंगळवार रोजीं अबदालीच्या लश्कराचा तळ तुमरपूर गावाजवळ......होता. इमाद, इन्तजाम, मीर सद्रुद्दीनखान, हकीम उबैदुल्लाहखान, सय्यिद मुहम्मद......खान, मिहदी कुलीखान व बहादुरखान अबदालीच्या लश्करांत आहेत. शाहवलीखान चार घटका दिवस आल्यावर इमादच्या डेऱ्यास गेला. चार घटका तेथें बसून व जाबसाल करून एक प्रहर चार घटका दिवस आल्यावर आपल्या

घरास परतला. इमादनें सैफुल्लाहखान, अब्दुर्रशीदखान, याकूत रकमखान, मिहदी कुलीखान यांस शाहवलीखानाला राहातां यावें म्हणून सादुल्लाहखानाच्या चौकांत असलेली स्वतःची हवेली तयार करण्यासाठीं पाठविलें. उपर्युक्त लोक मोतीमहल, शीशमहल व कोलीर बाजूचें घर यांची तयारी करीत आहेत. अबदालीनें पाठविलेले चार ख्वाजासरा व दोनशें स्वार तयारीसाठीं किल्ल्यांत आले असून बातमी आहे कीं, उद्या अबदाली किलेदाखल होईल. मुहम्मद रफीअ अबदालीकडून एक नसकची घेऊन शहरास धान्य-पुरवठा आणण्यासाठीं शाहदऱ्यास गेला. सआदतखान आफ्रीदी व सय्यिद हिदायत अलीखान यांस अबदालीकडून एकेका कुडत्याची कृपा झाली.

[जु.] ३ जवल ५ बुधवार

३

शा. १६७८ माघ शुद्ध ६
इ. १७५७ जानेवारी २६

ता. ५ जवल जु. ३ बुधवार या दिवसाच्या दिल्लींतील खबरा.

अबदाली अद्याप दिल्लीहून तीन कोसांवर वझीराबादेजवळ मौजे तुमरपूर येथें मुक्कामास आहे. इमाद व त्याबरोबरचे इन्तिजाम, जमीलुद्दीनखान, बसंतखान, मिहदी कुलीखान, अब्दुर्रशीदखान वगैरे रिवाजाप्रमाणें अबदालीच्या लश्करांत, शाहवली-खानाच्या डेऱ्याजवळ आहेत. काल जहानखान, सुरूरखान, मिरन्जीखान, याकूब अली-खान, किशनचंद, गुलाम हुसैनखान यांसह किल्ल्यांत येऊन अबदालीच्या हुकुमाप्रमाणें सर्व राजपुरुषांची पहाणी करून, प्रत्येकाचें रूप नीट करून त्यांपैकीं बारा जणांस कलमबंद केलें. तेथून मलिका झमानीच्या देवडीवर जाऊन जनान्यांत गेलेल्या स्वतः-बरोबरच्या महाल्यांच्या मारफतीनें दोन घडी जाबसाल करून उठून आला. नंतर अंगुरी, गुलाली, बुलन्द या बागांच्या रस्त्यानें सैर करीत इमादच्या हवेलीस आला. तेथील घरांची पहाणी करून नंतर मरहूम जाविदखान व इसहाकखान यांच्या हवेल्यास जाऊन त्यांची पहाणी केली. नंतर किल्ल्यांत येऊन बादशाही फरासखान्याच्या कोठ्या उघडविल्या. थोडा वेळ त्यांची पाहणी करून सफदरजंगाच्या नवीन हवेलीत येऊन मुक्काम केला. तेथें नजीब, अब्दुल अहद, गुलाम मुहीउद्दीन, यूसुफ, जवाहिर, उमरअली होश्मन्द हे खान त्याजकडे आले होते. त्यांजबरोबर जाबसाल केले. नजीबानें जहान-खानास मेजवानी दाखल २००० रुपये देऊन व त्याच्या सांगण्याप्रमाणें दोन दोन हजार रुपये अबदालीच्या शाहवलीखान वगैरे चार वजीरांसाठीं त्यांच्या लश्करांत पाठवून जाबसाल केला व एक घटका रात्र झाल्यावर उठले.

आज जहानखानानें सुरूरखान, नजीबखान, याकूब अलीखान यांसह सफदरजंगाच्या हवेलींतून दारा शुकोहच्या हवेलींत जाऊन व तिच्या दरवाज्यावर बसून बादशाही हत्तीखान्यां-तील पन्नास हत्तीणींची पाहणी करून त्या अबदालीच्या लश्करांत पाठवून दिल्या आणि एक प्रहर चार घटका दिवस आल्यावर तो इतरांसह तेथून स्वार होऊन किल्ल्यास आला.

तेथें बादशाही सिले (कूर) खान्याच्या कोठ्या उघडून पहाणी केली. तेथें असलेले चिलखत, समशेर, कपडे वगैरे आपल्या घरीं पाठविण्याविषयीं सांगून स्वतः तोरगढास गेला आणि दारूचीं पोतीं पाहून दीवाने आममध्यें आला. तेथें अबू जाफरखान पेशकार खानसामा याच्या मागणीप्रमाणें निरनिराळ्या कारखान्यांचे कागद पुढें आणले होते ते पाहून दोन प्रहर तीन घडी दिवस गुदरल्यावर किल्ल्यांतून स्वार होऊन स्वतःच्या डेऱ्यास आला. समसामुद्दौला व शोलापुरी बेगम यांजकडून आलेल्या अन्नानें जेवण केलें. नंतर त्याच्या बोलवण्यावरून तेथें जमलेले निअमतुल्लाहखान, समसामुद्दौला, खानाझादखान, इनायत-खान व इतर यांशीं जबासाल करण्यांत गुंतला.

आज सकाळीं शाहवलीखान इमादकडे येऊन इन्तिजाम, सय्यिद नियाझखान, सय्यिद जमीलुद्दीनखान, बसंतखान वगैरे इमादचे साथी यांशीं जाबसाल करून इमादचा साथी बहादुरखान यास अबदालीकडे घेऊन गेला. हिसार व नारनोळ या जिल्ह्यांच्या बंदोबस्तासाठीं शाहाकडून त्याची नेमणूक करवून आणि त्याच्या बरोबरच्या १३ लोकांना प्रत्येकी त्रिविध पोशाकानें गौरवून निरोप दिला. नसरखान नांवाच्या सरदारास दोन हजार शाही स्वारांसह त्याच्या तैनातीस दिले. तेव्हां दोघांनीं अबदालीच्या फौजेंतून कूच करून रूहुल्लाहखानाच्या सराई पलीकडे डेरा दिला. तसेंच शाहवलीखानानें इमादकडे येऊन त्याच्या उबैदुल्लाहखान, मिहदी कुलीखान वगैरे सोबत्यांशीं जाबसाल केला. नसकची पाठवून दिल्लीहून नियाझखानास बोलावून आणलें. त्याशीं जाबसाल करून एक घडी रात्र झाल्यावर स्वतःच्या डेऱ्यास गेला.

नजीबखानाकडील पैसेवसुलीचें काम तूर्त तहकूब केलें आणि सुरूरखान यास शहरची तहसीलदारी, गुलाम मुहीउद्दीनखानास त्याची नायबी आणि मिहदी कुलीखान व किशनचंद यांस अमीनी मुकर्रर झाली. तेव्हां उपर्युक्त तिघे (चौघे ?) व शाही साहुकार गुल मुहम्मद दिल्लीस आले.

शाहवलीखान अबदालीच्या बोलावण्यावरून त्याजकडे गेला व भेट घेऊन त्यानें दोन अशरफी नजर केल्या. अबदालीनें कृपाचिन्ह म्हणून त्यास एक कुडतें व एक शाल आणि बरोबरच्या प्रत्येकास एकेक कुडतें व भेटीस आलेला खालिक दर्दीखान मिंगबाशी यास एक कुडतें व एक शाल दिली.

राजा बापू पंडित राय भोगचंद याच्या हवेलींत रहात होता. असें म्हणतात कीं, शाहवलीखान व याकूब अलीखान यांच्या मार्फतीनें त्यानें अबदालीची भेट घेऊन पाच अशरफी नजर केल्या आणि शादिलखान व बरखूरदारखान अर्जबेगी यांच्या मार्फतीनें अर्ज केला व त्यांत बालाजीरावाच्या विकालतीच्या शर्ती लिहिल्या कीं, माझे मालक जो कोणी हिंदुस्थानच्या गादीवर बसतो त्याजपासून मुलखाची चौथ [घेतात ?]. उपर्युक्त राजाचे पंधरा स्वार जयसिंगपुऱ्यांतून राजाकडे येत होते. त्यांची मरहूम सादुल्लाह-खानाच्या आवारामध्यें अबदालीच्या लोकांशीं लढाई होऊन दोन मराठे जखमी झाले

आणि अबदालीच्या लोकांनीं मराठ्यांचे पाच घोडे पळविले. दुसरे दिवशी बालाजीरावाचा वकील बापू पंडित यानें अबदालीस अर्ज केला कीं, माझे मालक दोन लाख स्वारानिशीं चाकरीस हजर आहेत. अबदाली म्हणाला, ' हा काफिर खोटें बोलतो हाकलून द्या याला' तेव्हां उपर्युक्त पंडित भय खाऊन किशनचंदाच्या घराचा आश्रय घेऊन बसला आहे. आतांपर्यंत बंगशचा वकील किशनचंद यानें इमादच्या भीतीनें बापू पंडिताच्या घराचा आश्रय केला होता. आतां अफगाणांच्या वकीलीमुळें आणि बाता मारणें व खोटें बोलणें यामुळें किशनचंदानें अबदालीच्या गोटांत देखावा उत्पन्न करून तो बापू पंडिताचा आश्रय बनला होता. बापू पंडित रकम वगैरे जें कांहीं सांगतो तें तो आणून देतो. बापू पंडितानें भीति खाल्ली आहे व गर्भगळित झाला आहे. त्याच्या बंधूंनीं त्यास पुष्कळ सांगितलें कीं, तेथें राहूं नये; पण वेडेपणामुळें तेथें राहिला. उपर्युक्ताचे बंधू पुरुषोत्तम व दामोदर हे बायकामुळें व समशेर बहादुरासाठीं हुजूरकडून एक लाखाचें जवाहिर घेऊन झाशीकडे गेले आहेत. त्यांनीं अंताजी माणकेश्वरास खबर दिली नाहीं.

[जु.] ३ जवल ६ } **४** { श. १६७८ माघ शुद्ध ७ / इ. १७५७ जानेवारी २७

ता. ६ जवल सन ३ या दिवसाच्या दिल्लींतील खबरा.

अबदाली वजीराबादेजवळ मौजे तुमरपूर येथें मुक्काम करून आहे. इमाद, जमीलुद्दीनखान, उबैदुल्लाहखान वगैरे इमादचे मित्र तेथें आहेत. काल पाच घटका दिवस राहिला असता मीरंजीखान, निअमतुल्लाहखान, अमीनुद्दीनखान, हयातुल्लाहखान, मीर कुतबी यांसह जहानखान सफ्दरजंगाच्या नवीन हवेलींतून स्वार होऊन घोडे, हत्ती, बैल, उंट वगैरे तोषकखाना व जवाहिरखाना व शिलेखाना वगैरेंतील जिन्नस बादशाहाकरितां उपर्युक्त सरदारानें पाहून वेगळे करून ठेविले होते ते बरोबर घेऊन अबदालीकडे गेला. ते जिन्नस पोंचविले व उपर्युक्तांची अबदालीशीं भेट करविली. तेव्हां मीरंजीखानानें कुराणाची एक प्रत व इतरांनीं अशरफी नजर केल्या. अबदालीनें प्रत्येकावर कृपा केली आणि उपर्युक्त सरदारांस सांगितलें कीं, आलमगीर बादशाहास दिल्लींतून घेऊन यावें. तेव्हां सरदार तेथून निघून एक घटका रात्र होण्याच्या वेळीं किल्ल्यांत आला, आलमगीरच्या घराच्या देवडीवर जाऊन उभा राहिला आणि खाजा सराच्या मार्फतीनें अर्ज केला कीं, मला अबदालीनें तुमच्याकडे कामासाठीं पाठविलें आहे. तेव्हां बादशाह देवडीवर आला. सरदारानें मुजरा करून व हात बांधून उभे राहून अबदालीच्या हुकमाप्रमाणें विनंती केली कीं, हिंदुस्थानचे राज्य तुम्हालाच असो आणि अबदालीनें पाठविलेली कुराणाची प्रत बादशाहास नजर केली. तेव्हां बादशाहानें ती शिरसावंद्य करून परमेश्वराचे आभार मानले. नंतर सरदारानें विनंती केली कीं, भेटीकरितां अबदालीनें बोलाविलें आहे.

बादशाहानें सांगितलें कीं, उद्यां मुलाखतीसाठीं स्वार होतों. सरदारानें रात्र किल्ल्यांत घालविली आणि एकेक नसकची लहान-मोठ्या लोकांना बोलाविण्यासाठीं पाठऊन कळविलें कीं, उद्यां सकाळीं सरकारस्वारीसाठीं येऊन हजर व्हावें.

आज सकाळीं म्हणजे तारीख ६ रोजीं आलमगीर बादशाहानें उठून नित्यकर्म करून स्वारीची आज्ञा केली व आपण असद बुरजावरील झरोक्याचे खालीं येऊन हजर झाला. बादशाह खासा पोशाख घालून देवडीवर आला तेव्हां जहानखान, मीरंजीखान, समसामुद्दौला, सय्यिद नियाझखान, मीर फखुद्दीनखान, मीर बकाखान, मीर हयातुल्लाह-खान, मुजफ्फर हुसैनखान, मीर कुतबी, खानाझादखान, अमीनुद्दीनखान, नियमतुल्लाह-खान, याकूब अलीखान, नजीबखान, जुगुल किशोर वगैरे आले व त्यांनीं मुजरा केला. बादशाह सहा घटका दिवस आल्यावर ऐश महालाच्या देवडीवरून शृंगारलेल्या उंटावर स्वार होऊन अबदालीच्या लश्कराजवळ गेला. तेथें शाहवलीखान वगैरे चार वजीर बाद-शाहाच्या स्वागताकरितां आले होते. प्रत्येकानें हात बांधून मुजरा केला. एक प्रहर दोन घटका दिवस आल्यावर बादशाह अबदालीच्या डेऱ्यास गेला. तेव्हां अबदाली मसनद सोडून कांहीं पावलें पुढें आला व त्यास आलिंगन देऊन दोघे जण मसनदीवर बसले. बोलावल्याप्रमाणें तेथें येऊन इमाद, खानखाना व मीरंजीखान यांनीं मुजरे केले. सुमारें सहा घटका आपसांत जाबसाल होऊन नंतर अबदालीनें जरीचें एक कुडतें व एक टोपी, एक शाल, एक जीगा, साजासह एक विलायती घोडा आलमगीर बादशाहास नजर केला आणि म्हणाला कीं, ‘ हिंदुस्थानचें राज्य तुम्हांकडेच राहूं द्या ’ नंतर खानखानाकडे विजारत मुकरर केली आणि एक कुडतें, एक मंदील, एक शाल, एक फोता व एक पिशवी त्यास देऊन आणि मीरंजीखानास वकील–इ–मुतलक पद व हिरव्या किनखापाचें एक कुडतें देऊन दिल्लीस पाठविलें. मग बादशाह आपले चाकर व खानखाना यांस बरोबर घेऊन आपल्या डेऱ्यास आला. तीन प्रहरानंतर जामे मशिदींत जाऊन आसार शरीफाचे दर्शन घेतलें. सहा घटका दिवस राहिला असतां नमाज पढून चलाख उंटावर स्वार होऊन लाहोरी दरवाज्यानें दीवाने खासमध्यें आला. तेव्हां बरोबरच्या प्रत्येकानें आदाब केला. नंतर थोड्या वेळानें बादशाह हयातबक्ष बागेंत गेला. तेथील दरग्याची प्रार्थना करून बागेंत हिंडला. खानखाना, समसामुद्दौला वगैरे लहान मोठे उमराव तेथें आले. इमाद, जमीलुद्दीनखान, अब्दुल्लाहखान वगैरे स्वतःच्या सोबत्यांसह अबदालीच्या लश्करांत शाहवलीखानाच्या डेऱ्यांत आहेत.

जु. ३ जवल ९	५	श. १६७८ माघ शुद्ध १० इ. १७५७ जानेवारी ३०

जु. ३ रखर २७ ते जवल ९ पर्यंतच्या दिल्लीच्या हकीकती.

ता. २७ रखर या दिवशीं इमाद, इन्तिजामुद्दौला, भावासह उबैदुल्लाहखान, बहा-दुरखान, बसंतखान, जमीलुद्दीनखान, इत्यादि सर्व अबदालीच्या भेटीसाठीं फौजेसह त्यांचा

वजीर सोनीपत पलीकडे होता तेथें त्याच्या डेऱ्यांत जाऊन राहिले होते व त्याजकडून आलेलें जेवण करून बसले होते. नंतर शाहवलीखानानें या प्रत्येकास निरनिराळें ठेवलें होतें आणि त्या दिवशीं व रात्रीं प्रत्येकाचें अबदालीबरोबर बोलणें होऊन दुसरे दिवशीं म्हणजे ता. २८ रखर रोजीं अबदाली सोनीपत पलीकडून कूच करून मौजे मरोठ व नरेला यांमध्यें मुक्कामास आला असतां तीन प्रहरीं शाहवलीखानानें इमाद, इन्तिजाम वगैरेंस भेटीसाठीं आपल्या बरोबर घेऊन व हात बांधून प्रत्येकास अलग अलग दर्शन करविलें. तेव्हां उपर्युक्त दोघांनीं अनुक्रमें १०१ व १२१ मोहरा नजर केल्या. नंतर एक तास रात्र होईतों प्रत्येकाशीं खलबतें झालीं. नंतर इमाद वगैरे शाहवलीखानासह तेथून उठले. तेव्हां शाहवलीखानानें प्रत्येकास अलग अलग स्वतःचे घरांत राहविलें. नंतर अबदालीच्या नसकचींनीं शेरजंगास शहरांतून आणिलें होतें त्यास शाहवलीखान अबदालीच्या दर्शनास घेऊन गेला. अबदालीशीं जाबसाल झाल्यावर त्यास स्वदेशी रिवाजाप्रमाणें कृपा म्हणून पंचविध पोशाक व घोडा मिळाला व शहरांत जाण्याची अनुज्ञा मिळून तो परत शहरांत आला.

ता. २९ रोजीं अबदालीनें अब्दुल अहदखान व नासिरखान यांस नसकची स्वारांसह दिल्लीस जाण्यास सांगून फर्माविलें कीं, शहरांत जाऊन कोणी कोणास इजा न करील अशा तऱ्हेची व्यवस्था करा. त्यांनीं काजी, कोतवाल, मुफ्ती, खतीब यांना बोलाविलें. मग ते सर्व जमातीसह शुक्रवारचे नमाज व अबदालीच्या नांवें खुत्बा पढले. नंतर उपर्युक्त लोकांनीं कोतवाली चबुतऱ्यावर जाऊन जुलूम-जबरदस्ती विरुद्ध ताकीद केली.

नजीबखान रोहिल्यानें सरदार जहानखानामार्फत अबदालीचें दर्शन घेतलें. त्यानें कृपेचें प्रतीक म्हणून पंचविध पोशाख व जडावाचा सिरपेच देऊन त्याजकडे शहरची वसुली व किल्ल्याची बंदोबस्ती सोपविली. त्याप्रमाणें नजीब तेथून निघून शहरास आला आणि दारा शुकोहाच्या हवेलींत राहिला. नंतर बरोबर आलेल्या अबदालीच्या नसकचींना किल्ल्याच्या दरवाजावर पाठवून त्यांस सांगितलें कीं, किल्ल्यांतून बाहेर जाणाऱ्याचा झाडा घ्यावा व आंत कोणास जाऊं देऊं नये. नसकची त्याप्रमाणें करूं लागले. किल्ल्यांत असलेले सैफुद्दीन मुहम्मदखान, सय्यिद नियाझखान, मस्ऊदखान, समसामुद्दौला, निजावयाच्या खोलींत असलेल्या आलमगीर बादशाहाकडे गेले आणि त्याच्या बायकामुलांना त्यांनीं असद बुरजांत नेऊन ठेविलें. नंतर चारी बाजूच्या दरवाजांनीं या बुरजास सुरक्षित करून उपर्युक्त लोक किल्ल्यांतून बाहेर येऊन आपापल्या डेऱ्यास निघून गेले. अबदालीच्या हुकुमाप्रमाणें किल्ल्यांत नजीब व नसकची यांचा बंदोबस्त आहे आणि दीवाने आम व खास यांची तयारी चालू आहे. बातमी आहे कीं, अबदाली तेथून [उद्यां] शोलामार (शालिमार) बागेंत व परवा किल्ल्यांत दाखल होईल. अबदालीच्या फौजेनें वझीराबादेपासून काला पर्वत व तेथून मुहर्रमनगरची सराई व उबैदुल्लाहनगर वगैरेपर्यंत आणि सरदार जहानखान याजबरोबरच्या फौजेनें कसबे बोनी

ते यमुनेपलीकडील बदरपूरच्या थेट समोरपर्यंत डेरे दिले आहेत. नजीबखानाच्या तर्फेनें कुत्बखान रोहिला गला पोचविणें व ठरविलेल्या पैशाची वसूली यासाठीं यमुनेपलीकडील शाहदऱ्यास गेला आहे.

जु. ३ जवल ९ } ६ { श. १६७८ माघ शुद्ध १० इ. १७५७ जानेवारी ३०

जु. ३ जवल ८–९ या दिवसांच्या दिल्लींतील बातम्या.

काल दिवसाच्या अखेरीस मुज्दुद्दौला व अबदुल अहदखान यांनीं विजारतीबद्दल अभिनंदन करण्यासाठीं खानखानाच्या घरीं जाऊन दोन अशरफी नजर केल्या आणि भोजनाचीं नऊ ताटें जहानखान व शाहवलीखान यांजकडे पाठविलीं. अबदाली किल्ल्यामध्यें मोती महल व हयातबक्ष बाग यांमधील जनान्याच्या बंदोबस्ताकरितां राहिला. आलमगीर बादशाह आपल्याच महालांत होता. त्यानें पन्नास ताटें अबदालीच्या मेजवानीसाठीं पाठविलीं आणि बादशाहाची आई मुअज्जमाबादी हिनें २१ अशरफी व... अबदालीकडे पाठविलीं. इमादनें मेजवानीचीं ताटें शाहवलीखानाकडे पाठविलीं.

आज म्हणजे ता. ८ रोजीं अबदाली दीवाने खासमधून घोड्यावर स्वार होऊन दिवाने आममध्ये आला आणि नादिरशाहाप्रमाणें खुर्चीवर बसला. तेथें आलमगीरही आला. अबदालीनें ताजीम देऊन मसनदीवर आपल्या उजव्या बाजूस बसविलें. नंतर शाहवलीखान, जहानखान, बरखूरदारखान, खानखाना, इमाद, समसाम, मीरंजीखान, अब्दुस्समदखानाचा मुलगा, उबैदुल्लाहखान, नजीबखान व इतर हिंदुस्थानी लोक आले व त्यांनीं मुजरा केला. एक प्रहर एक घडी दिवस आल्यावर दोन्ही बादशाह उठून आपआपल्या महालांत गेले.

खानखानानें अर्ज केला कीं, शाही लश्करच्या आगमनामुळें, किल्ला व शहर यांत खूप गोंधळ झाला आहे व गरिबांना त्रास होत आहे. शाही लश्कर दोन चार दिवस येथें राहील तर सर्व शहर उजाड होईल. तेव्हां अबदालीनें तेथें हजर असलेला शहरचा कोतवाल हाजीखान यास बोलावून त्यास व त्याच्या मुलास प्रत्येकीं एक कुडतें व एक शाल देऊन आणि सादतखानास नसकचीबाशींचा दारोगा नेमून ताकीद केली कीं, लूटमार करणाऱ्यांस सजा द्या व शहराचें रक्षण करा. तेव्हां नसकचींनीं पन्नास साठ लुटारूंना पकडून आणून त्यांचे नाक–कान कापून त्यांची धिंड काढली. तरीही बादलपुरा, विठ्ठलपुरा, जसवंतपुरा, कंदाताला, सय्यद सालारचा बाजार, करावलपुरा व जुन्या नव्या शहरांतील इतर पुरे गारद झाले.

खानखाना अबदालीच्या हुकुमाप्रमाणें रेतीमधील (रीती ?) पुलाच्या तयारीकरितां यमुनेवर गेला, ताकीद करून इमादच्या घरीं आला आणि जावसाल करून तेथून

अब्दुल अहदखान व सैफुद्दीन मुहम्मदखान यांसह किल्ल्यांत गेला व ऐश महालाच्या देवडीवर जाऊन त्यानें आलमगीर बादशाहास मुजरा केला. नंतर खालशाच्या दिवाणीच्या चाकरीची तजवीज केल्याबद्दल मुज्दुद्दौला व अबदुल अहदखान यांस वालाबंद देऊन आणि जुगुल किशोर यास सर्फे खासच्या दिवाणीची चाकरी देऊन आपल्या हवेलीस पोहोंचला. तेथें मीरंजीखान, अब्दुल हैदरखान, लुत्फुल्लाहबेगखान, जुगुल किशोर व बंगालच्या सावकारांमधील नगरशेटाचा गुमास्ता रामप्रसाद यांनीं वाटाघाट केली. नंतर अबदालीच्या पेशकशीविषयीं त्याला अतिशय ताकीद झाल्यामुळें तो चिंतातुर झाला. त्यानें पन्नास शाही नसकची स्वतःच्या मंडईच्या रक्षणासाठीं पाठविलें.

खानखानाचा अबदालीसाठीं लिहिलेला हस्बुलहुक्म घेऊन एक लेखक सूरजमल जाटाकडे गेला.

राजा माधोसिंग याचा वकील मीर आफ्ताब पेशावरपासून अबदालीबरोबर होता. आतां माधोसिंगासाठीं पोशाख व जवाहीर देऊन त्यानें त्यास निरोप दिला.

अबदालीनें पाठविलेला एक खाजासरा मुईनुलमुल्कच्या बायकोकडे गेला व त्यानें हुकूम पोचविला कीं, तुम्ही पुढें लाहोरास रवाना व्हावें. तिनें अर्ज केला कीं, येथील नातेवाईक मला निराळे होऊं देत नाहींत, आपल्याबरोबरच शक्य तर येईन. दोन घटका दिवस राहिला असतां स्वार होऊन उपर्युक्त बाई इमादकडे गेली.

आज खानखाना काजी व मुफ्ती यांसह अबदालीकडे जाऊन त्यानें मागविलेले खालसा वतनाचे व सर्फे खासचे महाल यांसंबंधीं कागद गुदरून आला. नंतर मध्यरात्रीपर्यंत अबदालीनें हिंदुस्थानी ताफ्यांचा तमाशा पाहिला. खानखानानें चाळीस जिनगर व पानदान अबदालीकडे पाठविले; शाहवलीखानानें पाठविलेलीं द्राक्षांची एक कुती खानखानाकडे पोचली.

जु. ३ जवल ९	७	श. १६७८ माघ शुद्ध १० इ. १७५७ जानेवारी ३०

जु. ३ जवल ९ या दिवसाच्या दिल्लीतील वातम्या.

दिनारंभीं इमाद, शाहवलीखान, जहानखान, अर्जबेगी, बरखूरदारखान, खानखाना यांनीं दिवाने खासमध्यें जाऊन अबदालीस मुजरा केला.

इमादनें स्वतःच्या घरांत असलेलें ४५ लाखांचें जवाहीर, एक लाख व कांहीं हजार अशरफी यांचा कागद अबदालीस लिहून दिला. तेव्हां अबदाली म्हणाला तुलाही हिंदुस्थानची चाकरी फर्मावितों.

सहा घटका दिवस आल्यावर खानखाना व समसामुद्दौला व खाजा उबैदुल्लाहखान, मीरंजीखान, अबू जाफरखान पेशकार व खानसामा अबदालीकडून निरोप घेऊन ऐश

महालाच्या देवडीवर आले व त्यांनीं आलमगीरला मुजरा करून वाटाघाट केली. इतक्यांत जहानखान, शाहवलीखान, बरखूरदारखान वगैरे उमराव आलमगीरच्या मुजऱ्याकरितां आले व त्यांनीं दोन प्रहरपर्यंत वाटाघाट केली. नसकचींनीं खानखानावर कहर केला कीं, पैसा ताबडतोब सरकारांत दाखल करावा.

इमाद एक प्रहर दोन घटका दिवस आल्यावर अबदालीचा निरोप घेऊन स्वतःच्या हवेलीस आला आणि त्यानें सय्यिद जमीलुद्दीखान, बहादुरखान, मुहम्मद सईदखान, सैफुल्लाहखान, अब्दुर्रशीदखान व याकूब अलीखान यांजबरोबर वाटाघाट केली.

[जु.] २ जखर ८ } ८ {श. १६७७ फाल्गुन शुद्ध ९ / इ. १७५६ मार्च १०

[जु.] २ जखर ८ रोजीं लिहिलेले दोन बंद.

यापूर्वी दरबार, नवाब वझीरुलममालिक बहादुर याचा सरहिंदच्या चकल्यांत मुक्काम होणें, फौजेची पाहणी चालू ठेवणें, नवाब मुईनुल्मुल्क मरहूम याच्या मुलीचें लाहोरहून रवाना होणें व तिच्या आईनें दहेजचा लवाजमा बरोबर देणें, दत्ताजी शिंद्याच्या विनंतीवरून मारवाडांतील रजपुतांचें सल्ला करणें, जोधपूर व नागोर येथील राज्य विजेसिंगाकडे कायम होणें, तसेंच जालोर व मेडतें हीं रामसिंगाकडे कायम होणें, अजमीर सुभ्यापैकीं अर्धे महाल व अर्धे सांभर एकेकाकडे येणें. प्रत्येकास ६,००,००० रुपयांपैकीं निमीनिमी रकम आदा होणें, बल्लू जाटाच्या मुलांनीं दिल्ली भोवतालचे व जवळचे भाग ताब्यांत देणें व दरबारचा इतर वृत्तांत ता. १८ जवल सन २ रोजीं पाठविला तो नजरेखालून गेला असेल.

नंतर बादशाहजादा व नवाब वझीरुलममालिक बहादुर यांच्या लश्कराची हकीकत अशी——नवाबानें शाहजाद्यासह सरहिंद चकल्याच्या मुक्कामाहून सन २ जवल २१ या तारखेस कूच करून लश्करखान सराईच्या अलीकडे चकल्यापासून १२ कोसांवर असलेल्या पायल खेड्यावर डेरा दिला. सतलज नदी येथून सात आठ कोसावर आहे. नदी वरील पुलासाठीं होड्या फर्माविल्या. ता. २५ ला मालेजचा जमीनदार जमालखानाचा मुलगा भिखनखान, खाजा बख्शखान सन्दल अफगाण व शीखांचा जमातदार रणजितसिंग यांनीं बोलाविल्याप्रमाणें फौजेंत दाखल होऊन नागरमल्लाच्या मध्यस्थीनें वजीराची भेट घेतली. प्रत्येकानें ५।५ रुपये नजर ठेवली. प्रत्येकास पोशाख दिला. शीखांना लिहिण्याच्या बाबतींत उपर्युक्त राजास परवानगी दिली.

मुईनुल्मुल्कच्या बायकोनें वजीराची बायको असलेल्या आपल्या मुलीला सरहिंदला पाठवून कमरुद्दीनखान मरहूम याचें व अहमदखान अबदाली अफगाण याजबरोबरच्या युद्धांत जय मिळाल्यावेळीं मुईनुल्मुल्कानें आपल्या बरोबर लाहोरास नेलेलें सर्व जवाहीर आणि त्याशिवाय आपल्या जवळचे जवाहीर आणि किती तरी दहेजचा लवाजमा बरोबर

देऊन स्वतःचे विश्वासू मीर मोमीनखान व खाजा सरा यांस आणि मरहूम हाली-खानाची बायको म्हणजे त्या मुलीची आजी यांस बरोबर दिलें आणि स्वतः लाहोरमध्यें दाखल होऊन तेथील कामांत गर्क झाली.

मुईनुल्मुल्काच्या बायकोनें लाहोर सुभ्याचा नायब नाजिम सिद्दीक बेगखान यास सियालकोट व ईमनाबाद (अमीनाबाद?) वगैरे महालांचा बंदोबस्त व वसूल करण्यासाठीं पाठवून दिलें. अहमदखान...चार लाख रुपये स्वतःकडील व एक...दहेजच्या रूपानें लग्नासाठीं...घ्यावे व द्यावे आणि सालीना एक लाख रुपये बेगमेच्या मुलीच्या भावास सियालकोट वगैरे महालांच्या रकमेंतून काबूल सुभ्याचा तनखा मुकरर केला. त्याप्रमाणें उपर्युक्तानें वरील द्रव्य आणि शिवाय आपल्याकडील चार लाख रुपये दोआबचा फौजदार व सध्या तेथील मुख्त्यार बनलेला आदिनाबेगखान याजवर तनखा [म्हणून] लिहून पाठविला.

बेगमेची मुलगी लाहोरहून रवाना होऊन लाहोरपासून ३० कोसावर जम्मू पर्वताच्या दिशेस असलेल्या जलालाबाद परगण्यांत आदिनाबेगखानाजवळ आली. आदिनाबेगखानानें स्वागत करून पाहुणचार केला आणि तीस कांहीं दिवस आपल्या-जवळ राहवून घेऊन व आपल्या जवळचा कपडा व जवाहीर आपल्यातर्फे नवाबास नजर करून नवाबाच्या मुलीबरोबर पाठवून दिलें. आणि तनख्याचा पैसा नागरमल्लाच्या मध्यस्थीनें निशा करून पाठवून दिला.

नवाब वझीरुलममालिकानें आदिनाबेगाजवळून बेगम रवाना झाल्याचें ऐकून फौजेपैकीं जौहर वगैरे लोकांना तीस आणण्यासाठीं पाठविलें आणि त्याप्रमाणें उपर्युक्त गृहस्थ सन दोनमधील जवलच्या शेवटच्या तारखेस......सतलजवर पोहोंचले. उपर्युक्त नवाबानें जखरच्या एक तारखेस सय्यिद जमीलुद्दीनखान, बहादुरखान, हकीम इबादुल्लाह-खान, खोजा सआदत, खोजा निसबतखान व स्वतःचे इतर कार्यकर्ते यांस लवाजम्यासह आणण्यासाठीं पाठविलें. ता. २ ला बेगम नवाबाच्या लश्करांत उभारलेल्या निराळ्या डेऱ्यांत दाखल झाली. नवाबापुढें गुदरण्यासाठीं तिनें नजराणा आणला असून तो ती कसा गुजरते त्याची हकीकत पुढें कळवीन.

दोआबचा फौजदार आदिनाबेगखान यानें कित्येक वर्षांत सरकारची पेशकश न दिल्यामुळें त्याजकडे तीस लाख येणें निघत होतें. याविषयीं नागरमल्लामार्फत जाबसाल चालू होते. खानानें त्यांपैकीं पाच लाखांच्या बाबतींत अर्धें नक्त व अर्धें जिन्नसरूपानें द्यावें असें कबूल करावें म्हणून नवाबानें मुहम्मद तकीखान व शंकर पंडित यांस या बाबतींत खानाकडे रवाना केलें.

मुलतान व ठट्ठा सुभ्यांतील बहुतेक रईस (श्रीमंत) व जमीनदार यांचें नवाबास लिहून आलें कीं, आम्ही बादशाहाचे पिढीजाद नोकर आहों. सध्या संधी व फुरसत

आहे; तरी पादशाहाजादा वालागुहर यासह इकडे आगमन करावें. आम्ही सर्व फौजेसह सेवेस हजर आहों. यामुळें नवाबाच्या मनांत आहे कीं, प्रथम लाहोर सुभ्यांत जाऊन व कांहीं महत्कार्य योजून आपलें नांव करावें.

[जु.] २ जखर ८ } ९ { श. १६७७ फाल्गुन शुद्ध ९ इ. १७५६ मार्च १०

ता. ८ जखर सन २ च्या अखबारांतील शेषाचा दुसरा बंद.

शेरजंग व खानखानान बहादुर शाहजाद्याबरोबर आहेत. पण खानखानान बहादुर, आपली भावजय अर्थात् मुईनुल्मुल्काची बायको हिनें कमरुद्दीनखानाजवळचें सर्व जवाहीर वझीरुलममालिकास दहेज म्हणून दिल्याचें समजल्यामुळें अतिशय नाराज झाला असला तरी असहाय आहे. वझीरुलममालिक याजबरोबर असलेले बादशाही नोकर व तोफखान्याचे हजारी (प्रमुख) रोजमरा न मिळाल्यामुळें आसन्नमरण झाले असून फाके पडल्यामुळें उठून येत आहेत. नवाबसाहेबांनीं ही बातमी ऐकतांच त्यांस आपणांकडे बोलाविलें आणि त्यांचें समाधान करून नागरमल्लावर अठरा हजार रुपयांचा तनखा करून दिला व त्यांतून प्रत्येकास रोजीना आठ आणे द्यावे असें मुकरर केलें. शिवाय फौजेची निगादास्त सुरू आहेच.

अहमदखान व त्याचा प्रदेश यांची बातमी पूर्वीप्रमाणेंच आहे; म्हणजे तो व जहानखान कंदाहारमध्यें आहेत. पण मुलतान व ठठ्ठा येथील जमीनदार ठरलेला पैसा पाठवून देत असतात.

मी मागें मारवाडांतील सल्ल्याची हकीकत कळविली होती. सध्या ती अशी आहे कीं, नागोरचा वेढा उठवून दत्ताजी शिंद्यानें रामसिंगासह अजमीर सुभ्याकडे प्रयाण केलें. बातमी आहे कीं, ते पुष्करास जातील. राजा बिजेसिंग बिकानेर तालुक्यांत आहे. राज्यांतील मुत्सद्दी व मातबर यांच्या मुलांना शिंद्यांकडे ओलीस ठेविलें आहे. हेतू हा कीं, ३० लाखांपैकीं नकद, सोनें व गला मिळून पाच लाखांची तरी भरती त्यांनीं करून द्यावी. अंताजी पंडितही अजमीरच्या जवळ आहे. त्यामुळें नागोरच्या कोटाचे दरवाजे उघडले जाऊन दळणवळण सुरू झालें व धान्य येऊं लागलें.

राजा माधोसिंग जयपूरमध्यें आहे. बिकानेरचा जमीनदार राजा गजसिंग यास दक्षिणेच्या सरदारांच्या तहामुळें समाधान झालें आणि स्वतःचें लग्न कामा येथील जमीनदाराच्या मुलीशीं ठरल्यामुळें घरून निघून तिकडे जाण्यासाठीं ता. २१ जवल सन २ रोजीं जयपुरास पोंचला. हें समजतांच राजा माधोसिंग स्वार होऊन शहराबाहेर

आला आणि त्यानें बिकानेरच्या जमीनदाराची भेट घेऊन वस्त्रें, २ घोडे व जवाहिराचा एक संच देऊन त्याचा सन्मान केला. त्यानें आंबेर व जयपूर यांमध्यें डेरा देऊन लग्नाची तयारी सुरु केली.

राजा बिजेसिंग व राजा रामसिंग यांची मुलाखत करविण्याची तजवीज होत आहे. दोघांमध्यें हाडवैर असल्यामुळें मुलाखतीचा काय परिणाम होतो हें पाहणें आहे. निकाल लागेल तो आपणांस कळवीन.

राजा माधोसिंगानें ता. २१ जवल सन २ रोजीं नारनोल सरकारची फौजदारी खानखानान याकडे असतां त्याच्या बंदोबस्तासाठीं दलेलसिंग राजावत यास रवाना केलें.

सूरजमल जाटानें आज बरेच दिवस झाले मेवात व जाटवाडा यांच्या दरम्यान असलेला आलोर किल्ला हस्तगत करण्यासाठीं आपली कांहीं फौज नेमली होती. तिनें उपर्युक्त किल्ल्यास वेढा घातला. या वेळीं तो किल्ला बादशाही किल्लेदाराच्या ताब्यांत होता...या बातमीमुळें राजा माधोसिंग यानें उधोतसिंग राजपूत यास आलोर किल्ल्यास पाठविलें. दोघांत लढाई होऊन तींत जवळजवळ २०० लोक मरण पावले अगर जखमी झाले. नंतर जाट परत फिरले आणि राजपुतांनीं किल्लेदाराशीं बोलणें करून किल्ला आपले ताब्यांत घेतला. माधोसिंगाची इच्छा आहे कीं, जाटवाडा ताराज करण्यासाठीं दक्षिणी फौज येऊन पोचावी. सूरजमल जाट आपलें वतन भरतपूर येथें आहे. त्याचा मुलगा जवाहिरसिंग यास ताप (कील) आला आहे. यामुळें सूरजमल त्याच्या इलाजांत आहे. कोल सरकारापैकीं यमुनेच्या दोन्ही तीरावरील महाल जाटांच्या ताब्यांत आहे.

[जु.] २ जखर २१ नंतर } १० { श. १६७७ फाल्गुन वद्य ८
इ. १७५६ मार्च २३

श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वीं दरबारचा वृत्तान्त, चकले सरहिंदपासून बारा कोसांवर असलेल्या पायल गांवीं शाहजादा आलीगौहर व वझीरुलममालिक यांचे मुक्काम, वजीरुलममालिकांनीं पाठविलेले शेरजंग, जमीलद्दीनखान व खोजा सआदत मियांखान यांचें ता. २१ जखर सन २ रोजीं लाहोरांत आगमन, वजीराची सासू व मुईनुल्मुल्कची बायको हिची भेट घेतल्यानंतर तीस स्वतःच्या काबूंत आणणें व तिच्या कोठीस मोहोर करणें, तिला वजीराकडे पाठविणें, लाहोर सुभ्याच्या मामलतीविषयीं आदिनाबेगखानाशीं जाबसाल करणें, दत्ताजी शिंद्याचें पुष्कर तलावावर येणें व अजमीर सुभ्यांत ठाणीं कायम करणें, उपर्युक्त सुभ्याच्या सुभेदारीविषयीं राजांच्या वकीलांची समजूत होऊन स्वतःच्या कामाचा निकाल करून घेण्यासाठीं त्यांचें सैन्यांत येणें, तसेंच हुजूरची व बाहेरची इतर हकीकत ता. २१ जखर सन २ रोजीं कासिदाबरोबर पाठविली ती पोचून अवगत झाली असेलच.

आतां राजपुतान्याची हकीकत अशी—राजा माधोसिंग जयपूरमध्येंच आहे. बिकानेरचा जमीनदार राजा गजसिंग याचें लग्न कामाच्या जमीनदाराच्या मुलीशीं ठरल्यामुळें तो स्वतःच्या घरून निघून पुष्कळ दिवस जयपुरास डेरा देऊन राहिला होता. राजा माधोसिंगानें उपर्युक्त गजसिंग, कामाचा जमीनदार हरिसिंघ, किरोलीचा जमीनदार गोपालसिंघ, शाहपुऱ्याचा जमीनदार उम्मीदसिंग याचा भाऊ दीपसिंग, बघरूचा जमीनदार उम्मीदसिंग याचा नातू दानासिंघ आणि इतर रजपूत मित्र यांसह होळीच्या दिवसांत गुलाल व रंग उडविण्याचा खेळ केला व लढाऊ हत्तींच्या जोडीचा खेळ आपल्या हवेलीच्या मागें उपर्युक्तांस दाखविला.

राजा माधोसिंग यास बातमी लागली कीं, दत्ताजी शिंद्याची फौज.. जवळच दोन कोसावर आली असून तिनें आसपासची खेडीं उध्द्वस्त केल्यामुळें बहुतेक खेडीं उजाड झालीं आहेत. जयपूरमध्यें...निरुपाय होऊन दिवाण कन्हीराम यास जाबसालासाठीं शिंद्याकडे पाठविलें. त्यानें पैगाम केला कीं, मुल्ख वैराण करण्यांत कांहींच फायदा नाहीं. सरदारांनीं जाब दिला कीं, अंतस्थ सेवेच्या इराद्यानें तुम्ही दक्षिणी सरदाराचे वाजवी हक्क विसरला आहां...माधोसिंगानें पूर्वींची लिखापढी पाहून खंडणीची निशा करून दिल्यामुळें मराठी फौजेनें जयपूरचा वेढा उठवून पुष्करास गमन केलें. दत्ताजी शिंदे पुष्करावर मुक्कामास असतांना त्यानें अजमीर सुभ्यांतील निरनिराळ्या राजांना आपआपल्या मामलतींचा निकाल लावून घेण्याबद्दल व न घेतल्यास सजा होण्याबद्दल पैगाम धाडले होते. यामुळें आसपासच्या मातबर सरदारांनीं आपापल्या ऐपतीप्रमाणें उण्या अधिक खंडणीची निशा करून दिली व निर्धास्त बनले; पण ज्यांनीं टाळाटाळ केली त्यांवर आपत्ति कोसळली.

राजा अंताजी पंडितानें गेले कित्येक दिवस लुण्यास वेढा घातला होता. तेथील जमीनदारास सल्ला करण्याशिवाय सुटकेचा कोणताच उपाय दिसेना. आतां बातमी आली कीं, त्यानें खंडणीचा निकाल करून घेतला. अंताजीपंतानें प्रत्येकाकडून आपला रुसूम वसूल केला व दत्ताजीच्या बोलावण्याप्रमाणें अजमीरकडे कूच केलें.

बातमी आली कीं, बिजेसिंगानें होळीनंतर तिकडून बिकानेरच्या बाजूस प्रयाण केलें व कांहीं काल तिकडेच मुक्काम ठोकला. नंतर नागोरच्या किल्ल्यांत दाखल झाला. यापूर्वींच तेथील किल्लेदारानें शहराच्या कोटांत व किल्ल्यांत नव्यानें गल्ला वगैरेचा भरणा केला होता व आतां त्यानें बंडाची उठावणी केली. तो नागोरचा हवालदार असतां त्यानें मराठी फौज व बुणगे यांना पाणी मिळे अशा चार विहिरी व नद्या यांत आगीची झाडें तोडून टाकलीं. हेतू हा कीं, मराठी फौज आलीच तर तीस पाणी मिळूं नये.

बिजेसिंगानें आपल्या कित्येक विश्वासू लोकांस राजा रामसिंगाच्या लोकांसह जालोर किल्ला खाली करून रामसिंगाच्या लोकांस आंत जाऊ देण्यासाठीं पाठविलें

होतें. पण तेथील किल्लेदारानें साफ जाब दिला कीं, लढाईशिवाय मी किल्ला देत नाहीं व बिजेसिंगानें पाठविलेल्या लोकांस त्यानें जणूं नजरकैद केलें.

[या पुढील २।३ ओळींचा कागद फाटल्यानें अनुवाद करतां येत नाहीं.]

जु. २ रज्जब १ } ११ { श. १६७८ चैत्र शुद्ध ३ / इ. १७५६ एप्रिल २

दुसरा बंद

जयपूरहून येणाऱ्या कासिदांकडून समजून आलें कीं, बरोबर पाठविलेल्या लोकांत ...किले जालोर... मारावनजी (?) वाघ हाही होता......

वझीरुलममालिकच्या लश्कराची हकीकत अशी—नवाब व शाहजादा ता. १ [रज्जब] पर्यंत चकले सरहिंदहून १२ कोसावर असलेल्या पायल गावीं मुक्कामास होते. नवाब शेरजंग व खोजा सआदतमाबखान हे एक मजल वजीराची सासू व मुईनुल्मुल्काची बायको हिजबरोबर गेले व नंतर लाहोरास परतले. आतां उपर्युक्त दोघे व सय्यिद जमीलुद्दीनखान लाहोरांत मुक्काम करून आहेत. पण त्यामुळें तेथील रहिवाशांना पीडा होत आहे. ते पुन्हा परागंदा होत आहेत. त्यांचा काय मानस आहे हें न कळे. वजीराच्या प्रभावळींतील हकीम इबादुल्लाह यानें आपल्याबरोबर बेगमेस घेऊन लाहोर सोडलें व ता. १७ जखर [२ ऱ्या आलमगीरचा] जुलूस २ या तारखेस दुआबाचा फौजदार जलालावाद परगण्यांत आदीनाबेगखानाजवळ पोचला. खानानें मेजवानीचें साहित्य पाठविलें व स्वतः स्वागतासाठीं पुढें गेला. याच वेळीं बेगमेच्या नोकरांनी तनखा दिल्याशिवाय पुढें जाऊं देणार नाहीं असा हंगामा केला. आदीनाबेगनें ही हकीकत वजीरास लिहून पाठविली. वजीरानें दस्तखत पाठविलें कीं, नोकरांची तलब द्यावी व स्वतःच्या मामलतींत मुजरा घालावी. तेव्हां खानानें नोकरांच्या तनख्याची निशा करून दिली. उपर्युक्त हकीम बेगमेसह—ही वजीराच्या खाजासरांच्या जबरदस्तीमुळेंच निरुपायानें आली होती—आदीनाबेगाचा निरोप घेऊन निघाला व ता. २६ जखर रोजीं एक प्रहर दिवस आल्यावर नवाबाच्या लश्करांत दाखल झाला. वजीर सर्व लवाजमा, कित्येक नोकर व मित्र यांसह बेगमेस कांहीं कोस सामोरा गेला आणि बेगमेची स्वारी जवळ येतांच त्यानें पायउतारा होऊन तिजपुढें पाच रुपये नजर गुदरली. नंतर राजा नागरमल, बहादुरखान वगैरेंनीं ऐपतीप्रमाणें नजर गुदरली. वजीरानें बेगमेस आपल्या डेऱ्याजवळ दुसऱ्या डेऱ्यांत उतरविलें.

आदीनाबेगकडून...राजा नागरमल...आहे कीं, नवाबानीं सतलज नदी उतरून लाहोरास जावें. उपर्युक्त खानाकडे लाहोरचा मुकद्दमा असल्यानें नवाब सतलज उतरेपर्यंत वाट पहावी व लागलीच आजवर ज्यांशीं त्याचा सुलूख आहे अशा बंडखोर शीखांवर घसरावें आणि नवाब लाहोरास पोचेतों त्यांचा काटा काढावा. उपर्युक्त खानाच्या चिठ्या

अबदालीच्या सरदारांस गेल्या आहेत. शीखांवर घसरल्याची बातमी येतांच त्यांचा फौजही येईल.

पूर्वी वजीरानें चकले सरहिंदची फौजदारी सिद्दीकबेगाकडून काढून लक्ष्मीनारायण यास दिली होती; पण नंतर ती परत सिद्दीकबेगास बहाल करण्यांत आली. आतां ता. २९ जखर जु. २ रोजीं ती मुहम्मद अताखान याचा भाऊ मुहम्मद सईदखान यास बहाल केली...व पोशाख दिला. हकीम इबादुल्लाहखान यास पानीपत व सोनीपत... आणि चकले हिसार......ची फौजदारी........

आदीनाबेगखान......लिहून न आल्यामुळें सिद्दीकबेगखान......दिसत नाहीं व दिल्लीचे दौलतीच्या स्तंभांच्या उपाययोजनेवर भरवसा......दाखवितात. दुसरी बातमी अशी आहे कीं, लोहारला जात आहेत. शिपाई लोकांस मोठ्या त्रासानें अर्धा रुपया रोजीना मिळत आहे.

हजरतांची हकीकत अशी—बादशाहाचा मुक्काम किल्ल्यांतच आहे. वेळोवेळीं सैर-शिकारीसाठीं शहराबाहेर एखाद्या बागेंत जातो. नवाब सईदुद्दीनखान खानसामा व वजीराचा नायब दिवाण समसामुद्दौला अमीरुल उमरा स्वतःच्या लहानशा जमेतीसह बादशाहाच्या सेवेस हजर असतात. सध्या बादशाहानें ता. २८ जखर जु. २ रोजीं अअत-बारखानास रानगद्ध्यांच्या रथांत बसवून वजीराकडे पाठविलें. बादशाहाच्या आईनें वजीरास लिहिलें कीं, तुम्हांस भेटण्याची अनिवार इच्छा आहे. लिहून पाठविल्यास येथून निघून ताबडतोब तेथें येते. जवाबाची वाट पहात आहे.

बादशाहानें जु. २ जखरच्या शेवटच्या तारखेस पेशखाना पाच हत्तींवर लादून नवाबास भेटण्याच्या उद्देशानें...रवाना केला. खानसाम्यानें हुकुमाप्रमाणें सरकारी तोफखान्याच्या तयारीसाठीं पंधरा हजार रुपये जलालुद्दीनखान दारोगा याच्या सुपुर्द केले...समजत नाहीं कीं, अशा स्थितींत बादशाहाचें कूच कसें होईल. किल्ल्यामध्यें पूर्वीप्रमाणेंच वजीराचा पूर्ण बंदोबस्त आहे.

ता. २२ जखर जु. २ रोजीं नवाब सईदुद्दीनखान खानसामा यानें स्वतःच्या लोकांस बादशाहकुलीखान—हा मलिका जमानीचा चेला व लहानपणापासून तिच्या महालांत वाढला होता—याच्या डेऱ्यास पाठवून त्यास कैद करून आणलें. बादशहाचे खाजासरा त्याच्या डेऱ्यास गेले व त्यांनीं त्याचा डेरा जप्त करून आणला. या पूर्वीच मुहम्मदशाहाच्या मुलीच्या निक्यामुळें...बादशाही नोकर नाखूश झाल्याची हकीकत वजीरास लिहिली होती. याबाबत खानसामा व अमीरुल उमरा यांनीं...यांस पुष्कळ समजाविलें व वजीराचेंही लिहून आलें कीं, मलिका जमानीच्या मर्जीखेरीज इतर कांहींही करूं नये. म्हणून बादशाही चाकरांनीं बादशाहबीबीचा निका रहित केला आहे. झिका-रियाखानाचा मुलगा व कमुद्दीनखानाचा नातलग विजेखान यानें कित्येक दिवस संन्यास घेऊन फकीरीचीं वस्त्रें धारण केलीं होतीं. आतां ता. २४ जखर जु. २ ला राजा

बापूजी पंडिताच्या डेऱ्याला…२ मोहरा ओवाळल्या. वजिरानें ६ कपड्यांचीं वस्त्रें देऊन निरोप दिला…. महलदारखानाच्या शिवारांत तंबूदाखल झाला.

जु. २ रजब ३ } १२ { श. १६७८ चैत्र शुद्ध ५ / इ. १७५६ एप्रिल ४

…………………………

बापू पंडित दिल्लीपासून………असलेल्या महलदरखानाच्या मुहल्ल्यांतून निघून……पोहोंचला……शेवटच्या तारखेस…… सांबळीस पोहोंचला राव दामोदर पंडित कदाचित राजा……ताब्यांत घेईल, या बातमीनें राव दामोदरनें ता. ३ रजब जु २ रोजीं……नदी ओलांडली. धोंडाजी नायक यानेंही नदी ओलांडली व तो त्या रावांकडे गेला. सुगीचे दिवस आहेत व परमेश्वराच्या कृपेनें पुष्कळ धान्य आलें आहे. यामुळें त्याचा इरादा असा आहे कीं, पुष्कळ वसूल करून सरकारकडे पाठवावे व त्यांना खूष करावें. पुरुषोत्तम पंडित यास शहरांत सोडलें.

सुरजमल जाटाची हकीकत अशी–आतांपर्यंत आल्वरचे किल्ल्यांत राहून तेथील साठा व इतर गोष्टींची तयारी करीत आहे व फर्रुखनगराचा जमीनदार कामगारखान बलोच याशीं संबद्ध अशा कोट कलान महाल आणि जज्झर परगणा यांत स्वतःचे लोक पाठवून तेथील वसूल करण्याची इच्छा करीत आहे. त्याचा इरादा आहे कीं, गोडीनें फर्रुखनगर ताब्यांत घ्यावें. पूर्वींप्रमाणें यमुना नदीच्या दोन्ही तीरांवरील कोल व इतर महाल व अकबराबाद सुभा यांत जाटांचीं ठाणीं बसवून शांतपणें वसूल करावा. नजीबखान रोहिल्याचा सहारणपूरच्या फौजदारी भागांत मुक्काम आहे आणि सिकंदराबाद चकला त्याच्या ताब्यांत आहे.

मरहूम सफदरजंगाचा मुलगा शुजाउद्दौला याची हकीकत अशी–ता. १३ जखर जु. २ पर्यंत चुनारगडजवळ त्याचा मुक्काम होता. त्यानें सदरहू किल्ला बनारसचा फौजदार व जमीनदार बळवंतसिंग याजकडून ताब्यांत घेऊन तेथें स्वतःचा किल्लेदार नेमला. तेव्हां त्या जमीनदारानें गंगा ओलांडली व लतीफपुरांत……घेतलें होतें. यामुळें उपर्युक्त नबाबही……यांनीं हें ऐकून लढण्याची शक्ति व……या कारणानें उपर्युक्त नबाबानें स्वतःचे ठाणें त्या ठिकाणीं कायम……ही बाजू उघडली. सय्यिद नजाबत-अली वगैरे सरदार बरोबर आहेत.

शुजाउद्दौला……मरहूम राजा अमीरखानाचा पुतण्या बकाउल्लाखान यास…… उपर्युक्त खानानें कबूल केलें नाहीं. तो म्हणाला कीं, कोरा जहानाबादच्या फौजदारींत दखल करवून द्यावी. त्याप्रमाणें उपर्युक्त नबाबानें कबूल केलें कीं……वेळ मिळाल्यावर……दखल करवून तुमच्या ताब्यांत देईन.

बंगालचा सुभेदार नवाब महाबतजंग बहादूर याचा मुर्शिदाबादेस मुक्काम आहे. अलीकडे त्याची प्रकृति बरी नव्हती. पण परमेश्वरी कृपेनें आतां प्रकृति पूर्ण सुधारली.

शाहजहानाबादचे पुष्कळ लोक मुर्शिदाबादेला गेले. या बातमीनें उपर्युक्त नबाबानें परिस्थित्यनुसार प्रत्येकास दररोजचा शिधा (अन्न) ठरवून दिला.

ताजपूर पूर्णियाचा फौजदार सवलतजंग महाबतजंग बहादुराचा...होता. तो ता. २७ जवल जु. २ रोजीं मरण पावला. उपर्युक्त नवाबानें त्याच्या थोरल्या मुलाला मरहूम नवाबाचें शौर्याबद्दल पत्र लिहून त्याचा वारस केले......पूर्वीप्रमाणें चाकरी, मनसब, जागीर यांच्या सनदा हुजूरकडून करून पाठविल्या. अलीकुलीखान साबोटे कित्येक दिवसांपूर्वी शुजाउद्दौल्याकडून बोलणीं करण्यासाठीं हुजूरकडे आला होता. मरहूम सादतखानाच्या हवेलींत रहात असे. तो जु. २ रजब १ तारखेस मरण पावला सरकारनें त्याची संपत्ति जप्त करण्यासाठीं लोक नेमले होते. त्याच्या नोकरांनीं उत्तर दिलें कीं,... नंतर राहिलेली जप्त करावी.

जु. ५ रखर १८ } १३ { श. १६८० मार्गशीर्ष वद्य ५
इ. १७५८ डिसेंबर २०

ता. १८ रखर जु ५ पर्यंतचे दोन बंद व एक तुकडा 'श्रीमंतांचे कुशल असो.

या पूर्वी दरबारचा अखबार, शाहजहानाबादेच्या हकीकती, हजरत बादशाह व वजीरुल्ममालिक यांचें मुहम्मद अमीनखान भट्टी याच्या भट जिल्ह्यांतून निघून कूच दर कूच शहरांत समाविष्ट अशा तालकटोऱ्याच्या बागेंत ता. १८ रवल जु. ५ ला दाखल होणें. उपर्युक्त वजीराच्या मुलाखतीसाठीं राजा अंताजी पंडित माणकेश्वर यानें राजा नागरमल्लासह जाणें, सुरजमल जाटाचा मुलगा जवाहिरसिंग यांची दारुलखिलाफतीच्या आसपासचीं ठाणीं उठविणें, मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे यांनीं पाठविलेल्या तुकोजी वगैरे शिलेदारांचें पेशावरांत पोहोचणें, यापूर्वी त्यांचें लाहोर, गुजरात शाहदौला या ठिकाणीं पोचणें, ख्वाजा मीर्झाखान लाहोरच्या नायब नाजिमीबाबत व नसीरखान वगैरे गख्खर (अटक नदीच्या अलीकडील जमीनदार) यांच्यात लढाई होणें, मारवाड वगैरेचा अहवाल व इतर हकीकत ता. २० रवल जु. ५ रोजीं कासिदांबरोबर पाठविली ती नजरेखालून जाऊन तपशील समजला असेल.

त्यानंतरची हकीकत अशी—हजरत व वजीरुल्ममालिक हे तालकटोऱ्याच्या बागेंतून ता. २१ रवल जु. ५ रोजीं शहराकडे परतले. वजीरानें बादशाहास त्याच्या हत्तीमागें खवासींत बसून मोरचेल फिरवीत किल्ल्यांत दाखल केलें व नंतर स्वतः सअदुल्लाहखानाच्या चौकांतील हवेलींत दाखल झाला. दारुलखिलाफतींत असलेल्या अमीरजाद्यांनीं नबाबाची मुलाखत घेतली.

ता २५ रवल जु. ५ रोजीं नागरमल्लानें स्वतःच्या मध्यस्थीनें सूरजमल जाटाच्या उमरावांपैकीं लालसिंगाची नवाबाशीं भेट करविली. त्यानें ५ मोहरा, त्याचा दिवाण हरसिंगानें २ मोहरा व इतर बरोबरच्यानीं रुपये नजर गुजारली. नबाबानें लालसिंगास

सहा कपडे, सिरपेच, जीघा, कलगी, इ...चार कपडे...श्री अवतार बाळासाहेब यास गुजारले. सरकारांनीं दिल्लीच्या कामावर रयतेस त्रास होणार नाहीं व उरलेल्या शहराची खराबी होणार नाहीं असा मनुष्य नेमावा. शहरांतील लोक राजा बापू पंडित व नारोजी शंकर यांचे फार आभारी आहेत. कारण राजानें मनसूर अलीखानाच्या हंगाम्याच्या प्रसंगीं वजीराच्या कुलाहपोशांच्या हातून आणि नारोजी शंकरानें अबदालीच्या प्रसंगीं पुष्कळ-जण शाहजहानाबादेहून पळून झाशीमध्यें गेले होते त्यावेळीं त्यांचें रक्षण केलें व व्यापाऱ्यांस इजा केली नाहीं. यामुळें त्यांनीं त्यास आशीर्वाद दिला व देत आहेत. अंताजी पंडितानें दादासाहेबांस व स्वामीस द्यावयाच्या पैशाचे बाबतींत वजीरुल्म-मालिकास खूप तगादा लावला. यामुळें त्यानें मेहदी कुलीखान, नागरमल, राजा दिलेरसिंघ-यास रोशनजंग बहादूर हा किताब मिळाला होता—व इतर जवळचे लोक यांस वरील प्रकरणाचा निकाल व जाबसाल करण्यासाठीं अंताजी पंडिताकडे पाठविलें. त्याप्रमाणें कांहीं दिवस रदबदल व जाबसाल झाल्यावर शेवटीं बंगालच्या सुभ्यावर चार लाख रुपये आणि दुआब व लाहोर या सुभ्यांवर सतरा लाख रुपये म्हणजे २१ लाख रुपयांचे पर्वाने वजीरुल्ममालिक याच्या मोहरेनिशीं दादासाहेब व स्वामी यांच्या नावानें राजा अंताजी पंडित यांच्या हवाला झाले. उरलेल्या बाकीसाठीं इतर ठिकाणांवर तजवीज होत आहे. आतां या दरबारासंबंधीं......वजीरुल्ममालिक याजकडे श्रीमंत दादासाहेब यांसाठीं व अबदालीच्या दंग्यासंबंधीं ६५ लाख रुपयांची मागणी अंताजी पंडित यानें केली. नवाबानें वचन दिलें होतें. अद्याप पावेतों या प्रकरणाचा निकाल लागला नाहीं. घडेल तें श्रीमंतांना कळवीन.

वजीरुल्ममालिक यानें पूर्वीप्रमाणें शहराच्या कोटाच्या आतल्या भिंतीखालीं नवा खोल खंदक खणून ठेवला होता. सध्या सरदारांचे फौजेचें येणें ऐकून विचारग्रस्त झाला आणि तो नवाब अअतमादुद्दौला कम्रुद्दीनखानाच्या बुरुजापासून यमुनेच्या वाळवंटांत असलेल्या किल्ल्याच्या मुसम्मा बुरजाच्या झरोक्यापर्यंत खंदक करवीत आहे आणि तट व खंदक लौकर पूर्ण करावा अशी सक्त ताकीद आहे; तसेंच यमुनेचें पाणी खंदकांत आणून सोडण्याच्याही तजबिजींत आहे. हेतू हा कीं, कदाचित फौज रेतीच्या बाजूनें आली तर रस्त्यांत अडसर असावा; बिहारीदास नांवाच्या पेशकाराच्या घरीं वजीरुल्म-मालिक मोठ्या थाटानें...

जु. ५ रखर १८ } १४ {श. १६८० मार्गशिर्ष वद्य ५ / इ. १७५८ डिसेंबर २०

ता. १८ रखर जु. ५ पर्यंतच्या दरबारच्या व दिल्लीच्या उरलेल्या हकीकतींचा दुसरा बंद.

बातमी आली कीं, जनकोजी शिंदे हा सेखावत रजपुतांच्या तालुक्यापैकीं कांहींतून खंडणी घेऊन व तेथून कूच करून ता. १३ रखर जु. ५ ला नारनोळपासून पुढें दोन मजलींवर पोहोंचला. आज उद्या पटेलाकडून मुलाखतीची हकीकत येईल.

राजा बिजेसिंग स्वतःच्या जोधपूर गांवीं रहात आहे. त्यानें जनकोजी शिंदे याच्या हुकुमाप्रमाणें मेडतें, जालोर वगैरे महाल त्याबरोबर असलेला अभयसिंगाचा मुलगा रामसिंग यास लिखापढी झाल्यावर दिले. स्वतःच्या मामलतीपैकीं बरीचशी रक्कम हुंडीच्या रूपानें जनकोजीकडे पाठविली व लिहून कळविलें कीं, बाकीच्या पैशाची व्यवस्था करून मागाहून पाठवितों.

वजीरुल्ममालिकाची इच्छा आहे कीं, (मराठे) सरदारांनीं दिल्लीस येऊं नये व बाहेरून त्यांचे मनास येईल तसें निघून जावें. त्याप्रमाणें याबाबतींत नबाब अंताजी पंडितांना सांगत आहे. सहा सहा कपड्यांचे पांच पोशाख, पांच रत्नखचित शिरपेच व जेगे, तलवारी व सतरा दुसरे पोशाख, दत्ताजी व राव जनकोजी शिंदे, नारोजी शंकर व त्यांचे सहकारी यांसाठीं तयार केले आहेत. पोशाख व जवाहीर पाठविणें, राजा अंताजी पंडिताचे सल्ल्यावर अवलंबून आहे; वजीरुल्ममालिकाचा आग्रह आहे कीं, स्वतः जाऊन सरदारांना भेटावें व त्यांना निरोप द्यावा.

लाहोर जिल्ह्याची हकीकत अशी—राजा......लाहोरच्या निजामती बेगखानजवळ ......हजार स्वार व पायदळ मरहूम आदीनाबेग याचा वारस मीर हसन अलीखान व दीनदारखान यांशीं संगनमत करून...ता. ५ रखर जु. ५ रोजीं चिनाब नदीच्या ऐलतीरावरील वजीराबाद परगण्याजवळ त्यांचा तळ आहे. दरमहा एक लाख रुपयांच्या करारानें शीख लोकांना नोकरीस ठेवून त्यांस अफगान गख्खरांच्या टोळीचा बंदोबस्त करण्यासाठीं चिनाब नदीच्या पलीकडे पाठवीत आहेत.

बातमी आहे कीं, खाजा मीर्झाखान व मीर हसन अलीखान यांचे बोलावण्यावरून राव मल्हारजी होळकर व राव जनकोजी शिंदे यांनीं धाडलेले नरसोजी पंडित व तुकोजी वगैरे शिलेदार पेशावराहून लाहोरला जाण्यास निघाले होते. मिर्झा सुलताना बेगम किंवा मुगलानी बेगम म्हणजे मरहूम नबाब मुईनुलमुल्कची पत्नी व वजीराची मामी व आतां सासू उपर्युक्त शिलोदारांच्या मुलाखतीसाठीं लाहोरहून कूच करून गेली. ही बातमी मिळाल्यावर शिलेदार बेगम साहेबांचे देवडीवर आले व सलाम करून नजर केली. तिनें पोशाख व खाजा मिर्झाखानाच्या पत्राप्रमाणें दहा हजार रुपये खर्चासाठीं दिले. (त्यानंतर) उपर्युक्त शिलेदार बेगमेसह लाहोरास पोहोंचले आणि मिर्झाखान व मीरहसन अलीखान यांच्या फौजेंत सामील झाले.

गख्खर अफगाणांची हकीकत अशी—इबादुल्लाहखान याचे जागीं नेमलेला व जंगयारखान याचा भाऊ व अब्दुस्समदखान...या शहरांत...घोडेस्वार व पायदळ यांसह उपर्युक्त...बरोबर...नदीच्या पलीकडे...लाहोरास शीखांच्या बंडामुळें धान्याची रसद कमी मिळते. धान्याचा भाव सहा शेर आहे व तेथील पुष्कळ नागरीक तें ठिकाण सोडून जम्मूच्या डोंगरांत तेथील जमीदार राजा रणजित देव याच्या प्रदेशात जाऊन तेथें सुखानें राहूं लागले.

बेगमांची हकीकत अशी—हजरत नवाब मलिका जमानी बेगम, मुहम्मदशाहाच्या खास बायका व नवाब साहिबा या कंदाहारमध्यें होत्या. त्यांना तैमूर सुलतानानें हिंदुस्थानास रवाना केलें. कंदाहारहून त्यांनीं कूच केल्यावर वाटेंत अबदालीशीं संबंधित अशा ब्रूही टोळ्यांनीं त्यांना लुटलें व त्यांच्या सामानासह आपल्या सरदारांकडे नेलें. त्या मुहम्मदशाहाच्या बेगमा आहेत असें समजल्यावर सरदार देवडीवर आले व त्यांनीं राजशाही पद्धतीनें मुजरा करून बेगमांस नजराणा दिला. “कोणत्याही परिस्थितींत ब्रूही लोकांचे पूर्वज हिंदुस्थानचे मनसबदार व नोकर होते याची तुम्हांस कल्पना नव्हती” असें सांगून त्यांस त्यांच्या गुन्ह्याची माफी केली. मग त्यांनीं बेगमांची सर्व चीजवस्त लुटारूंकडून मागवून त्यांस परत केली आणि मेजवानी म्हणून दहा हजार रुपये दिले व स्वतःचे स्वार बरोबर देऊन काबूलास पोहोंचविलें.

युसुफझई सरदारांनीं मोठ्या अदबीनें मलिका जमानी वगैरेंचा पाहुणचार करून स्वतःचे स्वार पेशावरपर्यंत बरोबर देऊन व अटक नदी पार करून दिलें. दुसऱ्याहि गांवांतले जमीदार व अफगान त्यांचे ठिकाणीं त्यांस सामोरे आले. त्या झेलम नदी ओलांडून ता. ३ रखर जु. ५ ला गुजरात शाहदौला जवळ पोचल्या.

मुगलानी बेगमेनें लाहोरहून सहा हजार रुपयांची हुंडी मलिका जमानीच्या खर्चा-साठीं पाठविली व उपर्युक्त बेगमेनें उपर्युक्त बेगमांस भेटण्यासाठीं ता. ५ रखर जु. ५ ला लाहोरहून कूच केलें. बातमी आहे कीं, लाहोरमध्यें त्या दाखल होतील.

बादशाहास कळलें कीं, मलिका जमानी बेगम व साहिबामहल यांचा अहमदशाह अबदालीशी निका लागला होता. ती व मुहम्मदशाहाची मुलगी बादशाहबीबी यांचा खोजा बसंतखान महली आणि इतर लवाजमा यांसह लाहोरमध्यें राहण्याचा विचार आहे.

शाहजादा आली गौहरची हकीकत अशी—वजीरुल्मुल्क (रुलममालिक) नें ताकीद केल्यामुळें व खरें म्हणजे सरदारांच्या त्रासावरून नजीबखान रोहिल्यानें शाह-जाद्यास उत्तर दिलें कीं, हजरतांचे संरक्षण करण्याएवढी ताकीद आतां मजजवळ नाहीं. मनास येईल तसें करावें. म्हणून शाहजादा ता. २७ रवल जु. ५ रोजीं गंगानदी ओलांडून दारानगरास पोहोंचला व त्यानें कांहीं दिवस तेथें मुक्काम केला. नजीबखान अमरोहा-पर्यंत त्याच्या बरोबर होता. खर्चाकरितां २५००० रुपये त्यास नजर देऊन जु. ५ रखर ११ ला तो परत फिरला. जु. ५ रखर १३ ला संभालमध्यें आला आणि नवाबा-कडे जाण्याचा इरादा त्यानें कायम केला. शुजाउद्दौल्याच्या भेटीस जात आहे अशी बातमी आहे. सध्या एक हजार स्वार व तितकेच पायदळ आणि सय्यिद शहामतखान व हिदायत अलीखान वगैरे बरोबर आहेत.

सुरजमल जाटाची हकीकत अशी—तो भरतपूरच्या किल्ल्यांतून कूच करून मथुरेस आला. तेथें कांहीं दिवस स्नानें केलीं व नंतर तेथून कूच करून अकबराबादेस

पोहोंचला. अकबराबादच्या किल्ल्यातील किल्लेदाराकडे निरोप गेला कीं, " दख्खनमधील फौजेच्या आगमनाची अफवा आहे. मला उचित विश्वास आहे कीं, माझे मुतालीक तुम्ही किल्ल्यांत ठेवून घ्याल. " त्यानें सरळ उत्तर दिलें कीं, किल्ल्याचा दरवाजा बंद आहे......आणि हुजुरांचे हुकुमाशिवाय तुमच्या ताब्यांत किल्ला देणार नाहीं. हल्ला केला तर तोफेचे गोळे सोडीन. ......ता. ११ रखर जु. ५......

जु. ५ रज्जब ३ } १५ { श. १६८० फाल्गुन शुद्ध ५ इ. १७५९ मार्च ३

ता. ९ साबान जु. ५ रविवारीं मिळालें; ता. ३ रज्जब जु. ५ पर्यंतचे चार बंद.

श्रीमंतांचें कुशल असो.

दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या हकीकती, सरदारांचें दिल्लीस येणें, शहरापासून पांच कोसांवर बुराडीमध्यें फौजेचा मुक्काम, तेथें लश्करांत नारोशंकर व साहेबा (साबाजी) पटेलाबरोबर वजीरुल्ममालिकाचें जाणें व राव जनकोजी शिंदे व दत्ताजी पटेल यांच्याशीं मुलाखत होणें, त्यांचेकडून नाखूश होऊन परत येणें, उपर्युक्त सरदारांकडे सल्ल्याच्या जाबसालासाठीं राजा नागरमल्लाचें जाणें व दोघांचें न जमल्यानें उपर्युक्त रावांचें शहराकडे जाणें व घाटावर डेरा देणें...यमुना नदीपासून शेरजंगाची बाग व मुहम्मदखान बंगशाच्या शहराशीं जोडलेल्या हवेलीपर्यंत (जाणें), सादतखानाचे मोर्चे... अफगान...उपर्युक्त खानाची हवेली...कुद्सियाबादेच्या बागेंत कायम होणें, लढाई होणें, वजीरुल्ममालिकाच्या फौजेंतील रिसालेदार...व विजयी तोफखान्याची लढाई; दोन्ही बाजूचे पुष्कळ लोक जखमी होणें व मारले जाणें, सरतेशेवटीं नवाब वजीरानें पाठविलेल्या बैलांकडून अटक वगैरे तोफा व तोफखान्यांतील दारुगोळा ओढून नेला जाणें; नबाब-साहेबांच्या जागिरींतील म्हणून समजल्या गेलेल्या परगण्यांवर हल्ले व तेथील लूट; राजा अंताजी पंडित, जलालुद्दौला व राव पुरुषोत्तम पंडित यांच्या हस्तें निरोप देण्याबाबत नबाबानें मानाच्या ११ पोशाखांचे बस्ते, जवाहिर, घोडे वगैरे पाठविणें आणि ता. ३ जखर जु. ५ ला सरदारांचे वजीराबादेहून बुराडी या अधिक चांगल्या मुक्कामाच्या ठिकाणीं कूच करणें व याच महिन्याच्या चार तारखेस तेथून कूच करणें व शहरापासून बारा कोस अंतरावर डेरा देणें, लाहोरकडे जाण्याचा इरादा, उपर्युक्त सरदारांस उठवून लावण्याचे अटीवर बंगाल सुभ्याच्या व्यवस्थापकाचा वकील राजा रामप्रसाद याजकडून रोख एक लाख व ५० हजार रुपयांची निशा करून घेणें,...गंगानदीच्या किनाऱ्यावर वसलेले...परगणे व इतर कायम करून देणें, वार्षिक तीन लाख रु. वसुलीच्या करनाळ परगण्याचा जागिरीचा अर्धा व त्याशिवाय आपल्या स्वतःच्या निम्या हिश्याचा चौथा हिस्सा राव जनकोजी शिंदे यांचे नांवानें देणें, सूरजमल जाटाचा कारभारी रूपराम कटारा यांचें चार लाख रु. व हुंड्या यांसह शिंद्यांकडे पोहोंचणें, अवधचा सुभेदार

शुजाउद्दौला यानें उपर्युक्त रावांकडे खजिन्यानें भरलेले पांच उंट व इतर देणग्या पाठविणें, त्यानें सरदारांची भेट घेणें व खजिना वगैरे पोहोंचविणें, राजा माधोसिंगानें रनथंभोर किल्ला ताब्यांत घेणें, किल्ल्यांतील तोफखान्याच्या हजाऱ्यांशीं सलोखा करून राजाच्या लोकांचें किल्ल्यांत दाखल होणें, लाहोर, बंगाल, राजपुताना वगैरे व बाहेरील जिल्ह्यांचा अहवाल, एवढें कासिदांबरोबर ता. ५ जखर जु. ५ ला पाठविलें तें आपल्या नजरे-खालून गेलें असेलच.

ता. ५ जखर जु. ५ ला फौजेच्या सरदारांनीं मुक्काम करून वजीरुलममालिकानें पाठविलेलें जवाहीर व पोशाख घेऊन येणाऱ्या राजा दिलेरसिंग व जलालुद्दौला यांस उपर्युक्त महिन्याचे ६ तारखेला नवाबाकडे परत पाठविलें व तेथून कूच करून सरदारांनीं यमुनेच्या किनाऱ्यावर बागपतच्या अलीकडे डेरे दिले. फौजेच्या धुडगुसामुळें सोनीपत व पानीपत परगण्यांतील लोक पळून गेले व त्यांतील खेडीं लुटलीं गेलीं.

सरदारांची हकीकत अशी--दत्ताजी पटेल, साबाजी पटेल व नारो शंकर यांसह राव जनकोजी शिंदे यांनीं बागपतजवळून गणोर व तेथून संभाळका येथें कूच केलें व तेथून दिल्लीपासून ४० कोसावर असलेल्या पानीपतास तळ दिला. व्यापारी व नागरीक पळून गेले होते तरी फौजेनें त्यास वेढा घातला. तेव्हां हवेल्यांचें रक्षण व्हावें म्हणून जवळजवळ ५।६ हजार रुपये मिळाले. कुंजपुऱ्याचा जमीदार निजाबतखान याचा मुलगा (दलील) खान यास दहा लाख रुपये चौथाईची रकम पाठविण्याविषयीं राव जनकोजीचें पत्र आल्यामुळें उपर्युक्त खानानें तेथील नागरीक व स्वतःचे नातेवाईक यांना यमुना नदी पलीकडे नजीबखानाच्या तालुक्यांत पाठवून दिलें व स्वतः लढाईची तयारी किंवा सल्ला या हेतूनें मागें राहिला आणि स्वतःचे वकिलांना बोलणीं करण्याकरितां सरदारांकडे पाठविलें.

वकिलांनीं उपर्युक्त सरदारांशीं बोलणीं केलीं कीं, उपर्युक्त खानानें पूर्वीं ठरल्या-प्रमाणें दादासाहेब व राव मल्हारजी यांना नजराणा म्हणून जे दहा लाख रुपये दिले ते त्याच दृष्टीनें इ. हीं बोलणीं चालू असतां पानीपतहून सरदारांनीं कूच केलें व ते कर्नाळला पोहोंचले. येथून कुंजपुरा जवळ असल्यानें फौजेनें कुंजपुऱ्याच्या किल्ल्यास वेढा घातला. तेव्हां कांहीं दिवस बंदोबस्तानें किल्ल्यांत राहिलेला तेथील जमीदार दलीलखान यानें लढाई दिली. पण लढाईचा व विरोध करण्याची ताकद नसल्यानें व जीव बचावण्यासाठीं तह करण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं असें पाहून उपर्युक्त जमी-दारानें पैसे घेण्याबद्दल निरोप पाठविला. त्याप्रमाणें दोन लाख पंचवीस हजार रुपये पाठविल्यावर तेथील मामला निकालांत निघाला. त्यानंतर राव जनकोजी शिंदे यांनीं साबाजी पटेल यास जवळ जवळ १०।१२ हजार सशस्त्र तरूण घोडेस्वार देऊन लाहोर सुभ्याकडे पाठविलें. त्याप्रमाणें बातमी आली कीं, उपर्युक्त पटेलानें बहीर व बुणगे यांस लश्करांत सोडलें व सडा होऊन तो ता. २५ जखर जु. ५ ला सरहिंदजवळ पोहोंचला.

जु. ५ रज्जब ३ } १६ {श. १६८० फाल्गुन शुद्ध ३
{इ. १७५९ मार्च ३

३ रज्जब जु. ५ पर्यंतच्या दरबारच्या बातमीचा व दिल्लीच्या हकीकतीचा दुसरा बंद.

बातमी आली कीं, कुंजपुऱ्याच्या जमीदाराच्या प्रकरणाचा फैसला झाल्यावर राव जनकोजी शिंदे व दत्ताजी पटेल यांनीं तेथून कूच केलें. ता. २४ जखर जु. ५ ला ते ठाणेसरला म्हणजे कुरुक्षेत्र येथें पोहोंचले; तेथें त्यांचा मुक्काम आहे.

सरहिंद परगण्याच्या फौजदारीचा नायब सिद्दीकबेगखान त्या जिल्ह्याच्या वसुलीसाठीं बाहेर पडला होता. त्यानें राव जनकोजी शिंदे यांची मुलाखत घेतली व सांगितलें कीं, मी उपर्युक्त महालाचा दादासाहेबांनीं नेमलेला नोकर व मक्तेदार आहे. तुमच्या फौजा त्यापैकीं कांहीं प्रदेशावर हल्ले करून लूट करीत आहेत. या पद्धतीनें घेतलेल्या पैशाची समजली असेल तशी माहिती द्यावी. मी दादासाहेबांकडे जाईन व त्यांस सांगेन कीं, तुम्हांस पैसे पाहिजे असतील तर फौजेंतील सरदारांना ताकीद करावी कीं, कोणी खेड्यांची लूट करूं नये. तेव्हां उपर्युक्तांनीं ताकीद केली कीं कोणी खेडीं लुटूं नयेत व ताकीद करूनही कोणी लूट करील तर त्याच्या पोटाचे तुकडे होतील. साबाजी पटेल यांनींही अशीच कडक ताकीद केली. त्यामुळें आतां रयतेस नुकसान किंवा धोका पोहोचत नाहीं. अशी बातमी आहे कीं, ठिकठिकाणी पहारेकरी ठेविले आहेत.

लाहोरची हकीकत अशी कीं शीख गुरूचे लोक त्या भागांत असा गोंधळ (घालीत आहेत)...लूट थांबवीत नाहींत. तेव्हां भीतीनें शहराच्या तटाचे दरवाजे बंद झाले. त्यामुळें धान्य वगैरेची रसद मिळणें कठीण झालें आहे. आणि जवळचा प्रदेशही पूर्णपणें उजाड झाला आहे. या कारणानें महागाई फार वाढली आहे. कांहीं ठिकाणीं ५–६ शेर व कांहीं ठिकाणीं ७ शेर भाव आहे. तेथें जे थोडे लोक राहिलेले आहेत ते भुकेनें ग्रासलेले आहेत.

बातमी आली कीं, लाहोर निजामतीचा नायब ख्वाजा मीर्झाखान यानें लाहोरच्या नागरिकांवर खूप जुल्म केला व मरहूम आदीनाबेगखानाचा उत्तराधिकारी मीर हसन अलीखान याजकडे तो आपल्या भावासह गेला होता. हा खान मीर हसन अलीखानाचा शत्रू होता. याशिवाय लाहोरच्या नागरिकांची तक्रारही होती. यामुळें उपर्युक्त खानानें मीर्झाखान व त्याचा भाऊ यांना काठीनें चोप दिला व त्यांच्या तोंडास काळे फासून जाहीर केलें कीं, जो कोणी निमकहरामी करील व प्रजेस पीडा करील त्यास अशीच शिक्षा होईल. नंतर मीर्झाखानास त्याच्या भावासह कैद करून स्वतःच्या नायबाला लाहोरास पाठविलें व ताकीद केली कीं, कोणी तेथील नागरिकांवर जुल्म करूं नये. शीख सरदारांशींही बोलणीं चालू आहेत कीं, पूर्वींप्रमाणें त्यांनीं नोकरी करावी व लूटमारी सोडून द्यावी. पहावें ते आपली नेहमीची वागण्याची पद्धत सोडतात कीं नाहीं.

मुकर्रबखान व अटक समर्तेतील इतर गख्खर व अफगान व जमीदार यांच्या ताब्यांत चिनाब नदीच्या पैलतीरीं असलेला गुजरात शाहदौला प्रांत होता. वजीराबाद, सोनहरा पुरुसपूर व अम्ननाबाद या प्रांतांत ते वसूल करूं लागले. पण आतां दख्खनचे सरदार दिल्लीला आले व त्यांचा लाहोरकडे जाण्याचा बेत आहे ही बातमी ऐकून तेथें राहण्याचें धैर्य नसल्यानें त्यांनीं गुजरात शाहदौला प्रदेश सोडला. सर्वजण जेहलम नदी उतरून अटक नदीच्या जवळच्या भागांत गेले. सुदैवानें सरकारच्या फौजेचें नांव ऐकून पश्चिमेकडील जिल्ह्यांत कमालीची घबराट निर्माण झाली आहे.

आदीनाबेगखानाचा मेव्हणा मीर हसन अलीखान यानें गख्खर अफगान पळून गेल्याची बातमी ऐकतांच कूच करून तो चिनाब नदीवर आला आणि उपर्युक्त भागांत आपला अमल बसवूं लागला. मराठी फौजेंतील शिलेदार उपर्युक्त खानाबरोबर आहेत. त्यांचा इरादा होता कीं, उपर्युक्त नदी ओलांडून जेहलम नदीपर्यंत जावें.

ठठ्ठा व मुलतान सुभ्यांची हकीकत पूर्वी लिहिल्याप्रमाणें अशी-या दोन्ही सुभ्यांवर खुदादादखान लट्टीचा कारभारी महमूदखान गूजर व त्या जिल्ह्यांतील अफगान नागरिकांचे दाऊदपोत्रे, यांचा ताबा आहे. दादासाहेबांच्या सरहिंद भेटीच्या वेळीं कैद झालेला अबदुस्समदखान याचा मुक्काम मुलतानमध्यें आहे व तो फौज जमवीत आहे. सारांश उपर्युक्त सुभ्यांत तेथील कामाची व्यवस्था पाहील असा कोणी सरदार नाहीं.

अबदालीच्या अफगानांची हकीकत अशी—अबदालीचा मुलगा तैमूर, मीरबक्षी जहानखान, वजीर शाहवलीखान व सरदार यांचा मुक्काम कंदाहारमध्यें आहे. त्यांत आपआपसांत वैमनस्य आहे. आतां बातमी आहे कीं, अबदालीचा दसहजारी सरदार नसीरखान बलोच यानें जहानखानाशीं लढाई केली व तेथून मुलतान जिल्ह्यांत आला होता. पण तैमूर सुलतान व शाहवलीखान यांच्या बोलावण्यावरून परत कंदाहारला गेला. तो बाह्यतः हिंदुस्थानला जाण्याच्या दृष्टीनें फौज जमा करीत आहे. परंतु अबदालीच्या सरदारांच्या वचनभंगामुळें तेथील जमीदार त्याशीं सहकार्य करण्यास तयार नाहींत.

मुहम्मदशाहाच्या खास बेगमा मलिका जमानी व नवाब साहिबा महल या जम्मूचा जमीदार राजा रणजितदेव याजवळ आहेत. खोजा बसंतखान व इतर लवाजमा त्यांचे बरोबर आहे. बेगमांचे खर्चाकरितां राजा देतो....नबाब वजीरुल्ममालिकाला त्यांनीं पत्रें पाठविलीं आहेत कीं, हजरतचा पुतण्या अह्लीमिया याचा मुलगा किंवा अहमदशाहाचा मुलगा मीर्झा हंगा याच्या नांवानें खिलापत केली तर हुजूर भेटीस येऊं; नाहींतर मक्केला जाण्याचा पक्का इरादा आहे. वजीर आपल्या ठिकाणीं खुशाल आहे त्यानें अद्याप कांहीं वाईट केलें नाहीं. तो तरी चांगली वागणूक कां सोडील व राजकुटुंबापैकीं कोणी जवाहर वगैरे दिलें तर त्याचे पैसे दिले जातील अशीही उपाययोजना करीत आहे.

काश्मीर सुभ्याचा नायब सुखजीवनमल यानें तेथील जमीदार व नागरीक यांशीं मिळतें घेऊन तो सुभा बळकाविला आहे.

जु. ५ रज्जब ३	६७	श. १६८० फाल्गुन शुद्ध ७ इ. १७५९ मार्च ३

दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या हकीकती याबद्दलचा ता. ३ रज्जब जु. ५ पर्यंतचा तिसरा बंद.

खालिसा व तन यांचा दिवाण अबदुल अहदखान हुजुराकडून निघून आपल्या लोकांसह लश्करांत गेला होता. अजून तो राव जनकोजी शिंदे यांजबरोबरच आहे. पण त्यानें आपल्या संबंधितांस सामानासह नजीबखानाकडे पाठविलें आहे. नजीबखानानें दारानगरहून कूच करून गंगेच्या किनाऱ्यावरील मीरानपुरास डेरे दिले. त्यानें अबदुल अहदखानाच्या लोकांच्या आगमनाची बातमी ऐकून स्वतः आपला मुलगा जाबिताखान यास त्याच्या स्वागतास पाठविलें. त्यांस वेगळ्या ठिकाणीं ठेवलें व मेजवानीचें सामान पाठविलें. नजीबखानाशीं अबदुल अहदखानाच्या मध्यस्थीनें बोलणीं चालू आहेत.

राव जनकोजी शिंदे यांनीं राजा अंताजी पंडीत व पुरुषोत्तम पंडीत यांस बोलणीं करण्यासाठीं वजीरुल्ममालिक याजकडे पाठविलें आणि सूरजमल जाटाचा कारभारी रूपराम कटारा यासही त्यांजबरोबर पाठविलें. त्याप्रमाणें ता. ११ जखर जु. ५ ला राजा अंताजी पंडितानें वजीराकडे जाऊन त्याची मुलाखत घेतली. रूपरामानेंही राजा अंताजी पंडिताच्या मध्यस्थीनें मुलाखत घेतली व दोन मोहोरा ओंवाळून टाकल्या. रूपरामास चार कपड्यांचा पोशाख मिळाला.

ता. १२ जखर जु. ५ ला हाफिज रहमतखान रोहिला याचा वकील टेकचंद व मुनशी......माल यांनीं वजिराची भेट घेतली व उपर्युक्ताचा खलिता व अशरफी त्यास दिल्या. वकिलास पांच कपड्यांचा व मुन्शीस चार कपड्यांचा पोशाख मिळाला. १३ तारखेस नजीबखान रोहिल्यानें पाठविलेला वकील बख्तावरसिंग व त्याचा जुना वकील मेघराज यांनीं वजिराची भेट घेऊन खलिता देऊन स्वतःतर्फें दोन मोहरा नजर केल्या. बोलणीं झाल्यावर उपर्युक्त वकिलास पांच कपड्यांचा पोशाख मिळाला. १४ तारखेस राव मल्हारजीनें पाठविलेला गणेश पंडित यानें जाऊन वजिराची भेट घेतली व उपर्युक्त रावाच्या पत्रासह एक मोहोर व त्याच्या मुलानें पांच रुपये दिले. वजिरानें चार घटका त्याशीं खलवत केलें व सध्या सरदारांनीं केलेल्या अन्यायाचा जो पुरावा सरदारांकडूनच वजिरास समजला होता तो त्यास सांगितला. नंतर उपर्युक्तास पांच

कपडयांचा पोशाख व रत्नखचित शिरपेच व त्याच्या मुलास चार कपडयांचा पोशाख दिला.

बहादुरगडचा जमीदार बहादुरखान यानें आपल्या कामाचा निकाल झाल्यावर जनकोजीचा निरोप घेतला व तो बहादुरगडाला परतला. ता. १५ जखर जु. ५ ला हुजुराकडे येऊन वजिराची भेट घेऊन हवेलींत दाखल झाला.

सरदारांनीं अटक नांवाची एक व दुसरी एक अशा दोन तोफा एक लाख पन्नास हजाराच्या रकमेच्या ऐवजांत सूरजमल जाटाच्या लोकांच्या ताब्यांत दिल्या आणि दुसऱ्या तोफा व त्यांचे गाडे वगैरे स्वतः बरोबर नेले. राव जनकोजी शिंदे याच्या सांगण्यावरून राजा अंताजी पंडिताच्या लोकांनीं सूरजमल जाटाचा मुलगा जवाहरसिंह याशीं संबद्ध अशा खासीरापर्यंत तोफा पोहोंचविल्या व ते परतले. रूपराम कटाराही वजिराचा निरोप घेऊन रवाना झाला. बातमी आहे कीं, सूरजमल जाट या तोफा, अटक तोफ फार मोठी असल्यानें आलूर किल्ल्यांत ठेवील. ता. १५ जखर जु. ५ ला शाहजादा आलीगौहर अलाहाबाद जवळील झूशी येथें आला आहे. बकाउल्लाखान व मुहम्मदकुलीखान उर्फ मीर्झा कूचक याच्या सोबतचे जमादार आणि शुजाउद्दौल्याकडील मरहूम राजा इंद्रगीरचा चेला हे त्याजबरोबर आहेत. शुजानें शाहजाद्याच्या खर्चासाठीं पैसे पाठविले व त्याचा अजीमाबादेकडे जाण्याचा नक्की बेत आहे. ही बातमी ऐकून वजीरानें शुजाउद्दौल्याचा वकील राजा लक्ष्मीनारायण व मुहम्मदअलीखान जारची यांस बोलावून हुकूम दिला कीं, शाहजाद्यास स्वतःच्या ताब्यांत घ्यावें व अजीमाबाद उर्फ पटणा येथें जाऊं देऊं नये असें पत्र शुजाउद्दौल्यास पाठवावें.

वजिराचा खर्च वस्तुतः बंगाल सुभ्याच्या उत्पन्नावर अवलंबून असल्यानें शाहजाद्याच्या बनारस जवळून पटण्यास जाण्याच्या बेताच्या भीतीनें रात्रंदिवस त्याच्या मनाला आराम व स्वास्थ्य वाटत नाहीं. कारण शाहजाद्याच्या बंगालकडे जाण्यामुळें वसूल बंद होईल. म्हणून ता. २३ जखर जु. ५ ला युसुफबेगखान यास खलिता, पोशाख व जवाहीर देऊन नवाब शुजाउद्दौल्याकडे पाठविलें व कमालीची ताकीद दिली कीं, कांहींही करून शाहजाद्यास पटण्याकडे जाऊं देऊं नये. पूर्वींपासून अलाहाबाद सुभ्याची सुभेदारी वजिराकडे व नायब सुभेदारी शुजाउद्दौल्याकडे कायम आहे. आतां त्याच अटींवर अलाहाबादच्या सुभेदारीची व्यवस्था शुजाउद्दौल्याकडे दिली आहे.

वजिरानें पूर्वींप्रमाणें एक लाख पन्नास हजार रुपयांची निशा बंगालचा वकील राजा रामप्रसाद याजकडून सरकारचा सावकार धोंडाजी नायक याचा नोकर देवाजी नायक यास देवविली होती. आतां एक लाख रुपयांचा तनखा उपर्युक्त वकीलास केला व यमुनेच्या पलीकडील महालांवर व सहारणपूर वगैरेंवर करावयाच्या तनख्याचे परवाने राजा अंताजी पंताच्या हवाली केले. उपर्युक्त राजा व राव पुरुषोत्तम पंडीत यांस राव जनकोजी शिंदे याजकडे पाठविलें. त्याप्रमाणें हे दोघे ता. २६ जखर जु. ५ ला

दिल्लीहून कूच करून यमुना ओलांडून लश्कराकडे रवाना झाले. त्याच प्रमाणें नदीच्या पलीकडच्या भागांतून पैसे वसूल करून पुढें गेले. वजिराची सक्त ताकीद आहे कीं, तेथें लौकर पोहोंचून आमच्या सल्ल्याप्रमाणें वागावें.

माळवा सुभ्याचा मोकाशी रामाजी पंडीत जनकोजीकडे जाण्याच्या इराद्यानें आग्र्याच्या रस्त्यानें मथुरेस पोहोंचला. २।३ दिवस त्यानें स्नानासाठीं तेथें मुक्काम केला व नंतर सुमारें २००० स्वारांसह दिल्लीला पोहोंचल्यावर तो जयसिंगपुऱ्यांत येऊन उतरला. वजिरानें शहराच्या संरक्षणासाठीं पूर्वी लिहिल्याप्रमाणें तटाच्या दरवाज्यांवर नवीन मोर्चेबंदी करण्याचें ठरविलें आणि ताकीद दिली कीं, उपर्युक्त पंडिताबरोबरच्या मराठे स्वारांपैकीं कोणासही तटाच्या आंतील बाजूस येऊं देऊं नये.

अंताजी पंडित आणि पुरुषोत्तम पंडित हे एक होऊन ता. २० जखर जु. ५ रोजीं रामाजी पंडिताच्या मुलाखतीसाठीं गेले व ता. २२ ला त्यास वजिराच्या मुलाखतीसाठीं घेऊन आले. तेव्हां दोन मोहोरा ओंवाळून टाकल्या. पाच कपड्यांचा पोशाख, रत्नखचित सिरपेच, जीगा व एक तलवार उपर्युक्त पंडितास व चार कपड्यांचा पोशाख बरोबरच्या दोघांस दिले व रात्री बिदा केलें. त्याचप्रमाणें उपर्युक्त पंडित यमुना ओलांडून अंताजीबरोबर फौजेंत रवाना झाले.

जु. ५ रज्जब ३	१८	इ. १६८० फाल्गुन शुद्ध ५ इ. १७५९ मार्च ३

ता. ३ रज्जब जु. ५ पर्यंत दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या हकीकती यांचा चौथा बंद.

वजिराचा पुरीकडे कूच करण्याचा इरादा आहे. त्याप्रमाणें प्रवासांतील ओझ्याच्या व्यवस्थेसाठीं दोन हजार रुपये जलालुद्दौल्याच्या हवाला केले. एकत्र होऊन पुरीकडे कूच करावें म्हणून राव जनकोजी शिंदे यास आपणाकडे बोलाविलें आहे आणि राजा अंताजी पंडितास यमुनेच्या पलीकडून लवकर आणावें म्हणून त्यांना पाठविलें आहे. उपर्युक्त राजा वजिराच्या जथेदारांपैकीं आहे. यामुळें करार करून गेला कीं, त्यास लवकरच हुजुरापुढें आणतों.

शाहजादे व हजरताचे नोकर यांस पकडून प्रथम अकबराबादेच्या किल्ल्यांत ठेऊन नंतर अजीमाबादेकडे जावें असा वजिराचा बेत आहे. वजिरानें अंताजी पंडिताच्या अर्जाप्रमाणें सहा कपड्यांचा पोशाख व जवाहीर उपर्युक्ताकडे पाठविलें. वजिराचा खान-सामा राय अर्जुनीलाल कांहीं महिन्यांपूर्वी राजा माधोसिंगाकडे जाबसालासाठीं गेला होता. वजिरानें लिहिल्याप्रमाणें रणथंभोरच्या किल्ल्यांतील हजारी व तोफखान्याचा अधिकारी यांस उपर्युक्त राजाचे लोकांच्या हवाला केलें व राजाच्या खलित्यासह येऊन

वजिरास भेटला. ता. १९ जखर जु. ५ ला राजा बिजेसिंगाचा वकील रतीराम यानें वजिराची भेट घेऊन एक मोहोर ओंवाळून टाकली व पत्राचा खलिता देऊन उत्तर······ उपर्युक्त दोन्ही राजांनीं उघड ठरविलें आहे कीं, रणथंभोरच्या मजबूत किल्ल्यांत आपल्या आप्तेष्टांना ठेवून अजमीर सुभ्याच्या मुकासेदारांशीं लढाई द्यावी. म्हणून अजमीरच्या सुभेदारीची मागणी करीत आहेत. सुरजमल जाटालाही हजर होण्याचा पैगाम लावला आहे. या दृष्टीनें अकबराबादेची सुभेदारी त्यास देत आहेत. अशा तऱ्हेची उपाययोजना व मनसुबे उघड चालू आहेत. परंतु पुढें (प्रत्यक्षांत) काय होईल, तें सांगतां येत नाहीं.

सलाबतजंगाचा वकील राजा रामनारायण यानें वजिराची भेट घेऊन स्वतःतर्फे दोन मोहोरा व अशिलाचा खलिता दिला. ता. २० जखर जु. ५ रोजीं त्यास ५ कपड्यांचा पोशाख आणि जवाहिर दिलें गेलें.

कित्येक दिवसांपासून बादशाहाची प्रकृती ठीक नाहीं. आतांपर्यंत पुरेसा अवकाश मिळाला नाहीं. अजीमाबादेची सुभेदारी पूर्वीप्रमाणेंच शाहजादा आली गौहरकडे व नायबी बंगालचा सुभेदार जाफरखान याजकडे आहे. त्या सुभ्यांतील जमीदारांपैकीं कोणीही शाहजाद्याची मैत्री करूं नये ह्या हेतूनें वजिरानें बंगालची सुभेदारी आली गौहरकडून काढून शाहाजादा हिदायतबक्ष यास हुजुराकडून देवविली. शाहजाद्यावर लक्ष ठेवण्याचें बाबतींत बादशाहाचा हुकूम आणि वजिराचीं पत्रें जाफरखानास सादर केलीं आहेत.

राजांची हकीकत अशी––माधोसिंगाचा जयपूर व बिजेसिंगाचा जोधपूर ह्या आपआपल्या गांवीं मुक्काम आहे. पुष्कळ वेळां शिकारीसाठीं स्वार होऊन जातात. सध्या स्वतःचीं कित्येक पत्रे वजिराकडे पाठवितात. सूरजमल जाट स्वतःच्या भरतपूर किल्ल्यांत आहे. बातमी आहे कीं, होळीच्या वेळीं मथुरेस येईल. त्यानें कोल सरकार व अकबराबाद वगैरे सुभे यांत ठिकठिकाणीं ठाणीं बसविलीं आहेत व पैसा वसूल करीत आहे. बनारसच्या अलीकडे एक मजलेवर शाहजादा पोहोंचला आहे. शिपायांच्या खर्चा-साठीं शुजाउद्दौल्यानें पाठविलेले पैसे घोडदळ व पायदळ यांतील लोकांस त्यानें वाटून दिले. जवळजवळ दोन हजार स्वार व पायदळ त्याजबरोबर आहे. शिवाय बातमी आहे कीं, पहारा ठेवण्याचें कलम जारी केलें आहे. हिदायत अलीखान व सय्यिद शहामतखान व इतर बारहा जमातीचे राजपुत्र शाहजाद्याबरोबर आहेत. बातमी आहे कीं, कुराजहानाबादेचा मुकासेदार गोपाळराव पंडित यानें शाहजाद्याच्या निरोपाप्रमाणें ५०० स्वार शाहजाद्याकडे पाठवून स्वतः थोड्या लोकांसह गयेकडे गेला आहे.

बातमी आहे कीं, जाफरखानाचा मुक्काम मुर्शिदाबादेस आहे. त्याच्या विरुद्ध असलेल्या जुन्या जमीदारांपैकीं बहुतेकांस त्यानें मारून टाकलें. तसेंच युरोपियनांस कलकत्त्याहून स्वतःकडे बोलाविलें. (शाहजाद्याचा) अजीमाबादेस जाण्याचा (विचार) आहे. सुभेदारीचा नायब राजा रामनारायण यानें स्वतःचा डेरा बाहेर दिला आहे.

बातमी आहे कीं, पटणा सुभ्याशीं संबद्ध टकारीचा जमीदार सुंदरशाह याचा शाहजाद्याशीं पत्रव्यवहार होता. त्यानें आपल्या दोन नोकरांच्या मागणीची निशा केली नव्हती. तेव्हां वाद होऊन त्यांनीं त्यास तलवारीनें ठार मारलें. त्यावर त्याच्या चेल्यांनीं त्या दोघांची कत्तल केली.

हजरताचा मुक्काम किल्ल्यांत आहे. वजिरानें महालांतील व रंग महालांतील सोन्याचांदीचीं छतें फोडून आणि आटवून त्याचा पैसा केला होता. परंतु एक चांदीचें छत बाकी राहिलें होतें. आतां तें मोडल्यानें जवळ जवळ एक लाख रुपयांची चांदी निघाली. हजरत व सुल्तान यांची हकीकत पूर्वी लिहिल्याप्रमाणें अशी आहे कीं, रोजमरा व पोशाख यांच्या खर्चाचा त्यांना फार त्रास होत आहे.

सरकारांनीं अलीकडे माझ्या पत्रांना उत्तरादाखल दोन परवाने पाठविले. त्यांतील मजकूर समजला. अबदालीच्या हालचालींची हकीकत कळविणें व सरकारचें कारभाऱ्यांनीं त्यावर उपाय योजना केल्यानें त्याचा बंदोबस्त होणें यामुळें आनंद वाटतो. प्रथम अबदालीच्या मरणाविषयीं मीं कळविलें. परंतु लोक कधीं त्यास जिवंत दाखवितात तर कधीं मेलेला. परंतु मला स्वतःला जें उघड समजलें तें कळविलें. पहिल्या पासूनच मी नोकर असल्यानें कांहीं बक्षीस, सालीना तनखा व इतर गोष्टींची मला अपेक्षा आहे. कारण सरकाराशिवाय कोणी दखल घेत नाहींत. आपणांकडून जें कांहीं मिळतें तें निर्वाहासाठीं खर्च होतें. परंतु नैमित्तिक वगैरे कार्यासाठीं कांहीं उरत नाहीं. सरकारकडून देणगीदाखल कांहीं मिळण्याची कृपा व्हावी.

जु. ६ शाबान १७	१९	श. १६८१ चैत्र वद्य ३ इ. १७५९ एप्रिल १५

ता. १७ शाबान जु. ६ पर्यंतचा अखबार. श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वी दरबार व दिल्ली येथील हकीकत, जनकोजी शिंदे, दत्ताजी पटेल, नारोजी शंकर या सरदारांचे मालीजच्या अलीकडे १८ कोस व क(स ?)रहिंद चकल्याच्या अलीकडे दोन मजली अंतरावर असलेल्या करहलह (करेला ?) गांवीं पोचणें, नंतर अल्लासिंग जाटाच्या मामल्याचा निकाल करून त्यास आणि वरील चकल्याचा फौजदार सिद्दीक बेगखान यांस पोशाख आणि जवाहीर देणें, नंतर दुसरी ताजी हकीकत म्हणजे बंडखोर मिर्झाखान याचें शीखांसह लाहोरच्या वेढ्यांतून जम्मूच्या बाजूस पळून जाणें, राव जनकोजी व राव मल्हार यांनीं पाठविलेल्या शिलेदारांचे लाहोरकडे प्रयाण आणि लाहोर शहर व किल्ला यांत शिरणें, साहिबजी पटेलाचा लाहोर सुभ्याच्या बंदोबस्ताचा बेत, राजा माधोसिंगाच्या बोलावण्यावरून सूरजमल जाटाचे जयपूरला जाणें आणि ता. २३

रजब जु. ५ या दिवशीं राजाशीं भेट होणें, पाण्यांत मीठ टाकून शपथ घेणें, दोघांच्याहि राज्यांतील मोकासदारांची व जयपूरच्या जवळचीं ठाणीं उठवून लावणें, याच शपथे-साठीं राजा बिजेसिंग व बिकानेरचा राजा यांना बोलाविणें, शाहजादा आली गौहरचें अजीमाबादेजवळ पोचणें, यायोगें वजीराच्या मनास चिंता लागणें, हजरत, वजीर व शाहजादा हिदायतबक्ष यांचे पेशखाने वजीराच्या इच्छेनें शाहजादा आली गौहरच्या विरोधासाठीं पूर्व बाजूस बाहेर काढणें, हुजूरच्या खर्चाची न्यूनता व इतर बाहेरच्या हकीकती कासिदांबरोबर ता. शेवट माहे रज्जब जु. ५ या दिवशीं पाठविल्या त्या पोचल्या असतील. तसेंच पिस्ता, चिलगुजा व किश्मिश या सुक्या मेव्याच्या चार डाल्या पाठविल्या त्याही मिळाल्या असतील.

आतां सरदारांची हकीकत अशी--जनकोजी शिंदे, दत्ताजी पटेल, नारोजी शंकर मालीजच्या जमीदारांचा मामला उरकून करेल्याहून कूच करून सरहिंदच्या चकल्यांत येऊन पोचले. चकला व दोआब यांचा अधिकार चकल्याचा फौजदार सिद्दीक बेगखान याजकडे मुकरर करून आणि पूर्वींचे मामले[दार] व हुद्दे[दार] यांनीं दादासाहेब व स्वामी यांशीं जो करार केला होता त्यापेक्षां सालिना पाच लाख रुपये जास्त त्यांजवर खुषीनें करार करून व पैशाची निशा घेऊन त्यांस वस्त्रें दिलीं. नंतर तेथून कूच करून सतलजवरील माछीवाड्याच्या घाटानें सरहिंदपासून १४ कोस पुढें बहलूलपूर गांवीं डेरा दिला. ता. १२ शाबान जु. ६ पर्यंत तेथें मुक्काम केला. तेथील जमीदारांचा मामला उरकीत आहेत.

बातमी आली कीं, साहिबजी पटेल पेशावराहून कूच करून लाहोर सुभ्यांत दाखल होऊन तेथें असलेले राव मल्हारजी व जनकोजी शिंदे यांचे शिलेदार तुकोजी खंडोजी (गणोजी ?) कदम वगैरे यांस भेटला.

मीर्झाखान लाहोर सुभ्यांतून पळून शीख गुरूंच्या जमेतीसह जम्मूच्या बाजूस गेला होता. तेथून त्यानें मदतीसाठीं जम्मूचा जमीदार रणजितदेव यास लिहून पाठविलें होते. पण त्याजकडून साफ लिहून आलें कीं, तुम्ही येण्यापूर्वींच दक्षिणेंतील सरदारांचे आमच्या नांवें पत्र आलें आहे कीं, उपर्युक्त खान दैवयोगें जम्मूच्या तालुक्यांत आला तर त्यास कैद करून पाठवा. हें कबूल नसेल तर निदान त्यास आपल्या तालुक्यांत राहूं देऊं नये. तेव्हां तुम्ही माझ्या तालुक्यांतून बाहेर जावें हें उत्तम. तसेंच खानाचे जे लोक याच्या प्रदेशांत होते त्यांना लिहून पाठविलें कीं, आमचा हिंदु धर्म असा नाहीं कीं, तुम्हांस हाकलून द्यावें. पण सध्या मात्र सर्व प्रकारें काळजी घेऊन तुम्हांस बाहेर हाकलून लावण्याचें करतों. माझ्या डोंगराळ प्रदेशांत येऊं नये.

हा जबाब आल्यावर मीर्झाखान जम्मूच्या तालुक्यांतून निघून शीखांसह सियाल-कोटच्या बाजूस आला. हा खान हरामजादा बंडखोर असल्यामुळें गक्खर अफगानांस सामील झाला. त्यानें अब्दुस्समदखानास–हा पूर्वीं अब्दालीतर्फे सरहिंदचा फौजदार

होता व दादासाहेबांच्या फौजेनें बळेंच त्यांच्यासमोर आणलें होतें. कांहीं दिवस कैदेंत ठेवून नंतर दादासाहेबांनीं दयेनें त्यास सोडून दिलें होतें--लिहिलें कीं, तुम्ही सध्या गख्खर अफगाणांसह गुजरात शाहदौला इतर महालांत शिरावें. मीही शीखांसह तुमच्या मदतीस येतों. निर्धास्त असावें.

अब्दुस्समदखानानें मुलतान सुभ्यामध्यें ५।६ हजार स्वार व प्यादे जमवून मुलतान शहराजवळ येऊन मुक्काम ठोकला व शहरवासियांवर खंडणी मुकरर करून ती तो वसूल करूं लागला. तेथील रयत या पूर्वीच अबदालीचे अफगाणांच्या जुलुमानें हैराण होऊन गेली होती. तेव्हां तेथील रईस एक होऊन मुलतान येथीलच मुहम्मद अलीखान नावाच्या अफगाणी रईसाकडे गेले, स्वतःची कहाणी त्यांनीं निवेदन केली आणि सांगितलें कीं, आतां आम्हांस शहरामध्यें राहणें अशक्य आहे. तेव्हां तो त्यांचा सहाय्यक बनला व म्हणाला तुम्ही सर्व शहरवासी एकत्र रहा आणि सल्ला करून अब्दुस्समदखानाशीं लढण्यास कमर बांधा. मी आपल्या साथीदारांसह हजर आहे. त्यांत भाग घेईन. तेव्हां छोट्या-मोठ्या लोकांनीं एकत्र होऊन एकदम दंगा केला, अब्दुस्समदखानाच्या नायबास — तो शहरांत वसूल करीत होता व लोकांची बेअब्रू करून मार देत होता. — मारमारून बाहेर घालविलें आणि नायबाचे घोडे उधळून लावून इतर जिन्नस व वसुलीचा पैसा घेऊन गेले.

हि. ११७४ जु. १, रवल १ शनिवार | २० | श. १६८२ आश्विन शुद्ध २ इ. १७६० ऑक्टोबर ११

श्रीमंतांचें कुशल असो.

दिल्लीच्या हकीकती व बातम्या, भाऊसाहेबांचें ता. २० सफर हि. ११७४ ला ... पुष्कळ गाई व द्रव्य कामगारांत वाटून देणें, सैन्याच्या विजयाबद्दल कांहीं तोफगोळे सलीमगड किल्ल्यावरून नजीबखान रोहिल्याच्या फौजेकडे सोडणें, त्यानंतर सैन्याच्या तळाकडे परतणें, ही बातमी ऐकून अबदालीनें सीताराम सराईहून कूच करणें व ता. २३ ला अहमदगंजेच्या पुढें तंपूंत दाखल होणें, गाझीउद्दीनखान व सूरजमल जाट यांचा बल्लमगड येथें मुक्काम, शुजाउद्दौला व नजीबखान यांच्या मध्यस्थीनें अबदालीशीं सलोख्याचीं बोलणीं, अबदालीनें पाठविलेली टोपी व कुडतें घालणें, शाहाच्या परवानगीनें यमुनेच्या पलीकडे कोल, खुर्जा, डभई (खेडी) व इतर घाटांवरील परगण्यांतील भाग ताब्यांत घेणें व तिकडे (माणसें) पाठविणें, त्यांच्या लिहिण्यावरून फौजेंतील सरदारांची मैत्री न करण्याच्या अटीवर पेशकशीची माफी करणें, याच वर्षाच्या व महिन्याच्या ता. २४ ला सूरजमल जाटाच्या मुलाखतीच्या हेतूनें शुजाउद्दौल्यानें फौज व नजीबखान यांसह स्वार होणें, या बाजूनें सूरजमलाचें स्वार होणें, एकमेकांची मुलाखत न होणें, पण मध्यस्थांमुळें बोलणीं

होणें, लोनीमध्यें अब्दालीचा मुक्काम, अभारासिंगाचें मोरीस कूच करणें, परमेश्वरी कृपेनें पाऊस पडून यमुनेस पूर येणें आणि लाहोर, करहिंद, मारवाड, बंगाल या सुभ्यांचा अहवाल, या सर्व मुद्यांचें यापूर्वी ता. २७ सफर हि. ११७४ ला हुजुरांकडे पाठविलेलें तपशीलवार पत्र नजरेखालून गेलें असेलच.

आतां भाऊसाहेबांनीं अहमदगंजापुढील मुक्कामाहून कूच केलें व ते सरहिंदकडे नरेलाच्या पुढें जवळजवळ १४ कोसांवरील बरोठ्याजवळ तंबूंत दाखल झाले. आघाडीच्या सैन्यानें म्हणजे राव मल्हारजी होळकर व राव जनकोजी शिंदे यांच्या शूर लोकांनीं सोनीपतपर्यंत डेरे दिले आहेत. समशेरबहादूर, राजा अंताजी पंडित, इब्राहीमखान गार्दी व इतर सरदार भाऊसाहेबांबरोबर आहेत.

दमाजी गायकवाड याचा स्वतःच्या फौजेसह व तोफखान्यासह भाऊसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें मौजे बुराडी घाटावर मुक्काम आहे व अब्दालीच्या अफगानांच्या स्वागतास सामर्थ्यानिशीं सिद्ध आहे. राजा अंताजी पंडिताच्या धाकट्या मुलाचा जवळजवळ एक हजार स्वारांसह जुन्या शहराच्या किल्याजवळ महाबतखानाच्या रेतीमध्यें मुक्काम आहे.

बहादुरखान व मूसाखान यांच्या मामल्याचा फैसला झाल्यावर तुकोजी होळकर, गणोजी कदम, राव मल्हारजी व राव जनकोजी यांचे फौजेंतील इतर सरदार आणि राजा अंताजी पंडिताचा मोठा मुलगा दादरी वगैरे महालांचा वसूल करण्यासाठीं मूसाखानासह आले आहेत. या जिल्ह्यांत सर्वत्र वसुली चालू आहे. वसुलींतून मोकळे झाल्यावर फौजेंत सामील होतील.

भाऊसाहेबांनीं आवश्यक तयारीनिशीं २९ सफरला धाकटा नाना, यकाजी पंडीत मुनशी, अनाजी व महिपतराव प्रभू चिटणीस वगैरेंस किल्ल्यांत पाठवून हुकूम दिला कीं, शाहजाद्यास युवराज व आली गौहर यास वारस करून त्याच्या नांवानें शिक्का करावा.

ता. २९ (सफर सन ...) ला... धाकटा नाना, यकाजी पंडित, [नारो पंडित] किल्लेदार व बाळोजी यांनीं देवडीवर जाऊन आली गौहर... विनंती करणाऱ्यास बादली रंगाचा पोशाख दिला. शाहजहान बादशहास निरोप पाठविला... तुमच्या नांवानें सिंहासन... आतां शाहआलमची गादीवर बसण्याची पाळी आहे. पूर्वीप्रमाणें स्वतःचें घरीं जावें... त्याप्रमाणें मध्यें... दाखल झाले...जु. १ च्या सफरच्या शेवटच्या तारखेस शुक्रवारीं ५ घटका दिवस आल्यावर शाहआलमचा मुलगा शाहजादा जवानबख्त यास खुर्चीवर बसविलें व नंतर सरकारच्या हत्तीवर बसविलें. शाहआलमाचा... शाहजादा मीर्झा बाबा, पिलाजी जाधवाचा मुलगा सटवाजी जाधवही हत्तीवर पाठीमागें बसून मोरचेल ढाळीत व नौबती वाजवीत शाहजाद्यास जामे मशीदीमध्यें आणलें. तेथें पद्धतीप्रमाणें लोकांसह नमाज होऊन बादशाह शाहआलम याच्या नांवानें खुतबा वाचला. धर्मगुरूस कपडे दिले. तसेंच पूर्वीप्रमाणें त्यास हत्तीवर बसवून किल्ल्यांत आणलें. नंतर

दीवाने खासमध्यें खुर्चीवर बसवून भाऊसाहेबांनीं पाठविलेल्या १०१ मोहोरा नजर केल्या. त्यानंतर धाकटा नाना, नारोजी शंकर, बाळोजी, महिपतराव, सटवाजी जाधव व इतर कारभारी यांनीं यथाशक्ति नजराणा दिला. त्यानंतर कलावंतिणीचें नाचगाणें झाल्यावर महालांत दाखल झाला. कलावंतिणीचा एक ताफा नारो शंकराच्या महालांत गेला. तेथें नाचगाणें झालें. शहरांत शाहआलमचा शिक्का पाडला. या हकीकतीनें सर्व गैरमुस्लिम नागरिकांनीं (परमेश्वराचे) आभार मानले. परमेश्वरानें राजधानीस स्थिरता आणली. तो शाह आलमवर सर्व आयुष्यभर कृपा करो.

धाकटा नाना वगैरे कारभारी रात्रीं किल्ल्यांत राहिले. पहिल्या राज्यवर्षाच्या १ रवलला किल्ल्यांतील रंगमहालात गेले. तेथें शाहजादा व मीर्झा बाबा बाहेर आले. आकिबत महमूदचा भाऊ सैफुद्दीन मुहम्मदखान याच्या मध्यस्थीनें २५ लाख रुपयांचा करारनामा — पैकीं पांच लाख रुपये वलीअहदी (यौवराज्य) मिळाल्यावर व पूर्ण रक्कम हप्त्यानें देण्याचा — झाला होता. त्यामुळें सरकारचे कारभारी पैसे मागूं लागले. पैशाची व्यवस्था होईल त्याप्रमाणें कळविलें जाईल.

नऊदहा वर्षांचा शाहजादा जवानबख्त यास तीन हत्ती व कित्येक घोडे नजर म्हणून आले. बातमी आहे कीं, तंबू, नौबत व इतर कारखाने शाहजाद्यांसाठीं वेगळे मुकरर करून दसऱ्याचे दिवशीं बाहेर आणावे व अबदालीशीं लढाई करावी अशा प्रकारची योजना चालू आहे.

दुसरी योजना अशी कीं, मीर्झा बाबा व बेगमसाहेब (हजरत शाह आलमची आई) यांत बोलणीं झालीं होतीं कीं, अबदालीशीं नातें असल्यानें येथील हकीकत शाहाला कळविणें जरूर आहे. तेव्हां मसुद्याची विनंती केली. तोप्रमाणें यकाजी पंडितानें मसुदा लिहून दिला. मसुद्याप्रमाणें व स्वतः कांहीं लिहितील. बेगमसाहेबाचा इरादा आहे कीं, दोघांत कोणत्याही रूपानें तडजोड घडावी हें चांगलें. युद्धामुळें दोन्ही बाजूंवर आपत्ति ओढवेल.

अबदालीची हकीकत अशी– आतांपर्यंत तो लोनीसच आहे. त्याचे बरोबर सरदार होते त्यांस चकले सरहिंदचा फौजदार अब्दुस्समदखान याच्या मदतीसाठीं कुंजपुऱ्याकडे पाठविलें आहे. अबदालीला स्वतःच्या सरदारांबद्दल संशय आल्यानें तो त्यांना आपल्यापासून दूर जाऊं देत नाहीं. संधी मिळतांच सरकारकडे येतों अशा मजकुराचीं पत्रें पूर्वींपासून येत आहेत. पूर्वींपासून शाहाची ताकीद असल्यानें अबदालीच्या सैन्यानें यमुनेपलीकडच्या खेड्यांची लुटालूट केली नाहीं. आतां बातमी आहे कीं, अबदालीची फौज शेती लुटून खात आहे. नजीबखानाच्या या हकीकतीचा अर्ज ऐकला जात नाहीं व तो १५००० रुपये, २०० मण धान्य वगैरे पूर्वींप्रमाणें देत आहे तरी फौजेस फार भीति वाटत आहे.

शुजाउद्दौला व नजीबखान यांचा मुक्काम यमुनेपलीकडे आहे. त्यांचे डेरे व झेंडे या बाजूनें दिसतात. सध्या उपर्युक्त दोघांचीं भाऊसाहेबांकडे बोलणीं होत नाहींत.

अबदालीच्या थोर माणसांपैकीं एक दरवेश शाह अबदुल्लाह, अहमदशाहाच्या वेळीं खोजा जाविदखानाकडे बोलणीं करी. त्यानें शाहाकडे भाऊसाहेबांचा निरोप नेला. बातमी आहे कीं, दोन तीन दिवसांत अबदाली किंवा त्याचा वजीर यमुनेच्या त्या बाजूनें आणि भाऊसाहेब या बाजूनें मौजे बुराडीच्या घाटावर येतील. मध्यस्थांशिवाय दोन्ही बाजूचे कारभारी होडींत बसून बोलणीं करतील. अबदुल अहदखानाचा शाहवलीखानावर फार विश्वास आहे व त्यांत तडजोड झालेली आहे. पुढें होईल त्याप्रमाणें कळवीन.

अहमदखान बंगश निरुपायानें थोडे लोक घेऊन अबदालीबरोबर आहे आणि दूंदीखान वगैरे रोहिले, घोडेस्वार व पायदळ घेऊन गंगानदी उतरून अबदालीच्या लश्करांत दाखल झाले.

लाहोरच्या सुभ्याची हकीकत अशी–कांहीं शीख लोकांनीं उपर्युक्त सुभ्याच्या राजधानींत जाऊन भाऊसाहेबांची दवंडी पिटवली व गुरुसाहेबांची कराही केली. अमरदास भाऊसाहेब म्हणजे नीतीनजात गुरुसाहेब विजयासाठीं केले. आशिर्वादासाठीं आकाशाकडे हात लांब करून प्रार्थिलें कीं, जुलमी अबदालीस त्याच्या कृत्याबद्दल शिक्षा होऊन त्याचा नाश होवो. त्या सुभ्याचा आसपासचा भाग व दोआब व इतर प्रदेश यांवर शीखांचा ताबा आहे. त्याप्रमाणें मुलखाचा वसूल करून त्यांतील वाटणी शाहास देत आहेत. माहितीकरितां कळविलें आहे.

......हल्लेही केले. उपर्युक्त खानास त्याच्या प्रतिकाराची ताकद नसल्यानें तो पळून जालंधरमध्यें आला...उपर्युक्त खानाबरोबरच्या मनुष्यांस लुटलें व ठार केलें त्यांचे तंबू, घोडे वगैरेही लुटले. आतां त्याचे स्वार–ते २००० पेक्षां कमी असतील— पडतउठत कसेबसे जालंधरला पोंचले. परंतु त्यांच्यानें बाहेर पडवत नाहीं.

सरहिंद परगण्याचा फौजदार अबदुस्समदखान, रोहिल्यांचा पीरजादा कुतुबखान, गख्खरांपैकीं अजीमखान व इतर कुंजपुऱ्यांत आहेत आणि भीतीनें खंदक खणून व साधारण तट तयार करून राहिले आहेत.

अलासिंग जाट स्वतःच्या प्रदेशांत आहे. त्यानें शीखांच्या जमावास आपल्याकडे बोलावून भाऊसाहेबांस पत्र लिहिलें कीं, स्वतः कूच करून यावें. मी शीख सैन्यासह लवकरच भेटीस येतों व आपल्या सुदैवानें अबदालीच्या लोकांस जिवंत ठेवीत नाहीं. लाहोरच्या आसपास व इतरत्र शीखांचे ४०।५० हजार स्वार असतील.

मिर्झाखानाची हकीकत पूर्वी लिहिली तशीच आहे. जम्मूमध्यें असलेल्या कृष्णाजी पंडिताच्या संगनमतानें फौज जमवून ते गुजरात शाहदौलापर्यंत पोहोंचले. त्यांनीं अबदालीचीं ठाणीं उठवून लावलीं. त्यामुळें अटक नदीपर्यंत आपल्या फौजेचा भयंकर दरारा निर्माण झाला आहे.

मारवाडची हकीकत पूर्वीप्रमाणें आहे. माधोसिंगाचा जयपूर व बिजेसिंगाचा जोधपूर येथें मुक्काम आहे. आणि पूर्वीप्रमाणें अबदालीचे सरदार व रोहिले यांशीं त्यांचा पत्रव्यवहार चालू आहे.

शाहआलमची हकीकत सरकारास पूर्वीं लिहिल्याप्रमाणेंच आहे. अजीमाबादेस पोहोंचल्यावर त्यानें फुलवाडीस तळ दिला. सुभेदारीचा नायब राजा रामनारायण यानें त्याची भेट घेऊन नजराणा दिला. बातमी आहे कीं, बंगालच्या सुभ्याच्या प्रशासकाच्या मामलतीचा फैसला झाल्यावर परत येईल.

सूरजमल जाट आतापर्यंत गाझीउद्दीनखानासह बल्लमगढमध्यें आहे. शाहआलमच्या नावाचा शिक्का चालू झाला ही बातमी ऐकून ते फारच बेचैन झाले आहेत. आतां त्यानें पुन्हा रूपराम कटारा यास भाऊसाहेबांकडे पाठविले आहे. परंतु पूर्वीप्रमाणें दर्जा न राहिल्यानें सामान्य व मोठे लोक बोलतात कीं, सूरजमल जाटानें करार करून व गंगेची शपथ खाऊनही वचन पाळलें नाहीं याचा परिणाम चांगला होणार नाहीं.

सुभेदार नारोजी शंकर किल्ल्यांत आहे. इज्झतखान रोहिला व अमीरखान ठोका वगैरेंनीं उपर्युक्त राजाविरुद्ध बंड केलें. त्यांनीं किल्ल्यांत मोर्चेबंदी पक्की केली. व बादशाहाच्या झोपण्याच्या रंगमहालाजवळ गारद्यांच्या चौकीप्रमाणें रात्रंदिवस बसले आहेत.

हि. ११७४ जिल्काद ७	२१	श. १६८३ ज्येष्ठ शुद्ध ९ इ. १७६१ जून ११

...महिन्याच्या ७ तारखेपर्यंतच्या (हकीकतीचा) बंद. श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वीं दारुलखिलाफत शाहजहानाबादेची (दिल्लीची) हकीकत, लाहोर सुभ्यापलीकडे चाळीस कोस अंतरावर जेहलमच्या ऐलतीरावर वसलेल्या गुजरात शाहदौला येथें अबदालीचें जाणें, त्या सुभ्याची कायम व्यवस्था उखडणें, त्याचा मुलगा तैमूर व अफगान सरदार यांचें त्याबरोबर असणें, नजीबखानाचा हुजूरजवळ सफदरजंगाच्या हवेलींत मुक्काम, सूरजमलचा मुलगा जवाहरसिंग हा मूसाखान बलूचच्या ताब्यांत असलेल्या फर्रुखनगर जवळच्या कोटकलान गावामध्यें राहून व खेडी स्वतःच्या ताब्यांत घेऊन रब्बीच्या हंगामाचा वसूल करीत होता. म्हणून बलूची लोकांबद्दल सूरजमल जाटाशीं बोलणीं करणें, सूरजमल जाट व मल्हारराावाचा दिवाण गंगाधर पंडीत यांसह वजिराचें मथुरेहून यमुना नदी ओलांडून पैलतीरास जाणें, हाफिज रहमतखान व दूंदीखान या रोहिले सरदारांशीं आणि अहमदखान बंगश यांशीं बोलणीं करणें, आश्वासन घेऊन भेटीचें पक्कें करणें, उपर्युक्त रावांच्या फौजेनें रामपुऱ्याची लुटालूट केली असतां तींत रजपुतांचे पुष्कळ लोक मारले गेले व पुष्कळ जखमी झाले ही बातमी ऐकून राजा माधोसिंगाचें

स्वस्थानाहून बाहेर निघून सांगानेरमध्यें दाखल होणें; अकबराबादेचा किल्लेदार व सूरज-मल्लाचा नायब बलराम याचे लोक यांमध्यें तोफखान्याची लढाई, अजीमाबादेच्या बाहेर फुलवाडीमध्यें शाहआलमचा मुक्काम, तेथें इंग्रजांचा बंदोबस्त, बरीच फौज व तोफखाना यांसह अजीमाबाद येथें बंगालचा सुभेदार नसीरुउल्मुल्क याचा मुक्काम, हुकुमाप्रमाणें गंगेच्या ऐलतीरीं असलेल्या गाझीपूरजवळ शुजाउद्दौल्याचा डेरा देणें; हजरत व... यांत जाबसाल, हुजूरमुकदम्यांतील गोंधळ, ह्या बाजूच्या व्यवस्थेचा नाश व इतर तपशील कासिदांसांगातीं ता. २२ शव्वाल हि. ११७४ रोजीं कळविला तो नजरेखालून गेला असेल.

त्यानंतर बातमी आली कीं, अबदालीनें गुजरात शाहदौल्याहून कूच करून चिनाब नदी ओलांडली व कूच करीत करीत स्वदेशी जाण्यास निघाला. आतां अटकेशिवाय इतर नदी ओलांडावयाची राहिली नाहीं...शाहाच्या चुलत्यापैकीं मुहम्मद बुलंदखान यास, वजीर शाहवलीखानाशीं विरोध केल्यावरून, नजाबतपनाहा (अबदाली) नें पकडलें होतें. बातमी आहे कीं, तो लाहोरच्या सुभेदारीवर कायम होईल. शीखांनीं त्या सुभ्यांत बरीच गडबड केली आहे; त्यामुळें सुव्यवस्था होईलसें दिसत नाहीं. अबदालीच्या जुलमी लोकांचे हल्ले व लुटालूट यामुळें मुलूख धुळीस मिळून बेचिराख झाला आहे. परमेश्वरानें त्यास लौकरच अशी शिक्षा करावी कीं, त्याची नांवनिशाणी राहणार नाहीं.

अबदालीनें पूर्वी जम्मूचा राजा व शीख जीवनमल यांचेमधील झगड्यासंबंधीं निरोप पाठविला होता; पण आतां दोघेही लढाईस सज्ज असल्यानें कोणालाही निरोप पोहोंचविला नाहीं. उजबकांची फौज जमविली जाणें अगदीं उघड आहे.

दोआबची हकीकत अशी—सादतखान आफ्रीदी यास दोआबाचा फौजदार नेमून अबदाली जालंधरमध्यें रहात होता. अबदालीच्या फौजेच्या भीतीनें शीख लोक पळून जाऊन दऱ्याखोऱ्यांत लपून राहिले होते. आतां अबदाली लाहोरहून पुढें गेला असल्यानें त्यांनीं टोळ्याटोळ्यांनीं डोंगरांतून खालीं येऊन उपर्युक्त फौजदारास वेढलें आहे व त्या जिल्ह्यांत रबीच्या हंगामाची वसुली करीत आहेत. उपर्युक्त खानाजवळ लढाईची ताकद नसल्यानें लाहोर शहर व त्याजवळील प्रांत पूर्णपणें उजाड झाले आहेत.

चकले सरहिंदची हकीकत अशी—तेथील फौजदार गख्खर जमातींतील भिखनखान ...तेथें थोडी फौज घेऊन आहे. तेथें...अलासिंग जाट लखीजंगलचा जमीनदार आहे. तेव्हां उपर्युक्तांनीं लक्ष्मीनारायण या अधिकाऱ्यास जो...खान...

सूरजमल जाटाचा मुलगा जवाहिरसिंग याची हकीकत अशी—त्यानें मूसाखान बलोच याचे काटोर वगैरे तीन किल्ले जिंकून घेतले. त्या जिल्ह्यांतील जे जमीनदार बलुचींच्या विरुद्ध होते त्यांनीं उघडपणें जवाहिरसिंगाशीं मैत्री केली. तेव्हां आतां तो कोट कलानजवळ रहात आहे.

नजीबखानाची हकीकत अशी—सध्या तो दिल्लींतील सफदरजंगाचे हवेलींत रहात

आहे. त्याचा सख्खा पुतण्या जहांगीरखान आपल्या मूळ गावीं लग्नासाठीं स्वार होऊन जात होता. तेव्हां त्याच्या हत्तीच्या आजूबाजूस दारूकाम सोडलें असतां दारूची (आगीची) झळ लागून त्याचा चेहरा व हत्तीचा हौदा जळाला. म्हणून लग्न न करतांच तो आपल्या डेऱ्यास परतला. त्यानंतर कांहीं दिवसांनीं तो मरण पावला. नजीब उपरनिर्दिष्ट खानास स्वतःच्या मुलांपेक्षा जास्त समजे एवढें त्यावर त्याचें प्रेम होतें. तो हि. ११७४ मधील शव्वालच्या शेवटच्या तारखेपासून (२९) चार जिल्कादपर्यंत सुतकांत होता व दुःखानें मोठ्यानें रडे; एक दिवस त्यानें अन्न घेतलें नाहीं; त्यावर मोठें दुर्दैव ओढवलें. बादशाहजादा जवानबख्त व मीर्झा बाबासाहेब नजीबखानाच्या सांत्वनासाठीं त्याच्या डेऱ्यांत भेटण्यास गेले होते ते या वर्षाच्या चार जिल्कादला उपर्युक्त खानाच्या घरीं परत आले. तेव्हां खानानें १५ मोहोरा जवानबख्तास व पांच मीर्झा बाबा यास नजर केल्या. बादशाहजाद्यांनीं त्यास किल्ल्यांत नेलें. तेव्हां झीनत महलकडून गौरवाखातर त्यास पोशाख मिळाला. मूसाखान व मरहूम बहादुरखानाचा भाऊ ताज मुहम्मदखान हे नजीबखानाजवळ होते. ते दररोज उपर्युक्त खानाकडे मदतीची विनंति करीत होते. अखेर ४ जिल्कादला उपर्युक्त दोघा खानांनीं बादशाहजाद्यांचा निरोप घेतला. नवाबानें हजार स्वार बलुचांचे मदतीसाठीं बरोबर दिले. यामुळें जवाहिरसिंगाशीं लढाई होईलसें दिसतें.

सूरजमल जाटाबरोबर असलेल्या नजीबखानानें......तेथून राजा नागरमल्लाकडे पोहोंचल्यावर हुजुराकडे येऊन व उपर्युक्त खानाची मुलाखत घेऊन बोलणीं केलीं. एक दिवस शहरांत राहिल्यावर ४ जिल्कादला उपर्युक्त खानानें दिलेरसिंगाच्या खर्चासाठीं ५००० रु. देवविले व त्याची पाठवणी करून ताकीद केली कीं, त्यास (उपर्युक्तास) लवकर हुजुराकडे आणावें. एका बाजूनें लढाई व दुसऱ्या बाजूनें तहाचीं बोलणीं चालू आहेत.

सुतकांत असल्याच्या सबबीवर नजीबखान कित्येक दिवस सैन्यांतील लोकांकडे लक्ष देत नाहीं; घोडदळांतील लोकांस रोजमुरा न मिळाल्यानें त्यांस अन्नाची भ्रांत आहे. तेव्हां दोन टोपीवाल्यांनीं ३ जिल्कादला दीवाने खासमध्यें सैफुद्दीन मुहम्मदखानावर ठार मारण्याच्या हेतूनें हत्यार उगारलें. या गडबडींत तो खान जलदीनें महालाच्या देवडींत गेला व लपून बसला म्हणून वाचला. शाहाचें सैन्यांतील शिलेदार फार संतापले आहेत. त्यांचा लढाईचा बेत आहे. परंतु नजीबखानाकडे लक्ष देऊन आहेत.

नजीबखानाचा भाऊ सुल्तानखान यानें सोनीपतहून कूच केलें व तो यमुना ओलांडून पलीकडे पुतण्याच्या सांत्वनासाठीं आपल्या गांवीं गेला. रोहिल्यांनीं तेथून कूच केलें व ते यमुनेपलीकडे डेरे देऊन आहेत. शहराच्या हवेलींतील पुष्कळ लोक घाईनें बाहेर पडत आहेत. आतांपर्यंत उपर्युक्त खानाचा डेरा सोनीपतला पडला आहे.

झीनतमहल व मीर्झा बाबा यांनीं नजीबखानाकडे विनविलें आहे कीं, ' तुझा आपल्या वतनाकडे जाण्याचा इरादा असेल तर आम्हांस बरोबर न्यावें; कारण... तूं (एकटाच) गेल्यास आम्ही लवकर हुजूरकडे जाऊं. उपर्युक्त खान खानसाहेबाकडून परवानगीची इच्छा...जाण्याची जरूरी आहे. पण कांहीं दिवस थांबला. बरोबरचे लोक बंगले व वाडे करण्याच्या तयारींत आहेत...जाहीर छावणी...मल्हाररावाशीं पत्रव्यवहार व सलूख यांचा उपक्रम चालू आहे.

दि. ११७४ जिल्काद ७ } २२ {श. १६८३ ज्येष्ठ शुद्ध ९
इ. १७६१ जून ११

...७ जिल्काद हि. ११७४ पर्यंत [ची हकीकत]

वजीर व सूरजमल यांची हकीकत अशी—उपर्युक्त नवाबानें जवार किल्ल्याहून कूच केलें व आंबरोळी परगण्याजवळ गंगेच्या ऐलतीरीं चार कोसांवर असलेल्या लोहगड या ठिकाणीं येऊन डेरे दिले. मल्हाररावाचा दिवाण गंगाधर पंडित, सूरजमल्लाची फौज व नवीन नोकर बरोबर आहेत. सूरजमल जाट कोलपासून तीन कोसांवर असलेल्या रामगढ किल्ल्यांत रहात आहे त्याजवळ पायदळ व घोडदळ आहे.

वजिरानें जलालुद्दीनखानास दूंदीखान रोहिल्याकडे मित्रत्वाचीं बोलणीं करण्यास पाठविलें होतें. उपर्युक्त खानानें गंगेच्या पलीकडील लोनीहून दूंदीखानाकडे जाऊन व मुलाखत घेऊन बोलणीं केलीं. तेव्हां उपर्युक्त खानानें मुलाखतीसाठीं आपल्या ठिकाणाहून कूच करून गंगेच्या पैलतीरावर डेरा दिला जलालुद्दीनखानास कपडे, घोडा व चारशें रुपये रोख दिले व चार हजार रुपये वजिरासाठीं नजराणा देऊन निरोप दिला. उपर्युक्त नवाबाचें लश्कर व दूंदीखान यांमध्यें गंगा आहे.

बातमी आहे कीं, वजीर व सूरजमल जाट यांचें पत्र आल्यानें हाफिझ रहमतखानानें आपल्या बरेली गांवाहून कूच करून गंगेच्या ऐलतीरीं असलेल्या अहमदखान बंगशाच्या फर्रुखाबाद गांवीं येऊन त्याची मुलाखत घेतली व वजिरानें पाठविलेला जलालुद्दीनखान वजीर व सूरजमल यांचीं पत्रें घेऊन फर्रुखाबादला पोहोंचला व त्यानें मुलाखत घेतली. बातमी आहे कीं, या बाजूनें नवाब अहमदखानानें हाफिझ रहमतखानासह फर्रुखाबादेहून कूच केलें व त्या बाजूनें दूंदीखानानेंही उपर्युक्त नदी ओलांडली व तो या बाजूस जाला. वजिराची मुलाखत घेत आहेत आणि सूरजमल व मल्हाररावाचा दीवान यांच्या सल्ल्यानें एकमेकांच्या शपथा व कौलकरार होत आहेत. आतां नजीबखानास बोलावून तह करतील व वजीरास शहरांत आणतील.

सध्या हाफिज रहमतखान व दूंदीखान यांनीं नजीबखानाच्या नांवानें पाठविलेलीं

पत्रें...पुतण्या...दारुलखिलाफतचा मुक्काम चांगला नाही. जी कांहीं शाहवलीखान वजीर इकडून नजीब, शुजाद्दौला व मुहम्मदखान बंगश व राजा नागरमल यांजकडून होईल ती गोष्ट अधीक चांगली आहे. नेहमी अबदालीकडून ताकीद येते कीं, वजिरास दिल्लीस आणून हुजुराच्या कामावर मुखत्यार करावें. त्याप्रमाणें केलेंच पाहिजे. त्यावर उपर्युक्त खानानें उत्तर लिहून कळविलें कीं, तुम्ही वडील आहां. आपआपसांत ठरवून लिहिलें जाईल तें कबूल आहे. माझी कांहीं हरकत नाहीं.

शाह वलीखानाच्या पत्राप्रमाणें हुजूरास सोडून निघून यावें व वजीरास शहरांत येऊं द्यावे, या बाबतींत याकूब अलीखान नजीबखानास आग्रह करीत आहे व आतां-पर्यंत पाठविलेल्या अंतेवासींना नजीबास शाहाकडे बोलाविण्याबद्दल ताकीद आहे. तो शाहाच्या वाटणीची रक्कम त्याजकडे पाठवीत असला तरी गर्वामुळें त्याची दारुलखिला-फतींतून बाहेर पडण्याची इच्छा नाहीं. बंगले व उत्तम घरें यांची तयारी चालू आहे.

मारवाडच्या राजाची हकीकत अशी–रामपुऱ्याकडील हल्ले व तेथील लूट यांची बातमी ऐकून माधोसिंग सांगानेरास डेऱ्यांत दाखल झाला होता. आतां बातमी आहे कीं, तेथून कूच करून पेशकश वसूल करण्यासाठीं जयपूरपासून चाळीस कोस अंतरावर असलेल्या उनियारा तालुक्यांत पोहोंचला व तेथील जमीनदाराकडून पैशाची मागणी करीत आहे. उपर्युक्त ठिकाण त्रासदायक असल्यास कांहीं हातीं येणें कठीण आहे. तरीही कांहीं थोडेंफार मिळेल रामपुऱ्याच्या लुटीमुळें राजाची कमर खचली. त्याबाबत उपाययोजना (तयारी) दिसत नाहीं. राजा बिजेसिंग मेडत्यामध्यें राहून फौज गोळा करीत आहे. अजमीर सुभा घेण्याचा इरादा आहे.

अकबराबाद सुभ्याची हकीकत अशी–आतांपर्यंत अकबराबादेचा किल्लेदार व सूरज-मल जाटाचा नायब बलराम याचे लोक यांमध्यें तोफखान्याची लढाई व मोर्चेबंदी चालू आहे. किल्ल्यांत धान्यसाठा असल्यामुळें तो हातीं येणें कठीण आहे. शाहआलमकडून खास कपडे व स्तुतीचें पत्र किल्लेदाराच्या नांवानें आलें होतें. किल्लेदारानें तें सन्मानानें घेतलें व सूरजमल्लाच्या नांवानेंही पत्र पाठविलें आहे.

गोविंद पंडिताचा मुलगा बाळाजी याची हकीकत अशी–गोविंद पंडिताच्या वेळेप्रमाणें कोराजहानाबाद, चकले इटावा, शिकोहाबाद व इतर महाल यांत त्यांचीं ठाणीं बसलेलीं होतीं. आतां बातमी आहे कीं, हाफिज रहमतखान व दूंदीखान हे स्वतःची फौज घेऊन इटावा, शिकोहाबाद वगैरेंत दाखल झाले. आणि बाळाजीचीं ठाणीं उठवून त्यांनीं रोहि-ल्यांचीं ठाणीं बसविलीं. म्हणून तो पंडित परत फिरला व त्या ठिकाणांच्या पुढें असलेल्या अमरगडामध्यें आला. त्यानें स्वतःचीं पत्रें नवाब अहमदखान बंगश, दूंदीखान व हाफिज रहमतखान यांस पाठविलीं व संधी साधण्यासाठीं उपर्युक्त महालांची जबाबदारी स्वतःवर घेतली रोहिले सरदार सध्या कालाचे स्वामी असल्यानें ते कोणाचीही पर्वा करीत नाहींत. काय घडेल तें पहावें.

गंगेच्या किनाऱ्यावर सिंह (वाघ ?) बरेच असल्यानें वजीर त्यांच्या शिकारी-करितां स्वार होऊन गेला होता. बातमी आली कीं, चारी बाजूंनीं बंदुकीच्या गोळ्या सिंहावर झाडल्या गेल्या. वजीराचा सेवक खोजा नसीमखान याच्या कुशींत गोळी लागून तो मेला व बालाबाशखानाच्या दोन्ही हातांवर गोळीमुळें अशी जखम झाली कीं, त्याचे दोन्ही हात निकामी झाले. नसीमखानाचे पैसे व कांहीं वस्तू मरहूम बहादुरखानाच्या हसनगड किल्ल्यांत असल्यानें वजीरानें स्वतःच्या लोकांस उपर्युक्ताची मालमत्ता जप्त करण्यास पाठविलें. खानाकडील सावकारांच्या टिपेचे कागद आले होते. तेव्हां तेथून जवळच असलेल्या अनूपशहरांतील प्राणनाथ वगैरे सावकारांकडे स्वतःच्या नोकरास पाठविलें. पूर्वीप्रमाणें हल्लीं वजिराचीं पत्रें कलकत्ता बंदरांतील व अजीमाबाद सुभ्यांतील युरोपीयांच्या सरदारांस व बंगालचा सुभेदार कासिमखानाचा मुलगा नसीरुल-मुल्क यासही कपडे व जवाहीर यांसह जात आहेत. ... आशय असा कीं, तुम्ही व हजरत यांमध्यें दोन वर्षें लढाई चालू आहे. गुप्त करार झाला आहे कीं, हजरत सत्ताधारी झाल्यावर उपाय केला जाईल. हें अधिक बरें कीं...दुसरा महिना ... रक्षण करतात. हा सेवक (नजीब) अबदालीच्या ताकिदीप्रमाणें दिल्ली ताब्यांत घेऊन मुहम्मदशाहाच्या अवलादीपैकीं कोणातरी एकास बादशाह करीत आहे. शाहाच्या खर्चासाठीं दोन वर्षांचा जो जास्त वसूल केला होता तो माफ केला आहे. पुढील वर्षी नेहमींप्रमाणें घडेल......शुजाउद्दौला, अहमदखान बंगश व रोहिले सरदार यांनीं पत्र पाठविलें कीं, शाहआलम परत येणार असेल व शाहाच्या कामांच्या मुखत्यारीची ही स्थिती असेल तर आपल्या स्वतःच्या ताब्यांत असलेला मुलूख प्रत्येकाच्या ताब्यांत कसा राहील ? अमीरांमध्यें दाखल व्हावें व जागीर म्हणून मुलूख वाटून घ्यावा असा तह आम्ही नजीबाशीं का केला असेल ? पूर्वीच्या कृपेऐवजीं असें शत्रुत्व दाखवितील तर चांगलें नाहीं. आम्हांला जर असें कळतें कीं, योग्य मार्गावर येत नाहींत व तुमचें म्हणणें मान्य करीत नाहींत तर अशा परिस्थितींत मी दक्खनच्या सरदारांपेक्षां मी वेगळा नाहीं. तेव्हां लाचार होऊन त्यांस बोलावून प्रत्येकाची समजूत घालीन. त्यावेळीं तुम्हांस समजेल. स्वतःचीं कित्येक पत्रें हुजूर शाह व वजीर शाहवलीखान यांस पाठवितात. तिकडून त्यास चांगली तांकीद झाली आहे.

अजीमाबाद सुभ्याची हकीकत अशी—या शहराबाहेर ४।।१ कोसावर असलेल्या फुलवाडीमध्यें १९ शव्वाल हि. ११७४ पर्यंत शाहआलमचा मुकाम होता. त्याच्या डेऱ्याभोंवतीं इंग्रज लोक बसले आहेत. त्याची फौज फार पांगली–पसरली आहे. सुमारें दोन हजार पायदळ व घोडदळ असेल. बंगालचा सुभेदार नसीरुल्मुल्क बहादुर, अजीमाबादेच्या व्यवस्थापकाचा नायब, फौजेचा दिवाण राजा रामनारायण आणि उपर्युक्त नवाबाचा मेव्हणा मीर मुहम्मद सादिकखान यांचा मुकाम मोठें सैन्य व तोफखाना यांसह-हुजुराकडे आहे. कलकत्त्याहून इंग्रज कर्नल रवाना झाला होता. त्यानें ता. १८

शव्वालला हजरतांची मुलाखत घेतली. त्यानें १०१ मोहोरा व त्याच्या बरोबरच्या लोकांनीं अशरफी वगैरे नजर केल्या. उपर्युक्त कर्नलला कपडे व जवाहीर व त्याच्या लोकांस कपडे दिले गेले. (त्यानंतर) ते हजरतच्या निवासापासून चार कोसांवर थांबले आहेत.

...बनारसमध्यें भेटीसाठीं गेले होते...परंतु पुन्हां...दख्खनच्या सरदारांवर विजय मिळविला. आम्हीही हजर आहों. मैत्री ठेवतील तर चांगलेंच. त्यामुळें नवाबानें तो विचार सोडून दिला व कळविलें कीं, तुमची इच्छा असेल तर अवध सुभ्यास परत येतों.

झीनतमहल व मीर्झा बाबाख्तब हे नजीबुद्दौल्यास स्वतःपासून दूर जाऊं देत नाहींत. त्यामुळें उपर्युक्तांनीं या महिन्याचे शेवटीं करार केला कीं हजरतच्या बाबतींत कांहीं चांगलें होत असेल तर ठीकच नाहींतर उठवून...

हि. ११७६ रमजान २ } २३ { श. १६८५ चैत्र शुद्ध ४ इ. १७६३ मार्च १८

हि. ११७६ रजमान पर्यंत घडलेल्या दिल्लीच्या हकीकती व दरबारच्या राहिलेल्या बातम्या यांचा दुसरा बंद.

चकले सरहिंदचा फौजदार झैनखान याची हकीकत अशी–तो त्या परगण्याच्या त्या बाजूस अंबाला महालांत होता. तो कूच करून सरहिंदमध्यें आला. बातमी आहे कीं, शीखांची टोळी खानावरही हल्ले करीत आहे. वस्तुतः ती रूपड जिल्ह्यांत पोहोंचली आहे. कांहीं दिवसांनीं शीख सरदार परतल्यावर करनाळपर्यंतचा प्रदेश घेतील. आतां त्यांस कोणीही विरोधक नाहीं. यानंतर घडेल तें कळवूं.

नजीबुद्दौल्याची हकीकत अशी–रोहिले सरदार कांहीं दिवस हाफिज रहमतखान व दूंदीखान यांच्या लश्करांत राहिले होते, त्यांशीं सल्लामसलत केल्यावर ता. ११ शाबान हि. ११७६ ला तेथून कूच करून हजरताच्या कनोज येथील तळापासून ४।५ कोसांवर असलेल्या स्वतःच्या तंबूत आले. ता. १२ शाबानला शुजाउद्दौला मुलाखतीसाठीं नजीबुद्दौल्याच्या डेऱ्यांत गेला व सल्लामसलत करून स्वतःच्या डेऱ्यास परतला.

हाफिज रहमतखानाच्या लश्करांतून नजीबुद्दौल्यासह शाही लश्करांत आलेल्या याकूब अलीखानानें नजीबुद्दौल्यासह शुजाउद्दौल्याच्या डेऱ्यांत जाऊन त्याची मुलाखत घेतली व मोठ्या नम्रतेनें कांहीं कापड व जवाहीर यांची भेट देऊन स्वतःच्या तंबूत आले नजीबखानानें मुकद्दमे लिहून दूंदीखानाकडे पाठविले.

ता. १३ शाबानला दूंदीखानानें नजीबुद्दौल्याच्या बोलावण्यावरून गंगानदीच्या त्या बाजूकडून फौजेसह कूच केलें व तो नजीबुद्दौल्याच्या तंबूजवळील स्वतःच्या डेऱ्यांत

दाखल झाला. शुजाउद्दौला दूंदीखानाबरोबर आलेल्या सालारजंगासह दूंदीखानास भेटण्यासाठीं त्याच्या डेऱ्यांत गेला. तेथें नजीबुद्दौला, याकूब अलीखान व इतर सल्लागार व कारभारी यांशीं प्रत्येक बाबतींत सल्लामसलत झाली. त्यानंतर कपडे व जवाहीर यांनीं सत्कार झाला. प्रत्येकास स्वतःच्या योग्यतेप्रमाणें देऊन निरोप दिला व स्वतःच्या डेऱ्यास आला.

ता. १४ शाबानला नजीबुद्दौला व याकूब अलीखान यांसह दूंदीखान शुजाउदौल्याच्या डेऱ्यास भेटीसाठीं गेला. तेव्हां सर्वांची सेवा बादशाहाकडे कायम झाली.

ता. १५ शाबानला नजीबुद्दौला, दूंदीखान, याकूब अलीखान व नजीबखानाचे भाऊ शुजाउद्दौल्याच्या मध्यस्थीनें बादशाहाकडे गेले व त्याची भेट घेतली. तेव्हां नजीबुद्दौल्यानें १०१ मोहोरा, त्याचे भाऊ, अफजलखान व सुलतानखान यानीं ११ मोहरा, मुज्दुद्दौला व नजीबुद्दौल्याचे मित्र, नजीबुद्दौल्याबरोबर असलेले सूरजमल जाटाचा कारभारी रुपराम कटारा, राय दिलेरसिंग यांनीं प्रत्येकीं पांच पांच आश्रफी आपल्या भेटीच्या प्रसंगीं मीरबक्षी नजीबुद्दौल्यातर्फें सरकारास (मुघल बादशहास) नजर केल्या आणि दूंदीखान व त्याचे सांगाती यांनीं ५१ मोहरा आणि याकूब अलीखानानें अशरफी नजर केल्या. प्रथम सात कपड्यांचा पोशाख, जवाहीर, घोडा, हत्ती, एक तलवार व एक पोवळ्याची माळ अमीरुल उमरावाच्या रिवाजाप्रमाणें नजीबुद्दौल्यास आणि ६।६ कपड्यांचा पोशाख व जवाहीर, याकूब अलीखान, दूंदीखान, नजीबुद्दौल्याचे भाऊ अफजलखान व सुलतानखान आणि अबदुल अहदखान यांस तसेंच ज्यांनीं भेट घेतली त्या कारभारी लोकांसही कपडे व कांहींना जवाहीर इनाम दिलें; नजीबुद्दौल्यावर मोठी कृपा झाली. त्यास हुजूरकडून नासिरजंग ही पदवी व नजीबुद्दौल्याचा मुलगा जाबिताखान यास मुजफ्फरजंग ही पदवी, निशाण, नगारा, नौबत आणि मूळची व अधिक मिळून सहा हजार जात व सहा हजार स्वार एवढी मनसब मिळाली. सरकारची भेट झाल्यावर त्याची परवानगी मिळून ते स्वतःच्या डेऱ्यांत आले.

हाफिज रहमतखानाचे चाकरीबाबत हुजूरकडून शुजाउद्दौला व नजीबखान यामध्यें पुष्कळ बोलणीं झालीं तरीही उपर्युक्त खानानें उत्तर दिलें कीं, मी अहमदखानाच्या हाताखालीं चाकरी करीन. त्यानें बादशाही चाकरी ताबडतोब कबूल न केल्यानें निरोप त्यास पाठविला कीं, प्रथम दरबारांत हाफिज रहमतखानाची व्यवस्था होईल त्यावेळीं भेट होईल. नाहीं तर काय तेंही कळेल. रोहिले सरदारांची सत्ता आहे. पुष्कळ अफगान अहमदखानाकडे जमले आहेत आणि मुल्ला सरवर, मरहूम बक्षी अली मुहम्मदखान याचा धर्मपुत्र फतेखान, खानसामा व हाफिज रहमतखान या रोहिले सरदारांनीं अहमदखान बंगशाबरोबर कुराणाची शपथ घेतली असल्यानें शुजाउद्दौल्यास कमालीचा मानसिक त्रास झाला. पण त्यानें लढाईस

संमति दिली नाहीं व निश्चय केला कीं, आतां दखनच्या सरदारांनीं झांशीच्या किल्यास वेढा दिला आहे, त्यांस शिक्षा केली पाहिजे व असा कांहीं उपाय केला पाहिजे कीं, दखनच्या सरदारांस नर्मदा ओलांडून या बाजूस येतां येणार नाहीं. आपण झांशीला परत गेलें पाहिजे.

नजीबुद्दौल्यानें शुजाउद्दौल्याशीं करार केला कीं, मी सूरजमल्लास घेऊन झांशीला जाऊन सरकारची भेट घेतों. दुंदीखानानें जाहीर केलें कीं, बंगश व शुजाउद्दौला यांचीं मनस्थिती ठीक नसल्यानें एक महिन्यानें उपर्युक्त खानास समजावून व सांगाती घेऊन हुजूरकडे येतों. आतां मौजे आंवल्यास जाऊन मरहूम सईदुल्लाहखान याच्या जागीं त्यास वारस करून सरकारच्या दर्शनास आणीन. याप्रमाणें ठरलें.

ता. २३ शाबानला कनोजपलीकडून सरकारचे पुढील मुक्कामाचे तंबू शाहमदार दरग्याचे जवळच्या मौजे मखनपूरजवळ ६ कोस मागें गेले. शुजाउद्दौल्याचा डेराही रवाना झाला व दुंदीखानास निरोप दिला. बातमी आहे कीं, नजीबुद्दौला शुजाउद्दौल्याचा निरोप घेऊन चकले इटावा येथें पोहोचला. मागें लिहिल्याप्रमाणें सरकारस्वारी परतल्यावर कनोज व इतर ठिकाणें अहमदखानाच्या ताब्यांत येतील.

हि. ११७६ रमजान २	२४	श. १६८५ चैत्र शुद्ध ४ इ. १७६३ मार्च १८

दरबार व दारुलखिलाफत यांच्या ता. २ रमजान हि. ११७६ पर्यंतच्या हकीकतींचा तिसरा बंद

मल्हारजी होळकराचा वकील बाळूराव नजीबुद्दौल्याबरोबर असतो. बातमी आहे कीं, उपर्युक्तांचे मध्यस्थीनें सरकारच्या मुलाखतीबाबत त्यास कपडे इनाम मिळाले. महादजी शिंद्यानें पाठविलेला मीर अलीतकीखान शुजाउद्दौल्याकडे गेला होता. त्यास सरदारांचीं पत्रें बादशाहाकडे पोहोचविण्याबाबत कपडे इनाम मिळाले आणि राजा हिंदूपत बुंदेल्याच्या वकीलास वजीरुलममालिकाच्या मध्यस्थीनें खानाची भेट झाल्याबद्दल कपडे दिले गेले.

सरकार व शुजाउद्दौला यांचें झाशीकडे परत जाण्याचें पक्कें झालें व पुढील मुक्कामाचे तंबू मखनपूरला रवाना झाले. तेव्हां इमादुलमुल्क नाइलाजानें अहमदखान बंगशचा निरोप घेऊन परतला. फर्रुखाबादेहून कूच करून सिकंदऱ्याला पोहोंचल्यावर सूरजमल जाट व त्याचे किल्ल्यांत नवाबाचे लोक व सर्व सामान होते. त्यांकडे जात आहे. बाकी पूर्वींप्रमाणें आहेत.

सूरजमल जाटाची हकीकत अशी–तो स्वतःच्या किल्ल्यांतून कूच करून अकबराबाद सुभ्यांत येऊन राहिला आहे व उपर्युक्त सुभ्यांतील किल्ल्यांत बादशाही नमुन्याची (लाल)

निशाणें उभीं केलीं व आपले घोडेस्वार व पायदळ आपल्या ठाण्यांतून येथें बोलाविलें आहे. त्याचप्रमाणें पायदळाच्या तुकड्या (टोळ्या) उपर्युक्त हुजुराकडे दररोज येऊन पोहोचत आहेत.

शिंद्यांची हकीकत अशी--महादजी वगैरेंनीं फैसल्याप्रमाणें राज्याकडचे ४॥ लाख रुपये वसूल केल्यावर सोयरकडे कूच केलें या बाबतींत कित्येक दिवसांचा बादशाही नोकर व सध्या नजीबुद्दौल्याचा हरकारा सुजानराय शहाजाद्याच्या देणग्या म्हणून कपडे, जवाहीर व दुशाली घेऊन शिंदे सरदारांकडे आला. त्यानें उपर्युक्त देणग्या व नजीबुद्दौल्याचीं व अबदुल अहदखानाचीं पत्रें पोहोंचविलीं. महादजीनें रोख रु. ५०० व कापड सुजानराय हरकाऱ्यास देऊन नजीबुद्दौल्याकडे पाठविलें. सदाशिव गुजराती नावाच्या मेहतास स्वतःतर्फें नेमलें व त्यास उपर्युक्त हरकाऱ्याबरोबर नजीबुद्दौल्याकडे रवाना केलें.

राजा माधोसिंग व राजा बिजेसिंग स्वतःच्या घरींच स्वस्थपणें सहली व शिकार यांत गर्क आहेत. शुजाउदौला व बादशाह यांचा झांशीस जाण्याचा इरादा आहे. त्या पूर्वीच स्वतः माळवा सुभ्याकडे जावें व मग बादशाहाच्या भेटीस जावें असा राजा माधोसिंगाचा इरादा आहे. त्याप्रमाणें उपर्युक्त राजाच्या वकीलांतर्फें नजीबुद्दौला व शुजाउद्दौला यांस पत्रें येत आहेत.

बातमी आहे कीं, नारो शंकराचा पुतण्या विश्वासराव यानें पायदळ व घोडदळ घेऊन कित्येक दिवसांपासून झांशीच्या किल्ल्यास वेढा घातला आहे. गडकरी लोक लढत आहेत. विश्वासरावानें झांशीस येण्याबाबत शिंदे सरदारांस लिहिलें होतें. तथापि त्यांनीं बुंदीच्या मामलतीचा फैसला झाल्यावरही आतांपर्यंत झांशीकडे फौज पाठविली नाही व स्वतःही गेले नाहीत. कळत नाहीं कीं, असें कां होतें. दिल्लीची हकीकत अशी—बादशाहाजादा व बेगमा आपापल्या महालांत व नजीबुद्दौल्याचा मुलगा जाबिताखान स्वतःच्या लोकांसह किल्ल्यांत रहात आहे. हुजुराकडून त्याचा मुजफ्फरजंग बहादुर या पदवीनें सन्मान झाला. तेव्हां उत्सव करून नाच व गाणें पाहिलें. नजीबुद्दौल्याचा दिवाण राजा भूपालराय, दिवाण राजा महताबराय, बक्षी राजा खियालीराम, मुस्तौफी राजा तुलसीराम, राजा चैतराम, सरकारी खजिनदार राजा बिजेराम व इतर कारभारी यांनीं नजराणा म्हणून अशरफी दिल्या.

जाबिताखान शहारांत जुलूस करीत नाहीं. रोहिले लोकांनीं उपर्युक्ताचे न्याया-सनामुळें जुलूस बंद केला. त्यांचा पाठपुरा वा त्यास मंजूर नाहीं. परंतु चारी बाजूस खेड्यांतील गुजर जमीनदार वाटमारी करून प्रवाशांस लुटतात. घोडेस्वार व पायदळाच्या तुकड्या नसल्यानें या गोष्टीस उपाय होत नाहीं.

पूरब जिल्ह्याची हकीकत अशी—बंगालचा सुभेदार कासिमखान यानें मोंगीर किल्ल्याहून कूच केलें व गंगेच्या पैलतीरावर तो तबा येथें पोहोंचला तो तिकडेच राहिला.

कलकत्याचा इंग्रज सरदार मोंगीरमध्यें आला होता तो अजीमाबाद सुभ्याकडे गेला. तेथून तो कूच करून मुर्शिदाबादेस पोंचला. मुर्शिदाबाद इंग्रजांच्या ताब्यांत आहे. ते तेथें पैसा वसूल करीत आहेत. जाफरखान यास नामधारी सुभेदार करून स्वतःजवळ उपर्युक्त बंदरांत ठेवलें आहे व त्यास रोज खाण्यापुरेसा पैसा देतात.

शुजाउद्दौला स्वतःचें नांवानें मुख्य प्रधानकीची मोहोर खोदून करवीत होता. अबदालीकडून कलमदान व कपडे दिले गेले. शाह आलमनेंही उपर्युक्त मोहोरेबाबत ताकीद दिली. त्याप्रमाणें पुढील प्रासयुक्त शब्दांची मोहोर खोदली गेली. 'वजीरुल-ममालिक जुम्लतुल्मुल्क मदारुल्महाम अअतमादुद्दौला आसफजाह बुर्हानुल्मुल्क अबुल्मन्सूरखान सफदरजंग सिपहसालार यार वफादार शुजाउद्दौला बहादुर फिदवी बादशाह शाह आलम'. आतां बादशाही कागदपत्रांवर तीच मोहोर चालू आहे. अवध सुभ्यांत कांहीं जमीनदारांनीं उठाव केले होते. त्यामुळें उपर्युक्त नवाबानें मिया ईसाखान व इतर दोन रिसालेदार यांस फौजेसह नेमलें (पाठविलें) व उपर्युक्त सुभ्याचा नायब राजा वेणी बहादुर यास पाठविण्याचा विचार होता.

हि. ११७६ रमजान शेवट (३०)	२५	श. १६८५ वैशाख शुद्ध २ इ. १७६३ एप्रिल १५

हि. ११७६ रमजान शेवट (= ता. ३०) पर्यंतचे चार बंद. श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वीं दरबारच्या बातम्या आणि दारुलखिलाफा शाहजहानबादच्या हकीकती, हि. ११७६ शाबान २७ ला शाह अबदालीचें अटक नदी ओलांडून पलीकडे जाणें व तेथून कूच करून पेशावरांत पोहोंचणें, तेथें फौजेची व्यवस्था ठेवण्याबाबत उपाय, इराणच्या किझलबाश आलूस फौजेनें करीमशाहाशीं संगनमत करून शाहाचीं ठाणीं त्या हद्दींतून उठवून लावल्याचें जाहीर होणें, तसेंच तैमूर सुलतानाच्या पत्राप्रमाणें उपायाचा विचार, शीख सरदारांस बराच राग येणें आणि सियालकोट व गुजरात शाहद्दौला वगैरे जेहलमपर्यंतच्या भागावर त्यांचा ताबा, चकले करहिंदचा फौजदार झैनखान व दोआबाचा फौजदार घमंडासिंग हे शीखांच्या हल्ल्यामुळें व त्रासामुळें शाही चाकरी सोडून डोंगरांत आपआपल्या ठिकाणीं गेले असतां त्यांशीं शाहाच्या लिखापढीवरून दर वर्षी द्यावा म्हणून ठरलेल्या व दर वर्षी दिला जात असलेल्या पैशाविषयीं बोलणीं, जसासिंग, ठोकासिंग व इतर सरदार यांचे चकगुरु प्रदेशांतील अमृतसर तळ्यावर वैशाखी म्हणजे मेष संक्रांतीच्या स्नानाकरितां येणें, त्यानंतर दोघांची सल्लामसलत झाल्यावर मुलूख वाटून घेणें व निरनिराळ्या प्रदेशांत जाणें, शाहाचा दिवाण काबुलीमल, उबैदुल्लाहखान यांचें लाहोर सुभ्यांत वास्तव्य व शीखांशीं भेटीचीं बोलणीं, अकबराबादेच्या किल्ल्यांत राजा सूरजमल जाटाचें वास्तव्य, नजीबुद्दौल्यानें धाडलेले जाटाचे मुत्सद्दी रूपराम कटारा, राय दिलेरसिंग वगैरेंचें शाह-

आलम व सूरजमल यांच्या भेटीचीं बोलणीं करण्यासाठीं पोचणें, बादशाहाकडे पोचण्याच्या अटीवर नागरमल्लास वजिराची नायबी मिळणें आणि मुज्दुद्दौला अबदुल अहदखान यास बादशाहाच्या खालशाची व दुय्यम दिवाणी मिळणें, सिकंदरा-बिलासपूर (बिलोचपूर) येथें शाहआलम, शुजाउद्दौला व नजीबुद्दौला यांचा मुक्काम, हा गांव, राजपुरा व इतर खेडीं यांची लुटालूट आणि कैदी व गुरेंढोरें आणून दाखल करणें, इमादुल्मुल्काचें भरतपूर येथें व मारवाडच्या राजांचें स्वतःच्या वतनांत वास्तव्य, मरहूम सईदुल्लाहखानाच्या जागीं आंवला येथें वारस नेमण्याचा रोहिले सरदारांचा इरादा, फर्रुखाबाद या आपल्या गांवीं अहमदखान बंगशाचा मुक्काम, कनोज व इतर महाल यांत आपले फौजदार नेमण्याची उपाययोजना, शिंद्यांच्या सरदारांचा सोपर येथें तळ,: सूरजमल्लाचा मुलगा जवाहिरसिंग याचें दिल्लीजवळील भागांत पोहोंचणें व बाळू जाटाचे तालुके व मौजे तावरचा लहान किल्ला हस्तगत करणें आणि इतर सर्व लहान मोठे प्रसंग याबद्दल ता. १४ रमजान हि. ११७६ ला कासिदाकरवीं पत्र पाठवून कळविलें तें नजरेखालून गेलें असेलच.

यानंतर शाह अबदालीची हकीकत अशी—त्याचा पेशावर शहरांत मुक्काम आहे आणि काबूल–कंदाहारला जाण्याचा त्याचा विचार आहे. तो फौज जमविण्याचा पुष्कळ प्रयत्न करीत आहे. परंतु सरदार लोकांस कांहींहीं (पैसा) न दिल्यानें ते पुन्हां नोकरीवर रुजू होत नाहींत व तसें स्पष्ट उत्तर त्यांनीं दिलें. तेव्हां त्यानें काबूल खोऱ्यांतील युसूफझई जमातीपैकीं आलूस (अफगान) सरदारांस लिहून कळविलें कीं, मजकडे यावें व नोकरी करावी. हे सरदार स्वतःच्या जागीं शेर आहेत आणि कोणी कोणाच्या ताब्यांत नाहींत. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, आम्ही पूर्वीपासून हिंदुस्थानच्या बादशाहाचे नोकर आहों. आपण आम्हांस एकमाही तरी कशी देणार तें दिसतेंच आहे. परंतु जबरदस्तीनें शाहाच्या हुकमतींत असलेल्या या शहरांतील घरोघरच्या लोकांना तो आपल्या सांगाती घेईल. अटक नदी ओलांडल्यावर शाहाची फौज ठिकठिकाणीं विखुरली जाऊन लोक आपआपल्या घरीं गेले. शाहाजवळ आतां सुमारें चार हजार स्वार आहेत.

शीख सरदारांची हकीकत अशी—चकगुरूजवळच्या तळ्याचे कांठीं त्यांचा मुक्काम आहे व जमाव वाढता वाढता बराच मोठा झाला आहे. आतां मोकळेपणानें वैशाखी स्नान झालें. सहारणपूरचा आसमंत व इतर जिल्हे यावर त्यांचे हल्ले चालू आहेत. त्या जमावाशीं मुकाबला करण्याची कोणाचीहि ताकद नाहीं. अबदालीचें संकट टळलें पण शिखांचें आलें.

सरकार, शुजाउद्दौला व नजीबुद्दौला यांजकडे उपर्युक्त सरदारांचा अर्ज आला आहे कीं, हुजूरच्या मर्जीप्रमाणें अबदालीला लाहोर सुभ्यांतून हाकललें तेव्हां तो अटक नदी ओलांडून गेला. फौज जमविल्यानें खर्चाचा बोजा कमालीचा झाला आहे. आका रिजाकुलीखानानें सरकारकडे जी रक्कम पाठविण्याचें ठरविलें होतें ती आम्हांस दिली

जावी. म्हणजे ती फौजेस देतां येईल. सध्याच्या परिस्थितींत शीखांच्या फौजेस थोपवून धरणें आमच्या हातांत नाहीं. ती फौज शाहजहानाबाद (दिल्ली)वर चालून जाईल. मग आमच्यावर दोष ठेवूं नये. ह्यामुळें या भागांतील लोक गडबडून गेले आहेत.

सरहिंद परगण्याचा फौजदार झैनखान याची हकीकत अशी—तो सरहिंदहून कूच करून लखीजंगलाशीं संबद्ध ईसाखानाच्या कोटाकडे गेला होता. अलासिंगानें उघड जबाब दिला कीं, शीख सरदार माझें ऐकत नाहींत. तुम्हांस वाटेल तें करावें. तेव्हां खान त्या जिल्ह्यांतून चकले सरहिंदच्या अलीकडे दोन मजलीवर असलेल्या अंबाला येथें गेला. जें कांहीं थोडेंकार मिळेल तें वसूल करीत आहे व शिपायांचें पोट भरीत आहे. झैनखानापाशीं सुमारें पांच हजार स्वार व पांच हजार पायदळ आहे. परंतु शीखांचें नांव ऐकतांच खान चळचळ कापूं लागतो. म्हणून तो प्रसंग घडण्यापूर्वीं सरहिंदमधून स्वतः बाहेर पडला. शीख फौजा सरहिंद परगण्यांत येण्याचे वेळीं स्वतः दिल्लीस जावें असा खानाचा इरादा आहे.

सूरजमल जाटाची हकीकत अशी—त्याचा आतापर्यंत अकबराबादेस मुक्काम आहे. त्याच्या आमंत्रणावरून भरतपूर किल्ल्याहून कूच करून इमादुल्मुल्क येथें आला व त्यानें सूरजमल जाटाची भेट घेतली. कांहीं दिवस तेथें राहून व आपापसांत सल्लामसलत करून तो परत भरतपूर किल्ल्यांत दाखल झाला.

सूरजमल जाटानें पाठविलेले रूपराम कटारा व राय दिलेरसिंग वगैरे शाही लश्करांत नजीबुद्दौल्याकडे आले. त्यानें जाब पाठविला कीं, मीही एक सामान्य जमीनदार आहे. बादशाही भेटीसाठीं राजे येतील तेव्हां मलाहि त्यांच्या भेटीचा आनंद मिळावा अकबराबाद किल्ला खालीं करून देण्याबाबत उत्तर दिलें कीं, ह्या किल्ल्याचा इमादुल्मुल्कशीं संबंध आहे. उपर्युक्त नबाब घाईघाईनें किल्ल्यांत येऊन स्वतःचा बंदोबस्त करून गेला. बादशाही मुलुखाची दरबारचे लोक व्यवस्था करतील ती मला कबूल आहे व नजीबुद्दौल्यास निरोप पाठविला कीं...पूर्वींप्रमाणें प्रत्येकानें स्वतःचा मुलूख ताब्यांत ठेवावा; अशीं भांडणें चांगलीं नाहींत.

हि. ११७६ रमजान शेवट (३०)	२६	श. १६८५ वैशाख शुद्ध २ इ. १७६३ एप्रिल १५

दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या घडामोडी याविषयीं हि. ११७६ रमजानच्या शेवटच्या (= ३०) तारखेपर्यंतच्या हकीकतीचा दुसरा बंद.

हजरतांच्या लश्कराची हकीकत अशी--ता. २३ रमजान हि. ११७६ पर्यंत हजरत, शुजाउद्दौला व नजीबुद्दौला यांचा सिकंदरा--बिळासपुराजवळ मुक्काम आहे; परंतु त्या जिल्ह्यांतील खेड्यांची फौजेनें इतकी लूट केली कीं, एक एक रुपयास गाय व त्याच-

प्रमाणें इतर जनावरें आणि गुलाम लश्करांत विकावयास येत आहेत. त्या भागांतील नागरीक आकाशाकडे हात उंच करून त्या लोकांस (लुटारूंस) शिक्षा व्हावी म्हणून प्रार्थना करीत आहेत आणि दुःखानें ओरडत आहेत. परंतु कोणी ऐकत नाहीं.

नजीबुद्दौल्यानें ताकीद करून मनाई केली तरीहि रोहिले (लश्कराबरोबरच्या) बादशाही बुणग्यास लुबाडतात. येवढेंच नव्हे तर बेगमांच्या नोकरांवर त्यांनीं हात टाकले. या बेइज्जतीची हकीकत बादशाहानें शुजाउद्दौल्यास सांगितली. शुजाउद्दौल्यानें नजीबुद्दौल्यास सक्त ताकीद केली कीं, अशी दांडगाई चांगली नाहीं. त्याचप्रमाणें त्यानेंहि रोहिल्यांच्या सरदारांस कमालीची ताकीद केली व पुष्कळ लोकांस पकडून बादशाहाकडे पाठविलें. तरीहि रोहिले आपली वागणूक सोडीत नाहींत व उघडपणें मोठ्या आवाजानें नजीबुद्दौल्यास शिवीगाळ करतात कीं, आपले भाऊ अफगान म्हणजे अहमदखान याचे विरुद्ध उभे राहून शुजाउद्दौल्याशीं मैत्री करीत आहे. पण लढाई झाली कीं कळेल...त्यानंतर बादशाह व वजिर यांविषयीं मनाला येईल तसे बोलतात. त्यांत त्यांना कांहीं धोका वाटत नाहीं. तेव्हां ठरलें कीं, प्रथम शाही झेंडे जातील आणि दुसरे दिवशीं नजीबुद्दौला कूच करील. त्याचा डेरा लश्करापासून दूर राहील.

शुजाउद्दौल्यानें नजीबउद्दौल्यास कळविलें कीं, पटेलांनें वेढा घातला व मराठे गंगापार झाले त्या वेळीं मी तुमच्या मैत्रीमुळें धावून येऊन मित्रत्व दाखविलें दख्खनच्या सरदारांवर आम्ही विश्वास ठेवीत नाहीं. तुमचे प्राण व तुमचा मुलूख यांचें संरक्षण केलें. नंतर तुमच्या बोलावण्यावरून शाहाकडे गेलों. आतांहि तुमच्या लिहिण्यावरून अहमदखाना-बरोबरची लढाई थांबविली आणि तुमच्या येण्याची वाट पाहात राहिलों. तुम्हीं पूर्वीच्या हक्कांच्या परिणामांकडे लक्ष देऊन आपल्या सरदारांची लाज राखण्यासाठीं सरदारांस कनोजहून परतविलें. कराराप्रमाणें अहमदखानास हुजुराकडे आणिलें नाहीं. तुम्हीं, आम्ही व बादशाहा यांस तुच्छ लेखिलें. आतांहि स्वतःच्या नात्यांतील सरदारांची खबरदारी घेण्याचा इरादा नसेल तर मैत्रींचा हात मागें घेऊ. पुढें परमेश्वरी इच्छेप्रमाणें होईल. नजीबुद्दौल्यानें उत्तर दिलें कीं, मी सर्वस्वी नबाबाशीं मित्रत्वाच्या नात्यानें आहे. रोहिले सरदार व त्यांची फौज यांची हकीकत अगदीं स्पष्ट आहे.

सध्या नजीबुद्दौल्यानें मुला मुहसिन व स्वतःचे इतर विश्वासू लोक यांस हाफिज रहमतखान व दुंदीखान यांजकडे बोलणीं करण्यास पाठविलें कीं, कराराप्रमाणें अहमद-खानास हुजुराकडे आणावें. नाहीं तर लढाई ठेवली आहेच.

अहमदखान बंगशाची हकीकत अशी—तो उपर्युक्त वर्षाच्या २५ रमजानपर्यंत फर्रुखाबादेमध्यें होता. सध्या उमरावगीर, उपर्युक्त नवाब स्वतः व त्याचे लोक कनोज, अकबरपूर वगैरे महालांत जाऊन त्यांनीं बादशाही ठाणीं उठविलीं होतीं. या बातमीनें नवाब शुजाउद्दौल्यानें खूप खवळून स्वतःचे सुमारे दहा हजार घोडेस्वार व प्यादे

अहमदखानाचे लोकांस उठविण्यासाठीं पाठविले. त्याप्रमाणें उपर्युक्त फौज पोहोंचण्या-पूर्वीं अहमदखानाचे लोक उठून गेले. उपर्युक्त नवाबाच्या रिसालेदारांनीं पूर्वींप्रमाणें अकबरपूर, कनोज व इतरत्र ठाणीं बसविलीं व तेथून परतून ते लश्करांत दाखल झाले.

नवाब शुजाउद्दौल्याचा इरादा आहे कीं, मुलखाची व्यवस्था होऊं शकत नसल्यानें, प्रत्येक ठिकाणीं भांडणें व अडचणी चालू असल्यानें व याशिवाय इमादुल्मुल्क सर्व कामांत गोंधळून गेल्यानें हुजुरास नजीबुद्दौल्यानें ताब्यांत घेऊन स्वतः अलाहाबाद सुभ्या-कडे जावें. परंतु त्याची वरवर इच्छा आहे कीं, अहमदखानानें हुजुरांची भेट घ्यावी म्हणजे सर्व गोष्टींचा स्पष्ट उलगडा होईल.

अहमदखानानें स्वतःचा मानलेला मुलगा व सेनापति यांस बादशाहाकडे नजराणा व ओवाळणी यांसह पाठविण्याचें ठरविलें होतें. यामुळें सिकंदरा, बिलासपुर आणि अहमदखान व हाफिज रहमतखान यांशीं संबद्ध खेडींपाडयांत त्यांना पाठविणें तहकूब केलें.

हाफिज रहमतखान व इतर रोहिले सरदार यांनीं सईदुल्लाहखानाच्या ४० व्या दिवसासाठीं पोहोंचण्याच्या इराद्यानें फर्रुखाबादेच्या समोर असलेल्या गंगा नदीच्या पैलतीराहून मौजे आंवला येथें स्वतःचे डेरे रवाना केले होते. परंतु नारा (रो) जी उपर्युक्त खेडयांत पोहोंचल्याची बातमी आल्यामुळें त्यांनीं कूच करणें थांबविलें. परंतु दूंदीखान कूच करून या वर्षाच्या ९ रमजानला आंवल्यास पोहोंचला. आपला नातेवाईक मरहूम खान याच्या चाळिसाव्या दिवसानंतर तेथून कूच करून उपर्युक्त खानाच्या बसोली गांवीं गेला. रमजाननंतर सरकारच्या लश्करांत जाण्याचा त्याचा इरादा आहे.

बातमी आली कीं, मुल्ला मुहसिनाच्या सल्ल्याप्रमाणें हाफिज रहमतखानानें लश्करांत जाण्याच्या इराद्यानें स्वतःचे डेरे गंगेच्या अलीकडे पाठविले व करार केला कीं, दूंदीखानानें आपल्या गांवाहून कूच करून यावें व दोघांनीं मिळून शाही लश्करांत जावें. लश्करांत पोहोचल्यावर शुजाउद्दौल्याची भेट घेऊन अमहमदखानाच्या भेटीचें पक्कें करावें व भांडण मिटविण्याची खटपट करावी.

अजून सईदुल्लाहखानाचे जागीं कोणी मनुष्य कायम न झाल्यानें रोहिले सरदार स्वतःच्या जागीं [स्वस्थ] आहेत. कसा करार होतो, तें पहावें. परमेश्वरी कोपानें हाफिज रहमतखानाच्या कसबे बरेलीमध्यें आगीचा एवढा डोंब उसळला कीं, जवळ जवळ १॥ हजार माणसें, ४।५ हजार जनावरें आगींत जळालीं. त्याचप्रमाणें बसोली, आंवला, बदायून व मुरादाबाद येथें आगी लागून दोन दोन हिस्से वस्ती जळाली. दोन मशीदींत हाफिझ सैफी (अभिचार मंत्र) म्हणत होते तेही जळून गेले व सैफीनें त्यांचे कपडया-वर परिणाम केला (कपडे जळाले) ………

सूरजमल जाटाचा मुलगा जवाहिरसिंग याची हकीकत अशी—पूर्वीं मौजे तावरू त्यानें जिंकलें होतें. आतां मूसाखान बलोचच्या भाऊबंदांशीं संबद्ध अशा मौजे नाहारच्या

गढीवर तो चालून गेला. कालेखान बलोचनें किल्ल्यांतून कांहीं दिवस लढाई चालू ठेविली. सरते शेवटीं जवाहिरसिंगाबरोबर मोठा तोफखाना असल्यानें व बलोचला ठासून राहण्याची ताकद न राहिल्यामुळें तो पळून फर्रुखनगरला मूसाखानाकडे आला. २४ रमजानला जवाहिरसिंगाचे लोक किल्ल्यांत दाखल झाले.

याकूब अलीखानाचा शाहजहानपूरमध्यें मुक्काम आहे. उपर्युक्त नबाबानें राजा लक्ष्मीनारायण वगैरेंच्या जहागिरींच्या महालांबाबत हुजुरांस दर महिन्यास एक लाख रुपये देण्याचें कबूल केलें होतें. नजीबानें स्वतःचा मुलगा जाबिताखान याचे नांवें पत्र लिहिलें कीं, [जहागिरी] जप्त कराव्या. या बातमीनें उपर्युक्त राजानें मुक्काम हलविला व तो राजा खुशहालचंदाच्या हवेलींत येऊन राहिला व लश्करांत जात होता. जाबिताखानानें उपर्युक्तास कांहीं दिवस आपल्या ताब्यांत ठेविलें शेवटीं जवळजवळ १५००० रुपये नजराणा घेऊन जहागिरीचे परगणे त्यास बहाल केले. तेव्हां राजा लक्ष्मीनारायणानें जाणें रद्द केलें व बहुधा याकूबखानाकडूनहीं पैसे घेऊन महाल बहाल करील. अबदाली विलायतेस गेल्यानें [पोक्त] विचार कमी झाला. तो उपटसुंभ होता व आतां तो परतणार नाही अशा समजुतीनें ते विलग झाले आहेत.

हि. ११७६ रमजान शेवट (= ३०) — **२७** — श. १६८५ वैशाख शुद्ध २, इ. १७६३ एप्रिल १५

हि. ११७६ रमजान शेवटच्या तारखेपर्यंतच्या दरबारच्या बातम्या व दिल्लींतील हकीकती यांचा तिसरा बंद.

नजीबुद्दौल्याबरोबर असलेला सुभेदार राव मल्हारजी याचा वकील बापूराव पंडित याची बातमी आली कीं, तो नजीबुद्दौल्याकडून पत्रें घेऊन मल्हाररावाकडे रवाना झाला.

विठ्ठल शिवदेवाचा वकील जगन्नाथ पंडित हुजुराच्या भेटीस आला होता त्याला पोशाक मिळून निरोप झाला. बादशाह व शुजाउद्दौला यांचीं पत्रें घेऊन तो रवाना झाला.

शिंद्यांच्या सरदारांची हकीकत अशी—केदारजी व महादजी शिंदे यांचा कांहीं दिवस शिवपूरमध्यें मुक्काम होता. तेथून १८ रमजानला त्यांनीं झांशीकडे कूच केलें. विश्वासराव पंडितानें शौर्यानें स्वतःचे मोर्चे झांशीच्या किल्याच्या तटापर्यंत नेले. किल्यांतील लोक तोफांनीं लढाई करीत आहेत. लवकरच झांशी जिंकल्याची बातमी येईल. कारण किल्ल्यांतील लोक फार हैराण झाले आहेत व संभाजी पंडितहि विश्वासरावाला सामील झाला आहे.

राजा माधोसिंग व राजा बिजेसिंगहि पूर्वीप्रमाणें आपल्या ठिकाणींच रहात आहेत आणि शिकार व सहल यांत मशगूल आहेत.

बंगालचा सुभेदार कासिमखान याची हकीकत अशी—तो अजीमाबाद शहराच्या बाहेरील जाफरखानाच्या बागेंतून मोंघीरच्या किल्यांत गेला व तेथें त्याचें वास्तव्य आहे. बातमी अशी कीं, उघडपणें तर सरकारचीं पैशाबाबत पत्रें......बाबत...... अजीमाबाद सुभ्याहून उपर्युक्त नबाबाकडे आलीं होतीं व त्याच्या तरतुदीची खात्री झाली होती. परंतु नवाबाबरोबर असलेला इंग्रज करकीखान...त्या सुभ्यांत दाखल... पुष्कळ दिलजमाई केली कीं, मी लढाईला तयार आहे. नवाब कमालीचा गर्विष्ठ आहे. फिरंगी फौज मेंढराप्रमाणें तरवारीला भिते आणि बंगालचा माजी नवाब जाफरखान कलकत्ता बंदरांत इंग्रजाकडे रहात आहे. कलकत्त्याचे इंग्रज आपला भाग ठरवून घेऊन तो पैसा वसूल करीत आहेत. परमेश्वरी कृपेनें रुपये प्रत्यक्षपणें मुर्शिदाबादेंत जमा झाले आहेत. आणि जाफरखान यास परमेश्वराशिवाय कोणाकडूनही आशा नाहीं. देवाच्या कृपेनें लवकरच आपली फौज त्या जिल्ह्यांत जाईल व तो पक्कें ठरल्याप्रमाणें कायम झाला म्हणजे कोट्यवधि रुपये सरकारी खजिन्यांत दाखल होतील.

नजीबुद्दौल्याचा वकील राव मेघराज श्रीज्वाला भवानीचें दर्शन घेऊन कूच करीत करीत २६ रमजानला दिल्लीस पोहोंचला व त्यानें जाबिताखानाची भेट घेतली. आजारी असल्यानें फुरसतीनें नजीबाकडे जाईल.

ज्वालाभवानीची यात्रा व दर्शन झाल्यावर सूरजमल जाटानें पाठविलेल्या कलीमुल्लाखानाबरोबर बापू पंडित दारुलखिलाफतीस रवाना झाला. त्याजबरोबर जम्मूचा काफिला व व्यापारी माल पुष्कळ असल्यानें मुक्काम करीत करीत येत आहे.

जम्मूचा राजा डोंगरावर आहे. त्यानें शहाला मिळून धान्याची रसद अबदालीच्या लश्करांत पोहोंचविली म्हणून शत्रुत्वामुळें शीखांनीं पर्वताच्या पायथ्याशीं असलेले व उपर्युक्त राजाशीं संबद्ध असे चपराली वगैरे महाल लुटले.

जाबिताखान थोडेसे घोडेस्वार व पायदळ घेऊन किल्ल्यांत मुक्काम करून आहे व शहराच्या कारभारांत गर्क आहे. शहरांत शीखांची कमालीची भीति असल्यानें नजीबुद्दौल्यानें लिहिल्याप्रमाणें दिल्लीपासून चकले सरहिंदपर्यंत शीखांची रोज बातमी कळावी म्हणून कासिदांची डाक बसविली आहे. शहरांतील लोकांशींही त्याचें फारच भांडण आहे. कारण तो अबदालीसारखा आहे.

अबदालीचे लश्करांतून स्वतः परत येण्याचे वेळेस नजीबुद्दौल्यानें डोंगरी व इतर महालांतून दोनतीन लाख रुपयांचे जामीन घेऊन त्यांस गंगानदीच्या पैलतीरावरील बिजनूर गावांत ठेविलें होतें. आतां बातमी आहे कीं, डोंगराळ खेड्यांतील जमीनदारांनीं ओल सोडविण्यासाठीं एक होऊन लग्नाच्या बहाण्यानें एका माणसास उभें केलें.

लग्नाच्या वरातीबरोबर सशस्त्र मिरानपूरमध्यें जाऊन आणि तेथील जमीनदारांसह गंगा-नदीचा पायउतार पाहून रात्रीचे वेळीं ती ओलांडली. मध्यरात्रीचे वेळेस बिजनूरला वेढा दिला. तेथील रोहिल्यानें लढा दिला. शेवटीं हल्ला करून ते गढींत आले. स्वतःचे लोकांस सोडवून बरोबर घेतलें व पुन्हा गंगानदी ओलांडून ह्या बाजूस येऊन प्रत्येक जण आपआपल्या खेड्यांतील सुरक्षित ठिकाणीं पोहोंचला. खबर आहे कीं, जवळ जवळ दोन हजार बर्कंदाज प्यादे होते. खूप उत्तम काम केलें.

मुज्दुद्दौला अबदुल अहदखान नजीबुद्दौल्याचा बऱ्याच कामांत सल्लागार आहे. सरकारचा खलिता नजीबुदौल्यास पाठविला होता तो त्याकडे गेला. आतां नजीबुदौल्याच्या पत्राची पोंच व स्वतःच्या उत्तराचें पत्र नजीबाच्या कासिदजोडीकडून आलें. मला लिहिलें आहे कीं, जुना परिचय व लक्ष असून पत्र पाठविलें नाहीं. यामुळें खूप आश्चर्य वाटलें. परंतु मी त्यांस लिहिलें आहे कीं, अवकृपेनें आम्हांस विसरूं नये. कारण हा स्वतःस सरकारहून निराळा समजत नाहीं. मुज्दुद्दौल्याच्या लिहिण्याप्रमाणें सरकारास कळविलें व पत्र स्वतःच्या मोहोरेनें बंद करून खाजगी नोकराबरोबर पाठवून दिलें नजीबुद्दौल्याच्या कासिदांसही त्यांच्याबरोबर पाठवून दिलें. आशा आहे कीं, उपर्युक्त कासिदांजवळ उत्तर मिळेल. जें कांहीं मनांत असेल त्याचें उत्तर मुज्दुद्दौला व नजीबुद्दौला यांचे नांवानें मजकडे पाठविण्याची कृपा करावी. म्हणजे तेंच पत्र मुज्दुद्दौल्याकडे पाठवून व उत्तर मागवून तें पाठवीन. कारण मुज्दुद्दौल्यानें ह्या कामाबाबत अशा तपशीलानें लिहिलें आहे कीं पत्राची रसीद व उत्तर नजीबुद्दौल्याच्या नोकरांच्या करवी व उत्तराचा तपशील......

अबदुल अहदखानानें पूर्वीच्या पत्रव्यवहाराच्या प्रघाताप्रमाणें नजीबुद्दौला व स्वतः यांच्या मोहोरांनीं नारो शंकराच्या नांवानें पत्र पाठविलें होतें. त्याप्रमाणें तेंच पत्र उपर्युक्त राजाकडे व आपल्या दिवाणांकडे पाठविलें. सरकारच्या माहितीसाठीं कळविलें आहे.

अलीकडे जयपूरहून बातमी आली कीं, आपण व निजामअलीखान यांत पुन्हा वितुष्ट आलें; यामुळें माझ्या मनांत मोठी खळबळ निर्माण झाली. मी सरकारकडून लवकर उतर येईल अशी अपेक्षा करीत आहे. श्रीमंतांच्या उतराप्रमाणें करूं.

आपणांस माहीत असलेल्या व मी पाठविलेल्या अर्जांच्या उत्तरीं दोन पत्रांसह पाठविलेले परवाने पोहोचले. त्याप्रमाणें ते प्रत्येकाच्या नांवें धाडलें. उत्तर येईल तें सरकारकडे पाठवूं. नावाजणी म्हणून दिलेल्या एक हजार रुपयांचा तनखा-परवाना महादजीचे नांवें होता; त्याचे पैसे वसूल व्हावयाचे. पण तें पत्र त्यानें जबरदस्तीनें जवळच ठेवून उत्तर दिलें कीं, 'दिल्लीस पोहोचूं तेव्हां पैसे देऊं.' हें आपणांस कळविलें तें आपण नजरेखालून घातलें असेल. उपर्युक्तांच्या नांवांनीं ताकीदपत्रें खाजगी पत्रांतून लिहिल्यास तीं शक्य तों मजकडे पाठवावीं. आतां येथें पुनः बंडाळी झाल्यानें चिंता उत्पन्न झाली आहे. या परिस्थितींत आपल्या दर्शनाची अपेक्षा आहे.

हि. ११७६ } २८ { श. १६८५ ज्येष्ठ वद्य १४
जिल्हेज २८ } { इ. १७६३ जुलै १०

२८ जिल्हेज सन ११७६ पर्यंतचे तीन वंद. श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वी दरबारच्या बातम्या, दिल्लीच्या हकीकती, चकले इटाव्याचा अधिकारी हाफिज रहमतखान याशीं मुलाखत झाल्यावर नजीबुद्दौल्याचें तेथून परतणें, गंगेवरील बोठा घाटानें नदी ओलांडून पलीकडे जाणें, हि. ११७६ तील जिल्कादच्या शेवटच्या तारखेस नजीबाबादेस येणें, उपर्युक्त नदीच्या ऐलतीरीं तोफखाना व इतर गोष्टी मागें ठेवणें; आपला सख्खा भाऊ सुलतानखान, याकूब अलीखान, अबदुल अहदखान व नबाब सादुद्दीनखान यांस दिल्लीला पाठविणें; उपर्युक्त खानांचें दिल्लीस पोहोंचणें आणि राजपुत्र व जीनतमहल बेगम यांची भेट घेऊन स्वतःच्या हवेलींत दाखल होणें, बापाच्या आज्ञेप्रमाणें सर्व लोकांसह व राजा चैतराम खजानची, राजा महताबराय दीवान, राजा तुलसीराय मुस्तौफी व उपर्युक्त खानाचे कारभारी यमुना नदीच्या दोन्ही कांठावरील महालांचे हिशेब तपासण्याचें काम वर्षभर करीत असतां त्या आपल्या नोकरांसह नजीबखानाचा मुलगा जाबितखान याचें या सालच्या ४ जिल्हेजला नजीबाबादेकडे कूच, त्यानंतर ४ तारखेला सुलतानाचे किल्ल्यांत दाखल होणें, शुजाउद्दौला व नजीबुद्दौला यांमध्यें कमालीचें अस्वास्थ्य व राग, अबदालीच्य काबूल सुभ्यांतील मुक्कामाची व कंदाहारला जाण्याच्या इराद्याची हकीकत, जसासिंग व ठोकासिंग यांचें दुआबांत आणि चरतसिंग वगैरेंचें जेहलमच्या पैलतीरीं असणें, सूरजमल जाटाचा अकबराबादेंत, इमादुल्मुल्कचा भरतपूरच्या किल्ल्यांत, अहमदखान बंगशाचा स्वतःच्या गांवांत फर्रुखाबाद येथें व मारवाडच्या राजाचा स्वतःच्या गांवीं मुक्काम, शाहआलम आणि शुजाउद्दौला यांचें जाजमऊ येथें जाणें, गेल्या वर्षाप्रमाणें शिवराजपूर येथें छावणी टाकणें व तेथें छपरें आणि वंगले उभारण्याबाबत तयारी, बंगालचा सुभेदार मीर कासिम याचा मोंघीरच्या किल्ल्यांत मुक्काम, महाराजा सरूपचंद व राजा महताबचंद या बंगालच्या सुभ्याच्या नगरशेट सावकारांना दग्यानें मोंघीरमध्यें पकडून आणिलें जाणें, खानानें त्यांना किल्ल्यांत सन्मानानें बंदोबस्तांत ठेवणें, जसासिंगाच्या पत्रोत्तराबरोबर मरहूम आदीनाबेगखानाचा मुत्सद्दी दिलाराम याची अर्जी व इतर सर्व हकीकतीचीं पत्रें जासुदाबरोबर ६ जिल्हेज हि. ११७६ रोजीं हुजुरांकडे पाठविलीं. तीं सर्व आपण नजरेखालून घातलीं असतीलच.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी--काबूल सुभ्यांत बरेच दिवस राहून त्यानें आलम यूसुफझाई सरदारांस नोकरी व मैत्री याबाबत कितीही ताकीद केली व लाहोर सुभ्याचा सर्व महसूल देण्याबाबत वायदे केले तरी त्यांनीं मैत्री केली नाहीं. त्यांनीं उत्तर दिलें कीं, पूर्वी दिलेल्या वचनापासून ठरलें आहे कीं, आम्ही हिंदुस्थानच्या बादशाहाविरुद्ध कमर कसणार नाहीं. आतां बातमी आहे कीं, शाह काबूल सुभ्याहून कंदा

हारकडे रवाना झाला. नंतर कंदाहारमध्यें दाखल झाल्याची बातमी आली. शाहवलीखान, बरखूर्दारखान, शाहपसंदखान, इतर सरदार व कांहीं नोकर शाहाबरोबर आहेत.

ज्याप्रमाणें दिल्लींत शाह अबदालीच्या येण्याची अफवा कांहीं दिवस उठून नंतर ती थंड झाली, त्याप्रमाणें काबूल व पेशावर यांमध्यें शीख आल्याची बातमी सामान्य व मोठ्या लोकांच्या तोंडीं आहे. या कारणानें अबदालीनें आपल्या जहानखान बक्षीस थोडे लोक बरोबर देऊन तिकडे पाठविलें. आणि जाहीर केलें कीं, लाहोरची सुभेदारी व शीखांचा बंदोबस्त यांसाठीं त्यास पाठविलें आहे. त्याप्रमाणें उपर्युक्त खान काबूलहून कूच करून काबूलच्या अलीकडे पांच मजलीवर असलेल्या जलालाबादेस पोहोंचला. सध्या तो तेथें राहून फौजेच्या व्यवस्थेकडे लक्ष देत आहे. अबदालीचा असमंजसपणा उघड झाल्यानें कोणीहि नोकरीस कबूल नाहींत.

शाहाचा थोरला मुलगा तैमूर सुलतान कंदाहारमध्यें आहे. इराणच्या बादशाहाशीं संबंद्ध अशा आल्स· किजलबाशांच्या सरदारांनीं इराणचा मुलूख ताब्यांत घेतला. तेव्हां इराणला साह्य करण्याचेंहि शाहाच्या मनांत आहे. शीखांच्या बाबतींत उपाय योजण्याचाहि त्याला अत्यंत त्रास होत आहे. पावसाळ्यानंतर व्हायचें असेल तें होईल.

...शीख सरदारांची [हकीकत] अशी--हल्लीं जसासिंग वगैरे दोआबांतून कूच करून अमरसरमधील जगगुरु अथवा गुरुमठ याठिकाणीं सल्लामसलतीसाठीं गेले. गुजरसिंग व लहानासिंग वगैरेंचा माझामध्यें व चरतसिंग वगैरेंचा जेहेलमच्या पैलतीरीं मुक्काम आहे. बातमी आहे कीं, सर्व सरदार उपर्युक्त ठिकाणीं पोहोंचून मसलत करतील व तींत ठरल्याप्रमाणें वागतील.

शुजाउद्दौल्यानें पाठविलेला गंगोराय दिल्लीहून दुआबांत जसासिंगाकडे गेला आणि त्यानें पोशाक, बादशाही हुकूम आणि शुजाउद्दौल्याचीं पत्रें पोहोंचवलीं. तेव्हां त्यास उत्तर मिळालें कीं, आम्ही सल्लामसलतीसाठीं जगगुरुकडे जात आहों. हुजुरांच्या हुकुमानुसार सरदारांशीं बोलून हुकुमाप्रमाणें करूं.

चकले सरहिंदचा फौजदार जैनखान याची हकीकत अशी—उपर्युक्त परगण्यांत शीख आल्याची अफवा आणि रूपड वगैरे महालांवर त्यांचे हल्ले व लूट यांची बातमी ऐकून तो भटिंडा भागांत गेला. अलासिंग जाटास अबदालीची फारच भीती वाटत असल्यानें उपर्युक्त (सरहिंद) महालांच्या व्यवस्थेचें काम त्यानें जसासिंगाकडे सोपविलें आणि तीन लाख रुपयांचा ठराव केला. नंतर जैनखानाकडे निरोप पाठविला कीं, पुढील व्यवस्था केली पाहिजे. तें उपर्युक्त खानानें मान्य केलें. जसासिंग सरहिंदमध्यें त्याचे हुकूम अमलांत आणू लागला. अलासिंगाची फौज जैनखानाबरोबर स्वतःच्या तैनातीच्या वसुलींत व व्यवस्थेंत गुंतली आहे आणि उपर्युक्त खान त्या महालाची व्यवस्था पहात आहे. त्यानें शाहाला कळविलें कीं, प्रसंग जाणून शीख सरदारांबरोबर व्यवस्थेचा ठराव केला. अटक नदी ओलांडून फौजा अलीकडे येतील त्या वेळीं मी साह्यास हजर आहे.

हि. ११७७ } मोहरम २० }　　२९　　{ श. १६८५ आषाढ वद्य ७ { इ. १७६३ आगस्ट १

हि. ११७७ मुहर्रम २० पर्यंतचे दोन बंद व एक लहान कागद. श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वी दरबारच्या बातम्या, दिल्लीच्या हकीकती, अबदालीचें काबूल सुभ्याहून कंदाहारकडे कूच, जहानखानास स्वतःकडे बोलाविणें, उपर्युक्त खानाचें शाहाच्या हुकुमाप्रमाणें जलालाबादेहून काबूलकडे कूच, जसासिंग, ठोकासिंग, गुजरसिंग, लहानासिंग वगैरे शीख सरदारांचें जगगुरु येथें सल्लामसलतीसाठीं येऊन पोहोचणें, उपर्युक्त सरदारांचा दोआब, सियालकोट वगैरे अटक (सिंधु) नदीच्या ऐलतीरापर्यंत ताबा; जैनखान फौजदाराचा चकले सरहिंदमध्यें व त्या ठिकाणच्या आसपासच्या मुलुखांत मुक्काम, अलासिंग जाटानें उपर्युक्त भागाबाबत उपर्युक्त सरदारांशीं पैशाविषयीं ठराव करणें व गोंधळ नाहींसा करणें, नजीबुदौल्याचा गंगेच्या पैलतीरावरील नजीबाबादेस मुक्काम, यमुनेच्या ऐल व पैल तीरांवरील [कांहीं] वर्षांचे महालांचे हिशेब स्वतःचा मुलगा जाबिताखान याचे मध्यस्थीनें स्वतःच्या सरकारच्या मुत्सद्यांकडून समजाऊन घेणें, नजीबखानाचा भाऊ सुलतानखान यानें केलेला किल्ल्याचा बंदोबस्त, राजा सूरजमल जाटाचा आग्र्यामध्यें...इमादुल्मुल्कचा भरतपूर किल्ल्यांत व हाफिज रहमतखानाचा इटाव्यामध्यें मुक्काम, हजरत व शुजाउद्दौला यांचें ता. १६ जिल्हेज हि. ११७६ ला अलाहाबादेस पोहोंचणें व शिवराजपूरमध्यें छावणी ठेवण्याचा हुकूम, अलाहाबादेंत धान्याची महागाई व इतर सर्व हकीकती यांचें पत्र कासिदावरोबर उपर्युक्त वर्षी ता. २८ जिल्हेज ला हुजुरांकडे पाठविलें, तें नजरेखालून गेलें असेलच.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी—बातमी आली कीं शाह कंदाहारास पोंचला. तेथून त्यानें कंदाहारला जोडलेल्या भागाचा सत्ताधारी नसीरखान ब्रूही बलूचसाठीं भेट म्हणून दोन घोडे, पोषाख व जवाहीर पाठविलें; हेतू हा कीं त्यानें शीखांच्या पारिपत्यासाठीं मैत्रीच्या अटी पाळाव्या. खानानें अबदालीची भेट स्वीकारली नाहीं. तो बोलला कीं, शाहाचे शीखांशीं युद्ध जुंपलें आहे व हा इकडे कंदाहारास आला आहे. तेव्हां मुख्य मंत्री शाहवलीखानाला फर्माविलें कीं, नसीरखानाचें मन वळवून त्याला वश करावें. इराण प्रकरणाबद्दलही असें बोलतात कीं, इराणच्या जमाती स्वतःच्या भागांत मालकच झाल्या आहेत.

शीख सरदारांची हकीकत अशी—जहानखानाच्या आगमनाची अफवा ऐकून चरतसिंग सियालकोटाहून रहतासगडाजवळ आला. चकगुरूस सल्लामसलतीसाठीं सरदार जमले होते. ते या बातमीमुळें चरतसिंगाच्या मदतीसाठीं एकत्र झाले. उपर्युक्त सरदारांच्या फौजा अटकनदीच्या अलीकडे रावळपिंडीस गेल्या व त्या जिल्ह्यांत त्यांच्या हालचाली चालू आहेत. दुआब वगैरे महालांवर त्यांचाच ताबा आहे मरहूम सुलतान मुकरबखानाच्या जमीदारीच्या प्रदेशांत त्या जमातीचा अमल चालू झाला. सरदारांचा इरादा

आहे कीं, अबदाली लाहोरला जाण्यासाठीं पेशावरला येईल तेव्हां स्वतः अटकला पोहोंचून लढाईच्या तयारीनें रहावें.

जैनखानाचा मुलगा सरहिंद परगण्यांत आहे. अलासिंग जाटाच्या लोकांना घेऊन तेथील कारभारांत गर्क झाला आहे. सरहिंद परगण्याच्या अलीकडे अंबाल्याजवळ उपर्युक्त खानाच्या हालचाली चालू आहेत.

दिल्लीची हकीकत अशी—नजीबुद्दौल्याचा बंधू सुलतानखान हा पूर्वीप्रमाणें किल्ल्यांत आहे. जवानबख्त व जीनतमहल आपल्या महालांत आहेत. किल्ल्याचे व दिल्लीचे सर्व अधिकार उपर्युक्त खानाकडे आहेत. उपर्युक्त खानानें ताकीद केली तरी रोहिले लोक शहराच्या तटाबाहेरील ओसाड प्रदेशांत प्रवाशांना कापड वगैरेसाठीं ठार करतात. सरकारचे माहितीसाठीं कळविलें आहे.

शाहवलीखानाचा नातेवाईक सुहराबखान यानें सजावलीसाठीं चाळीस लाख रुपये मुकरर केले होते व आगा...एलची यास पाठविलें होतें. शाहआलम व शुजाउद्दौला यांनीं पाठविलेला वकील उपर्युक्त खानांबरोबर शाही लश्करांत गेला होता. उपर्युक्त नबाबानें उत्तर दिलें कीं, ह्या वजिराच्या ताब्यांत दिल्लींतील महाल आहेत. नजीबुद्दौल्यानें उपर्युक्त दुर्रानीस स्वतःबरोबर आणून दिल्लीस पाठविलें होतें. उपर्युक्त खानानें पैशाच्या अडचणीमुळें आपल्या कांहीं वस्तू व घोडे विकून गुजराण केली आणि याकूब अलीखानास कळविले कीं, शीख वाटेंत आडवे आल्यानें माझें विलायतेंत शाहाकडे जाणें कळतच आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यांचा खर्च दिला पाहिजे. उपर्युक्त नबाब व नजीबुद्दौला यांनीं उपर्युक्त खानाचे बाबत पत्र पाठविलें होतें. त्याप्रमाणें सुलतानखानानें नजीबुद्दौल्याच्या लिहिल्याप्रमाणें उपर्युक्तास त्याबरोबरच्या स्वारांसह नोकर ठेवून एक हजार रु. ची दरमहाची हुंडी व सरासरी रु. वीस कायम करून दिले.

नजीबुद्दौल्याची हकीकत अशी—आतांपर्यंत गंगेच्या पैलतीरावर असलेल्या नजीबाबादेस त्याचा मुक्काम आहे. जाबिताखानाच्या मध्यस्थीनें हिशेब तपासण्याचें काम चालू आहे व बहुतेक कारभारी लोक त्यांत गर्क आहेत. बातमी आहे कीं, ह्याचा फैसला झाल्यावर हि. ११७७ च्या मोहरमच्या शेवटीं जाबिताखान बापाकडून परवानगी मिळून दिल्लीस जाईल आणि सुलतानखान सोनीपत व पानीपत महालांच्या बंदोबस्तासाठीं फौज घेऊन कूच करील.

चकले इटव्याच्या बंदोबस्तासाठीं हाफिज रहमतखानानें तेथें मुक्काम केला होता. तो व भदोरियाचा राजा यांमध्यें भांडण होतें. आतां दिसण्यांत तरी कांहीं तडजोड झाली आणि भरोंडची गढी हाफिजच्या लोकांना दिली. त्यामुळें उपर्युक्त खानानें तेथून कूच केलें व गंगा नदी ओलांडून पैलतीरावरील स्वतःच्या बरेली महालांत गेला.

हि. ११७७ मोहरम २० } ३० { श. १६८५ आषाढ वद्य ७
इ. १७६३ ऑगस्ट १

हि. ११७७ मुहरम २० पर्यंतच्या उरलेल्या हकीकती व दिल्लीच्या बातम्या यांचा दुसरा बंद.

हाफिज रहमतखानानें स्वतःचा नातलग व अली मुहम्मदखान रोहिला याचा मुलगा फैजुल्लाहखान यास नबाबाकडे पाठवून करार केला कीं, रोहिल्यांचे सरदार नजीबुद्दौला, दूंदीखान वगैरे तुम्हाला सईदुल्लाहखानाचे जागीं आंवळ्यामध्यें बसवीत असतील तर ठीकच. नाहीं तर मी स्वतः मरहूम खानासाठीं मुकर केलेली खेडीं व रोख पैसा तुम्हाला देईन. सईदुल्लाहखानाची बायको (म्हणजे) दूंदीखानाचीं मुलगी पूर्वी (आपल्या) बापावर नाराज होती. कारण सदरहू खानाची इच्छा होती कीं (त्याचा) स्वतःचा मुलगा मुहिब्बुल्लाहखान यास आंवळ्यास कायम करावें. आतां समजूत घातल्यानें दूंदीखान स्वतःच्या मुलीच्या इच्छेप्रमाणें वागण्यास तयार झाला. म्हणून सईदुल्लाहखानाच्या बायकोनें सुमारें दहा लाखांचें जवाहीर, रोख पैसे व सर्व तोफखाना आंवळ्याहून बसोलींत दूंदीखानाकडे पाठविला. आतां बातमी आहे कीं नजीबुद्दौला, दूंदीखान, हाफिज रहमतखान, मुल्ला सरदारखान, खानसामा फतहखान हे आंवळ्यांत जातील व तेथें ज्याची निवड करतील त्यास कायम करतील. अशा परिस्थितींत त्यांच्या एकमेकांच्या स्वभावांतील भिन्नतेंतून होणाऱ्या भांडणामुळें कितपत एकमत होईल तें पाहिलें पाहिजे. ओढाताण लक्षांत येत आहे.

हि. ११७७ मुहरम १५ ला राव मल्हारजी होळकरानें नजीबुद्दौल्याचे नावाचीं पत्रें देऊन पाठविलेलें दोन कासिद दिल्लीला पोहोंचले व तेथून नजीबाबादेला रवाना झाले. कासिदांच्या तोंडून सरकार स्वारीची सुरक्षितता व विजय मिळविणें...खूप मालमत्ता लुटणें, त्यानंतर त्या सुभ्यांत ठाणें बसविणें, तेथून सरकारचें परतणें व पंढरपूरला मुक्काम, निजामअलीखानाचें बीडला पोहोंचणें, मल्हारजीच्या मध्यस्थीनें स्वतःच्या विश्वासू नोकरांस बोलणीं करण्यासाठीं पाठविणें, ह्या गोष्टी कानांवर आल्या तेव्हां श्रीजीचे फार आभार मानले. चार महिने झाले तरी माझ्या अर्जांची पोंच आली नाहीं म्हणून मी रात्रंदिवस पत्राची अपेक्षा करीत आहे.

सूरजमल जाटाची हकीकत अशी—तो आग्र्याहून भरतपूरच्या किल्ल्यांत दाखल झाला. इमादुलमुल्कही तेथेंच असल्यानें मुलाखत झाली. उपर्युक्त नबाबानें खात्री केल्यानें तोंडी करार केला कीं, मी इकडे नबाबाच्या कानांत मनापासून गुंतलों आहे, नजीबुद्दौल्यासहि लिहिलें आहे. नजीबुद्दौल्याशीं गुप्तपणेंहि वाईट वर्तन करीत नाहीं. कारण त्याच्याच ताब्यांत मुलूख आहे. म्हणून आतां उपर्युक्त सनांत मुहरम ११ ला भरतपूर किल्ल्याहून कूच करून सूरजमल मथुरेंत आला आहे. जनतेंत बोलवा उठविली

आहे की, इमादुलमुल्काच्या कामासाठीं तेथें गेला. परंतु स्वतःच्या बापाच्या कह्रियामुळें आला आहे. बातमी आली कीं, सूरजमल व इमादुलमुल्क वगैरेंच्या नांवाचीं पत्रें घेऊन सरकारची (कासिद) जोडी आली आहे. सूरजमल्लासह इमादुल्मुल्क बल्लमगढास येत असल्याची अफवा फारच पसरली आहे. परंतु माझ्या अंदाजाप्रमाणें उपर्युक्त नबाबास सरकार भेटीस येण्याची व त्यांत यश येण्याची आतां आशा नाहीं. आपलें सैन्य हिंदुस्थानांत येईल तेव्हां त्याच्या मनचें होईल. आपल्याशिवाय त्यास दुसरा आसरा नाहीं.

शाह आलम व शुजाउद्दौला यांची हकीकत अशी—पूर्वींप्रमाणें त्रिवेणीच्या पैलतीरीं असलेल्या अलाहाबादेस शाहआलमचा मुक्काम आहे. शुजाउद्दौलाहि तेथेंच आहे सरकारच्या नोकरांपैकीं प्यादे व स्वार मिळून जवळ जवळ ४।५ हजार नोकर (पूर्वीं) तेथें होते. आतां धान्य महागल्यामुळें जवळ जवळ एक हजार स्वार व प्यादे यांच्याजवळ राहिले आहेत. बातमी आहे कीं, या पावसाळ्यांत छावणी येथेंच आहे. शुजाउद्दौल्यानें कारखाने व स्वतःचे रिसालेदार बाहेर पाठवून दिले आहेत. बंगालचा सुभेदार कासिमखान याशीं मामलतीचीं बोलणीं चालू आहेत. बातमी आहे कीं, सरकारासाठीं चार लाख रुपये व शुजाउद्दौल्यासाठीं दोन लाख कायम झाले. यानंतर एकंदर पेशकशीबाबत पक्के करण्यासाठीं सावकारांशीं बोलणीं [चालू आहेत.] नक्की काय ठरेल तें पाहिलें पाहिजे. सरकारच्या माहितीसाठीं कळविलें आहे.

बंगालचा सुभेदार मीर कासिम याची हकीकत अशी—खबर आली आहे कीं, अजीमाबाद उर्फ पटण्याच्या कोठीबाबत इंग्रजांचें मीर कासिमशीं भांडण झाल्यानें त्यांनीं उपर्युक्त सुभ्याची लूट करण्याचें मनांत ठरवून बऱ्याच शिड्या तयार केल्या व संरक्षक भिंतींच्या खालीं त्या पक्क्या बसविल्या. नंतर तोफखान्याची लढाई सुरू केली. मग ते भिंतींवरून शहरांत दाखल झाले व त्यांनीं लूटालूट सुरू केली. ही बातमी मीर कासिमला कळली तेव्हां त्यानें स्वतःची फौज नेमली. ती एकदम हल्ला करावा त्याप्रमाणें त्वरेनें अजीमाबादेंत घुसली. तेव्हां वखारीतील इंग्रजांशीं लढाई झाली. इंग्रजांच्या फौजेंत तरवारीनें लढण्याची ताकद नसल्यानें तींपैकीं पुष्कळ मारले गेले. शेवटीं ती पळून गेली; पण शहराच्या तटाबाहेर आपल्या वखारींत येऊन तेथून तिनें तीन दिवस तोफखान्याची लढाई केली. त्यानंतर मीर कासिमच्या फौजेंतील रिसालेदारांनीं शहरांतील लोकांनिशीं हल्ले केले. बरेच इंग्रज ठार केले. उरलेले निरुपायानें पळून कलकत्ता बंदराकडे निघून गेले आणि वखारींतील लक्षावधी रुपयांची सर्व मालमत्ता लुटली गेली. यामुळें सध्या उपर्युक्त सुभ्यांत मीर कासिमचा उत्तम बंदोबस्त आहे. जवळ जवळ पांचशें इंग्रज कामास आले.

पूर्वींप्रमाणें मीर कासिमचा मोंगीरच्या किल्ल्यांत मुक्काम आहे. बंगालच्या नगरशेट सावकाराच्या भावानें आपल्या भावास आपले संबंधितास (नातेवाईकास) आणण्यास

पाठविलें होतें. त्याप्रमाणें दोन्ही भावांचे नातेवाईक व मुलगे मुर्शिदाबादेहून रवाना होऊन उपर्युक्त किल्ल्यांत दाखल झाले. सावकारांच्या वास्तव्यासाठीं हवेली व कोठी तयार होत आहेत. खरी गोष्ट अशी आहे कीं, या सावकारांच्या आगमनानें त्यांच्या-जवळचा कोडो रुपयांचा खजिना उपर्युक्त नबाबाचे ताब्यांत आला. सरकारच्या माहितीसाठीं कळविलें आहे.

हि. ११७७ रखर ३ — ३१ — श. १६८५ आश्विन शुद्ध ५, इ. १७६३ आक्टोबर ११

ता. ३ रखर हि. ११७७ पर्यंतच्या हकीकतींचे चार बंद व एक तुकडा.

श्रीमंतांचे कुशल असो दरबारच्या बातम्या, दिल्लीच्या हकीकती, अबदालीचा कंदहारमध्यें मुक्काम, जहानखानाचें पेशावरास आगमन आणि जुलूम जबरदस्तीनें तेथील नागरिकांवर खंडणी लादणें शीखांचा बंदोबस्त करण्यासाठीं फौज जमविण्याची उपाययोजना, योग्य फौजेसह उपर्युक्त सरदारांचा जेहलम नदीवर तळ, त्या जिल्ह्यांतील सामान्य किल्ल्यांच्या हकीकती, लाहोर वगैरेच्या जवळच्या प्रदेशावर त्यांचा ताबा, हजरत आणि नबाब शुजाउद्दौला बहादुर यांचा अलाहबादमध्ये तळ, अफगाण-दुर्रानींचे व किजलबाशांचे उपर्युक्त नबाबाचे मैत्रीमुळें शुजाउद्दौल्यापासून वेगळें होणें; बनारसकडे कूच करण्याचा इरादा, मीर मुहम्मद जाफरखान व कलकत्ता बंदरांतील इंग्रज यांशीं लढा देण्याच्या हेतूनें मीर मुहमद-कासिमखानाचें कूच करणें व त्यांचे राजमहालजवळ पोहोंचणें,... ७, ८ कोस अंतरावर उपर्युक्त खानाच्या फौजा, गंगानदीला मिळणाऱ्या एका नाल्यानें भयंकर उग्र स्वरूप धारण करणें, थोड्याच काळांत लढाईची बातमी येणें, मारवाडच्या राजांचा आणि सूरजमल जाट यांचाही स्वतःच्या गावांत मुक्काम, नजीबुद्दौल्याचे नजीबाबादमध्यें आगमन, दिल्लींतील दुसऱ्या लहानसहान गोष्टी; सुलतानखानाचा किल्ल्यामध्यें मुक्काम, किल्ल्यांतील व शहरांतील बंदोबस्त, या सर्वांची तपशीलवार हकीकत निरोप्यांचे बरोबर या पूर्वीं ता. १७ रबिलावल हि. ११७७ ला हुजूरकडे पाठविली ती नजरेखालून गेलीच असेल.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी—ता. १७ सफर हि. ११७७ पर्यंत त्याचा मुक्काम कंदाहारमध्यें होता. फौज जमा करण्यासाठीं तो तेथून हिरातकडे कूच करून गेला होता. कांहीं दिवसांनीं कंदाहारला परत आला. पण कंदाहारचे आलूस व ऊजबक यांचे शाहाशीं सख्य होत नाहीं. म्हणून त्या जिल्ह्यांतील डोंगराळ मुलखांतील जमीनदारांशीं पुन्हा सख्यत्वाचीं बोलणीं चालू आहेत. फौज गोळा करणें व शीखांचा बंदोबस्त करणें या वरील उपायांचे पाऊल पुढें पडत आहे. काबूल सुभ्यांत जाण्याचा त्याचा विचार चालू होता.

जहानखानाची हकीकत अशी—पेशावर शहरांतील लोकांवर जुलूम जबरदस्ती व मारपीट करून त्यानें त्यांकडून जवळजवळ तीन लाख रुपये वसूल केले. त्यापैकीं थोडी रक्कम शिपाई लोकांत वाटली व तेथून कूच करून तो अटक नदीवर आला. त्या जिल्ह्यांत शीखांच्या फौजेची हालचाल चालू असून शीख फौज चकगुरू येथील तळ्यावर दसरा व कार्तिक स्नानासाठीं आली होती. पण तेथून परत जेहलम नदीवर आपल्या लोकांत सामील झाली म्हणून तो लढाईंत मारला गेलेल्या अबदुस्समदखानाचा मुलगा अफजलखान आणि आपले इतर सहकारी यांसह अटक नदी ओलांडून नदीच्या या बाजूस १५ कोसावर असलेल्या हसनअबदाल या ठिकाणीं आला व तेथेंच त्यांनीं मुक्काम केला आहे. प्रत्यक्षांत ७, ८ हजारांपेक्षां जास्त घोडेस्वार त्यांपाशीं नाहींत.

जहानखानाचा गखर जमीनदारांशीं जाबसाल झाला तो असा— पूर्वीप्रमाणें त्यांनीं ठरलेला पैसा पाठवून द्यावा आणि आपल्या लोकांसह सहकार्यासाठीं येऊन हजर व्हावें. मुलतानच्या सुभेदारीबाबत मरहूम अफगान जाहिदखानाचा मुलगा शुझाखान, त्याचप्रमाणें जम्मूचा राजा यांजकडून एकाच प्रकारची लिखापढी आली आहे कीं, मामुली रक्कम पाठवून देऊं. त्याप्रमाणें शाहाच्या जमातीचाच असलेल्या शुझाखानानें उत्तर पाठविलें कीं, "मजजवळ पैसा नाहीं. तेव्हां स्वतः येऊन उपर्युक्त सुभ्याची वसुली करावी अगर आपल्या मनास येईल त्यास सुभ्यावर नेमावें". जम्मूच्या राजानेंही शीखांची सबब लिहून पाठविली आहे.

हसनअबदालहून झेलम नदीवर जहानखानास शीखांच्या भेटी (लढाई)साठीं जातां येत नाहीं; तेथें तो शाहाची वाट पाहात आहे. शाहाचा पाठपुरावा असल्याशिवाय लाहोरला जाणें व शीखांशीं लढाई होईलसें दिसत नाहीं. उपर्युक्त खानाचें हुजुरास पत्र आलें आहे कीं, तुम्ही लवकर यावें. काय होतें तें पहावें.

शीखांची हकीकत अशी— चरतसिंग आणि इतर सरदार यांचा तीन चार हजार स्वार व प्यादे लोक यांसह जेहलम नदीवर मुक्काम आहे. बऱ्याच सरदारांचा चकगुरूच्या तळ्यावर कार्तिकस्नानाला जाण्याचा विचार होता. पण जहानखान अटकच्या अलीकडे आल्याची व हसनअबदालमध्यें त्याचा मुक्काम असल्याची बातमी आल्यानें उपर्युक्त नदीवर त्यांनीं मुक्काम केला व उपर्युक्त खानाशीं लढाई देण्याच्या तयारींत आहेत.

जसासिंगाचा दुआबच्या फौजदाराच्या घरीं मुक्काम असून तो त्या जिल्ह्याचा वसूल करण्याच्या तयारींत आहे. शीखांच्या आणखी एका टोळीनें लाहोरच्या आसमंतांत गडबड सुरू केली व ते शहरांत धान्याची रसद फारशी जाऊं देत नाहीत. यामुळें तेथें धारण रुपयास आठ शेर झाली आहे. शहराच्या बाहेर धान्य स्वस्त आहे. त्यामुळें हल्ली शहरांत लोक उपाशी मरत आहेत. सध्या पुष्कळ लोक जमावा जमावानें कार्तिकी मेळ्यासाठीं चकगुरू येथें जमले आहेत व तेथें कांहीं घरें पूर्वीप्रमाणें उभारल्यानंतर दुसऱ्या घरांची तयारी झाली आहे व दुर्रानी टोपीवाले मजुरी करीत आहेत.

चकले सरहिंदचा फौजदार आपल्या चकल्यांत अलासिंगाशीं मिळतें घेऊन त्याच्या मदतीनें त्या ज़िल्ह्याचा वसूल करणें व व्यवस्था करणें यांत गुंतला आहे. शीखांपैकीं अजमू नावाच्या जाटानें शाहदौलांच्या काहीं खेड्यांवर हल्ले करून तीं लुटलीं व बुडिया महाल लुटावा असाही त्याचा इरादा आहे.

बातमी आली कीं, अलासिंग जाटाची व झैनखानाचीही शाहाचा बक्षी जहानखान यास पत्रें जातात कीं, त्यानें लाहोर सुभ्यांत यावें. नंतर आपण दोघे दुआबांतून शीखांची ठाणीं उठवून लावूं. या परिस्थितीमुळें शीख व अलासिंग या दोघांत नाखुशी निर्माण झाली आहे.

हि. ११७७ रखर ३ } ३१ { श. १६८५ आश्विन शुद्ध ५ / इ. १७६३ आक्टोबर ११

ता. ३ रखर हि. ११७७ पर्यंत घडलेल्या पण लिहावयाच्या राहिलेल्या हकीकतींचा दुसरा बंद

पूरब जिल्ह्याची हकीकत अशी—कासिमखान (फिरंगी) इंग्रजांशीं व जाफरखानाशीं लढाई करण्यासाठीं मोंघीर किल्ल्याहून कूच करून गेला होता. आतां बातमी आली कीं, तैग्रीस प्रमाणें वाहणारी रहवा नदी पुढें आल्यामुळें कासिमखान गर्वानें फुगून जाऊन नदीला उतार होता तेथून त्यानें ती ओलांडली. इंग्रज सरदार व जाफरखान यांनीं तह करण्याच्या हेतूनें १०।१२ कोस त्याच्या पाठीमागें जाऊन डेरे दिले. बातमी आली व जाहीर झालें कीं, इंग्रज मुक्काम करण्याची ताकद नाहीं असें भासवून पळून जाऊं लागले. अशा परिस्थितींत कासिमखानास जोर चढून तो त्यांमागें गेला. इंग्रजांच्या सैन्यानें संधी साधून रात्रीच्या वेळीं छापा घातला व लढाई झाली. उपर्युक्त खानाच्या लोकांपैकीं पुष्कळ लोक मारले गेले. शेवटीं सैन्यानें मोठा पराभव खाल्ला. नदीला उतार असलेल्या ठिकाणाची वाट चुकून पुष्कळ लोक बुडाले. तेव्हां कासिमखान हत्तीवर स्वार होऊन फरारी झाला. त्यावेळीं तेथें स्वार व प्यादे होते कसें तरी धडपडत मोंघीर किल्ल्यांत आले. फौजेचें मोठें नुकसान झालें आणि तंबू, तोफखाना व इतर संपत्ती लुटली गेली.

बातमी आली कीं, ऐन लढाईच्या धुमश्चक्रींत आणि कासिमखान उच्च पदास चढूं लागल्यापासून त्याच्या मैत्रींत असलेला व ज्याच्या जवळ ४–५ हजार स्वार व प्यादे होते त्या कोरखनखान (?) इंग्रजानें पाठ फिरविली; तो कलकत्त्यांतील इंग्रजांच्या लश्करांत सामील झाला व आपल्या जमातींतील लोकांशीं एकरूप झाला. असें कळलें कीं, त्याचीं मुलें माणसें कलकत्ता बंदरांत होतीं त्यामुळें तो लढाई करूं शकला नाहीं. कासिमखानाबरोबर असलेला कामदारखान मबनी इंग्रजांच्या सैन्यांत गेला. त्यानें जाफरखानाची भेट घेतली व त्यास सामील झाला.

बातमी आहे कीं, इंग्रजांचें सैन्य व जाफरखानाचे मुलगे पाठलागासाठीं कूच करून गेले तेव्हां कासिमखानाचा इरादा होता कीं, मोंगीर किल्ला त्यांत पुष्कळ दिवस राहून शत्रूशीं लढाई देण्यासारखा नसल्यानें अजीमाबादेच्या अलीकडे तीन कोसावर असलेल्या रहतासगढाला जावें. या हेतूनें त्यानें तेथें पूर्वीच जवळजवळ एक कोट रुपये व इतर माल (गोष्टी) व वस्तू स्वतःच्या लोकांबरोबर पाठविल्या होत्या. आणि अजीमाबादेच्या नायब सुभेदारासही पत्र पाठविलें होतें कीं, 'स्वार व प्यादे मिळवावे ...त्या शहराच्या तटाचा जो भाग पडलेला असेल तो लवकर [दुरस्त करावा.] अजीमाबादेस जाण्याचाही माझा विचार आहे.' मोंघीर किल्ल्यांतून लवकर बाहेर आला तर फारच छान! नाहींतर इंग्रजांचें सैन्य तेथें पोहोचल्यावर तेथून परत येणें कठतच आहे. सारांश तो गोंधळून गेला आहे व पेचांत सांपडल्यानें अगतिक झाला आहे.

शुजाउद्दौल्यास स्वतःच पराभव व मदत याबद्दल मीर मुहम्मदखानाचीं पत्रें पुन्हां पुन्हां आली तीं अशी कीं, जर तुम्ही स्वतः कूच करून आलां तरच उत्तम, नाहीं तर बंगालचा मामला हातचा जातो. सामान्य लोकांत असा समज आहे कीं, उपर्युक्त खानाने राजा महताबचंद व राजा सरूपचंद या कैदेंत असलेल्या बंगालच्या नगरशेट सावकारांस ठार मारलें; परंतु खरी हकीकत मला अशी दिसतें कीं, दोघेही भाऊ कैदेंत आहेत; त्यांचे हातपाय दोरीनें बांधून त्यांना चिखलांत टाकतात व खाण्यापिण्यास कांहीं देत नाहींत. ते मोठ्या संकटांत आहेत. तो असें बोलतो कीं 'हें बंड तुम्ही उत्पन्न केलें आहे' म्हणून त्यांचेकडे क्रोडो रुपयांची मागणी करीत आहे. अजीमाबादेचा पूर्वींचा नायब राजा रामनारायण कैदेंत पक्का अडकला आहे. या जुलमी माणसापासून त्याची सुटका दिसत नाहीं. लढाईची बातमी ऐकून अजीमाबादेच्या आसपास तेथील जमीनदार हल्ले करून लूट करीत आहेत. त्यांनीं कासिमखानाचे नायब व त्यांचीं ठाणीं उठवून लावलीं.

सरकारच्या लश्कराची हकीकत अशी—सरकारच्या लश्कराचा अलाहाबाद सुभ्यांतील त्रिवेणी नदीवर मुक्काम आहे. ता. १७ रबिलावल हि. ११७७ रोजीं बादशाह नदीच्या पलीकडे शुजाउद्दौल्याच्या डेऱ्यास गेला होता. नबाबाने १०१ मोहरा व कांहीं जवाहीर व कापड त्यास नजर केलें. बादशाहानें तेथें जेवण केलें. शुजाउद्दौला व बादशाह यांमध्यें नव्यानें करार झाला. त्यानंतर बादशाह नदी ओलांडून आपल्या डेऱ्यास परतला. कासिमखानाच्या लिहिण्याप्रमाणें शुजाउद्दौल्यानें बादशहाचा निरोप घेतला, त्रिवेणीपलीकडचा मुक्काम हलवून अलाहाबादजवळ नदी ओलांडली व ता. २० रबलला कासिमखानाच्या मदतीसाठीं बनारसकडे कूच केलें. प्रत्यक्षांत वीस हजार घोडेस्वार व प्यादे त्याजवळ आहेत. शाहाच्या संरक्षणासाठींही फर्माविलें आहे. परंतु पैशाचा तुटवडा असून शिपायांनीं सात महिन्यांच्या पगाराची मागणी केली आहे.

बादशाहाचा पेशखाना, तोफखाना, त्रिवेणी ओलांडून पलीकडे गेला होता. ता.

२५ रवल रोजीं मुक्काम हलविण्याचे पक्कें झालें. सरकारी नोकरांस अर्ध्या महिन्याचा पगार दिला. धान्याचा भाव ७।८ शेर होता तो १३।१४ शेर झाला आहे.

इंग्रज व जाफरखान यांचे वकील बोलणीं करण्यासाठीं शुजाउद्दौल्याकडे गेले आहेत. दोन्ही बाजूंनीं जाबसाल चालू आहे. सैन्यांतील एकाही शिपायाची मदत मंजूर नाहीं. जाफरखान आतां फक्त नबाब कासिमखानाचा खजीना घेण्यासाठीं कूच करीत आहे. शांततेनें व हरतऱ्हेच्या सलोख्याच्या बोलण्यानें वसूल करण्याचा विचार आहे.

हि. ११७७ शाबान २९ } **३३** { श. १६८५ फाल्गुन शुद्ध १
इ. १७६४ मार्च ३

ता. २९ शाबान हि. ११७७ पर्यंतच्या बातमीचे तीन बंद व एक तुकडा श्रीमंतांचें कुशल असो.

दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या हकीकती अशा–ता. २५ जखर हि. ११७७ रोजीं यमुनेच्या पलीकडे दिल्लीपासून आठ कोसावरील गाझीउद्दीननगराजवळ सुरजमल व नजीबुद्दौला यांमध्यें झालेल्या लढाईची हकीकत, सुरजमल एकाएकीं बाणानें मारला जाणें; त्याच्या फौजेचें पलायन, त्याचे सर्व लोक व सरदार सुरक्षित पोहोंचणें, कांहीं दिवसांनीं नजीबुद्दौल्यानें तेथून कूच करणें, त्याचें यमुना घाटावर जाटांशीं संबद्ध अशा दंकूर गांवीं येणें व खेडी लुटणें, लोक व गुरें कैद करणें, तेथून कूच करणें, चतुर्थीला महालांत दाखल होणें; कोलजलेश्वर आणि भई वगैरे सरकारांशीं संबद्ध दूंदीखानाचा मुलगा मुहिब्बुल्लाहखान या नजीबुद्दौल्याच्या मेव्हण्यानें फौजेसह गंगा ओलांडून अलीकडे येऊन खुरजा, पहालो आणि चंदूस वगैरे महाल – येथील जाटलोक व नागरीक पळून गेले, ताब्यांत घेणें, ता. ९ रजब हि. ११७७ ला अबदालीचें अटक ओलांडून अलीकडे येणें, बरीचशी फौज घेऊन चरतसिंग, टोकासिंग वगैरे शीख सरदारांचें सियालकोट. गुजरात शाहदौला, पुरसरूर, सौधरा वगैरे महालांत एकत्र येणें, त्या जमलेल्या लोकांतून जसासिंग वगैरेंनीं सतलज ओलांडून सरहिंदला वेढा घालणें, उपर्युक्त चकल्यावर अबदालीकडून नेमलेला जैनखान याच्या नायबाशीं कांहीं दिवस लढाई होणें, नंतर तो गाव लुटणें, या बातमीमुळें जैनखानाचे अंबाल्याहून शीखांशीं लढण्यासाठीं कूच, त्याचे सरहिंदपासून सहा कोसांवर येऊन पोहोंचणें; जसासिंग कलाल वगैरेंनीं/त्या लोकांवर हल्ले करणें, मोठी लढाई होणें, त्यांची लूटमार होऊन कित्येक स्वार मारलें जाणें व पळून जाणें, उपर्युक्त खानाची कत्तल व लूट झाल्यावर शीखांनीं सरहिंद किल्यास वेढा घालणें व मिळवून लूट करणें, याची जवळ जवळ १४।१५ लाख रुपयांची चीजवस्त व रुपये जप्त करणें, दिल्लीपासून १९ कोसावरील फर्रुखनगराहून डीग किल्ल्याला सुरजमल जाटाचा मुलगा जवाहरसिंग याचें येणें व किल्ल्याची मजबुती करण्यांत गर्क होणें,

सुरजमल जाटाचे मेहुणे बलराम व जसाराम यांचें नजीबुद्दौल्याशीं लढाई करण्यासाठीं येणें व यमुनेजवळ बलोचपूर व सुलतानपूर येथें ७।८ हजार स्वार घेऊन मुक्काम करणें, परंतु दोन्ही लश्करांमधील या नदीस मोठा पूर येणें, हजरताचे नोकर, वजीरुलममालिक व शुजाउद्दौला यांच्या यमुनेच्या ऐलतीरीं काल्पीजवळ शाहपूरला असलेल्या मुक्कामाची हकीकत, बंगालचा सुभेदार कासिमखान बहादुर यानें शुजाउद्दौल्याच्या मध्यस्थीनें बादशाहाची भेट घेणें, पोशाख, जवाहीर, हत्ती, घोडे, यांचीं उपर्युक्त नवाबास भेट, त्यांच्या नोकरींत हजर होणें, जवळ जवळ दोन लाख रुपयांचा खजिना स्वतःजवळ असणें, हिंदूपत बुंदेल्याशीं मामलतीबाबत-जाबसाल होणें, त्याचा कालिंजर किल्ल्यांत मुक्काम व त्याची कमालीची बळकटी करणें, आणि इतर तपशील यांच्या हकीकतीचें पत्र कासिंदाबरोबर पाठविलें तें आपल्या कानावरून गेलेंच असेल.

आतां या प्रांतांतील हरकाऱ्याच्या तोंडून बातमी मिळाली कीं, सरकार स्वतः फौज व सरदार यांसह कर्नाटक व टट्टा प्रांतांचा बंदोबस्त व त्या भागांतील दंगेखोरांना शासन यांसाठीं गेले आहेत. मी सरकारचा फार जुना नोकर असल्यानें तेथील हकीकत हरकाऱ्यांबरोबर कळवावी.

अबदालीची हकीकत अशी—अटक ओलांडल्यावर नदीच्या अलीकडे पंधरा कोसावरील हसन अबदालमध्यें त्यानें कांहीं दिवस मुक्काम केला व शाहवलीखान, शाहपसंदखान व जहानखान वगैरे स्वतःच्या सरदारांसह तेथून कूच करून तो रावळपिंडीला आला. यामुळें शीख लोकांनीं झेलम ऐलतीरीं असलेल्या गुजरात शाहदौलाहून कूच केलें आणि लाहोरपासून सोळा कोसावरील चकगुरू या त्यांच्या पूजास्थानास पोहोंचले. तेथें एकत्र जमून मसलती केल्या कीं, लाहोरच्या आसपास सर्व ठिकाणीं भक्कम किल्ले आणि स्वतःचा मुलूख आहे आणि तेथें धान्य व गवत पुष्कळ असल्यानें अबदालीस खुशाल येऊं द्यावें. त्यास अडथळा करूं नये. तो चिनाब ओलांडून अलीकडे आला कीं, लढाई केली पाहिजे.

शीख लोक परतून ते चकगुरूस पोहोंचल्यामुळें अबदाली रहतासगड किल्ल्यांत गेला आणि त्यानें स्वतःच्या लोकांस त्या किल्ल्यांत ठेविलें. नंतर झेलम ओलांडून येऊन गुजरात शाहदौला व परसरूरमध्यें त्यानें तळ दिला. शाहाच्या फौजा चिनाब नदीच्या तीरापर्यंत पसरल्या आहेत. फौजेचे २—३ गोल करून आणि चकगुरूहून कूच करून शीख सरदार त्या नदीवर पोहोंचले आणि तेथें ते गस्त घालीत आहेत. उपर्युक्त ठिकाणीं त्यांचा खूपच मोठा जमाव जमला आहे. त्यांचा इरादा आहे कीं, शाह चिनाब अलीकडे येईल तेव्हां लढाई करावी. पण अबदाली व ते लोक यामध्यें पूर आलेली ती नदी आहे. प्रत्यक्षांत शाहाजवळ सुमारें चाळीस हजार स्वार आहेत; आणि स्वार, प्यादे व उत्तम घोडेस्वार मिळून एक लाखापेक्षां जास्त शीख लोक आहेत.

हि. ११७७ शव्वाल २ } ३४ { श. १६८६ चैत्र शुद्ध ३
{ इ. १७६४ एप्रिल ४

ता. २ शव्वाल हि. ११७७ पर्यंतच्या हकीकतीचे तीन बंद व एक तुकडा श्रीमंतांचें कुशल असो.

यापूर्वी दरबारच्या बातम्या व दिल्लींतील हकीकती, झेलम नदी ओलांडून अबदालीचें चिनाबवर पोहोंचणें, डाव्या बगलेच्या सैन्यानें पायउतारावरून नदी ओलांडणें, नंतर स्वतः ती नदी ओलांडून अलीकडे येणें, चरतसिंग, हरीसिंग व ठोकासिंग वगैरे शीख सरदारांशीं लढाई देणें, दोन्ही बाजूंकडील पुष्कळसे लोक मारले गेल्यावर व अनेक जखमी झाल्यावर शाहाच्या सैन्याचा पराभव होऊन तें वाईट परिस्थितींत सांपडणें, पायउतार न सांपडल्यानें नदींत पुष्कळसे लोक बुडणें, शाहानें नदींत घोडा घालणें, बुडतो कीं वाचतो याबद्दल त्यास संशय, शीखांनीं त्यांचा पाठलाग करणें, तंबू लुटणें,... सरहिंद कसब्यांत शीखांच्या घोडदळाचा प्रमूख जसासिंग याचें येणें व त्याचे...अंतर्वेदींतील साबली व झंजा...या महालांवर हल्ले करून लूट केल्यावर यमुना ओलांडून अलीकडे येणें व अंबाल्यास पोहोचणें, कडाकोराबाबत कुंजपुरा वगैरेंचा जमीदार दलीलखान याजकडून पैसा वसूल करणें, त्या प्रांतांतील बऱ्याच खेड्यांची खराबी, सहारणपुराजवळील इस्लामनगरामध्यें नजीबुद्दौल्याचा मुक्काम, यमुनेच्या पलीकडे वसलेल्या खुरजा, माट, महाबन व दंकूर हे महाल सूरजमल्लाच्या दस्तुराप्रमाणें, जवाहिरसिंगाच्या लोकांनीं व्यापणें, बलराम वगैरेंचा डीग व कुंभेर येथें मुक्काम, पैशामुळें आपसांत लढाई होणें व हिंदुस्थानी स्वार व प्यादे नोकरीस ठेवणें, हजरत व शुजाउद्दौला यांच्या नोकरांचा शाहपुरामध्यें तळ, हिंदूपत बुंदेल्याच्या मुकद्दम्याचा फैसला, आपल्या लश्करांतील सावकारांचें पैशाच्या निशेसाठीं जाणें, स्वतःच्या प्रदेशांत मारवाडच्या राजांचा मुक्काम, राजा माधोसिंगानें रामकिशन या स्वतःच्या मुनशीस हुजूराकडे पाठविणें, मथुरेची फौजदारी व अकबराबादेची सुभेदारी स्वतःस मिळण्याबाबत हुजूरकडे विनंती व इतर सर्व हकीकती याविषयीं हरकाऱ्यांबरोबर शाबानच्या शेवटच्या तारखेस पाठविलेलें बातमीपत्र नजरेखालून गेलें असेलच.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी—मोठी लढाई होऊन शीखांनीं (पराभव) केल्यावर...शाह झेलमवर आला. त्याचें लोक खूप त्रास होऊन धडपडत (कसेतरी) गेले. त्यानें स्वतःचें पागोटें खालीं उतरून फौजेंतील लोकांस सांगितलें कीं, 'बळ धरून पुन्हा त्या लोकांशीं लढाई केली पाहिजे.' परंतु कोणाच्या मनांत हें येईना. टोळीटोळीनें झेलम ओलांडून ते पलीकडे गेले. एकदम हल्ला झाला असतां ढालीशिवाय फौज, लगामाशिवाय उंट जसे भरकटत जातात तसें शीखांच्या भीतीनें (रात्रंदिवस) तीस तीस कोस अंतर तोडून हसन अब्दाल येथें ते पोंहोचले, तेव्हां आपल्याला थोडा दम खायला अवकाश आहे असे त्यांना वाटलें......एकेकट्यानें प्रयत्न केला. परंतु

आपापसांतील घाईंच्या हालचालीमुळें शाहाच्या लश्कराचा तळ व बाजार गारत झाला आणि एकाची टोपी दुसऱ्याला गेली. अटकच्या अलीकडची फौज पांगली. थोडक्यांत म्हणजे ता. २२ शाबानला अटक नदीच्या अलीकडची फौज त्या बाजूस गेली व फौज ......पीरजाद्यांची वस्ती असलेले मौजे चकपटी हें गांव लुटून पेशावरांत दाखल झाली. नदीच्या पलीकडची फौज डोंगरांत गेली. परंतु ४।५ हजार स्वार मागें राहिले होते. त्यांनीं या शहरांतील पुष्कळशा लोकांना लुटलें. अबदालीची हकीकत स्पष्ट कळली नाहीं. पण मुलतानच्या सावकारांच्या नोकरांकडून...समजलें कीं,अबदालीनें लांबच्या मजलांनीं प्रवास केला आणि त्याचे दोस्त म्हणतात कीं, ‘ फौजेच्या सरदारांत सर्वत्र बखेडा माजला आहे. पण तो मात्र जिवंत निसटला ’ बातमी आली कीं, काबूल कंदाहारला जाण्याच्या इराद्यानें त्यानें पुढें कूच केलें. अफगाणांपैकीं यूसुफ जमातीनें खैबरघाट रोखला व पैगाम लावला आहे कीं, ‘ आम्ही हिंदुस्थानच्या बादशहाचे नोकर होतों व त्यासाठीं पैसे घेत होतों. आतां आम्हांस कांहींच मिळत नाहीं ...बातमी आहे कीं, शाहवलीखानानें त्यांना कांहीं देऊन करार केला आणि तेथून रवाना झाला. आतां बातमी आहे कीं, खैबर दरींत दाखल झाल्यावर अफगाणांनीं अबदाली फौजेवर हल्ले केले. तो स्वतः जिवंत पोहोंचला कीं मध्येंच मारला गेला याबद्दलचीं हकीकत कांहीं दिवसांनीं कंदाहारहून येईल. श्रीमंताच्या माहितीसाठीं...

चरतसिंग, हरीसिंग, करोरीमल, ठोकासिंग व लोहारसिंग वगैरे शीख सरदार जमावाजमावानें आले आहेत. त्यांची हकीकत अशी—होळीसाठीं चकगुरू येथें आले होते. त्याप्रमाणें होळीनंतर कूच करून झेलमवर गेले आहेत. त्यांनी ठिकठिकाणीं स्वतःचीं ठाणीं कायम बसविलीं आहेत. बातमी आली कीं, अटकच्या ऐलतीरावरील पोटोवाल येथें स्वतःचा बंदोबस्त करावा व त्या प्रांतांतील जमीदाराकडून पैसे वसूल करावे ह्या हेतूनें तेथें जाण्याचा त्यांचा इरादा आहे. गुलामशाह लद्दी या मुलतानच्या जमीदाराकडे, अबदाअलीचा चुलता मुहम्मद बुलंदखान या काश्मीरच्या सुभेदाराकडे आणि इतर जमीदारांकडे स्वारांबरोबर लिहून पाठविलें आहे कीं ‘ स्वतःच्या वकीलास पाठवून अबदालीच्या लिहिल्याप्रमाणें वसुलाच्या पैशाची निशा करावी नाहींतर फौजा येतील. ’

लाहोरची हकीकत अशी—हरीसिंगाचे लोक या शहरांत शिरण्यासाठीं गेले होते. चरतसिंगाचे लोकहि गेले. तेव्हां त्यांच्यांत लढाई झाली व दोन्ही बाजूचे सुमारें दोनशें लोक ठार वा जखमी झाले. शेवटीं तह झाला व चरतसिंगाचे ठाण्यांतील लोक शहरांत दाखल झाले. असें समजलें कीं, काबुलीमल्लाच्या नांवाचें शहर बहाल करण्याबाबतचे चरतसिंगाचें पत्र आलें आहे. त्यांनीं काबूलीमल याजकडून दोन लाख रुपयांची मागणी केली होती, त्यामुळें काबुलीमल तेथील नागरिकांकडून पैशाची मागणी करीत आहे. आणि सावकार व व्यापारी यांस अबदालीच्या लोकांसारखे बांधूनें मारहाण करतो.

तेथील सर्व लोकांवर मोठीच आपत्ती आली आहे. प्रत्येकाकडून पैशाची मागणी चालूच आहे.

हि. ११७७ जिल्हेज २८ { ३५ } श. १६८६ ज्येष्ठ वद्य ३० इ. १७६४ जून २९

ता. २८ जिल्हेज हि. ११७७ पर्यंतच्या हकीकतीचे तीनबंद. श्रीमंतांचें कुशल असो.

दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या हकीकती—अबदालीचे काबूल सुभ्यांत दाखल होणें, वजीर शाहवलीखानास शीखांना शासन करण्यासाठीं कंदाहार येथें पाठविणें, चरतसिंगानें स्वतःच्या व इतर लोकांसह सियालकोट महालांतून अटककडे कूच करणें, दोआबांत जसासिंग कलाल वगैरे शीखांचा मुक्काम व आपापसांत लढाई होणें, यमुनेच्या पलीकडील रामरा गावच्या घाटावर नजीबुद्दौल्याचा मुक्काम, तेथें स्वतःचा भाऊ सुलतानखान यास सर्व फौजेसह ठेवणें, गंगेच्या पैलतीरीं स्वतःच्या नजीबाबाद गांवीं जाणें, तेथें स्वतःच्या हातानें किल्ल्याचा पाया घालणें, जवाहिरसिंगाचें मथुरेहून डीग व भरतपूर किल्ल्यांकडे जाणें, निरनिराळ्या किल्ल्यांतून तोफखाना आणणें, संभाजी गणेश पंडीत, भाऊ माने आणि नव्यानें चाकरीस ठेवलेले इतर रजपूत सरदार यांची व्यवस्था लावणें, इमादुल्मुल्कचा भरतपूर किल्ल्यांत मुक्काम, सरकारी नोकर, शुजाउद्दौला, कासिमखान वगैरेंचा अजीमाबादेच्या अलीकडे सात कोसांवर तळ पडणें; जाफरखान या बंगालच्या सुभेदाराचा अजीमाबादेंत मुक्काम; तेथील किल्ल्याची व शहराच्या तटाची मोर्चेबंदी, सर्वस्वी मजबूती, सर्वांच्या अगोदर इंग्रजांनीं कलकत्त्यावर मोर्चे लावणें, राजा बेणीबहादुर, हिंमत बहादुर गोसावी व कासिमखान वगैरे सरदारांनीं त्यावर हल्ले करणें, त्यानंतर उपर्युक्त नबाब व बादशाह यांचें स्वार होणें, हि. ११७७ शव्वालच्या शेवटच्या तारखेस मोठी लढाई होणें, बादशाही फौजेपैकीं पुष्कळसे जवळ जवळ ५।६ हजार–लोक–मारले जाणें आणि जखमी होणें, सर्वांचा निरुपाय होऊन संध्याकाळीं परतणें, उदेपूरचा जमीदार महाराणा यांशीं संबंद्ध असलेल्या जाधवाच्या बरोबर राव मल्हार यांच्या आगमनाची हकीकत, महाराण्यानें स्वतःच्या निहालचंद मुनशीस मामलतीचा जाबसाल करण्यासाठीं पाठविणें, माधोसिंगाचा जयपूरास मुक्काम, दिलेरसिंग याचें स्वतःचा मुनशी रामकिसन यासह नजीबुद्दौल्याकडे आपसांत जाबसाल करण्यासाठीं जाणें, पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें एकमत होणें, राजपुत्राचा दिल्लीच्या किल्ल्यांत मुक्काम, नजीबुद्दौल्याचा मुलगा जाबिताखान यानें शहरांतील किल्ल्यांत बंदोबस्त करणें, राजा नारो शंकराचा पुतण्या विश्वासराव पंडित यानें कुंच महाल ताब्यांत घेणें, या महालावर हुजुराकडून नेमल्या गेलेल्या नायबाचें पळून जाणें, हाफिज रहमतखानाच्या लोकांशीं कहकबीस महालांत लढाई होणें, रोहिले मारले गेल्यावर खानाच्या नायबाचें पळून

जागें, विश्वासरावाचें ठाणें बसणें आणि इतर सर्व हकीकती याविषयीं ता. १९ जिल्काद हि. ११७७ ला श्रीमंतांकडे पाठविलेलें पत्र नजरेखालून गेलें असेलच.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी—बातमी आली कीं, शाहवलीखानाकडून कंदाहारमध्यें फौज जमा झाली नाहीं म्हणून अबदाली काबूलहून कूच करून कंदाहरमध्यें दाखल झाला. नासिरखान ब्रूही याच्या ताब्यांत कंदाहारला जोडलेले भाग आहेत. तेव्हां त्याकडे शाहवलीखानाला पाठवून त्यास कळविलें कीं, शीखांच्या नाशासाठीं आमची सोबत करणें समानधर्मत्वाला उचित आहे. तेव्हां त्या खानानें उत्तर दिलें कीं, जरी शाह स्वतः भेटीस आला तरी साह्यास मी कबूल होणार नाहीं. परंतु तुमचा उपकृत असल्यानें मैत्री करीन. नंतर आलूपाताना आणण्यासाठीं जहानखान यास बल्ख व बुखारा यांकडे पाठविलें. नादिरशाहाचा नातू व इराणचा स्वामी मिर्झा शाहरुख याशीं झालेलीं बोलणीं अशीं—सालेसाल खंडणी देणें मला कबूल आहे. तह करावा. फौजेची नियुक्ती करावी. त्याप्रमाणें पावसाळ्यानंतर अबदाली बेत करील.

अटकनदीच्या ऐलतीरावरील जमीदाराकडून मारला गेलेल्या समदखानाच्या मुलाशीं सख्य करून ८।९ हजार स्वार, जमा केले व शीखांशीं लढाई करण्याच्या इराद्यानें त्यांनीं तयारीनिशीं झेलमकडे कूच केलें या बातमीनें चरतसिंगानें आपल्या फौजेंतून कूच केलें व उपर्युक्त नदी ओलांडून तो पैलतीरी गेला.दोघांत मोठी लढाई झाली. दोन्ही बाजूचे बरेच लोक मारले गेले. उपर्युक्त गख्खरांस टिकाव धरतां आला नाही व ते स्वतःच्या ठिकाणाकडे पळून गेले. चरतसिंगानें पाठलाग करून घोडे वगैरे हातीं आलें तें लुटलें; मुरगानचक्टापर्यंत जाऊन परत फिरला व शाहदौल्यास आला. इतर महालांच्या बंदोबस्तासाठीं त्याचा त्या महालांत मुक्काम आहे.

हरीसिंग भीकनतर्फे मुलतान सुभ्यावर नायब निजाम म्हणून वली मुहम्मदखान कायम आहे. किल्ल्यांची आणि शहराच्या बाहेरील भागांची बरीच नासधूस झालेली होती. म्हणून तेथील दुरुस्ती करून उपर्युक्त खान तेथील कामांची बंदोबस्ती करण्यांत गुंतला आहे. अबदालीचा दिवाण काबुलीमल्ल यानें हल्लीं शीखांचा सरदार हरीसिंग भीकन याशी मैत्री केली आहे. त्याला लाहोरच्या सुभ्यावर कायम केलें आहे. उपर्युक्त सुभ्याचा वसूल तो हरीसिंगाकडे पाठवीत आहे. धान्याची महागाई फार असल्यानें ताकीद देऊन जवाचा ११ शेर व गव्हाचा ८ शेर असे भाव ठरविले आहेत. कराराप्रमाणें जम्मूचा राजा आपल्याकडील वसुलाचा पैसा शीख सरदारांस पाठवीत आहे. अबदालीचा चुल्ता व काश्मीरचा नायब बुलंदखान हा उपर्युक्त सुभ्यावर कायम आहे. तेथील नाकेबंदी करून व हिंदुस्थानांतील लोक नेमून स्वतःचा फायदा साधीत आहे.

———

हि. ११७७ जिल्हेज २८ } ३६ { १६८६ ज्येष्ठ वद्य ३०
इ. १७६४ जून २९

ता. २८ जिल्हेज हि. ११७७ पर्यंतच्या दरबारच्या व दिल्लींतील हकीकतींचा दुसरा बंद

नजीबुद्दौल्याची हकीकत अशी—त्यानें नजीबाबाद किल्ल्याचा पाया घातल्यावर व त्याच्या मुलानें घरांतील खजीन्याच्या कांहीं कोठया फोडल्या होत्या त्या घराचा बंदोबस्त केल्यावर त्यानें तेथून कूच केलें व या सालच्या ता १७ जिल्कादला रामरा घाटावर स्वतःच्या फौजेंत तो दाखल झाला. अलासिंग जाटाची पतियाळा या त्याच्या ठिकाणाहून पत्रें आली कीं, मी नबाबसाहेबाकडे येऊं शकणार नाहीं. उचित सल्ला हा कीं, तेथून कूच करून या बाजूस यावें. यामुळें शीखांस भय वाटेल. नाहीं तर ते लोक आपण दिल्लीकडे परतल्यावर हल्ले करतील. या लोकांच्या एकमेकांतील वैमनस्यावर माझा विश्वास नाहीं. कारण ते आपापसांत लढाई करतात व पुन्हा एक होतात. असें असूनही नजीबुद्दौल्यानें मौजे रामराहून कूच केलें व मुक्काम आणि चाल करीत ता. ५ जिल्हेजला यमुनेच्या पैलतीरीं दिल्लीपासून १३ कोसांवरील मौजे काढ येथें तो पोहोंचला व तोफखाना......... ५ कोसांवरील मौजे.........पोहोंचला. आपला सख्खा भाऊ सुलतानखान व रोहिल्यांची फौज तेथें ठेऊन तो एकटाच ता.......जिल्हेजला सफदर-जगांच्या दिल्लींतील हवेलींत दाखल झाला. त्या दिवसाच्या अखेरीस शाहजाद्याच्या भेटीस किल्ल्यांत गेला होता. मरहूम इतिमादुद्दौल्याचा मुलगा बकारखान शाही लश्करांत मरण पावल्यानें त्याजविषयीं फाते देण्यासाठीं ता. १८ ला नबाबाची पत्नी शोलापुरी बेगम हिच्या डेऱ्यास गेला. नंतर मलिका जमानीच्या डेऱ्यांत गेला असतां दोन रत्नखचित माला व एक दुशाला त्यास इनाम मिळाली. नंतर याकूब अलीखानाच्या डेऱ्यांत गेला. तेथें दासीचें नाचगाणें पाहिलें आणि शीखांच्या बाबतींत करावयाच्या उपाययोजने-बाबत विचारविनिमय करून आपल्या हवेलींत दाखल झाला.

दोन हजार स्वार व पायदळ स्वतःजवळ बाळगून असलेला दिलेरसिंग राजावत जयसिंगपुऱ्यांत दाखल झाला. शाहजाद्याकडून त्यास व त्याचे बरोबरचे लोकांस मानाचा पोषाक देण्याची तयारी झाली; कारण नजीबुद्दौल्यानें पोषाक वगैरेचा खर्च जीनत महल बेगमेकडे देऊन टाकला होता. त्याची भेट होऊन नजीबुद्दौल्याशीं बोलणीं झाल्यावर काय होतें तें पहावें. माधोसिंगाशीं जाबसाल असा कीं, आपण एकत्र येऊन विरोधकांची समजूत करावी. नारनोळमध्यें यावें. तेव्हां माधोसिंगानें जयपुराहून कूच केलें. भेट होईल असा अंदाज आहे. मुद्दा असा कीं, राव मल्हार यांचा जयपुरास जाण्याचा व एक होऊन लढाई करण्याचा विचार आहे. म्हणून नजीबुद्दौला नारनोळकडे जाण्याचा संभव दिसत नाहीं. आणि तसें होणारही नाहीं. कांहीं दिवसांत शहरांतून कूच करून स्वतःच्या फौजेंत दाखल होईल.

जसासिंग कलाल वगैरे शीखांची हकीकत अशी––जसासिंग कलालाच्या लिहिण्या-प्रमाणें.हरीसिंग भीकन व निहालसिंग वगैरे चकगुरु जवळच्या [भागांतून निघून दोआबांतील] भागांत आले त्यानंतर त्यांची मुलाखत होऊन सुलूख झाला.त्याप्रमाणें याच सालच्या ता.१२ जिल्हेजला सर्व लोक म्हणजे हरीसिंग भीकन, निहालसिंग व करदारसिंग...व दिल्लीवालियान आणि गूजरसिंग हे सुमारें तीस हजार स्वार व पायदळ यांसह सतलज नदीच्या ऐल-तीरावरील रूपडच्या घाटानें नदी ओलांडून सरहिंद परगण्यांत दाखल झाले व त्यांच्या फौजा कुंजपुऱ्यावर आणि अंबाला किंवा शाहाबाद या महालांवर हल्ले करून खेडीं लुटीत आहेत. अंतर्वेदींत जाण्याचा त्यांचा बेत आहे.

अलीसिंग जाटाचा पतियाळा या स्वतःच्या गांवीं मुक्काम होता. त्यानें शीखांशीं लढण्याच्या हेतूनें स्वतःच्या किल्ल्याची तयारी केली होती. ठाणेसर वगैरे करनाळपर्यंतचा जो मुलूख सध्या त्यानें स्वतःच्या ताब्यांत आणला होता त्याच्या वसुलीचा पैसा कोणा-सही दिला नव्हता. शीखांची फौज अधिक असल्यानें आपल्या स्वतःच्या ठिकाणाहून कूच करून तो उपर्युक्त सरदारांच्या मुलाखतीस गेला व त्यांना सामील झाला. अलासिंगानें नजीबुद्दौल्यातर्फे रु. ८०००० कडाकुऱ्याबद्दल रोख कबूल केले व ते तो देत आहे. या शिवाय वसूलीबद्दल अशी बोलणी करीत आहे कीं, "नजीबुद्दौल्याशीं संबद्ध प्रदेशांत सैन्य उतरवूं [नये]. जो पैसा ठरेल त्याची माझ्याकडून निशा करून घ्यावी. त्यास शीख सरदारांनीं उत्तर दिलें कीं, स्वतःविषयीं वसुलीबाबत निशा यावी. नजीबुद्दौल्याच्या बाबतींत तुम्हांला काय करावयाचें आहे." या हकीकतीनें नजीबुद्दौला आणि सर्व लोक गोंधळून गेले......नजीबुद्दौला शीखांशीं एकदा लढाई देईल. विजय मिळाला तर सरहिंदकडे जाईल; नाहींतर शुक्रताल येथें जाईल. परमेश्वर शहराचा रक्षणकर्ता आहे. व्हायचें असेल तें होईल. त्याप्रमाणें नजीबुद्दौला दोनचार दिवसांत फौजेंत दाखल होईल.

जवाहिरसिंगाची हकीकत अशी–– तो कांहीं दिवस भरतपूर किल्यांत राहिला. मोठ्या धोरणानें त्यानें आपला मेव्हणा बलराम याच्या लोकांस तेथून काढून स्वतःच्या लोकांस तेथें नेमिलें. इमादुल्मुल्क बहादुराची भेट घेऊन त्यानें आपल्याशीं मैत्री करावी या गोष्टीवर लक्ष केन्द्रीत केलें. त्यानें उत्तर दिलें कीं, लवकरच राव मल्हार येत आहे. उपर्युक्त रावाचीं पत्रें तुम्ही व मी दोघांकडेही आलीं आहेत की...... लवकरच तिकडे येतों. मी येईपर्यंत थांबावें व काम लवकर उरकूं. उपर्युक्त राव आल्याशिवाय माझें येथून हलणें होऊं शकणार नाहीं. तेव्हां जवाहिरसिंग डीग किल्ल्यांत पोहोंचला व त्यानें स्वत.च्या भावास अकबराबादेस पाठविलें. सुरजमल्लाच्या वेळेपासून सालीना सात लाख रुपये नाहरसिंगास उत्पन्न देण्याचें ठरलें होतें. आतां जवाहिरसिंगानें स्वतःतर्फे तीन लाख रुपये उत्पन्न वाढवून दिले. सर्व फौज मथुरेंत आहे. राव मल्हारची (लोक) वाट पाहात आहेत.

———

हि. ११७८ जवल २९ | ३७ | श. १६८६ मार्गशीर्ष शुद्ध १
इ. १७६४ नोव्हेंबर २४

हि. ११७८ जवलच्या शेवटच्या तारखेपर्यंतचे तीन बंद. श्रीमंतांचें कुशल असो.

दरबारच्या बातम्या व दिल्लींतील हकीकती--हि. ११७८ सालच्या पहिल्या तारखेस अबदालीचें कंदाहारहून कूच, तेथून एक मजलीवर काबूलला जाण्याच्या हेतूनें डेरेदाखल होणें, शाहवलीखान व अबदाली यांची आपापसांत एकी व बेकी होणें, खानाचा स्वतःच्या मित्रांसह कंदाहारमध्यें मुक्काम, खानास आणण्यासाठीं अबदालीनें स्वतःच्या सरदारास पाठविणें, सेनापति जहानखान याचा काबूलमध्यें मुक्काम व त्यानें अबदालीची वाट पाहणें, चकगुरूच्या जवळील अमरसर तळ्यांत स्नान केल्यावर शीख लोकांनीं तेथून मुक्काम हलविणें; फौजेंतील चांगले लोक निवडून जवळ जवळ साठ हजार स्वारांसह, चरतसिंग, हरीसिंग, सखासिंग, निहालसिंग, गूजरसिंग वगैरे सरदारांचें गुजरात शाहदौल्याकडे व झेलमच्या पैलतीरीं जाणें, जसासिंग, ठोकासिंग, खुशहाल, करदारसिंग वगैरेंचें दुआबांत पोहोंचणें, जवाहिरसिंगाच्या वकीलांचें त्यांच्याबरोबर असणें; राव मल्हारजी होळकर याची जवाहिरसिंग व इमादुल्मुल्क यांचेशीं ता. १२ जवलला भेट होणें, खिजराबादेच्या बागेंत त्यांचा डेरा, नजीबुद्दौल्याचें किल्ल्यांतील बुलंद बागेंतील तंबूत दाखल होणें, सैन्यांतील करावलीशीं लढाई आणि मरहूम कमुद्दीनखानाच्या यमुनेच्या रेतीमधील हवेलीच्या बंदेबुर्जाची दररोज मोर्चेबंदी, ता. २७ रखरला शुजाउद्दौला आणि इंग्रज यांत मोठी लढाई होणें, आणि बादशाह व शुजा यांच्या लश्कराचा फार मोठा पराभव व विध्वंस होणें, कांहीं स्वारांसह नजीबुद्दौल्याचें बनारसला पोहोंचणें; सर्व सामान व तोफखाना लुटला जाणें, याविषयीं आणि इतर सर्व हकीकती याविषयीं या पूर्वी ता. १३ जवल हि. ११७८ रोजीं पाठविलेलें पत्र नजरेखालून गेलें असलेच.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी—पूर्वीप्रमाणें त्याचा मुक्काम कंदाहारमध्यें आहे. आणि आतांपर्यंत वजीर शाहवलीखान आणि शाह यांच्यांत एकी झाल्याची बातमी न आल्यानें पत्राप्रमाणे अऊन्नासमध्यें......आणि नजीबुद्दौल्याचा वकील मेघराज व हाफिजरहमतखानाचा वकील केदारनाथ हे दोघे अबदालीस नजराणा देण्यासाठीं हुंड्या बरोबर घेऊन जम्मू येथें मुक्काम करून आहेत. त्यांचें काबूल व पेशावर येथें येणें उघड झालें आहे. परंतु मुलतानची बातमी विश्वासार्ह आहे. त्यामुळें जेवढी कळविली तेवढीच बातमी आहे.

जहानखानाचा काबूलमध्यें मुक्काम आहे. फौज जमविण्याचा प्रयत्न करीत आहे. अबदालीची वाट पहात आहे. बरेच लोक जमल्याशिवाय शीखांना शासन करण्यासाठीं हिंदुस्थानांत [येण्याचा*]विचार नाहीं आणि त्या लोकांचे कुलाहपोशांवर (अफगाणांवर) फार लक्ष आहे.

शीखांची हकीकत अशी–चरतसिंग वगैरे सरदारांनीं चिनाब ओलांडली व पैलतीरीं जाऊन पुढें मुलतानकडे व अटक नदीच्या प्रदेशांत जाण्याचा त्यांचा विचार आहे. जसासिंग वगैरेंनीं दोआबांतून कूच केलें. त्यांनीं ता. १३ जवलला सतलज ओलांडली व अलीकडे येऊन १५ तारखेस सरहिंदच्या अलीकडे दोन मजलीवर अंबाला महालांत ते पोहोचले. अजमाबाद तलावरी या सराईला वेढा घातला. ठाणेदार दलीलखान या कुंजपुऱ्याच्या जमीनदारानें तोफखान्याची लढाई दिली. तेव्हां करदारसिंग बंदुकीची गोळी लागून कामास आला. नंतर [दलील] खानाशीं मामलतीचे जाबसाल चालू झाले. सुमारें सहा हजार स्वार लोडबा घाटाच्या जवळच्या उतार असलेल्या ठिकाणाहून यमुना ओलांडून पलीकडे गेले आणि त्यांनीं पुष्कळ खेडीं लुटून बेचिराख केलीं. जवाहिरसिंगाचे वकील बरोबर आहेत आणि तो मदतीसाठी आपले लोक आणीत आहे. दुसरी टोळी जिंद महालाकडे गेली. बातमी आहे कीं, थोड्या वेळांत जवाहिरसिंगास सामील होतील. या हकीकतीनें पानीपतचे नागरिक किल्ल्यांत पळून गेले. साबली वगैरेचे रहिवासी खेड्यांत पक्के पाय रोवून आहेत व कांहीं तजलाबादेस जाऊन राहिले आहेत. आतां यमुनेच्या ऐलतीरीं मोठें संकट आलें आहे. काय घडेल तें पहावें.

राव मल्हारजी जवाहिरसिंग आणि इमादुल्मुल्क यांची हकीकत अशी–जुन्या शहराच्या किल्ल्याच्या अरबसराई बाजूपासून यमुनेच्या या बाजूपर्यंत त्यांचे डेरे लागलेले आहेत. करावलीशीं लढाई चालू आहे. नजीबुदौल्यास नजीबाबादेहून मेरठमध्यें ५।६ लाख रुपये आले होते. तो खजिना लुटण्यासाठीं ता. २० जवल शुक्रवारीं पूल बांधून यमुना ओलांडून मराठी फौजेनें नदीच्या त्या बाजूस कूच केलें. बारा कोस गेले असतां अगोदरच रात्रींच्या वेळींच खजीना दिल्लीस दाखल झाल्याचें कळल्यामुळें ते परत फिरले आणि नजिबुद्दौल्यास ताकीद करून घासदाणा वगैरे आणणारे त्याचे घोडे, तट्टें, उंट घेऊन गेले. नंतर उमरावगीर वगैरेंची फौज नदी ओलांडून गेली. मुघल फौजेंतील रोहिले रिसालेदार साकीबेगखान, हसनबेगखान दखनी व नसरखान हे नजीबुद्दौल्याचे नोकर रोहिले रिसालेदार यमुनेच्या त्या कांठावर आले असल्याने मोठी लढाई झाली. जाटांनीं प्रथम बंदुकांनीं आणि नंतर शस्त्रांनीं लढाई केली. पुष्कळ मुघल ठार केले व कित्येक जखमी केले. त्यांना मारीत मारीत ते यमुना नदीच्या पुलबंदी असलेल्या राजघाटावर आले.

हि. ११७८ रमजान १७ — ३८ — श. १६८६ फाल्गुन वद्य ३, १७६५ मार्च १०

ता. १७ रमजान हि. ११७८ पर्यंतच्या हकीकतीचे तीन बंद व एक तुकडा श्रीमंतांचें कुशल असो.

दरबारच्या बातम्या व दिल्लीच्या हकीकती, अबदालीचें झंडारामदास येथें येणें,

जम्मू डोंगराच्या बाजूस नानकशाह फकीराचा मुक्काम व तेथून जलालाबादला पोहोंचणें, वकील पाठविण्याबाबत जम्मूच्या राजास ताकीद, अबदालीच्या लश्करांत धान्याची व इतर वस्तूंची महागाई, तो बवाह नदी ओलांडून सुलतानपूरमध्यें आल्याची बातमी व अबदालीच्या मुक्कामाजवळ कज्जाकी पद्धतीनें शीख लोकांचें येणें, यमुनेच्या पैलतीरी मल्हाररावाचा मुक्काम, तह केल्यावर ता. १७ शाबान हि. ११७८ ला नजीबुद्दौल्याचे उपर्युक्त रावाबरोबर जवाहिरसिंगाच्या डेऱ्यांत जाणें, उपर्युक्तास पुष्कराज हें रत्न नजर करणें, त्यानंतर उपर्युक्त नबाबाचें वर उल्लेख केलेल्या रावाबरोबर ता. १९ ला इमादुल्मुल्काच्या डेऱ्यांत जाणें व अशरफी देणें, मानाचा कपडा, पोशाख, जवाहीर व कंठा... मिळणें व नंतर २० तारखेला शाहदऱ्यापासून... मल्हारराव, जवाहिरसिंग व इमादुल्मुल्क यांनीं यमुनेच्या अलीकडे नाल्यावर डेरा देणें, जसासिंग वगैरे शीख लोकांचें बुराडी पाहून सरहिंदकडे रवाना होणें, जवाहिरसिंगापासून बाकीचे तेरा लाख रुपये घेणें......उपर्युक्त ......यांचे नजीबुद्दौल्याच्या डेऱ्याकडे ता. २३ शाबानला (जाणें) व खलबत झाल्यावर पांच वस्त्रें, दोन रत्नें, पोवळ्याची माळ, हत्ती व दोन घोडे मल्हाररावास देणें, बरोबर असलेल्यांना १२९ मानाचे कपडे, ४५ जवाहिर मिळणें, शुजाउद्दौल्याचा इंग्रजांकडून पराभव व त्याचे लखनौला दाखल होणें, तेथेंही इंग्रजांच्या भीतीनें मुक्काम न करतां आपले लोक व खजिना वगैरेसह फर्रुखाबादेस रवाना होणें, जवाहिरसिंगानें कूच करणें व थगील येथें पोहोंचणें, नजीबुद्दौला व याकूब अलीखान वगैरेंच्या नांवानें लिहिलेल्या पत्रांसह अबदालीची खबर येणें, मारवाडच्या राजांचा आपल्या गांवीं मुक्काम, या हकीकतींचें पत्र यापूर्वीं ता. २५ शाबानला हुजुरांकडे पाठविलें तें नजरेखालून गेलें असेलच.

त्यानंतर अबदालीची हकीकत अशी— सुलतानपुराहून कूच करून दोआबांतील जालंधरला तो पोहोंचल्यावर तेथील अफगाण नागरिकांवर त्यानें ८०,००० रुपये खंडणी लादली. तसेंच दोआबांत दाखल झाल्यावर धान्यही महाग झालें. त्या जिल्ह्यांतील सामील झालेल्या जमीनदारांच्या अर्जावरून ताकीद दिली गेली कीं, कोणी हल्ले करूं नये. परंतु अबदालीचे शिपाई कपले हुकूम मनावर घेतात ? त्यानंतर सतलज नदी ओलांडून या बाजूस येऊन ता. १२ रमजानपर्यंत सरहिंदच्या या बाजूस कोठाच्या समोर वसलेल्या छटणपूर येथें त्याचा मुक्काम आहे. दोआब वगैरे कांहीं ठिकाणीं जे अबदालीचे लोक मुक्काम करून होते ते शीखांच्या भीतीनें उठून लश्करांत दाखल झाले. अबदालीच्या अमलाचा व शीखांच्या तंबीचा कांहीं परिणाम झाला नाहीं.

नजीबुद्दौल्याचा वकील राव मेघराज व हाफिज रहमतखानाचा वकील केदारनाथ वगैरे जम्मूच्या डोंगरांत होते त्यांनीं ता. ४ रमजानला अबदालीची मुलाखत घेतली. नजीबुद्दौल्याच्या वकिलाचा अर्ज होता व अबदालीनें स्वतःच असें सांगितलें कीं, फक्त नजीबुद्दौल्याच्या मदतीसाठीं आणि काफिरांना शासन करण्यासाठीं त्या जिल्ह्यांत

जावयाचें. त्या बाबतींत एकमत झालें आहे. अशा परिस्थितींत आपल्या स्वारीची हकीकत समजली व मनाजोगता जर खरोखरच तह झाला तर ठीक; नाहींतर थोड्या दिवसांनीं दिल्लीला येऊं. तेव्हां तुमच्या अशीलाला (नजीबुद्दौल्यास) तसें लिहावें आणि त्यांतच पैशाची मागणीही केली गेली. नजीबुदौल्यानें त्याच वेळेस उत्तर लिहिलें कीं, खूप त्रास सहन करूनही मल्हाररावाच्या मध्यस्थीनें तह झाला नाहीं. त्यामुळें लवकरच हुजुराकडे येतों.

अलासिंग जाट याचा वकील काश्मीरीमल ह्याचा मुक्काम पतियाळास आहे. वसुलीबाबत बोलणीं करण्यासाठीं तो अबदालींच्या लश्करांत हजर झाला आहे. त्याला आणण्यासाठीं अबदालीनें सजावल पाठविले होते. तेव्हां उपर्युक्त (अलासिंग जाट) स्वतःच्या किल्ल्यातच राहिला व भीतीनें अबदालीच्या भेटीस गेला नाहीं. पण त्यानें चाळीस हजार रुपये नजराणा पाठविला. बातमी आहे कीं, अलासिंग जाटाच्या मामलतीचा तीन लाख रुपयांवर निकाल झाला. त्याचा पुतण्या अबदालीकडे नोकरीस गेला.

शीखांची हकीकत अशी—चरतसिंग, हरीसिंग, वगैरे सरदार...आसपास व दुआबांतही इतस्ततः मुक्काम करून आहेत व अबदालीचीं ठाणीं बसूं देत नाहींत. त्याचा अर्थ असा कीं, सर्व सरदार व सैन्य यांसह अबदाली कूच व मुक्काम करीत असावा आणि स्वतःच्या फौजेस वेगळें होऊं देत नसावा. आतांपर्यंत शीखांना कांहीं शासन झालें नाहीं व पुढेंही होईल असें दिसत नाहीं. हल्ले करून लूट करण्याशिवाय त्याचा वेगळा हेतू दिसत नाहीं. अशा परिस्थितींत बहुधा पैसे दिले तर तो लाहोरकडे जाईल; नाहीं तर बातमी आहे कीं, यमुना ओलांडून पलीकडे सहारणपूर जिल्ह्यांत जाऊन सर्व लोकांकडून जबरदस्तीनें पैसा वसूल करील.

बातमी आली कीं, दिल्लीजवळच्या भागांतून सरहिंदकडे गेलेले जसासिंग कलाल वगैरे सरदार अंबाल्यापर्यंत जाऊन पोहोंचले. तेव्हां सतलज ओलांडून अबदाली अलीकडे आल्याची बातमी आली. त्यामुळें लढाई न होतां समाना येथें ते पोहोंचले. त्यानंतर कूच करून माखूवालाला जाऊन राहिले आहेत. तेथून अबदाली राहण्याचें ठिकाणाचें अंतर वीस कोस आहे. खरी हकीकत अशी आहे कीं, शीख अबदालीशीं सरळ सरळ लढाईस उभे राहात नाहींत आणि त्यालाही त्यांचा फार त्रास होतो. त्यांनीं अबदालीचा विचार सोडला नाहीं व सोडणार नाहींत. तेव्हां बंदोबस्त कसा होणार ?

जसासिंग व इतर शीख सरदारांनीं अलासिंग जाटाकडे सांगून पाठविलें कीं अबदालीशीं मामलतीचा ठराव करूं नये. प्रत्यक्ष वेढा घालण्यासाठीं आम्ही मदतीस तयार आहो. उत्तर दिलें कीं, 'मी जमीनदार आहे, मी मामलत करणार, मी लाचार आहे; तुम्ही अबदालीशीं लढण्यास मदत करावी.

———

हि ११७८ रमजान १७ } ३९ { श. १६८६ फाल्गुन वद्य ३ / इ. १७६५ मार्च १०

ता. १७ रमजान हि. ११७८ पर्यंतच्या दरबारच्या बातम्या आणि दिल्लींतील राहिलेल्या हकीकतींचा तिसरा बंद.

ता. १४ रमजानला गडापुढें महलदारखानाच्या अवदालीकडे जाण्याच्या हेतूनें नजीबुद्दौल्यानें आपला पेशखाना व इतर सामान नमकमंडीला रवाना केलें. ता. १५ ला शुक्रवारीं जामा मशिदींत आला. नमाज पढल्यावर हत्तीवर स्वार झाला आणि चोब्यावर व हत्तीवर नगारे वाजवीत डेऱ्यांत दाखल झाला. किल्ल्याच्या रक्षणासाठीं एका जमादाराशिवाय कोणीही मनुष्य त्यानें दिल्लींत ठेवला नाहीं.

नजीबुद्दौल्यानें अवदालीकडून आलेला याकूब अलीखान यास कांहीं दिवसांपूर्वीं सल्लामसलतीसाठीं व उपाययोजनेचे बाबतींत बोलणीं करण्यासाठीं गंगानदीच्या दुसऱ्या तीरावर असलेले रोहिले सरदार व शुजाउद्दौला यांजकडे पाठविलें होतें. जावसाल येण्याची तो वाट पाहात आहे. जवाहिरसिंगानें पाठविलेला कलीमुल्लाखान नजीबुद्दौल्याबरोबर दिल्लीहून रवाना झाला. मल्हाररावाच्या नजराण्यासह अवदालीकडे जाण्याचा बापू पंडित याचाही विचार आहे. खर्चाच्या व्यवस्थेंत आहे. तो आपल्या भावाकडून पैसा येण्याची वाट पहात आहे.

रोहिले सरदार आणि शुजाउद्दौला यांची हकीकत अशी आपले लोक, खजिना व इतर सामान यांसह फर्रुखाबाद येथें मुक्काम करणें त्यास योग्य न वाटून तो हाफिज रहमतखानाच्या बांस बरेलीस जाऊन तेथें त्यानें आपले लोक...व चीजवस्त सुरक्षित ठेविली आणि स्वतः तेथून कूच करून गंगानदीच्या दुसऱ्या बाजूस गणमुक्तेश्वर घाटापासून आठ कोसावरील हसनपुरास आला. हाफिज रहमतखान, मुल्ला सरदारखान, फत्तेखान वगैरे सरदार मुलाखतीसाठीं दारानगर घाटापासून कूच करून गेले. त्याप्रमाणें ता. ८ रमजानला हसनपुरास पोहोचले. शुजाउद्दौल्याची मुलाखत घेतली, अश्रफी व घोडे वगैरे नजर केले. त्याच्या सहाय्याबाबत बोलणीं केलीं. शुजाउद्दौल्याचा दिल्लीस जाण्याचा बेत कायम झाला होता. परंतु अबदालीच्या आगमनाच्या अफवेमुळें असें ठरविलें कीं, फर्रुखाबादला जाऊन अहमदखान व इमादुल्मुल्क यांशीं सल्लामसलत करावी व त्यानंतर उपर्युक्त नवाबाच्या मदतींत लक्ष घालावें.

शुजाउद्दौल्याची मैत्री व मदत याबाबत मल्हाररावाशींही जावसाल चालू आहे. परंतु विश्वासघातकी जवाहिरसिंगाकडून पैसे देऊनही मदत न आल्यानें सरदारांस भीती वाटूं लागली. यांच्या मुलाखतीचीही बातमी पसरली आहे कीं, मुलाखतींत ठरेल त्याप्रमाणें ते करतील.

हजरतांच्या नोकरांची हकीकत अशी--अलाहाबादजवळ बादशाहाचा तळ आहे.

कांहीं इंग्रज त्याच्या नोकरींत आहेत. तेव्हां इंग्रजांनीं ता. १५ शावानला चुनारगड किल्ला आणि ता. १७ ला अलाहाबादचा किल्ला जिंकून ताब्यांत घेतले. आणि बादशहाचा झेंडा पक्का केला. तेथील किल्लेदारांनीं कित्येक दिवस लढाई दिली. बाहेरील तोफांचे गोळे किल्यांत पडूं लागले तेव्हां त्यांचा धीर खचून...ते बाहेर आले व हजरतांची मुलाखत घेऊन त्यांनीं स्वतःचा जीव वांचविला व त्यांचे सेवेस हजर झाले.

बातमी आली कीं, अवध व अलाहाबाद सुभ्यांचे जमीदार बादशाहाशीं रुजू होऊन वसूल आदा करण्यास तयार झाले. तथापि लखनौ, खैराबाद वगैरे शहरांतील कांहीं पुरे जमीनदारांच्या दांडगाईमुळें उध्वस्त झाले होते. इंग्रजांच्या व सरकारच्या पाठिंब्यानें राजा बेणीबहादुराचा लखनौंत मुक्काम आहे. कित्येक दिवसांपासून सरकारच्या नोकरींत असलेला शुजाउद्दौल्याचा चुलत भाऊ मिर्झा कूचक याशीं संबद्ध आगा नजफ कुलीखान याजकडे कुराजहानाबादेची फौजदारी कायम झाली.

शुजाउद्दौल्याचा सुभ्यांतून अंमल अजिबात उठला अशी बातमी आली.

बादशाहानें शुजाउद्दौला सुभ्यांतील वसुलापैकीं रुपयास सहा आणे इंग्रजांना लिहून दिले सध्या इंग्रज सरदार व जाफरखानानें पाठविलेला वकील शिताबराय यांची बादशाहाशीं भेट झाली. मंत्रीपद शाहजादा मुहम्मद अकबर याच्या नावें कायम झालें आहे.

जाफरखानाची हकीकत अशी—कलकत्त्यांतील बड्या इंग्रज साहेबानें त्यास पाठविल्यामुळें तो मुर्शिदाबादेस दाखल झाला. बड्या साहेबानें गोरी फौज बरोबर दिली होती. बातमी आहे कीं, तेथून कूच करून तो फौजेसह अजीमाबाद सुभ्याला पोहोंचला. आणि बोलावल्यावरून तो बादशाहाच्या नोकरींत गेला.

मारवाडच्या राजांची हकीकत अशी—माधोसिंग जयपुरास आहे. त्याचा नोकर शिवभट मल्हाररावाबरोबर आहे. त्यानें त्यास राजाकडे पोशाखासह पाठविलें. नजीबखानानें पांच कपड्याचा पोषाख व दोन जवाहीर देऊन पाठविलें. भट रवाना होऊन जयपुरास आला असेल आणि राजा बिजेसिंग आपल्या गांवीं आहे.

बातमी आली कीं, श्रीमंतांकडून मानाजी शिंदे नेमलेल्या फौजेसह नर्मदा ओलांडून माळवा सुभ्याकडे येत आहे असें ऐकून महादजी शिंदे पदभ्रष्ट झाला. ओडछा व दतिया या मुक्कामाच्या ठिकाणाहून लढाईसाठीं त्यानें कूच केलें. त्याजबरोबर जवळ जवळ पांच हजार स्वार आहेत. मैत्री व सेवा यांबाबत त्याचीं पत्रें शुजाउद्दौला आणि नजीबुद्दौला यांजकडे आलेलीं आहेत.

अशीही बातमी आली कीं, गोविंद पंडित बुंदेल्याच्या मुलांनीं इतर मुकासेदारांशीं संगनमत केलें व फौज जमा करून चकले इटाव्याशीं संबद्ध महालांत दाखल झाले. त्यांनीं इटाव्याला वेढा दिला. हाफिज रहमतखानातर्फे फौजदारीचा नायब नेमला गेला होता त्याशीं यांची लढाई चालू आहे. हाफिजानें शेख कबीर व स्वतःचे इतर रिसालेदार यांस

उपर्युक्त नायबाचे मदतीसाठीं पाठविले. तसेंच हाफिजानें पत्र पाठविलें होतें कीं 'तुम्ही या महालांत कोणत्या दस्तऐवजाच्या आधारानें आलां?' त्यांनीं उत्तरादाखल लिहिलें कीं, 'बादशाहाचा हुकूम आम्हांजवळ आहे'. या उत्तरामुळें हाफिजनें शुजाउद्दौल्याच्या मध्यस्थीनें मल्हाररावाकडे विनंती केली कीं, उपर्युक्त सरदारांस लिहून इटावा महालांत त्यांस अडथळा करावा. करार होईल त्याप्रमाणें पैसे उपर्युक्त रावास दिले जातील. बातमी आहे कीं, शुजाउद्दौला गंगा ओलांडून ऐलतीरावर आला. अनूपशहराजवळ डेरा असलेल्या मल्हाररावाची तो मुलाखत घेत आहे. आणि इटावा आणि शिकोहाबाद हे महाल मिळण्याबाबत प्रयत्न करीत आहे. उपर्युक्त (राव) पैशाची मागणी करीत असल्यानें...... सरकारजवळ नाहीं...असें वाटतें. [काय होईल तें] पहावें. आणि महाराजांचें ऐश्वर्य कायम राहो.

सु. ९६४ } ४० { श. १४८५–८६ इ. १५६३–६४

पहिला अली आदिलशाह ⟶ शम्सुद्दीन फोलादखान नायब गैबत व कारकून व इतर रहिवासी मामले संदलापूर.

सध्या माझी देसाईगिरी दुसराच मनुष्य घेऊन बसला आहे. तो त्याचा हक्क नाहीं. समत मारडीचा जोशी खंडो विठ्ठल याचा भाऊ यमाजी यानें देसाईगिरीची स्वतःच इच्छा धरली होती. त्या उद्देशानें बुर्हान निजामशाहापुढें जाऊन व खोटें सांगून देसाईगिरी घेतली. आतां या समतेचा मुकासा सातपाकडे झाला आहे. ही जागीर पूर्वी सातपाकडे होती. तेव्हां तो देसाईगिरी चालवीत असे. मंदरूपचा पाटील यलगोंडा हा जोतरावाचा शेजारी होता. उपर्युक्त समत जोतरावाकडे चालू आहे. यलगोंडा हा जोतरावाच्या जमेतीच्या सहाय्यानें देसाईगिरी चालवीत होता. अहीरवाडी खालील कुंभारीचा कुलकर्णी जखरस हाही बहादुरुलमुल्क याच्या कारकिर्दीत या समतेची देसाईगिरी चालवीत होता. उपर्युक्त कसब्याचा पाटील भर[म*]ण्णा यानें हरकत घेतली. तीप्रमाणें फर्मान होऊन त्यानें स्वतःकडे (देसाईगिरीची) मिरास घेतली आणि कोणाकडून तरी ती तो चालवितो. या बाबत व्यवस्था व्हावी. देसाई व कुलकर्णी यांची सर्व हकीकत ध्यानांत घेतली. यमाजी व यलगोंडा व जखरस हे या समतेमध्यें देसाईगिरी करितात. त्या सर्वांना दूर केलें आहे. देसाईगिरी व विलायत व उपर्युक्त मुकासा असें जें कांहीं असेल तें नरससेटी व नरहरी व विठ्ठल यांजकडे मुकर केलें आहे. उपर्युक्त नरससेटी व नरहरी यांस उपर्युक्त मामल्याचे देसाई समजावें. या मामल्याचा व समतांच्या देसाईगिरीचें काम त्यांजकडे चालवावें. त्यांनीं त्या भागाची भरभराट करावी व सरकारशीं निष्ठा दाखवावी. देसाईगिरी त्यांच्याकडे

याची. जो कोणी या देसाईगिरींत ढवळाढवळ करील त्यास पकडून शासन करावें. म्हणजे दुसरा कोणी हरकत करणार नाहीं. उपर्युक्त तीन मनुष्यांना पकडून त्यांनीं जो पैसा जमविला असेल तो दरबाराकडे पाठवून द्यावा. या तीन मनुष्यांकडून जामीन घेऊन ताकीद करावी कीं, देसाईगिरीमध्यें अडथळा आणूं नये. अडथळा आणल्यास ते गुन्हेगार होतील असें पक्कें समजावें.

हि.९७६ रखर ७ } ४१ { श. १४९० भाद्रपद शुद्ध ९ इ. १५६८ सप्टेंबर २८

पहिला अली आदिलशाह ⟶ आंकसखान.

या वेळीं खासा कचेरीचा सरनौबत सन्जरखान यानें कचेरीस अर्ज पाठविला कीं, इस्तादाबादेंत माझ्या घरानजीक मियां बहाउद्दीन याचें घर आहे. तो तर मेला. त्याची बायको मुलांसह त्या घरांत राहते. त्या गावांत राहणारे त्या (आंकसखान) खानाचे मुतालीक वेळोंवेळीं त्या घरास त्रास देतात व म्हणतात कीं, घर खाली करा व दुसऱ्या कोणासही देऊं करतात. हें योग्य नाहीं व मुसलमानास अनुचित आहे. तरी आपल्या मुतालिकांना ताकीद करा. त्या विधवेच्या घराच्या आसपास घोटाळूं नका. अडथळा करूं नका. फर्मानाप्रमाणें चालावें. हुजूरच्या परवानगीनें. वझीरे हुकूमत खानखानान किश्वरखान याच्या माहितीनें.

हि. ९८९ रमजान २ } ४२ { श. १५०३ आश्विन शुद्ध ३ इ. १५८१ सप्टेंबर ३०

दुसरा इब्राहीम आदिलशाह → संदलापूर मामल्याचा नायब गैबत जाबितखान व कारकून

उपर्युक्त मामल्याचा देसाई नरसेटी बिन मंगसेटी यानें नवाबांस अर्ज केला. उजव्या व डाव्या बाजूच्या दुकानांचीं दोन घरें माझी मिरास असून मजकडे चालू आहेत. सध्या आदसेटीनें हरकत करून उजव्या बाजूच्या एका दुकानाचें घर जबरीनें ताब्यांत घेतलें व चालवीत आहे. असें आहे तर आदसेटीस ताकीद करून न्याय व उचित म्हणून तें दुकान देसाई मजकुराच्या ताब्यांत द्यावें. मिरासीचें काम असल्यामुळें अगाऊपणा उचित नाहीं व तसा कोणी करूं नये. हुजूरच्या परवानगीनें; सरनौबत दिलावरखान याच्या माहितीनें.

हि. ९९० मोहरम १ } ४३ { श. १५०३ माघ शुद्ध २ इ. १५८२ जानेवारी २६

दुसरा इब्राहीम आदिलशाह ⟶ संदलापूर मामल्याचा नायब गैबत जाबितखान व कारकून.

या वेळीं नरसेटी बिन मेगसेटी देसाई मामले मजकूर यानें दरबारच्या नजरेस आणलें कीं, ज्या वेळीं या कसब्यांत बाजार वसविला गेला तेव्हांपासून आतांपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूस सरदेसाई याचीं दुकानें होतीं. सध्या या कसब्याचा शेटे तकशेटीचा भाऊ अदसेटी यानें उजव्या बाजूचें माझें दुकान काबीज केलें आहे. तें मला देत नाहीं. शिरजोरी करतो. हें त्याचें काय धाष्ट्र्य आहे? देसायाचें जुनें व आज तागायत त्याजकडे चालू असलेलें दुकान त्यानें काबीज करावें हा काय प्रकार आहे ? या बाबत शेट्याला हुजूर बोलावून इन्साफ करून पूर्वीच्या महजराप्रमाणें दुकान देसायाच्या ताब्यांत देण्याबद्दल ताकीद केली आहे. कोणत्याही प्रकारें त्या शेट्याचा मुलाहिजा करूं नये. तो पुन्हा असें करणार नाहीं अशा प्रकारें त्याची समजूत करावी. हि. ९९० मोहरम १. हुजूरच्या परवानगीनें; अमीरे जुम्ला सरेसर नौबत दिलावरखान याच्या माहितीनें.

हि. ९९१ शव्वाल ९ } ४४ { श. १५०५ कार्तिक शुद्ध १० इ. १५८३ आक्टोबर १६

दुसरा इब्राहीम आदिलशाह ⟶ संदलापूर मामल्याचा नायब गैबत जाबितखान व कारकून

तुमची अर्जी आली. तींत लिहिलें होतें कीं, ' उपर्युक्त मामल्याचा देसाई नरससेटी यानें विनविलें कीं, पूर्वी या प्रदेशाची पेशकश शंभर होन मजवर मुकरर करून तसें फर्मान झालें होतें. नंतर मी हुजूरकडे जाऊन स्वतःची हकीकत सांगितली. तेव्हां ५० होन माफीची कृपा झाली. बाकी पन्नास होन मी पूर्वीपासून आतांपर्यंत आदा करीत आलों आहे. सध्या कचेरींतून जुन्या हुकुमाप्रमाणें १०० होन पेशकश बसविली, चालू केली व तीसाठीं मला वरातदार त्रास देत आहेत. या मामल्यांत मला इनाम व लाजिमे नाहींत. आणि ह्या ठाण्यांत चोवीस गावें आहेत. तेव्हां पन्नास होनांपेक्षां अधिक पेशकशीमुळें त्रास होतो व ती देववत नाही. ' तुमची अर्जी व देसायाच्या विनंति ध्यानांत घेतल्या. शंभर होनांचा हिशेब असा करीत. जुनी पेशकश ५० होन, अधिक केली ती ३० होन आणि मार्डी समतेमधील सात गांवांबद्दल २० होन मिळून शंभर होन. आतां यांतील ३० होन माफ करून ७० होन पेशकश कायम केली आहे. प्रतिवर्षी देत जावी. हि. ९९१ शव्वाल ९. हुजूरच्या परवानगीनें आणि अमीरे जुम्ला सरे सरनौबत दिलावरखान याच्या माहितीनें.

हि. ९९४ जवल २२ } ४५ { श. १५०८ वैशाख वद्य ८
इ. १५८६ मे १

दुसरा इब्राहीम आदिलशाह ⟶ संदलापूर मामल्याचा नायब गैबत झाबितखान व कारकून

मामले मजकूरचा पटेल व देसाई नरससेटी यानें नवाब सुलेमानी यांजकडे अर्ज केला कीं, ' उपर्युक्त कसब्याची सरपटेलगी व उपर्युक्त मामल्याची देसाईगिरी माझी मिरास आहे. हा कसबा वसला तेव्हां माझ्या पूर्वजांनीं हमरस्त्याच्या उजव्या डाव्या बाजूस दुकानें घालून बाजारास सुरुवात केली. त्याप्रमाणें पिढ्यानुपिढ्या चाललें. सध्या या कसब्याचे रहिवासी आदसेटी, मागसेटी व तुकसेटी यांनीं हरकत करून उजवीकडील दुकानें जबरीनें कब्जांत घेतलीं आहेत. याबाबत पूर्वी फर्मान झालें होतें कीं, तीं दुकानें मला द्यावी. नाहीं तर उपर्युक्त दुकानें चालविणाऱ्या बक्कालांना हुजूर पाठवून द्यावें. उपर्युक्त बक्कालानीं शिरजोरीं करून, न दुकानें दिलीं, न हुजूर आले. नंतर या वेळीं रातिबाच्या गल्याबरोबर आद सेटी हुजूर आला असतां त्यास ताकीद झाली होती कीं, एक तर दुकानें देऊन टाकावी किंवा हरकत असेल तर तसा कागद कचेरीस देऊन न्यायास उभें रहावें. उपर्युक्त सेटी परवानगीवाचून गेला. या पूर्वीच दुकानांना दुराही दिली होती कीं, न्याय झाल्याशिवाय दुकानें उघडू नयेत. उपर्युक्त शेट्यांनीं दुराही मोडून दुकानें उघडलीं. तरी निकाल व्हा. ' असें आहे तर हें फर्मान मिळतांच तिन्ही बक्कालांना तुम्ही हुजूर पाठवावें. नरस सेटी हुजूर आहे. तेव्हां पक्का न्याय होईल. हयगय करूं नये. यांतच सरकारचाकरी आहे. हि. ९९४ जवल २२ हुप. अमीरे जुम्ला दिलावरखानाच्या माहितीनें.

हि. ९९७ जखर ११ | ४६ { श. १५११ वैशाख शुद्ध १२
इ. १५८९ एप्रिल १७

दुसरा इब्राहीम आदिलशाह⟶ संदलापूर मामल्याचा नायब गैबत फोलादखान

त्याचा अर्ज मिळाला. या वेळी नरसू बिन मंगशेटी देसाई यावर सरकारी चाकर मिया अलाबक्ष बिन जमालुद्दीन मुलतानी याची १०० होनाची वरात आली होती. ती बातमी ऐकतांच तो (देसाई) बेदिल होऊन गावाबाहेर गेला आहे आणि यामुळेंच वरील कसब्यांतील क्षुद्र व्यापारी आणि इतर जातीचे लोक गाव सोडून गेले आहेत इत्यादि गोष्टी समजल्या. असें जर होत असेल तर समजावें कीं ती वरात रद्द केली आहे. त्या गावच्या इतर लोकांना दिलासा देऊन कसबा भरेल असें करावें. या बाबतींत योग्य ती व्यवस्था करावी. हुप. हि. ९९७ जखर ११. अमीरे जुम्ला मुरादखान याच्या माहितीनें.

} ४७ {

दुसरा इब्राहीम आदिलशाह ? →

...त्या बाजूस (बंड) उठलें आहे. फार त्रास होत आहे. म्हणून...यास जमेतीसह पाठविलें आहे. त्यासह शाहदुर्ग (नळदुर्ग) हून...हीच ताकीद (शिक्षा) करण्यासाठीं नरसू उमाजी पंडितासही पाठविलें आहे फर्मानाप्रमाणें चालावें. हुप. मुस्तफाखानाच्या मध्यस्थीनें.

} ४८ {

दुसरा इब्राहीम आदिलशाह ? →

किल्ल्याच्या राज्यनिष्ठेविषयीं अर्ज पाठविला तो.........त्या राज्यनिष्ठानें त्यांसह ती चाकरी उत्तम बजावावी. म्हणजे पुष्कळ कृपा होईल. स्वतःचे पावलोक पाठविण्यास माफी आहे असें समजू नये. त्याचा उत्कर्ष करूं यावर त्या राज्यनिष्ठानें विश्वास ठेवावा. या बाबत मन स्वस्थ ठेवून खूप यत्न करावा. हुप.

हि. १०३८ रवल ६ } ४९ { श. १५५० कार्तिक शुद्ध ७
इ. १६२८ आक्टोबर २४

मुहम्मद आदिलशाह→ ?

या वेळीं.........या तर्फेतील बेडर व बंडखोर डोकें वर काढून बंड करीत आहेत. म्हणून हुजूरकडून ... यास नेमिलें आहे. तरी २०० उत्तम स्वार त्याजकडे पाठवावे. त्यानें बंडखोरांचा निःपात करण्याचा असा प्रयत्न करावा कीं, त्यांचा एकही अवशेष दृष्टीस पडणार नाहीं. याविषयीं ताकीद जाणावी. हि. १०३८ रवल ६ हुप. याबाबत हसन बिन इब्राहीम महलदार यास पाठविलें आहे.

हि. १०३८ रखर ११ } ५० { श. १५५० मार्गशीर्ष शुद्ध १२
इ. १६२८ नोव्हेंबर २८

मुहम्मद आदिलशाह → देसाई व मुकद्दम परगणे महींदरी

बीरदास शांबा याच्या मुतालिकांकडून उपर्युक्त परगण्याच्या रयतेवर जुलूम झाला तर देसाई, रयत व कारकून यांनीं दरबाराकडे यावें. म्हणजे हुजुरून निकाल होईल. हि. १०३८ रखर ११ हुप. मुस्तफाखानाच्या मध्यस्थीनें.

सु. १०२९,
हि. १०३८ रखर १३ } ५१ { श. १५५० मार्गशीर्ष शुद्ध १४
इ. १६२८ नोव्हेंबर ३०

मुहम्मद आदिलशाह → महींदरी परगण्याचे देसाई

बीरदास शांबा याजकडील उपर्युक्त परगणा किरशनला दिला आहे. त्याचे ताब्यांत द्यावा. सु. १०२९, हि. १०३८ रखर १३ हुप. मुस्तफाखानाच्या मध्यस्थीनें.

हि. १०३९ सफर २८ } ५२ { श. १५५१ आश्विन वद्य ३०
इ. १६२९ आक्टोबर ६

मुहम्मद आदिलशाह → ?

तुम्हांस......याचें दुःख होत आहे. बंडास शिक्षा...तुम्ही खात्री ठेवावी कीं पुन्हा संधी येतांच आमची तुम्हावर कृपा आहे असें समजून गेल्या प्रसंगाच्या भरपाईसाठीं जमेत...पादशाही लश्कर...त्य राज्यहितेच्छूचें कल्याण होईल हि. १०३९ सफर २८. हुप. मुस्तफाखानाच्या मध्यस्थीनें.

सु. १०३८,
हि. १०४८ रवल १७ } ५३ { श. १५६० अ. श्रावण वद्य ३
इ. १६३८ जुलै १९

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा हवालदार मलिक संदल व कारकून.

सध्या उपर्युक्त मामल्यांतील टीप बर्ग जकातीची कमावीस करण्यासाठीं वरील खात्याच्या लोकांना पाठविलें आहे. तरी उपर्युक्त राज्यनिष्ठानें उपर्युक्त मामल्यांतील कसबे, खेडीं, पेठा, बाजार यांतील आगरी व तांबोळी यांस ताकीद करून दर बैल ओझ्यामागें पाव होन, (दर गोरह सालीनह) गाय ओझे पाव होन देत जावे. वसूल नीट होईल असें करावें आणि तो ऐवज पट्टीच्या खाशांच्या तनख्याकडे पावता करावा. आणि मदतीबाबत या खात्याचे लोक जें सांगतील त्याप्रमाणें व्यवस्था करून द्यावी. म्हणजे त्याची राज्यनिष्ठा व्यक्त होईल. सु. १०३८, हि. १०४८ रवल १७. हुप.

सु. १०४०
हि. १०५० जवल २६ } ५४ { श. १५६२ भाद्रपद वद्य १३
इ. १६४० सप्टेंबर ३

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार मलिक सरवर व कारकून

सध्या दरबाराकडे अर्ज झाला कीं, नायकवाडींकडून यावयाच्या नजराण्यासंबंधीची नवाब खानभाई यांची वरात आली असतां तिचा पैसा वसूल करण्याबाबत नायकवाडी व तुम्ही हरकत व दिरंग लावीत आहां. हें केवढें धार्ष्ट्य? नायकवाड्यांनी नजराणा कबूल केला तेव्हांच त्यांस नायकी दिली. आतां नजराण्याचें द्रव्य देण्यास टाळत असतील तर पक्कें समजा कीं, त्यांजकडील नायकी काढून घेऊन जे नजराणा

मान्य करतील त्यांस नायकी दिली जाईल. आतां हें फर्मान पावतांच उपर्युक्त वराती पैकीं बाकी राहिली असेल ती सर्व वसूल करून उपर्युक्त नवाबाच्या मुतालिकांचे हवाला करावी. याबाबत दिरंग झाल्यास परिणाम चांगला होणार नाहीं. जो कोणी यांत हरकत आणील त्यास शिक्षा होईल. नजराण्याची हप्तेबंदी करून सु. १०४१ चा हप्ता पूर्वी हुकूम झाल्याप्रमाणें आदा करावा. सु. १०४०, हि. १०५० वजल २६. हुप.

सु. १०४१ हि. १०५० शाबान १५ } ५५ { श. १५६२ मार्गशीर्ष वद्य १ इ. १६४० नवंबर १९

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा हवालदार मलिक सरवर व कारकून

हुजूरकडून शाह बाबूलयांस शाही पोशाक देऊन सिके हुमायूनपट्टी, कार इमारत, इतर भेट, यांच्या द्रव्याची काळजी घेणें, अंबारखान्याच्या गल्याची वसुली, या भागांतील खजिन्यापैकीं नायकवाडी व इतर मुकद्दम यांजकडील शिलकेचें द्रव्य, सरदेसाई, देसाई नाडगोंडा, देसकुळकर्णी, सरमुकद्दम, पटेल, चौगुले, यांजकडील शेरी द्रव्याची बाकी, मिरासदारांच्या इनामाची व हुज्जतीशिवाय खात असलेल्या इनामाची चौकशी, ऐन दस्त व सीमेचें भांडण, या मामल्यांतील गावांच्या इनामांचे कबाले, या कामांसाठीं पाठविलें आहे. तरी त्यास मदत करून उपर्युक्त बाबींचे पैसे दरबाराकडे पाठवून द्यावे. हुज्जतीशिवाय इनाम खाणाऱ्या मिरासदारांची नीट चौकशी करून व्यवस्था करणार आहे. तुम्हीही याबाबत प्रयत्न करून अशी मदत द्यावी कीं, तुमची निष्ठा व्यक्त होईल. यांजबरोबर दहा प्यादे व दोन कचेरीकडील लोक दिले आहेत. तुम्हा सरकारी अधिकाऱ्यांपैकीं कोणीही निष्ठेमध्यें कसूर केल्यास तुमचे हुद्दे दूर होऊन शिक्षा होईल आणि तुमचेकडे असेल तें सर्व :तुमचेकडून हिसकावून घेण्यात येईल. सु. १०४१, हि. १०५० शाबान १५. हुप.

सु. १०४१, हि. १०५० शव्वाल २२ } ५६ { श. १५६२ माघ वद्य ८ इ. १६४१ जानेवारी २४

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार मलिक सरवर व कारकून

एव्हां दरबारास समजलें कीं, उपर्युक्त मामल्यापैकीं आवर व पाथरवट व दरूदगर व लोहार यांस इमारत खात्याकडून हुजूर बोलाविलें असतां आले नाहींत. काय ही त्यांची दांडगाई ? आतां त्यांस दूर करून दुसरे लोक ठेवावे व काम घ्यावें. खात्याकडून पूर्वीच्या लोकांस चालत होतें तें यांसही चालवावें. यांजकडे चालत असलेल्या गावांवर लक्ष ठेवून त्यांत कोणासही दखल होऊं देऊं नये. सु. १०४१, हि. १०५० शव्वाल २२ हुप. वझीरे हुकूमत अमीनुल्मुल्क याच्या माहितीनें.

सु. १०४१,
हि. १०५० शव्वाल २३ } ५७ { श. १५६२ माघ वद्य ९
इ. १६४१ जानेवारी २५

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार मलिक सरवर व कारकून

सध्या हुकूम होतो कीं, नऊशे म्हशी उत्तम, तरुण, दुभत्या सरकारी थट्टी खात्याच्या लायक, उपर्युक्त मामल्याच्या...मधून सरकारी खर्च करून खरीदाव्या व थट्टी खात्याकडे पाठवून याव्या. हें काम सर्व कामांत जरूरीचें आहे असें समजावें. सु. १०४१, हि. १०५० शव्वाल २३ हुप.

सु. १०४१,
हि. १०५० जिल्काद २ } ५८ { श. १५६२ फाल्गुन शुद्ध ४
इ. १६४१ फेब्रुवारी ३

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार मलिक सरवर व कारकून

उपर्युक्त मामल्यांतील बोरामणी गाव उपर्युक्त मामल्याचा हाकिम शरा काजी हैदर बिन काजी सईद यास कजाची भाकरी म्हणून चालत आहे, आतां दरबारास असें समजलें कीं, उपर्युक्त गावचा कदीम रयत जोलाई आपत्रीमुळें वरील गाव सोडून उपर्युक्त कसब्यामध्यें येऊन राहिला होता. उपर्युक्त गावच्या पटेलानें त्यास परत बोलाविलें. परंतु कसब्याचे सेटे व महाजन त्यास जाऊं देईनात. तरी आतां तसें करूं नये. बोरामणीचे मुकद्दम त्यास आपल्या गावास बोलावतील. त्यास अडथळा करूं नये. सु. १०४१, हि. १०५० जिल्काद २ हुप.

सु. १०४२,
हि. १०५१ शव्वाल २७ } ५९ { श. १५६३ पौष वद्य १४
इ. १६४२ जानेवारी १९

मुहम्मद आदिलशाह → मिया अहमद हसन सआदत हवालदार व कारकून मामले संदलापूर

उपर्युक्त मामल्यातील कसबे, पेठा व गावें यांतील संदे(सनदे ?)वाले. तारे (झे ?) वाले यांजकडील प्रत्येक पखालीस अठरा जितल व प्रत्येक झेल्यास सहा जितल, बोऱ्याविके, सोरोबुक्ती, मुदरिमह, भुक्ती, दरबरह, लोरकीविके, यांजकडून प्रत्येक दुकानास मणभर ज्वारीमागें नऊ जितल, परटांकडील बरार हे [दौलतखान्याकडे सालाबाद भोगोट्याप्रमाणें चालू असणारे लाजिमे अमानत करून जामदारखान्याच्या] खात्याकडे जमा करावे असा हुकूम झाला आहे. [तरी उपर्युक्त लाजिमे अमानत करून] उपर्युक्त खात्याची कमावीस महलदार अलीखान व......खान (यांस त्या कमाविशीची हवालदारी दिली आहे) यांस यावी. उपर्युक्त किल्ला, गावें व कसबे यांशीं संबद्ध शेख सिराज व उपर्युक्त खान हे कमावीस करून तिचा वृत्तांत हुजूरकडे धाडतील. रातिब

खात्याकडे लागणारा सेलबेल मोठ्या गावांतून रांशीनें खरीदी करून रातिब खात्याकडे पाठवून द्यावा. छोट्या गावांस सेलबेलच्या खरीदीची तसवीस लागूं देऊं नये. सु. १०४२, हि. १०५१ शव्वाल २७ हुप.

सु. १०४३, हि. १०५२ रजब २९ — ६० — श. १५६४ कार्तिक शुद्ध १, इ. १६४२ आक्टोबर १४

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा हवालदार मिया अहमद हसन सआदत व कारकून

......तनखा म्हणून मामले मजकूरच्या जकातीपैकीं दोनशे होन दिले आहेत. तरी हें द्रव्य उपर्युक्त खात्याकडे पाठवून द्यावे. सु. १०४३, हि. १०५२ रजब २९ हुप. सध्याचा हवालदार सिद्दी बिलाल यानें फर्मानाचा अमल करावा.

सु. १०४३, हि. १०५३ मोहरम १ — ६१ — श. १५६५ चैत्र शुद्ध ३, इ. १६४३ मार्च १२

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा सर हवालदार मलिक संदल व हवालदार सिद्दी दिलावर व कारकून

दरोबस्त कोठी खातें खासा खात्याच्या तनख्यांत दिले असतां...अडथळा उत्पन्न करून कोठी खात्याकडील नोकरांकडून माराकुटी करून द्रव्य घेतलें याचा अर्थ काय? आतां त्यांजकडून घेतलेलें सर्वच्या सर्व द्रव्य परत करावें. यापुढें पुनः अडथळा करूं नये. फिर्याद आल्यास तुम्हांस जाब द्यावा लागेल. सु.१०४३, हि.१०५३मोहरम १ हुप.

सु. १०४३, हि. १०५३ रखर २४ — ६२ — श. १५६५ आषाढ वद्य ११, इ. १६४३ जुलै १

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा हवालदार सिद्दी बिलाल व कारकून

उपर्युक्त मामल्यापैकीं मंदरूप समतेपैकीं भंडारकवठें कसबा साहिबी साहिबा हिजकडे चालू आहे. त्या गावच्या साप्ताहिक बाजारासाठीं येणारे बक्काल व उदमी यांस सातसाली कौल दिला आहे. त्याप्रमाणें ते उदीम करीत असतां सध्या तुम्ही त्यांजवर जुलूम करून त्यांस पकडून, मार देऊन, जकात व इतर यांबद्दल त्रास देत आहां व त्यांजकडून पैसे घेतले. यामुळें ते बाजारास येत नाहींत व बाजारास नुकसान पोचतें हें तुमचें केवढें धाष्टर्य ? आतां हें फर्मान पावतांच त्यांस दिलासा देऊन त्यांजकडून घेतलेले सर्व पैसे परत करा. कोणताही अडथळा आणूं नका. प्रयत्नपूर्वक बाजार

आबाद करा. जमना खोताचा भाऊ लुमाजी हा जुना मिरासदार आहे. त्याजकडे बाकी आहे ती न देतां खोताच्या आसऱ्यास गेला आहे. त्यास ताकीद करून इतर रयताप्रमाणें शेती व हुद्देदारांच्या सांगीप्रमाणें करील असें करावें. सु. १०४३, हि. १०५३ रखर २४ हुप.

सु. १०४४
हि. १०५३ जिल्काद २९ } ६३ { श. १५६५ फाल्गुन शुद्ध १
इ. १६४४ जानेवारी ३०

मुहम्मद आदिलशाह → शहबाज हवालदार व कारकून मामले संदलापूर

टीप बर्ग जकातीच्या कमाविशीबाबत नवें फर्मान पाठविलें असतांही, कमाल सबब सांगून अजून ठाण्याची मिसेली दिली नाहीं. याचा अर्थ काय ? या जकातीची कार्यवाही तंबाकूप्रमाणें निराळी करून खाशाच्या तनख्याकडे चालू करावयास पाहिजे होती. पण सबब सांगून कमावीस करूं न देणें हें तुमचें केवढें धाष्टर्य ? आतां फर्मान येतांच टीप व पत्रकेणी यांच्या हशिलाच्या कमाविशीबाबत सुचविलें असेल तसें टीप खात्याच्या हरकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणें कमावीस करवून तीपैकीं उरलेला हशील ठाण्याखालच्या तनख्यासाठीं खर्च करून त्यांतून उरलेला हशील टीप खात्याच्या हरकाऱ्यांच्या निसबतीनें पाठवून द्यावा. त्यांत एक जितलाची गडबड करूं नये. यापुढें कोणत्याही सबबीनें उशीर करूं नये. त्या कसब्यांत व प्रदेशांत पटवारी असतील त्यांच्या पुढाऱ्यांना ताकीद करवून टीपेच्या हाशिलाच्या उशीराविषयीं ठरल्याप्रमाणें वसूल करून हरकाऱ्यांस देवावा. याविषयीं पुनः तक्रार येऊं देऊं नये. सु.१०४४ हि.१०५३ जिल्काद २९ हुप. वझीरे हुकूमत इखलासखानाच्या माहितीनें; सीदी मीराननें कायम केलें.

सु. १०४५
हि. १०५४ रमजान १४ } ६४ { श. १५६६ कार्तिक वद्य १
इ. १६४४ नोव्हेंबर ५

मुहम्मद आदिलशाह → अहमद हसन सआदत हवालदार व कारकून मामले संदलापूर

सध्या फर्हादखानाच्या हेजिबानें सांगितलें कीं, ' उपर्युक्त खानाच्या मुकाशापैकीं अंकलकोट परगण्यापैकीं चिंचोली व वळसंग या दोन गांवांच्या सीमेबाबत तंटा लागला आहे. वळसंगकरांनीं चिंचोलीकरांच्या सीमेंत आक्रमण केलें आहे. त्यामुळें चिंचोली गाव खराब झाला आहे. शेती पडली आहे. तें गांव फार दिवसापासून उपर्युक्त खानाकडे मुकासा आहे. आजपर्यंत भांडण झालें नव्हतें. आतां असा तंटा उत्पन्न आला आहे. तरी व्यवस्था व्हावी. त्यास आतांपर्यंत कधींच तंटा झाला नसतां आतांच तंटा उत्पन्न करून वळसंगकरांनीं चिंचोलीच्या सीमेंतच आक्रमण करणें हें केवढें

धाष्टर्य ? आतां फर्मान पावतांच तुम्ही, ठाण्याचे लोक व जवान यांनीं सीमेवर जावें आणि पूर्वपरंपरेप्रमाणें सीमेचा निकाल करावा. जो निराळें कांहीं करील त्यास अशी तंबी द्यावी कीं, इतरांस धडा मिळेल. याबाबत ताकीद जाणून तात्काळ सीमेवर जावें, भांडण तोडावें व वृत्त हुजूरकडे पाठवून द्यावें. क्षणाचाही उशीर करूं नये. सु. १०४५, हि.१०५४ रमजान १४ हुप.

सु. १०४५, हि. १०५४ रमजान २७ } ६५ { श. १५६६ कार्तिक वद्य १४ इ. १६४४ नोव्हेंबर १८

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार मिया अहमद हसन सआदत व कारकून

या मामल्यांतील कसबा, पेठा, बाजार व गांवें यांतील मीट मोला, सोर नमक, दांग मोला हे जिन्नस जामदारखान्याकडील मोकाशी दर्पराव याजकडे जामदारखान्यांतील खास पोशाखासाठीं दिले असून पूर्वीच्या फर्मानाप्रमाणें चालू आहेत. आतां हुकूम होतो कीं, वरील ठिकाणांपैकीं जेथे हे जिन्नस असतील तेथें ते जप्त करून कोणाही घेवाऱ्यास घेऊं न देतां स्वतः खरेदी करून आज्ञाधारक लोकांकडून दोन विभाग करून सुरक्षित ठेवावे... वरातदारांना अडथळा करूं किंवा ताबा घेऊं देऊं नये. सोरा तयार होईल त्याचें वृत्त, मोलेकार व्यापारांना तो पूर्वी कसा विकीत व सध्याचा भाव काय आहे तें तपशील वार लिहून दरबाराकडे पाठवावें. पुढें हुकूम होईल त्याप्रमाणें वागावें. जकात व इतर पट्टयांचा वसूल मोकाशांकडून दर करून सोरा खात्याच्या मुतालिकांकडे दिला आहे. त्यांनीं कमावीस करून वसूल हुजुराकडे पाठवून द्यावा. किंचितही उशीर करूं नये. उशिराचा चांगला परिणाम होणार नाहीं. सु. १०४५, हि. १०५४ रमजान २७. हुप.

सु. १०४६, हि. १०५५ रमजान १५ } ६६ { श. १५६७ कार्तिक वद्य २ इ. १६४५ ऑक्टोबर २६

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार सय्यिद अश्रफ व कारकून

या मामल्याच्या ठाण्याचे आवरगौंडे, मोपकार व पाथरवट यांनीं दरबारास विनंति केली कीं, आमच्या खास हाताखालीं दोन सरगवंडे, आठ गवंडे, तीन मोपकार, एक पाथरवट चालू आहेत. ते नावनिशीवर नेमून द्यावे. त्यासाठीं आम्ही पंचवीस होन देऊं. विनंतीप्रमाणें कोंडीगौंडा बिन सिद्रामगौंडा व हलीगौंडा बिन नागणगौंडा असे दोन सरगवंडे, सिदनगौंडा बिन रेवणगौंडा, हनवंतगौंडा बिन अक्कनगौंडा, कोतीगौंड बिन रामनगौंडा, तिक्कनगौंडा बिन अम्मनगौंडा, वेंकटगौंडा बिन मंतणगौंडा, तुलजगौंडा बिन कोतगौंडा, जक्कणगौंडा बिन शिवगौंडा, असे सात गवंडे, भरमाजीगौंडा बिन रेवण-

गौंडा, नारोजीगौंडा बिन चौंडोजीगौंडा संताजीगौंडा बिन सेनगौंडा असे तीन मोपकार व सिदूजी जानजी हा पाथरवट असे मुकरर केले आहेत. ते पक्के आहेत असें समजून मार्डी समतेमधील आवळें, खेडें व मालिसगाव यांचा वसूल व इतर त्यांच्या स्वाधीन करावें. नजरेचे पंचवीस होन हुजूरच्या इमारतखात्याकडे मोपसाठीं दिले आहेत. या खात्याचा सरखोत म्हणून त्यास मान्यता दिली आहे. सु. १०४६, हि. १०५५. रमजान १५ हु. प. सध्याचा हवालदार हसन रूमीखान यानें याप्रमाणें आचार करावा.

सु. १०४६, हि. १०५५ जिल्काद २९ } ६७ { श. १५६७ माघ शुद्ध १ इ. १६४६ जानेवारी ७

मुहम्मद आदिलशाह → मुद्दाम नेमलेला हवालदार हसन रूमीखान महलदार व कारकून मामले संदलापूर.

टीप व पत्रकेणी यांच्या कमाविशीबाबत नवीन पक्कें फर्मान झालें आहे कीं, यांच्या हाशिलापैकीं निम्मा खासा पट्टीकडे दिल्याचें जाणून टीप खात्यांतील लोकांच्या सूचनेप्रमाणें कमावीस करून त्या लोकांच्या मध्यस्थीनें उपर्युक्त खात्याकडे पाठवून द्यावा. आतां पुन्हां समजलें कीं पत्रकेणीचा इजारा दिला असतां त्याचा निम्मा भाग टीप खात्याकडे अजून गेला नाहीं व तऱ्हतऱ्हेच्या सबबी सांगून अडथळा केला आहे. हे काय ठीक आहे ? आतां हें फर्मान पोहोंचतांच या कसब्याच्या पत्रकेणीचा खोत व बाजारांतील व खेड्यांतील तांबोळी व मोकाशी यांस ताकीद करून पत्रकेणीचा जो इजारा झाला आहे त्यांत कोणताही फेरबदल न करतां त्यांतील निम्मा खासापट्टीच्या तनख्यासाठीं आहे हें जाणून तो अर्धा पैसा टीप खात्याच्या लोकांकरवी पाठवून द्यावा. हाशिलाचे पैसे ठाण्याकडे दिले असल्यास ते अयोग्य आहे हें समजून ते इकडे तात्काळ पाठवून द्यावे. याबाबत ताकीद जाणावी. टीप खात्याकडील लोक ही कमावीस करण्याविषयीं जें सुचवितील तें नीट लक्षांत घ्यावें व त्यास मान देऊन आणि ठाण्याचे प्यादे कमाविशीच्या साह्यासाठीं देऊन त्वरेनें वसुलाची व्यवस्था करावी. यापुढें तक्रार येऊं देऊं नये. हुकुमाप्रमाणें अमल करावा. सु. १०४६, हि. १०५५ जिल्काद २९ हु. प.

सु. १०४६ हि. १०५६ सफर... } ६८ { श. १५६८ चैत्र इ. १६४६ मार्च

मुहम्मद आदिलशाह→ मुद्दाम नेमलेला हवालदार हसन रूमीखान महलदार व कारकून मामले संदलापूर.

यावेळीं हुकूम झाला आहे कीं, या मामल्याची दीवाणी, शिक्कापट्टी, वास्तुपट्टी, भेटपट्टी, या बाबतीतील ठाणा व खासा शरीफा यांच्या तनख्याशिवाय करून राहिलेली बाकी चाकरीकडील माणसांकडे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष चालू होती ती दूर करून खजिन्याकडे

अमानत केली आहे. ती रक्कम खजिन्याच्या तनख्याकडे आहे असें जाणून कोणतीही सबब न सांगतां खजिन्याच्या खात्याकडे त्वरेनें पाठवून द्यावी. या गावांत सादिलवार जमा करूं नये. या विरुद्ध एक जितल सादिलवार जमा झाला आणि मोकाशांनीं तक्रार केली तर ती रक्कम तुमच्याकडून वसूल केली जाईल आणि परिणाम चांगला होणार नाहीं. एक जितलही सादिलवार म्हणून जमा करूं नये. सु. १०४६ हि. १०५६ सफर...हु. प.

सु. १०४७, हि. १०५६ रवल ३० — ६९ — श. १५६८ ज्येष्ठ शुद्ध ३ इ. १६४६ मे ७

क्र. ६७ प्रमाणें प्रेषक ग्राहक

यावेळीं गोंदजी बिन नरसोजी आणि डोंगरोजीचे मुलगे पद्मोजी व तिमाजी, जामदारखाना खात्याकडील चोंडीगर व उपर्युक्त मामल्यांतील संगदरी गावच्या मोकाशांचे चाकर यांनीं दरबाराकडे अर्ज केला कीं, 'हा गाव फार दिवसांपासून संपूर्ण खराब झाला आहे, शेती पडली आहे. पहिल्यापासून दिवाणबाबींची पट्टी या गांवावर नाहीं. पण ठाण्याकडून या बाबीविषयीं या गावास कमाल त्रास होत आहे. हा गाव आम्हांला मिळाल्यानंतर हजार खटपटी करून रयतेला कौल देऊन गावाचा पाया घातला व दिवेलावणी सुरू केली आहे. ठाण्याच्या दहशतीमुळें रयत गावांत न राहतां परागंदा होत आहे. विचार व्हावा.' या गावावर दिवाणीबाबीची पट्टी घेऊं नये असें ठरलें असतां त्याच बाबीविषयीं गांवाला त्रास देणें हा कोण अर्थ. आतां हा गाव मोकाशाकडे दिला आहे आणि तसें समजून त्यास कोणताहि त्रास देऊं नये. ठाण्याच्या लोकांना गावावर पाठवूं नये. उलट रयतेला कौल व दिलासा द्यावा. या बाबत ताकीद जाणावी. फिर्यादीवर येऊं नये. सु. १०४७, हि. १०५६ रवल ३० हु. प.

सु. १०४७, हि. १०५७ रखर २३ — ७० — श. १५६९ वैशाख वद्य १० इ. १६४७ मे १९

क्र. ६७ प्रमाणें प्रेषक ग्राहक

इमारत खात्याकडील बेगारी म्हणून गावगन्नाकडून यावयाची रक्कम ३४८ होन चालू आहेत. पण अजून ती रक्कम वसूल करून इमारत खात्याकडे पाठविली नाहीं याचा अर्थ काय? आतां वरील रक्कम कोणतीही सबब न सांगतां किंवा उशीर न करतां सर्वच्या सर्व वसूल करून वरील खात्याकडे पाठवून द्यावी, असें फर्मान धाडलें आहे. तरी तें पावतांच रक्कम वसूल करून त्याच क्षणीं वरील खात्याकडे धाडून द्यावी. म्हणजे इमारतीचे... ? हें काम अत्यंत जरूरीचें आहे. उशीर करूं नये. याप्रमाणें न केल्यास घोर परिणाम होईल. याबाबत पुन्हा तक्रार येऊं देऊं नये. सु. १०४७, हि. १०५७ रखर २३. हु. प.

सु. १०४८,
हि. १०५७ जवल १ } ७१ { श. १५६९ ज्येष्ठ शुद्ध ३
इ. १६४७ मे २६

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा मुद्दाम नेमलेला हवालदार व हुजूरचा महलदार हसन रूमीखान व कारकून.

हिंदूंच्या बाबतींतील गणाचारीचा अमल तहकूब (लिंगदार) झाला आहे तो (कायमचा) दूर करून, उपर्युक्त मामल्यांतील कसबे, खेडी, पेठा व बाजार यांतील तहकुवी मिळालेल्या (लिंगदार) हिंदूकडून सालीना पहिल्या प्रतीच्या घरास पाव होन चवल, दुसऱ्या प्रतीच्या घरास पाव होन, तिसऱ्या प्रतीच्या घरास तीन दुवल आणि चवथ्या प्रतीच्या घरास चवल एवढा खानाखूशी हा कर मुकरर केला आहे. तो वसूल करावा. तो जामदारखाना खात्याखालील खाशांच्या पोशाखासाठीं दिला आहे. तो जवळच्या व दूरच्या अशा सर्व तहकुबी मिळालेल्या हिन्दूकडून वसूल करून जामदारखान्याच्या खात्याकडे पाठवून द्यावा. सु. १०४८, हि. १०५७ जवल १. हुप. .

सु. १०४८,
हि. १०५८ रखर १२ } ७२ { श. १५७० वैशाख शुद्ध १४
इ. १६४८ एप्रिल २६

मुहम्मद आदिलशाह → हुजूरचा महलदार व मुद्दाम संदलापूरवर नेमलेला हवालदार व कारकून

उपर्युक्त मामल्यातील ऊर (अदर?) हा मुहम्मद याकूतखानाकडील गाव हसनखान मियाना यास दिला आहे. चालवावा. सु. १०४८, हि. १०५८ रखर १२. हु.प.

सु. १०४९,
हि. १०५८ शव्वाल १७ } ७३ { श. १५७० कार्तिक वद्य ३
इ. १६४८ ऑक्टोबर २४

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्यावरील नामजाद हवालदार हसनरूमीखान महलदार व कारकून

गल्ला, वीदल, तूप, तेल, साखर, कंद, कंजारा यांशीं संबद्ध उभ्या मार्गाची जकात, मजकूरी, थलमोड, थलभरीत, निकाळू, पैसारू, ठाणेदारी, विस्वा, लवाजिमेदार, मीठ (मेट) मार्ग, दरवाजे, लाभदाणा, कोरटें, आवट मापारी, पसकी या पट्टया व इतर माफ करून यलसेटीस पाठविलें आहे. त्यानें माफीनें उत्साहीत होऊन छोट्यामोठ्या व्यापाऱ्यांचें समाधान करून हरतऱ्हेचें धान्य दरबाराकडे पाठवून द्यावें. धान्य व इतर जिन्नस यांचा भाव उतरवून राज्यनिष्ठा जाहीर व्हावी. आतां हें फर्मान पावतांच उपर्युक्त सेटीबरोबर दहा शिपाई द्यावे. धान्य रवाना होईपर्यंत त्यांचा खर्च प्रतिमास पाठविला जाईल. म्हणजे सेटी मेहनत करील. हर एक बाबींत त्यास साह्य

करावें. त्यास जकात व इतर बाबी माफ आहेत हें लक्षांत घेऊन क्षुद्र व्यापारी, आरंदकार व उदमी यांजकडून कांहीं घेऊं नये व कोणतेहि अडथळे आणूं नयेत. हुद्देदार, जागीरदार व मोकाशी यांनींहि कांहीं घेऊं नये म्हणून ताकीद करावी. उपर्युक्त व्यापाऱ्यांनीं वर दिलेले जिन्नस मुहम्मदपुरास आणावे. वरील बाबींत त्यांना त्रास पोचेल, गोण्या येण्यास अडचण येईल आणि ते तक्रार करतील तर त्याची चौकशी होईल. सु. १०४९, हि १०५८ शव्वाल १७. हु. प.

सु. १०४९, हि. १०५९ शाबान ५ } ७४ { श. १५७१ श्रावण शुद्ध ७ इ. १६४९ ऑगस्ट ४

मुहम्मद आदिलशाह→संदलापूर मामल्याचा हवालदार मुहम्मद कासिम व कारकून.

या वेळीं काजी हैदर बिन काजी सईद यानें दरबारास विनंति केली कीं, 'या मामल्यांतील बोरामणी हा गाव सर्व बाबींसह काजीपणाच्या निर्वाहासाठीं इनाम दिला होता व तसा तो चालू असतां या मामल्याच्या ठाण्यानें प्यादे व स्वार पाठविले. त्यांनीं हरएक बाबीविषयीं अडथळा उत्पन्न करून या गावच्या रयतेस धरून ठाण्यावर नेलें. त्यांस त्रास देऊन त्यांजकडून एकशें होन घेतले व ते इतर त्रास देतात. व्यवस्था व्हावी.' हें गाव वरीलप्रमाणें इनाम असतां उपर्युक्त त्रास देणें हें केवढें धार्ष्ट्य ? आतां हें फर्मान पावतांच रयतेकडून जें घेतलें असेल तें तात्काल परत द्यावें व रयतेस सोडून द्यावें. इथून पुढें असा अगाऊपणा करूं नये. तो गाव निर्दिष्ट बाबींसह काजीच्या ताब्यांत द्यावा. त्यास कोणताही त्रास देऊं नये. ठाण्याहून स्वार प्यादे पाठवूं नयेत. काजीपणा चालविण्यासाठीं काजीनें सय्यिद मुहम्मदला पाठविलें आहे. त्याजकडून काजीचें काम त्याबाबतच्या कायद्याप्रमाणें करून घ्यावें. त्याची प्रतिष्ठा राखावी. ताकीद जाणावी. सु. १०४९, हि. १०५९ शाबान ५. हु. प.

सु. १०५०, हि. १०६० मोहरम २१ } ७५ { श. १५७१ पौष वद्य ७ इ. १६५० जानेवारी १४

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्याचा हवालदार मुहम्मद कासिम व कारकून.

जानो नागोजी याच्या मुशाहिऱ्याबद्दल या मामल्यांतील गावांच्या वारकऱ्यांवर दिलेल्या (वराती) पैकीं उरलेले पंधरा होन या सालासाठीं दिले आहेत. आदा करावे. प्रतिवर्षीं फर्मानाची सबब सांगूं नये. सु. १०५०, हि. १०६० मोहरम २१. हु. प. सध्याचा हवालदार सय्यिद अश्रफ यानें याप्रमाणें असल करावा.

सु. १०५०, हि. १०६० जवल १९ } ७६ { श. १५७२ वैशाख वद्य ६ इ. १६५० मे ११

मुहम्मद आदिलशाह→संदलापूर मामल्याचा हवालदार सय्यिद अश्रफ व कारकून.

कारखान्यांचे सबनीस, चिटणीस व कारकून तसेंच पारसनीस, हरकारे, भरणेवाले, खोत, नायकवाडी, सरगिरोह, लश्करी, इतर लोक, हुद्देदार, कसब्याचे लेखक, गावोगावचे पटेल व रयत यांशीं संबद्ध हिशेबी खात्याकडील बाकी, तुहफा, कबुलात, पेशकशी, खिदमती, खजिन्याचा तनखा, खाशाचा रातिब, अंबारखान्यांतील धान्यावरील कर्ज व सामग्रीसंग्रह, खरीदीची बाकी, पोत्याचा (खजिन्याचा) मोबदला ...ठाण्याखालील गावें व विलायत यांतील इतर बाबी, जवळचे व लांबचे नौकर (यांचा पैसा), दिवाण बाबींचे पैसे, पेशकशी, खिदमती, सादिलवाराचा पैसा इत्यादि बाबी सालोसाल वसूल न होतां चाललें आहे. आतां हुकुम होतो कीं, विलायतेंतील लोकांची सु. १०४९ पर्यंतची उपर्युक्त बाबींविषयी जी बाकी ओढली आहे ती, ते लोक व ते जिवंत नसल्यास त्यांचे वारस यांवर त्यांची स्थिति पाहून एक ते पाच वर्षांत देण्याचा ठराव करून वसूल करावी. नगद दरबाराकडे पाठवावी. आणि धान्य व इतर जिन्नस अंबारखाना खात्याकडे पाठवावे. ज्या गयाळांकडून वसूल होणें अशक्य आहे त्यांची नीट चौकशी करून त्यांस दरबाराकडे पाठवून द्यावे. अडथळा करतील त्यांस तंबी द्यावी. सबब सांगूं किंवा उशीर करूं नये. गेल्या सालपर्यंतची हकीकत हवालदाराच्या शिक्क्यासह तपशीलवार लिहून पाठवावी. हिशेबाचे सु. १०४९ पर्यंतचे कागद तपशीलासह जुन्या यारदीसह हिशेबी खात्याकडे पाठवावे. सु. १०५०, हि. १०६० जवल १९. हु. प.

सु. १०५१, हि. १०६१ जवल ४ } ७७ { श. १५७३ वैशाख शुद्ध ५ इ. १६५१ एप्रिल १५

मुहम्मद आदिलशाह→ हुजूरचा मजलिसी व संदलापूर मामल्यावर मुद्दाम नेमलेला हवालदार मीर्झा युसुफखान व कारकून.

मौजे कळभीड समत मारडी हा गाव सर्व बाबींसह मोकासा म्हणून इमारत-खात्याकडील अफराद रंगणगौडा बिन तमणगोंडा याजकडे चालू होतें. आतां दरबारास समजतें कीं ' तें गांव हरकत उत्पन्न करून अजून त्याला दिलें नाही. तें गाव फर्मानानें मुकासा म्हणून त्यास दिलें असतां ठाण्याकडून त्यास दिलें नाहीं हें काय धाष्टर्य ? आतां हें फर्मान पावतांच तें गांव त्याजकडे द्यावें व आणखी असें समजलें कीं त्या गावच्या पटेलाचीं गुरेंढोरें ठाण्यांत नेलीं आहेत. यामुळें पटेल गाव सोडून गेला आणि गाव खराब होत आहे. तेव्हां आतां ठाण्यानें प्रयत्न करून पटेलाला आश्वासन देऊन त्याचीं गुरेंढोरें परत करावीं. या बाबत ताकीद जाणावी. फर्मानाप्रमाणें अमल करावा. सु. १०५१, हि. १०६१ जवल ४. हु. प.

सु. १०५१, हि. १०६१ रमजान १० } ७८ { श. १५७३ भाद्रपद शुद्ध ११ इ. १६५१ ऑगस्ट १७

मुहम्मद आदिलशाह → हुजूरचा मजलिसी व मुद्दाम नेमलेला हवालदार मीर्झा यूसुफखान व कारकून मामले संदलापूर.

सध्या आम्हाला लढाऊ लोह्यांची अतिशय आवश्यकता आहे. तरी हुकूम होतो कीं 'त्या मामल्यांतील चांगले लढाऊ लोहे मिळाले तर ते किंवा कोणीं पाळीत असेल ते घेऊन तात्काळ इकडे पाठवून द्यावे. पुष्कळ लोह्यांच्या शोधासाठीं माणसें पाठवूं नये व जे कांहीं लोहे मिळतील ते ताबडतोब दरबाराकडे पाठवून द्यावे. म्हणजे त्यांची निष्ठा प्रगट होईल. याबाबत ताकीद जाणून आचरण करावें. सु. १०५१, हि. १०६१ रमजान १०. हु. प.

सु. १०५१, हि. १०६१ शव्वाल ८ } ७९ { श. १५७३ आश्विन शुद्ध १० इ. १६५१ सप्टेंबर १४

मुहम्मद आदिलशाह→ मीर्झा यूसुफखान हवालदार व कारकून मामले संदलापूर.

सध्या हुकूम झाला कीं, ' सरकारस्वारीसाठीं बैलांची जरूरी आहे. तरी फर्मान पोहोंचताच २५ बैल इमारत खात्याकडे पाठवावे. या बाबतींत क्षणाचाही विलंब करूं नये. ताकीद जाणावी. सु. १०५१, हि. १०६१ शव्वाल ८. हु. प.

सु. १०५२, हि. १०६२ रवल ९ } ८० { श. १५७३ फाल्गुन शुद्ध १० इ. १६५२ फेब्रुवारी ९

मुहम्मद आदिलशाह →मजलिसी व मामले संदलापूरवर मुद्दाम नेमलेला हवालदार मिर्झा यूसुफखान व कारकून.

या वेळीं हुकूम झाला कीं, ' सरकार कामाच्या दुधाळ, जवान व माहूरी १८ म्हशी फर्मानांत सांगितलेल्या बाबींच्या पैशांतून विकत घ्याव्या व सरकारी थटीकडे पाठवाव्या. या बाबतींत उशीर करूं नये. उशीर केल्यास त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. ताकीद समजावी. सु. १०५२, हि १०६२ रवल ९. हु. प.

सु. १०५३, हि. १०६२ जिल्हेज १९ } ८१ { श. १५७४ कार्तिक वद्य ६ इ. १६५२ नोव्हेंबर ११

मुहम्मद आदिलशाह → मुहम्मदखान हवालदार व कारकून मामले संदलापूर

या वेळीं हुकूम झाला कीं, 'उपर्युक्त मामल्यांतील दिवाणी बाबीविषयीचे पैसे घेऊन (खाशाकडील रतिबाचा तनखा सोडून) व ठिकठिकाणीं तपास करून सरकारकामाचे हरीण, बोकड, लढाऊ (जंगी) आणि शूर लोहे आणि दुधाळ माहुरी म्हशी जेथे मिळतील

तेथें खरेदी करून दरबाराकडे पाठवून याव्या. या बाबत ताकीद जाणावी. सु. १०५३, हि. १०६२ जिल्हेज १९. हु. प.

सु. १०५३,
हि. १०६३ सफर २४

८२

श. १५७४ पौष वद्य ११
इ. १६५३ जानेवारी १५

मुहम्मद आदिलशाह→संदलापूर मामल्याचा हवालदार मुहम्मदखान व कारकून.

बसाली महालातील गांवें, पेठा व कसबा यांशीं संबद्ध अशा सावळशी व परवळशी यांच्या वारकऱ्यांच्या नफ्याचा बारा महिन्याचा पैसा म्हणून वारकऱ्यांना जें कांहीं येईल त्यापैकीं एक महिन्याचा पैसा काढून घेऊन खाशा लोकांच्या तनख्याकडे दिला होता आणि या बाबत त्या महालांना फर्मानही दिला होता. आतां मंद्रूप व मार्डी तसेंच कसबा व वजिरांकडे असलेली गांवें व ठाणें यांजकडील पन्नास होन याच नोकरांच्या तनख्याकडे मुकरर केले आहेत. तरी जवळच्या व दूरच्या लोकांच्या सबबी न ऐकतां ही व्यवस्था चालू राहील असें करावें. ठाण्याकडून कमावीस करून त्याची रसद रातिब खात्याकडे पाठवून द्यावी आणि या पैशाबाबत कांहीं अधिक वसूल झाला तर तोही रातिब खात्याकडे पाठवावा. वारकऱ्यांशी संबद्ध अशी रिकाबांतील मनुष्यें व ठाणें यांच्या तनख्याविषयीं जें कांहीं असेल तें आम्ही दूर करीत आहों. दूर केलें आहे असें समजावें. ठाण्याखालील वारकऱ्यांचा ऐवज गैरमहसूल, पैदागिरी, सादिक व शेरणी या रूपानें दिला आहे आदा करावे. ताकीद जाणावी. अमल करावा. सु. १०५३, हि. १०६३ सफर २४. हु. प.

सु. १०५३,
हि. १०६३ जवल ४

८३

श. १५७५ चैत्र शुद्ध ६
इ. १६५३ मार्च २४

मुहम्मद आदिलशाह → मुहम्मद बिन पीरमहम्मद जावितखान हवालदार व कारकून मामले सोलापूर

हुजूरच्या इमारत खात्याकडील २५ गाई चरण्यासाठीं वपाळण्यासाठीं उपर्युक्त मामल्याकडे पाठविल्या आहेत. ज्या गांवांत पाणी व वैरण भरपूर असेल त्या ठिकाणीं त्यांना ठेवावें व त्या चांगल्या पोसल्या जातील असें करावें. जेव्हां आम्ही त्या खात्याकडून परत बोलावू तेव्हां त्या ताबडतोब परत कराव्या. गाईंच्या जोपासनेबाबत हेळसांड करूं नये. सु. १०५३, हि. १०६३ जवल ४. हु. प.

सु. १०५४, हि. १०६४ मोहरम १९	८४	श. १५७५ मार्गशीर्ष वद्य ६ इ. १६५३ नोव्हेंबर ३०

मुहम्मद आदिलशाह→ संदलापूर मामल्याचा हवालदार मुहम्मदखान व कारकून

सोरा व अटक नमक मोला व शोर नमक मोला या खात्याच्या बाबी जवळचे व लांबचे लोक व वजिरांचा मुकासा व ठाण्याचा तनखा यांजकडून दूर करून खाशाच्या वस्त्रागाराच्या तनख्यासाठीं नियुक्त केल्या आहेत. सु. १०५४, हि. १०६४ मोहरम १९. हु. प. सरखैले ममालिक सय्यिद नुरुल्लाह याच्या माहितीनें.

सु. १०५४, हि. १०६४ रजब २२	८५	श. १५७६ ज्येष्ठ वद्य ८ इ. १६५४ मे २९

मुहम्मद आदिलशाह→मामले संदलापूर मामल्यावर मुद्दाम नेमलेला हवालदार व हुजूरचा महलदार हसन रूमीखान व कारकून.

या वेळीं दरबारास समजलें कीं, आमच्या नावाचा शिक्का असलेले मुहम्मदशाही होन उपर्युक्त मामल्यांतील कसबे, पेठा व गावें यांतील सराफ, व्यापारी, रयत व इतर हातांत धरत नाहींत, खुर्दा देत नाहींत व खरेदीविक्रींत चालू करीत नाहींत. उपर्युक्त होनावर आमचा शिक्का मारला असतां तो चालू न करणें हें केवढें धाष्टर्य आहे ? आतां हुकूम होतो कीं, मुहम्मदशाही होन त्रेचाळीस कशी सोन्याचा असून त्यास खोटा म्हणेल किंवा त्यास अपूर्ण करून स्वीकारणार नाहीं किंवा खुर्दा देण्यास दिरंग करील त्यास तंबी देऊन त्याचें घर, जमीन व वस्तवानी सरकारजमा करावी. आणि असें करावें कीं, इतरांना उदाहरण होईल. असें करण्यांत दिरंग झाला किंवा याविरुद्ध आचरण केलें तर खात्री असू द्या कीं, याचा परिणाम ठीक होणार नाहीं. ४३ कसापेक्षां कमी असणारा होन हुजूरच्या टांकसाळींत पाठवून द्यावा. तो तेथें वितळवून खरा करून दिला जाईल. फर्मानाप्रमाणें अमल करावा. याबाबत सुस्ती घडल्यास बादशाही रोष होईल. सु. १०५४, हि. १०६४ रजब २२. हु. प. सरखैले ममालिक सय्यिद नूरुल्लाह याच्या माहितीनें.

सु. १०५६, हि. १०६६ रमजान २२	८६	श. १५७८ आषाढ वद्य ८ इ. १६५६ जुलै ५

मुहम्मद आदिलशाह → संदलापूर मामल्यावर मुद्दाम नेमलेला हवालदार व हुजूरचा महलदार हसन रूमीखान व कारकून

मिया ताज मुहम्मद याजकडील उपर्युक्त मामल्यांतील बोरामणी गाव (तंबाखू व पानजकातीची टीप या शिवाय) शाह मुहम्मद जाफर यास दिलें आहे. चालवावें. सु. १०५७, हि. १०६६ रमजान २२. हु. प.

सु. १०५८,
हि. १०६८ रखर ४

८७

श. १५७९ पौष शुद्ध ६
इ. १६५७ डिसेंबर ३०

दुसरा अली आदिलशाह → संदलापूर मामल्यावर खास नेमलेला हवालदार व हुजूरचा महलदार मुहम्मद रुमीखान व कारकून.

उपर्युक्त मामल्यातील एरावारी (अहिरवाडी) समतेपैकीं ३२ खेडीं पूर्वी मलिक रैहानकडें चालू असतां तीं पीरखान याजकडे तंबाखू व पान यांच्या जकाती खेरीज करून मुकासा म्हणून दिलीं आहेत. ती त्याच्या ताब्यांत द्यावीं. सु. १०५८ हि. १०६८ रखर ४. हु. प.

सु. १०५८,
हि. १०६८ जखर २९

८८

श. १५८० चैत्र शुद्ध १
इ. १६५८ मार्च २४

दुसरा अली आदिलशाह → संदलापूर मामल्यावर मुद्दाम नेमलेला व हुजूरचा महलदार मुहम्मद रुमीखान व कारकून

उपर्युक्त मामल्यातील मंदरूप समतेपैकीं अब्दुल अली याजकडे चालणारीं ३६ गावें मामले करंजवड कडबचूर व रनाळा यांच्या ऐवजीं अअतबारखान यास दिलीं आहेत. द्यावीं. सु. १०५८, हि १०६८ जखर २९. हु. प.

सु. १०५९,
हि. १०६९ जिल्हेज २

८९

श. १५८१ भाद्रपद शुद्ध ३
इ. १६५९ ऑगस्ट ११

दुसरा अली आदिलशाह→ सरे सरनौबत व सर हवालदार शहनवाजखान आणि हुजूरचा महलदार व मुद्दाम नेमलेला हवालदार रूमीखान व कारकून मामले संदलापूर.

उपर्युक्त मामल्यांतील कारखान्यांच्या तनख्याच्या मुकाशाकरितां म्हणून दिलेला आवर हा गाव निगाह आणि मामूरी यांसाठीं मिंजले शाह याजकडे तंबाकू आणि पान यांच्या जकातीशिवाय इतर बाबींसह दिला आहे, तो त्याच्या मुतालिकांच्या ताब्यांत द्यावा व निगाह आणि मामूरी या बाबत तो शाह जें लिहील त्याप्रमाणें करीत जावें. सु. १०५९, हि. १०६९ जिल्हेज. २. हु. प.

सु. १०६०,
हि. १०७० जवल ८

९०

श. १५८१ माघ शुद्ध १०
इ. १६६० जानेवारी ११

दुसरा अली आदिलशाह → संदलापूर मामल्यावर मुद्दाम नेमलेला हवालदार व हुजूरचा महलदार मुहम्मद रूमीखान व कारकून

फर्हादखान बहादुराच्या बाबत उपर्युक्त मामल्यांतील वळसंग हें गांव त्याजकडून काढून रिजवीखान याजकडे तंबाखू व पानें यांजवरील कर सोडून बाकी सर्व बाबींसह दिलें आहे. सु १०६०, हि. १०७० जवल ८. हु. प.

सु. १०६०,
हि. १०७० शव्वाल ४ } ९१ { श. १५८२ ज्येष्ठ शुद्ध ५
इ. १६६० जून ३

दुसरा अली आदिलशाह → संदलापूर मामल्याचा हवालदार अफजलखान.

सीदी जौहर याच्या हेजिबानें अर्ज केला कीं, उपर्युक्त मामल्यांतील अहीरवाडी समत उपर्युक्त सीदी जौहरकडे मुकासा चालू आहे. परंतु सीदी अली सीदी सुबह याचे मुतालीक त्रास देऊन उपर्युक्त समत उपर्युक्त सीदीच्या ताब्यांत जाऊं देत नाहींत. असें त्यांनीं कां करावें ? आतां तात्काल सीदीच्या लोकांस ताकीद करून व त्यांस समतेंतून बाहेर काढून ती समत सीदी जौहरच्या मुतालिकांच्या ताब्यांत द्यावी. त्या समतेंतून उत्तरोक्त सीदीच्या लोकांनीं घेतलें असेल तें सर्वच्या सर्व पूर्वोक्तास परत द्यावें. सु. १०६०, हि. १०७० शव्वाल ४. हु. प.

सु. १०६०,
हि. १०७० शव्वाल १५ } ९२ { श. १५८२ ज्येष्ठ वद्य १
इ. १६६० जून १४

दुसरा अली आदिलशाह→संदलापूर मामल्याचा हवालदार अफजलखान व कारकून.

उपर्युक्त मामल्याची बखैर लिहिण्यासाठीं उमूरे मुल्की खात्यापैकीं बनाजी तिमाजी हेजीब हा हुजरून पूर्वीच्या फर्मानाप्रमाणें मुद्दाम नेमला आहे. सध्या दरबारास समजलें कीं, उपर्युक्त खात्यांतील हेजीब शेषो नारायण यानें फर्मान मिळविलें व तो उपर्युक्त मामल्यांत आला आहे. तरी हुकूम होतो कीं, शेषो नारायण यास दूर करून बनाजी तिमाजी यास कायम केलें आहे. त्यासच पक्का समजून त्याजकडून नेहमीप्रमाणें बखैर व अहवाल लिहून घेऊन दरबाराकडे पाठवीत जावा. आणि शेषो नारायण यास कैद करून हुजूर पाठवून द्यावें. माजी हेजीबाचे बाबतींतील तनखा, हवालगीर व घर अजून बनाजी तिमाजीच्या ताब्यांत दिलेलें नाहीं याचा अर्थ काय? आतां उपर्युक्त गोष्टी तात्काल त्याच्या ताब्यांत द्याव्या. सु. १०६०, हि. १०७० शव्वाल १५. हु. प. शाह अबुलहसनच्या माहितीनें.

सु. १०६२,
हि. १०७२ रवल १९ } ९३ { श. १५८२ कार्तिक वद्य ६
इ. १६६१ नवंबर २

दुसरा अली आदिलशाह → संदलापूर मामल्यावर मुद्दाम नेमलेला हवालदार व हुजूरचा महलदार मुहम्मद रूमीखान व कारकून.

या वेळीं वसुली दप्तराचा यार्दी भिमाजी विठ्ठल यानें दरबारास विनंति केली कीं, उपर्युक्त कसब्याच्या वाडींतील जमीन फर्मानाप्रमाणें माझ्याकडे चालू आहे. परंतु ठाण्यांतून तिच्या वसुलीबाबत इमारत खात्याची मागणी व कोट बांधणें यांच्या नांवा-

१००

दुसरा इब्राहीम आदिलशाह (?)→ गुरुसिदा

सध्या आमच्या कानांवर आलें कीं, तुझी ह्या राज्याची शुभ चिंतण्याची इच्छा आहे. म्हणून या फर्मानाच्या योगानें आम्ही तुझा उत्कर्ष करतों. स्वतःचें मन सर्व-प्रकारें शांत ठेवून स्ववःचे स्वार (?) घेऊन दरबारात यावें. म्हणजे योग्यता, जमेत व तयारी पाहून त्याप्रमाणें उत्कर्ष करूं. दरबाराकडे येण्याबावत कोणताही उशीर करूं नये......हुजूरच्या परवानगीनें.

सु. १०१७, हि. १०२६ जिल्काद ८ — १०१ — श. १५३९ कार्तिक शुद्ध ९, इ. १६१७ आक्टोबर २८

दुसरा इब्राहीम आदिलशाह → आलमेले परगण्याचे अधिकारी व नाडगीर. उपर्युक्त परगण्याचा देसाई गुरुसिदा यानें दरबारास विनंति केली कीं, उपर्युक्त परगण्याची देसायकी आणि उपर्युक्त कसब्याची पटेलगी व पट्टणसेटी माझी मिरास असतां हरामखोरानें सध्या तीं चनमलास दिली आहे. ती कृपेनें मला मिळावी. तरी उपर्युक्त देसायकी, पटेलगी व पटणसेटी हीं कामें चनमलाकडून काढून गुरुसिदा याजकडे पूर्वीप्रमाणें कायम केलीं आहेत. कायद्याप्रमाणें त्याजकडे चालू ठेवावीं. हकलाजिमे, पटीपछोडी, तैनात, बनवाले, विस्वा, पसकी, पळकी या बाबी स्वतःकडे ठेवून बाकी सर्व पूर्वीप्रमाणें त्याजकडे वंशपरंपरेनें चालू ठेवावें. सु. १०१७, हि. १०२६ जिल्काद ८. हुप.

सु. १०२५, हि. १०३४ रमजान १७ — १०२ — श. १५४७ ज्येष्ठ वद्य ३, इ, १६२५ जून १३

दुसरा इब्राहीम आदिलशाह → गुरुसिदा

तू प्रयत्न, जांबाझी, उपाययोजना, शौर्य, स्वार व पायदळ यांचीं जमवाजमव वगैरे करून व दाखवून मोहिमेंत प्रगति केलीस व करीत आहेस हें दरबारच्या ध्यानास आलें. तुझें तें करणें तुझा उत्कर्ष व थोरवी यांस अनुरूप आहे. मियां हुसैनाच्या बाबतींतील आलमेले परगणा तुला मुकासा दिला आहे. आपलें डोकें खूप उंचवावें. स्वार व पायदळ यांची जमवाजमव करून मोहीम व शुभेच्छा यांबाबत मोठा प्रयत्न करावा. म्हणजे आणखी तऱ्हतऱ्हेच्या कृपा होतील. सु. १०२५, हि. १०३४ रमजान १०. हुप. हुजूरचा मजलिसी मजालिसखान याच्या माहितीनें.

सु. १०२५,
हि. १०३५ रवल १५

१०३

श. १५४७ मार्गशीर्ष वद्य २
इ. १६२५ डिसेंबर ५

दुसरा इब्राहीम आदिलशाह → गुरुसिदाचे मुतालीक

तुम्ही जाणावें कीं, या वेळीं दरबारास समजलें कीं, रणसिंगारखान याजबरोबर मुद्दाम मसलतीवर पाठविलेला मुहम्मदखान ...... पाहुणचाराकरितां बोलावून दगाबाजीनें दस्त केलें आहे. म्हणून हुकूम होतो कीं, उपर्युक्त मनुष्य व इतर कीं, ज्यांना पकडलें आहे. त्यांस [...... म्हणजे ते] उपर्युक्त खानाजवळ जाऊन उपर्युक्त मोहिमेंत सामील होतील आणि त्यांचे घोडे पकडले असतील ते सर्वच्या सर्व परत द्यावे. या बाबत ताकीद जाणावी. सु. १०२५, हि. १०३५ रवल १५. हुप. हुजूरचा मजलिसी मजालिसखान याच्या माहितीनें.

सु. १०२५,
हि १०३५ रखर २४

१०४

श. १५४७ पौष वद्य १०
इ. १६२६ जानेवारी १३

॥ र्द फर्मान हुमायून शरफ सदूर याफ्त बजानेब मलिकार्जुन फरजंद मोकदमल-इम [सा] ल गुरुसिदा दरी विलां झगडेचे हकीकत हरामखोराचे लोकांसी पडाऊ कलेचे व अगा मुराद फरजंद चंगीसखान सरलस्कर हरामखोराचे तर्फे होऊन किती येक स्पाही सिकस्त खादले ते सियेदत निकाबत दस्तगाह व दौलतखोह मोतमीन शाह अबुल हसन माहलदार हुजूर नामजाद बहवालदारी किले शाहदुर्ग व मोकदमल इमसाल मस्यारनुले बदरगहि माला रोसन जाहले शाबास तुवा मसकत व जाहबाजी कराव्या तकसीर केले नाही तेवरून अज राह मराहीम पादशाहाना खलहत फखरा तुजकारणे पाठविले अहे ते-प्रमाणे सरफराज होणे दौलतखोहीमधे मसगूल असणे तेप्रमाणे सरफराजी असे तादान[द] छ २४ माहे रबिलसानी सन येक हजार पंचतीस परवानगी हुजूर अशरफ अकदस हु॥ अला बायेलाम रुकन सलतनतिल अलियतिल अलिया फरजंदी शाह नवाजखान सर मजालसी व वजीर हुकूमत

सु. १०२७,
हि. १०३६ जिल्काद २६

१०५

श. १५४९ अधिक श्रावण वद्य १२
इ. १६२७ जुलै २९

दुसरा इब्राहीम आदिलशाह ⟶ गुरुसिदा

सध्या मिया वफाखानाच्या अर्जावरून तुझ्या सेवेची व शुभेच्छेची हकीकत दरबारास समजली. तरी हें फर्मान देऊन तुझा उत्कर्ष करीत आहों. आतां जरूर आहे कीं, शाहदुर्ग किल्ल्याच्या तयारीसाठीं भेट म्हणून तू कबूल केलेले पंधरा हजार होन उपर्युक्त किल्ल्याच्या हवालदारीवर मुद्दाम नेमलेला महलदार शाह अबुल हसन याजकडे पोचते करावे. या बाबत ताकीद जाणावी. सु. १०२७, हि. १०३६ जिल्काद २६ हुप.

सुमारें सु. १०२७ } **१०६** { श. १५४८-४९ / इ. १६२६-२७

दुसरा इब्राहीम आदिलशाह (?) → गुरुसिदा

तू शाहदुर्ग किल्ल्याच्या उस्तवारीकरतां (पंधरा हजार) होन नजर कबूल करून त्याप्रमाणें अर्ज पाठविला होतास. म्हणून त्या किल्ल्याच्या तयारीकरितां वरील रकमेंतून गला व इतर जिन्नस घेण्याचा हुकूम दिला होता. आतां आमच्या कानावर आलें कीं, उपर्युक्त नजरेच्या पैशापैकीं थोड्याशा पैशांतून गला घेतला गेला. बाकी सर्व पैसे अजून तुजकडे बाकी आहेत. ज्या अर्थीं तूं नजर कबूल केलीस त्या अर्थीं ती देण्यामध्यें उशीर करणें योग्य नाहीं. आतां हें फर्मान पावतांच उपर्युक्त पैशापैकीं सन १०२७ सालचा हप्ता साडेसात हजार होन याच क्षणीं देऊन टाकावा. म्हणजे किल्ल्याची बेगमी घेईल. तू स्वतःच ही रकम कबूल केली होतीस आणि त्यामुळें हुकूम केला गेला होता. तुझ्या जहागिरीबाबत इतर लोक पुष्कळ नजर कबूल करीत होते. परंतु त्यांचें म्हणणें बाजूस सारून ती जहागीर तुला देण्यांत आली. हें लक्षांत घेऊन तुझ्या अर्जाच्या विरुद्ध तू जाणें ठीक नाहीं. तरी पैसे ताबडतोब आदा करावे. ......हुजूरच्या परवानगीनें.

सु. १०२७, हि. १०३७ मोहरम २० } **१०७** { श. १५४९ भाद्रपद वद्य ७ / इ १६२७ सप्टेंबर २१

मुहम्मद आदिलशाह → आलमेले परगण्याचे देसाई

हरामखोर कृष्णाजी भोसले याच्या बाबतींतलें उपर्युक्त परगण्यांतील बंदहाळ हें गांव अमानत फर्माविलें आहे. तरी तें अमानत करावें व त्याच्या मुतालिकांना कैद करून दरबाराकडे पाठवून द्यावें. या विषयीं पक्की ताकीद जाणून हुकुमाप्रमाणें आचरण करावें. सु. १०२६. हि. १०३७, मोहरम २० हु. प.

सु. १०२९, हि. १०३८ सफर २९ } **१०८** { श. १५५० कार्तिक शुद्ध १ / इ. १६२८ आक्टोबर १८

मुहम्मद आदिलशाह → आलमेले परगण्याचा देसाई

उपर्युक्त परगण्यांतील देउळगाव व बलगानूर हीं गावें खव्वास खात्याकडील खव्वास व लेखक यांच्या मुशाहिऱ्यासाठीं बेलेकटी, पापोशी, मेजबानी, नौसेबेल व जंगपटी यावाची सोडून बाकी सर्व बाबींसह मुकासा म्हणून दिलीं आहेत. तरी तीं ताब्यांत द्यावीं. सु. १०२९ हि. १०३८ सफर २९. हु. प.

सु. १०२९, हि. १०३८ रखर २ } **१०९** { श. १५५० मार्गशीर्ष शुद्ध ३ इ. १६२८ नोव्हेंबर १९

मुहम्मद आदिलशाह → आलमेले परगण्याचे देसाई.

या वेळीं दरबारास समजलें कीं मौजे ... च्या बाजाराचा हशील ... खानाच्या मोकाशांनीं ... सध्या जकातीचे खोत व पतकी यांच्या त्रासामुळें बाजाराच्या हशीलास पुष्कळ नुकसान आलें आहे. तरी हें फर्मान पोहोचतांच खोत व पतकी यांस ताकीद करून सालाबादप्रमाणें व माजी मुकाशांच्या वेळीं होता त्याप्रमाणें बाजार आबाद करावा आणि बाजारास येणाऱ्या–जाणाऱ्यांस मदत देऊन बाजार भरेलसें करावें. या बाबत ताकीद जाणून हुकुमाप्रमाणें वागावें. सु. १०२९ हि. १०३८ रबिलाखर २ हुप. मुस्तफाखानाच्या माहितीनें.

[पाठीवर*] वाो छ १६ माहे रबिलाखर दर साल सन तिसा अशरीन अलफ.

सु. १०२९, हि. १०३८ शव्वाल २६ } **११०** { श. १५५१ ज्येष्ठ वद्य १२ इ. १६२९ जून ८

मुहम्मद आदिलशाह → आलमेले परगण्याचे कारकून व देसाई

पन्नास मोठे व चांगले टोकरे अतिशय जलदीनें तयार करून भिवरा नदीच्याजवळ फिरोझाबाद शहराच्या आसमंतात जमा करावे. या बाबत ताकीद जाणावी. या अर्थाची ताकीद समजावून देण्यासाठीं अब्दुल कादिर महलदार यास पाठविलें आहे. काडीचाही उशीर करूं नये. सु. १०२९ हि. १०३८ शव्वाल २६ हुप. मुस्तफाखानाच्या मध्यस्थीनें.

सु. १०२९, हि. १०३८ जिल्हेज २७ } **१११** { श. १५५१ श्रावण वद्य १४ इ. १६२९ ऑगस्ट ७

मुहम्मद आदिलशाह → आलमेले परगण्याचा देसाई गुरुसिदा

उपर्युक्त परगण्यांतील देउळगाव व बलगानूर गांवच्या मुकाशांच्या पोटांत असलेल्या खव्वासांच्या जमेतीनें दरबारास अर्ज केला कीं, उपर्युक्तानें [सुहूर*] सन [एक हजार वीस*] सातमध्यें आमच्या हक्कांपैकीं देउळगावमधून तीनशे साडे एकुणसत्तर होन घेतले आहेत आणि बलगानूरमधून कतबा लिहून घेतला आहे. शिवाय तेथून गला, रोगण व इतर घेऊन गेला आहे आणि तो तरतऱ्हेनें त्रास देत आहे. याचा अर्थ काय ? आतां हें फर्मान पोचतांच दोन्ही गावांतून जें कांहीं घेतलें असेल तें सर्व परत करावें. त्रास देऊं नये. आश्वासन व दिलासा द्यावा. गावें आबाद करावी. फिर्याद येऊं देऊं नये. सु. १०२९, हि. १०३८ जिल्हेज २७. हुप.

सु. १०३७,
हि. १०४७ सफर १४

११२

श, १५५९ आषाढ शुद्ध १५
इ. १६३७ जून २७

मुहम्मद आदिलशाह→आलमेले परगण्याचे देसाई

उपर्युक्त परगण्यांतील सीदी अहमद खुदावंदखान याच्या बाबतींतलीं बलगानूर व कुमसी हीं दोन गावें भाऊबंदांसह करीमदादखान जमाअतदार यास बेलेकटी, पापोशी, मेजबानी, नौसेलबेल व जंगपटी या बाबी सोडून बाकीच्या सर्व बाबींसह मुकासा म्हणून दिलीं आहेत. तरी तीं ताब्यांत द्यावीं. सु. १०३७, हि. १०४७ सफर १४. हु प.

सु. १०४२,
हि. १०५१ जिल्काद ९

११३

श. १५६३ माघ शुद्ध १०
इ. १६४२ जानेवारी ३०

मुहम्मद आदिलशाद → फर्जंदी शाहजी भोंसला

सिपहसालारीची मदार रणदुल्लाखान याजला फर्माविली आहे. तुम्ही त्याशीं व त्याच्या धोरणाशीं एकरूप होऊन या दरबारची चाकरी व स्वाऱ्या यांत प्रगती करून दाखवावी आणि त्यास राजी राखावें. त्यांतच आमची मेहेरबानी आहे. रुस्तुमजमाही तुमच्या राज्यनिष्ठेची शिफारस करण्याचा एकही प्रसंग फुकट दवडीत नाहीं. सध्या रुस्तुमजमानें रहमतखान व खुदावंदखान व गाझीखान व अफजलखान यांस त्या मुलुखांत कायम नेमलें आहे आणि कर्नाटकतर्फेची मदारेमहाम व सरलश्करी रुस्तुमे जमान यास दिलेली होती. त्याचप्रमाणे उपर्युक्त लोकांना दिलेली आहे. तरी त्यानें त्यांच्या सांगण्यांत राहून त्यांच्या सल्ल्यानें स्वारी करावी आणि राज्यनिष्ठा दाखवावी. म्हणजे सध्या त्याजवर मेहेरबानी आहे ती दिवसेंदिवस वाढत जाईल. सु. १०४२, हि. १०५१ जिल्काद ९. हु. प.

सु. १०५८
हि. १०६८ जवल ६

११४

श. १५७९ माघ शुद्ध ७
इ. १६५८ जानेवारी ३०

दुसरा अली आदिलशाह → महाराज फर्जंदी शाहजी भोंसले.

कर्नाटकचा मुलूख खराब झाला आहे. या वेळीं या बाजूस एक सुभेदार नेमला गेला तर उत्तम; नाहीं पेक्षां हा मुलूख हातांतून जाईल अशा आशयाचा तुमचा अर्ज पोहोंचला. त्याप्रमाणें अफजलखान मुहम्मदशाही यास कर्नाटकची सुभेदारी मुद्दाम फर्माविली आहे. तरी तुम्ही त्याशीं मिळून राज्यनिष्ठा प्रकट करावी. तुम्ही कर्तबगार व हुशार आहां. दोघे एकदिल झाला म्हणजे काम दुरुस्त होऊन येईल. तुम्ही मनपसंत राज्यनिष्ठा दाखवावी. खानास आम्ही असा आदेश दिला आहे कीं, तुमच्याशीं मिळवून घेणें हें अतिशय आवश्यक आहे असें जाणून तुमचा सल्ला योग्य आहे असें

समजावें. तुम्ही सर्व तऱ्हेनें संतुष्ट राहून कर्नाटकचें काम उत्तम तऱ्हेनें पार पाडावें. त्यांत तुमच्या राज्यनिष्ठेमुळें आमचें मन संतुष्ट होईल आणि आमच्या संतोषावर नजर देऊन हुकुमाप्रमाणें अमल करावा. सु. १०५८, हि. १०६८ जवल ६. हुप.

सु. १०६१, हि. १०७१ जवल २२ } ११५ { श. १५८२ पौष वद्य ९ इ. १६६१ जानेवारी १४

दुसरा अली आदिलशाह—>चोक्कलिंगप्प नायक मदुरेकार (मदुरेचा नायक)

पूर्वीं तुमच्या नांवें फर्मान सादर झाला होता कीं, मदुरा आणि तंजावर या बाजूची सर्व मदार फर्जंदी महाराज शाहजी भोंसला याजवर टाकलेली आहे व त्या बाजूची सरलश्करी हसन अंबरखान याजला दिली आहे. या दोघांशिवाय दुसऱ्या कोणालाही तेथें दखल नाहीं. आतां तुम्हांस जरूर होतें कीं, त्या दोघांचें म्हणणें म्हणजे शाही हुकूम आहे असें जाणून ताबडतोब पेशकशीची रकम दरबाराकडे पाठवून द्यावी. परंतु आश्चर्य आहे कीं, अजून तुम्ही या बाबतींत दिरंग करीत आहां. आतां हा फर्मान पावतांच पेशकशीची रकम त्या दोघांकडे पाठवून राज्यनिष्ठा व्यक्त करावी आणि त्यांचें सांगणें हा पादशाही हुकूम समजून आचरणांत आणावें त्यांच्या समाधानांतच पादशाही समाधान आहे असें जाणावें. सु. १०६१, हि. १०७१ जवल २२. हुप.

फर्मान हुमायुन शरफ सदूर याफ्त आं की यिजित व रफाअत दस्तगाः षुजाअत व शाहामत यिंतिब्राः जिब्दतुल अमाशिल वल अ[श]बाः शामिलुल शैम वल याअतिबार चोक्कलिंगप्प नायक मधुरेकार [बयि] नायात बिगायात पादशाहाना व नवाजिष यिलतिफात खुसरवान ममताजि व सरफराजि बूदेहे बिदानद की मोदल फरमान मासिर संपनामु मधुरे तंजावुरि दिविद्दतनं माहाराजु षुजाअत व षाहामत दस्तगाः बुमदेः दौलतखोहान वफाकीष कुद्देः हावाखौहौन खैर अंदीष जिब्दतुल कबायिल वल अख्वान खुलासतुल वल अमाशिल वल अकरान रूकनल दौलत अल काहिरा फरजंदि माहाराजि शाहाजीराजे भोंसला वालिकिं यिबि अक्कड पि सरलश्कर-तनं हासन अंबारखानक्कु यिनायत बेशिनामु यिप्पड्डविरिद्दरू

नम्मंधलिदु

सु. १०६४, हि. १०७४ रज्जब ११ } ११६ { श १५८५ माघ शुद्ध १३ इ. १६६४ जानेवारी ३०

दुसरा अली आदिलशाह—> एकोजी भोंसले

या खराब वेळीं आमच्या कानावर आलें कीं फर्जंदी महाराज [शाहजी भोंसले] परमेश्वरी हुकुमानें या नश्वर जगाचा त्याग करून त्या शाश्वत जगांत निघून गेले. ही

खबर ऐकून आम्हांस अतिशय दुःख झालें. त्यांनीं परमेश्वरी हुकुमास राजी राहून मन संतोषीत ठेवावें. आणि नवाब अब्दुर्रहीम बहलोलखान यांच्या भेटीस जाऊन पादशाही मसलतींत सामील व्हावें. नंतर कौल व करार यांसह फर्मान पाठविला जाईल. सु. १०६४ हि. १०७४ रज्जब ११.

सु. १०६४
हि. १०७४ जिल्काद १६ — ११७ — श. १५८६ ज्येष्ठ वद्य ३, इ. १६६४ जून १

दुसरा अली आदिलशाह—→ पादशाहबाद मामल्याचे अधिकारी व देसाई

कादिराबाद उर्फ त्रिणामल व तलवानसूर या परगण्यांची देशमुखी व देशकुलकर्णकी आणि कादिराबाद परगण्यापैकीं कोदनूर, सपदल, तानकर या गांवांची इनामी या सर्वांची मिरास कादिराबाद परगण्याच्या मिराशीच्या ऐवजी यकोजी भोंसले व शाहजी भोंसल्याचे इतर चिरंजीव यांस फर्मानाप्रमाणें चालू आहे. आतां फर्मान कीं, उपर्युक्त मिरास यकोजी भोंसल्यास दिली आहे. ती त्याच्या ताब्यांत द्यावी. त्याच्या वंशजांकडे चालवावी. सु. १०६४, हि. १०७४ जिल्काद १६. हुप.

सु. १०६४,
हि. १०७४ जिल्काद १९ — ११८ — श. १५८६ ज्येष्ठ वद्य ५, इ. १६६४ जून ४

दुसरा अली आदिलशाह —→ कोलाहाल ऊर्फ मुहम्मदाबाद मामल्याचे देसाई.

उपर्युक्त मामल्याची देशमुखी, देशकुलकर्णकी आणि नाडगौंडकी यांची मिरास शाहजी भोसल्याचे यकोजी व इतर मुलगे यांस फर्मानाप्रमाणें चालू आहे. आतां हुकूम होतो कीं, उपर्युक्त मामल्याची देसगत (इनाम व हक्क लवाजिमे व इतर बाबी या सह) उपर्यूक्त यकोजी भोंसले यास दिली आहे. तरी ती त्याच्या ताब्यांत द्यावी व त्याच्या वंशजांकडे चालवावी. सु. १०६४, हि. १०७४ जिल्काद १९. हुप.

सु. १०७२,
हि. १०८२ जखर १६ — ११९ — श. १५९३ आश्विन वद्य ३, इ. १६७१ आक्टोबर १०

दुसरा अली आदिलशाह ——→ महाराज फर्जंदी यकोजी भोसले.

पर. कावेरीपतन, पर. तिरुपतूर, किले जगदेवगड, पर. वातमबार, पर. मअबदूर, किले आंसगिरी, पर. गणियनेल्लूर ऊर्फ गमासनल्लूर, किले मलियापेठ. मलियाबार (मलबार), किले मोरखुर व कर्यात सुरजगिरि पेठ (जगदेवाच्या मुलखापैकीं) हीं सर्व स्थानें अअतमादरावाचे बंधू केशवराव, नारो पंडित, श्रीनिवासराव, पुरुषोत्तमराव यांच्या बाबत असून वझीरे हुकूमत खवासखान यांजकडे चालू आहे.आतां हीं स्थानें त्याजकडून दूर केली आहेत. जगदेवाचा सदर मुलूख (तंबाखू, तीप बर्ग झकात

व इनामें खेरीज करून) मामले दिलाशादाबादमधील कसबे व देह आणि मौजे कन्दकूर यांच्या मोबदल्यांत तुला दिली आहे. शिवाय किले इब्राहीमगड, करन्चूर मामल्यांतील कसबे व खेडीं, कसबे मलेखेड पेठेसह, मलेखेड परगण्यांतील खेडे मूलकूर, मौजे हडगल हारदनी, मौजे रेवाडी समत हवेली शहर अहसनाबाद, मौजे सरदसा कर्यात् ठाणें, मौजे बामणी कर्यात् बालाघाट, किले पन्हाळ्याखालचीं इतर गावें, मसवरी तप्यांतील खेडीं, जवाली कर्यातमधील खेडीं, मौजे मन्नू कर्यात म्हसवे कबरकलदर मौजे गोबरकोप तर्फ कोणकोप मामले तोरगळ व किले बादावी खालील गांवें व मौज तदलबागी ठाणे बीदरी दारुस्सलतनत मामले पुरनूर मुहंमदपूर व इतर आणि कलहर परगण्याच्या देसगतीची मिरास (गांवें व वर्तना व चावर यांच्या इनामासह) आणि देशमुखी मौंजे औंद कर्यात बालाघाट परगणे कलहर (इनाम व वर्तना यासह) आणि इतर महालांची मिरास, या सर्वांची कृपा केली आहे तरी जगदेवाचा प्रदेश लिहिल्याप्रमाणें ताब्यांत घ्यावा आणि त्या प्रदेशाचा वसूल पूर्वीपेक्षां अधाक करून दाखवावा .आणि जो अधीक वसूल होईल तो हुकुमाप्रमाणें अमल करावा. सु. १०७१, हि. १०८२ जखर १६ हुप.

सु. १०५८, हि. १०६८ शाबान २२	१२०	श. १५८० वैशाख वद्य १० इ. १६५८ मे १६

दुसरा अली आदिलशाह → मीर्झा मुराद अली बेग

महाराज फर्जंदी शाहजी भोंसला या दरबारच्या कल्याणेच्छूंपैकीं एक आहे आणि तुम्हीही त्या बाजूस नजीकच आहां. तुम्ही दोघांनींही कल्याणेच्छेपासून दूर जाऊं नये. कल्याणेच्छा करीत असावे. आतां हुकूम होतो कीं, राजा व तुम्ही एक होऊन या दरबारच्या कल्याणेच्छेच्या अटी पुऱ्या कराव्या. त्यांत या दरबारची मर्जी राहील. कोणत्याही प्रकारें वितुष्ट दाखवूं नये. हुकुमाप्रमाणें चालावे. सु. १०५८ हि. १०६८ शाबान [२] २, हुप.

सु. १०५८, हि. १०६८ शाबान २२	१२१	श. १५८० वैशाख वद्य १० इ. १६५८ मे १६

दुसरा अली आदिलशाह → कोनेटी नायक.

सांप्रत हुजूरकडून अफजलखान मुहम्मदशाही यास लश्करासह त्या बाजूस नेमिलें आहे. शिवाय महाराज फर्जंदी शाहजी भोंसला त्या तर्फेस आहे. तेव्हां तुम्ही उपर्युक्त खान व राजा यांच्या आज्ञेंत राहून राज्याच्या कल्याणाची इच्छा बजावावी. गरजगो लोकांच्या शब्दांकडे मुळींच कान देऊं नये. कान देण्यांत तुमचा फायदा नाहीं. जाणावे. हुकुमाप्रमाणें चालावें. सु. १०५८, हि. १०६८ शाबान २२ हुप.

सु. १०५८, हि. १०६८ शाबान २२ } १२२ { श. १५८० वैशाख वद्य १० इ. १६५८ मे १६

दुसरा अली आदिलशाह——>नरसराज म्हैसूरकार.

सांप्रत हुजुरकडून अफजलखान मुहम्मदशाही यास लश्करासह कर्नाटक तर्फेस नेमिलें आहे आणि महाराज फर्जंदी शाहजी भोंसला त्या हद्दींत आहे. तो फार पूर्वी पासून या दरबाराचा कल्याणेच्छू आहे. तेव्हां तुम्ही उपर्युक्त खान व महाराज यांस मिळून त्यांच्या संगतीनें राज्य कल्याणेच्छेच्या अटी बजावाव्या (अमलांत आणाव्या) हें तुमच्या उत्कर्षाचे कारण आहे. जाणावें सु. १०५८, हि. १०६८, शाबान २२, हुप.

सु. १०४४, हि. १०५४ सफर २ (१२ ?) } १२३ { श. १५६६ चैत्र शुद्ध ४ (१४) इ. १६४४ मार्च ३१ (एप्रिल १०)

मुहम्मद आदिलशाह → वर्तमान व भावी अधिकारी व देसक परगणे मोटी जंबगे

उपर्युक्त परगण्याचा देसाई हनुमंता याने मुहम्मदनगरच्या मसलतींत शौर्य दाखवून चाकरींत प्रगति केली. म्हणून त्यास शाही पोशाख देऊन सन्मानिलें आहे. आतां त्यास दोन गांवें व जमीन त्यांवरील कांहीं हक्कांसह दिली आहे. पूर्वीच्या भोगवट्याप्रमाणें चालवावी. कोणासही हरकत करूं देऊं नये. अडथळा आणील त्यास तंबी द्यावी. वंशपरंपरा इनाम चालवावे. सु. ०४४, हि. १०५४ सफर २ (१२ ?). हुप. व शब्बासखान वझीरे हुकमत याच्या माहितीनें

सु. १०६६, हि. १०७६ शाबान १६ } १२४ { श. १५८७ माघ वद्य २ इ. १६६६ फेब्रुवारी ११

दुसरा अली अदिलशाह ——> वर्तमान व भावी अधिकारी व देसाई मोटी जंबगे

परगणे मजकूरचा देसाई हणमंता यानें पाचशे प्यादे व शंभर स्वार यांसह पादशाही मसलतीवर येऊन चाकरीचा दस्तूर प्रगत केला. म्हणून भाईखान तसीनकडील दरगी गांव दूर करून हणमंता देसाई यास इनाम दिला आहे. तरी वरील गांव तंबाकू तीप बगैर झकात व (पूर्वीचीं) इनामें सोडून सर्व बाबींसह त्याचें हवाला करावा व चालू ठेवावा. सु. १०६६ हि. १०७६ शाबान १६, हुप.

सु. १०८४, हि. १०९५ जवल १९ } १२५ { श. १६०६ वैशाख वद्य ६ इ. १६८४ एप्रिल २५

सिकंदर आदिलशाह ——> देसाई परगणे मोटी जंबगे

या वेळीं मुघल मुहम्मदपूर मामलत्याच्या जवळ आले आहेत. तरी हुकूम होतो

कीं, त्यांनीं स्वार, प्यादे, दारू, गोळे, बाण व इतर सामान यांसह शाही मसलतीसाठीं दरबाराकडे येऊन चाकरीचा पायंडा प्रगत करावा. किंचितही दिरंग करूं नये. त्यांतच त्यांच्या चाकरीचा उत्कर्ष आहे. याबाबत अहमद तानह खवास यास पाठविलें आहे. सु. १०८४, हि. १०९५. जवल १९. हुप.

सु. १०३५ हि. १०४४ जखर ९ | १२६ | श. १५५६ मार्गशीर्ष शुद्ध १२ इ. १६३४ नोव्हेंबर २१

मुहम्मद आदिलशाह → माण परगण्याचा देसाई

या परगण्यातील कासेगांव ही कर्यात बाबाजी भोसल्याकडे चालू होती ती काढून सर्व बाबींसह लश्करखान याजकडे [इनाम] दिली आहे. त्याच्या ताब्यांत द्यावी. सु. १०३५, हि. १०४४ जखर ९. हुप. दौलतखवासखान याच्या माहितीनें.

हि. ९७२ रवल २३ | १२७ | श. १४८६ कार्तिक वद्य १० इ. १५६४ आक्टोबर २९

(आरंभीं शिक्का, ३८ ओळी फार्सी मजकूर, दोन शेरे व पुन्हा ७ शिक्के)

॥ र्द कौलनाम अज दिवन हुमैयूनू आला हजरती सलतनतपनाहा मादलत-दस्तगाहा शहा अलीजाहा आलंमपंनाहा मेहर वा पेहर सरफराज अबुल मुजाफर आदिल-शाह सुलतान गोसावी तां बेस्मि सुदगल बावूजी दिधले कौलनामा यैसे जे हजरती दिवाणी मऱ्हमती पादशही करउनू देसाईपण वा जौधीरीगी वा देस कुलकरणीगी किले शाहादुर्ग वा विलायेती वा मुजाफाती आं बेस्मि तुझे अवलाद वा अफवादासी तुझे पिडी दर पिडीसी मिरास करउनू दीधले असे जे किले मजकूर नवे बांधिले त्या खाली विलायेती वा माहालाती करार जाहाले त्य देसाई चौधरी वा देसकुलकरणीं किले मजकूराचे कोणासी तालूक निसबती तुज दिवाणी नजर इनायेती व मऱ्हमती करउनू तुज मिरास करउनू दिधले असे बि॥

किले मजकूर

१ कसबे किले मजकूर	८ मौजे जवलकोट	१५ कसबे तेर
२ मौजे अचलेर	९ मौजे हूविनसलगरा	१६ कसबे मणूरु
३ मौजे जोलद आस्टा	१० परगणे अंकलकोट	१७ परगणे महींदिरी
४ कसबे आणदुरू	११ परगणे गुंजोटी	१८ तपे पांघरी वा
५ मौजे आळुरू	१२ तपे ढोंकी	१९ धारसीव
६ मौजे गक्षेर	१३ प॥ अलंद	२० कसबे अपसिंग

७ कसबे मोरंब १४ मौजे अरलकरंजि २१ कसबे माहेवाल

बाजे देहाये कर्याती बालाघाट वा बाजे महालाती मुजाफाती

किले मजकूर

तरी तुवा आपण देसाई चौधरी वा देसकुलकर्णी माहालहा मजकूराचे यैसे जाणौनू या कौलनामा हुमायुना वरउनू अपुले खातिर करार करउनू देसाईपण वा चौधरीगिरी वा देसकुलकर्णीचे काम रवां कीजे दिवाणाचे हलालखोरी वा नेककीर्दी मध्ये असिजे कोणे बाबे विचारू न कीजे दुसरा कोण्ही तुझे कामामधे दखल होऊ नेदू जरी कोण्ही दावे करउनू तुजसीं बेहंजारी करील तरि त्यांसी अदल फर्माउनू तुझे पिडी दरपिडि लेकुरुचे लेंकुरेसी जव प्रयन्तर हे दुनिया असिजे तव तुझे तुज चालउनू दुसरेयासी ताल्लुक नाही तुवा आपुले खातिरजमा करउनू लाजिमा देसाइगिरीचे वा चौधरीपणाचे वा देसकुलकर्णीचे कानूखंडी वा पछोडी वा विस्वा वा मोहबली बाकी अवघे तुझे दुंबाला केले असे घेउनू कोणे बाबे विचार वा फिकीर न करिता मिरास मजकूर तुझे अवलाद अफवादसि मोकरर केले असे यासी तजाउज नव्हेल हे सत्य जाणणे बरहुकूम कौलनाम हुमांयून रवंद

छ २३ माहे रबिलवल इसने सबैन

प ॥ बिमोजिब रोका वसिकेखान आलीशान केशवरकान वजीर हुकूमत वा मलिक अबुदुल हुसैन मजमूर ममालीक

(पाठीवर) तेरीख २३ माहे रबिलौवल इसने सबैन

सुरू बार मुश्रीफ

हि. ९७२ रवल २६ } **१२८** { श. १४८६ कार्तिक वद्य १३ इ. १५६४ नोव्हेंबर १

[आरंभी शिक्का, ३३ ओळी फार्सी मजकूर, दोन फार्सी शेरे, ७ शिक्के*]

तेरीख २६ माहे रबिलौव्वल इसने सब्बैन सुरू बार मुश्रीफ

मुतालिकानी मोकासाइयानी वा कारकुनानि वा देसाईयानि वा मोकदमानि बाजे माहलात अंकी बमराहीम पादस्याहना अंकी सरदेसाइ वा चौधरकी वा देसकुलकरणी बै ॥ मुदगल बिन बाबजी मीरास कर्दे आतिफत्त फरमूदे सुदे अस्त मे जायेद की सरदेसाई वा चौधरकी वा देसकुलकरणी मुदगल बाबजी मिरासी दानिस्ते वुरुदू कुनद

[उपर्युक्त सारांशांत तपशील आला नाही तो फार्सी पाठावरून खाली उतरला आहे*]

वजीरे हुकूमत किश्वरखान याच्या मुकाशाचा परगणा अंकलकोट

कामिलखान याच्या मुकाशाचा परगणा महिंदरगी

बोंडी हणमंतराव याच्या मुकाशाचा
परगणा धाराशीव
बालाघाट समतेतील गावें
कसबे मनूर

दिलावरखान याच्या मुकाशाचे
परगणे गुंजोटी, ढोकी व पांगरी
मौंजे भदगांव
मलिक फकीरुल्मुल्क याच्या मुकाशाचा
परगणा आळंद
कसबे माहेवाल

ता. २६ माहे रवल हि. ९७२. किश्वरखानाच्या परवानगीनें

हि. ९७२ रवल २८ } **१२९** { श. १४८६ कार्तिक वद्य ३० इ. १५६४ नोव्हेंबर ३

[आरंभीं १ ल्या अली आदिलशाहाचा एक शिक्का व दोन शेरे व ३७ ओळी फार्सी मजकूर*]

दे फर्मान हुमायून सरफ नफाद याफ्त बजानिबु मलिक सर्क खोज नेमतुला नैब गैबत वा कारकुनानि हाल वा इस्तकबाल वा मोकदमानि वा रेया वा बरेया कसबे वा कर्याति किले शहादुर्ग आं की हजरती दिवाणी मन्हमति करउनू देसाई वा चौधरिगी वा माहाजनी वा देसकुलकरणी किले मजकूर वा मुजाफती आं बेस्म मुदगल बाबूजीसी मिरासी करउनू दिधले असे जे किले मजकूर नवेनी बुनियादी केले देसाई वा चौधरगिरी वा देसकुलकरणी किले मजकूराचे कोणासी ताल्लूक नाही हुजुरुनू मन्हमति करउनू बेस्म मुदगल बाबूजीसी बादहू बा अवलाद वा अफवादासी जव प्रयन्तर हे दुनिया असे तव प्रयन्तर मिरास करउनू चालउनू म्हणउनू बि॥

१ कसबे किले मजकूर	५ कसबे आणदुरू	९ कसबे मणूरू
२ कसबे मोरंब	६ कसबे आळूर	१० कसबे अचलेर
३ कसबे जोळदास्टा	७ कसबे माहेवाल	११ कसबे तेर
४ कसबे अपसिगा	८ मौंजे गधेर	१२ मौंजे अरलकरंजी

बाजे देहाये व मु॥ समत बालाघाट दे॥ लाजिमे तरी तुमी मुदगल बाबूजी मशार-नुले देसाई वा चौधरी वा माहजन वा देसकुलकरणिगी किले मजकूर देखील मुजाफाती मजकूर जाणौनू देसाई वा चौधरिगी वा देसकुलकरणिगी वा माहाजनी दुबाला मुदगल बाबूजी बादहूबअवलाद वा अफवाद ऊचे दुबाला कीजे हे दुनिया...असिजे तव चालउनू विलायेती मजकूर यांसी जफत करउनू दी {दी} जे आणि कोणासी सर सक्ती वा सिरजोरी करू ने दीजे काइदा देसाईगिरी वा चौधरी वा देसकुलकरणी वा माहाजनी बरवे रीति चालउनू देसाईगिरीचे काम आणि चौधरिगी वा देसकुलकरणी वा माहाजनि-गीचे काम याचे हाती चालउनू घेणे दिवाणाचे कारबार वा बिराड वा तकसीम वा बाजे

कारबार वा मुनसिफी वा विलायेती मजकूर यावेगले करूं ने दीजे वा मशारनुले
लाजिमा कानूखंडी वा पासोडी वा विस्वा }वा विस्वा{ वा मोहली आवघे दुवाल करउ
मशारनुलेसी हुरमती देत जाइजे वा हर येक मोकदम वा मुजेरेया विलायेती मजकुरा
ताकिदी करणे जे मशरनुलेसी मिलउनु असती ऐसे विलायेतीचे कैफियेती पेसजि वा दर
वख्त तमाम यासी ठाउके कीजे तालिक लिहुनू घेउनू असली पर्तोंनू दीजे बरहुक
फर्मान हुमायून रवंद

तेरीख २८ माहे रबिलौवल इसने सबैन वा तिसा मेया

पाा बिमोजिब रोका बसिके खान आलीशान केशवरकान }केशवरखान{ वजी
हुकूमत वा मलिक् अबुदुल हुसैन मजमू ममालिक

सु. ९८१,
हि. ९८९ सफर ११ }

१३०

{श. १५०३ चैत्र शुद्ध
{इ. १५८१ मार्च १७

दुसरा इब्राहीम आदिलशाह → शाहदुर्ग किल्याचे वझीरुलमम्लिकत ना
गैबत व कारकून

हा किल्ला व आणखी कांहीं भाग यांचा देसाई व देशकुलकर्णी सुधो बाबजी य
दरबारास येऊन अर्ज केला कीं, मी कागद लिहून दिला आहे कीं, सन ९७९ मध्यें वि
सुरो तन्कल यानें हरकत करून देसायकी व देशकुलकर्णकी [बद्दल] कबुलायत केली होत
पण ही मिरास माझी असल्यामुळें ही माझ्या ताब्यांत फर्मावावी. एकसाली तीनशे हो
आणि लवाजिम्याची चौथाई पेशकश कबूल करतों. उपर्युक्त विसोनें दिलेली कबुला
रद्द करावी म्हणजे आम्ही आमची पेशकश पोचवूं. अर्जाप्रमाणें सुधो बाबजीस उपर्यु
देसाईगिरी व देशकुलकर्णकी मुकरर केली आहे. उपर्युक्त विसोची कबुलायत रद्द क
दीडशें होनांचा मक्ता केला आहे. प्रत्येक वर्षी ही रकम द्यावी. पेशकशीची रकम स
कारी कारखान्यांच्या रातिबासाठीं नेमिली आहे. ती सरकारी खजिन्यांत दाखल करा
सुधो बाबजी यास देसाई व देशकुलकर्णी समजावें. सरकारी कामें त्यासह चालू करा
सल्ला घ्यावा. तुळजापुरासह विस्व्याची तैनात व इतर लवाजिमे सालाबाद चालू असत
त्याप्रमाणें चालूं ठेवावे. त्यानें हुजूरकडे जामीन दिला आहे आणि दप्तरांत कतव्या
पुरावा आहे. तरी अडथळा आणूं नये. सर्व बाबींविषयीं योग्य व्यवस्था करा
फर्मानाप्रमाणें चालावें. सु. ९८१, हि. ९८९ सफर ११. हुप.

हि. ९९१
मोहरम २४ (२५) }

१३१

{श. १५०४ माघ वद्य १० (१
{इ. १५८३ फेब्रुवारी ७ (८)

दुसरा इब्राहीम आदिलशाह → शाहदुर्ग किल्याचा नायब गैबत म
वझीरुल्ममालिक व कारकून.

या वेळीं या किल्ल्याचा देसाई व देशकुलकर्णी मुधो बाबजी यानें अर्ज केला कीं, थोरल्या दिवाणाच्या जमान्यांत या किल्ल्याचा पाया घातला व तो बांधला गेला. तेव्हांपासून हा किल्ला, त्याच्या लगतचा भाग व भोनगाव येवढ्याची देसाइकी व देशकुलकर्णकी वंशपरंपरेनें मला मिरास होती ती आज तागायत चालू आहे. शत्रूंनीं या किल्ल्यास वेढा घातला होता तेव्हां नानाविध कष्ट व प्राणांशीं खेळ करून एकनिष्ठा दाखविली. असें असतांही सध्या विसो सुरो तंगोल यानें हरकत करून व पेशकश कबूल करून या किल्ल्याची देसाइकी आपणाकडे करून घेतली. मुधो बाबजी देसाई विश्वासू व निष्ठावान आहे. म्हणून उपर्युक्त दोन्ही कामें त्याजकडे कायम केलीं आहेत. वेढ्यामध्यें त्यानें उत्तम कामगिरी केल्यामुळें जुनी कबुलात दूर केली आहे. त्यानें स्वखुशीनें दोनशे होन पेशकश कबूल करून एकसाली चौथाई व कतबा हजर केला. म्हणून उपर्युक्त तंगोल यास दूर केलें आहे. शुहूर ९८३ पासून दोन्ही कामें मुधो बाबजीकडे कायम समजून तीं कामें त्याजकडून करून घ्यावीं. देसायाचे लेखी कायदेकानू असतील ते त्यास द्यावे. त्या कामाबद्दल तैनात, विस्वा, लवाजिमे इत्यादि सालाबाद चालू असतील ते त्यास द्यावे. उपर्युक्त दोनशे होन पेशकश या किल्ल्याच्या इमारतीच्या सोप (सामग्री) साठीं मुकरर केली आहे. ती रकम वसूल करून किल्ल्याच्या इमारतीकडे खर्च करावी. हाच जुना देसाई आहे असें समजून जामिनाचा अडथळा करूं नये. हि.९९१ मोहरम २४. हुप. अमीर जुमला व सरे सरनौबत दिलावरखान याच्या माहितीनें.

सु. १००५, हि. १०१४ जवल १६	१३२	श. १५२७ आश्विन वद्य २ इ. १६०५ सप्टेंबर १९

दुसरा इब्राहीम आदिलशाह → शाहदुर्ग किल्ल्याचा नायब गैबत मलिक फखुद्दीन व कारकून.

शाहदुर्ग किल्ल्याचा देसाई व देशकुलकर्णी मुधो बाबजी यानें अर्ज केला कीं, नळदुर्ग किल्ल्याचा पाया घातला तेव्हां हा किल्ला व त्यास जोडलेला भाग यांची देसाइकी व दशकुलकर्णकी मिरास म्हणून वंशपरंपरेनें मला दिली. ती आज तागायत मजकडे आहे. शत्रूंनीं या किल्ल्यास वेढलें असतां त्या मोहिमेंत हर प्रकारें कष्ट घेऊन मी एकनिष्ठा प्रगट केली. नंतर विसो सुरो यानें अडथळा केला आणि पेशकश कबूल करून या किल्ल्याची देसाइकी आपणास करून घेतली. पण माझ्या निष्ठेमुळें देसाइकी व देशकुलकर्णकी यांची माझी मिरास मजकडे देऊन विसो सुरोनें दिलेली कबुलायत दूर केली. याविषयीं फर्मान मजकडे आहे. असें असतां सध्या या सालीं खवासांपैकीं अलीशाह सखावतखान खव्वास व नामाजी मुधो यांच्या वराती कबूल करून वरील कामें विसो सुरोनें आपणाकडे घेतलीं. याबाबत व्यवस्था व्हावी. या सर्वांचा विचार करून उपर्युक्त वराती दूर केल्या आहेत. मुधो बाबजी यास कबु-

लात माफ केली आहे. त्याजकडून देसाइकी, देशकुलकर्णकी इत्यादींचें काम घ्यावें, आणि त्याचे हकलवाजिमे, विस्वा इत्यादि सालाबाद चालू असेल तें त्याजकडे चालवावें. सु. १००५, हि. १०१४ जमादिलावल १.

सु. १००९, हि १०१७ जिल्काद २ } **१३३** { श. १५३० माघ शुद्ध ३ इ. १६०९ जानेवारी २८

२ रा इब्राहीम आदिलशाह → शाहदुर्ग किल्याचा नायब गैबत शाह वली आणि कारकून.

राज्याचा हिशेबतपासनीस विसो पंडित याचा मुशाहिरा म्हणून (या किल्लयाचा देसाई मुधो बाबजी याचा मुलगा तानाजी मुद्गल देसाइकी करीत आहे. त्याजकडील शेरणी) अडीचशे होन = सत्तावीस नौरस सात होन दिले आहेत. त्याचा तपशील असा –

मामले रायचूरच्या सु. १००८ च्या वरातीच्या मोबदल्यात १७५ होन = १९ नौरस, ४ होन.

मुस्तफाबाद हिसारच्या सु. १००६ च्या वरातीच्या मोबदल्यांत २१ होन = २ नौरस, ३ होन.

चंदन किल्लयाच्या सु. १००८ च्या वरातीच्या मोबदल्यांत २५. होन = २ नौरस, ७ होन.

अलमेले परगण्यापैकीं बेतनूर गावच्या वरातीच्या मोबदल्यांत २९ होन = ३ नौरस, २ होन. [याचा तपशील*]

सु. १००४ पैकीं १४॥ होन = एक नौरस ५॥ होन.

सु. १००६ पैकीं १४॥ होन=एक नौरस, ५॥ होन.

तरी वरीलप्रमाणें रकम आदा करावी. हुकुमाप्रमाणें चालावें. सु. १००९, हि. १०१७ जिल्काद २. हुप.

} **१३४** {

दुसरा इब्राहीम आदिलशाह → शाहदुर्ग किल्ल्याचे......

संदलापूर मामल्यांतील शाहदुर्ग ठाण्याचा तनखा म्हणून असलेलीं व त्याच ठाण्यांतील एक्कावन गावें त्याच ठाण्याच्या तनख्यासाठीं दिलीं आहेत. त्यांचा तपशील असा—[येथें ५० गावांचीं नांवें दिलीं आहेत] तरी हीं गावें पूर्वीप्रमाणें उपर्युक्त किल्लयाचे स्वाधीन करावी. ता....हुप. दियानतुल्मुल्क सर मजलिसी याच्या माहितीनें.

सु. १०३७, हि. १०४६ जखर २ — १३५ — श. १५५८ कार्तिक शुद्ध ३ इ.१६३६ आक्टोबर २२

मुहम्मद आदिलशाह → शाहदुर्ग किल्ल्यावर मुद्दाम नेमलेला हवालदार व कारकून.

या प्रदेशांतील देसाई, देशकुलकर्णी व नाडगौडा यांवर एकसाली नजराणा बसविला आहे. त्याप्रमाणें या किल्ल्याचा सरदेसाई, देशकुलकर्णी व नाडगौडा हणमाजी तानाजी यास एकसाली नजराणा कायम केला आहे. तो वसूल करून दरबाराकडे पाठवून द्यावा. अंतो खंडेराव यानें या भागाच्या नाडगौडकीसाठीं नजराणा कबूल करून फर्मान घेतला होता. पण त्याच्या या किल्ल्याच्या नाडगौडकीच्या मिराशीशीं कांहीं संबंध नाहीं. त्याच्या नजराण्याच्या मोबदल्यांत या किल्ल्याच्या नाडगौडकीपैकीं जें संमत केलें तेवढेंच चालू ठेवावें. बाकी हकलाजिमे, मिरास इत्यादि ज्याची त्यास वंशपरंपरेनें सुपुर्द करावी. सु· १०३७, हि. १०४९ जखर २.

सु. १०४२, हि. १०५१ शाबान — १३६ — श. १५६३ कार्तिक इ. १६४१ आक्टों—नोव्हेंबर

मुहम्मद आदिलशाह → शाहदुर्ग किल्ल्याचे देसाई, कुलकर्णी व सरमुकद्दम.

या किल्ल्याखालचे बहुतेक गांव...संकटानें आणि ठाणें व इतर यांच्या त्रासानें वैराण झाले, प्रजा पांगली व परागंदा झाली. त्यामुळें पुष्कळ जमीन पेऱ्याशिवाय राहिली. असें झालें असेल तर ते हकलवाजिमे खाऊन काय करतात आणि त्यांचें कल्याण तरी कसें होणार ? आतां आसपासच्या रयतेस दिलाशाचा कौल देऊन आणावें, ठाण्याची तशवीश दूर करून जमीनीचा एक तुकडाही वहीतीखेरीज पडूं देऊं नये· आणि सर्व गावें आबाद करावीं. पाण्याची व निपाण्याची तसेंच वहीतीची व गैर वहीतीची जमीन कोणती याची हकीकत हुजूरकडे येऊन कळवावी. ती विचारांत घेऊन उचित व्यवस्था केली जाईल. हुकुमाप्रमाणें वागावें. सु. १०४२, हि. १०५१ शाबान. हुप. वझीरे हुकूमत इखलासखान याच्या माहितीनें.

सु. १०६२, हि· १०७२ जिल्काद ७ — १३७ — श· १५८४ आषाढ शुद्ध ८ इ. १६६२ जून १४

[आरंभीं पिंपळपानी शिक्का व ११ ओळी फार्सी मजकूर]

बजानेब नरसो हणमाजी देसाई व देसकुलकर्णी व नाडगौडा व मोकदमानी कसबा व देहाये मुजाफाती व देहाय बालाघाट किले शाहदुर्ग बिदानंद के सुहूर सन इसने

सितैन व अलफ दरी विला तुमी आरिजा मरसूल केले होते की विलायत किले मजकूर अज अफत व फितरत व नफरी व गैरमाहसूल व पैदागिरी व मुबलक खराब व वैराण जाहले अहे व ठाणेचे तसविसेकरितां रैयत लोक तमाम परागंद होऊन जागाजागा गेले आहेती नजर इनायेत फरमाऊन नफरी व गैरमाहसूल माफ करनू फरमान हुमायून मरहामत फरमावणे मणौनू तरी तुमचे·आहवालस खातीर मुबारकेसि आणौउनू [तु]मचे मुदासारखे हरदू बाब माफ फरमाऊन फरमान हुमायून सादिर केले आहे मेबायेद के तुमी दर हर बाब खातिरजमा करून विलायेताचे रैयतासि तमाम कौल व दिलासा देऊन विलायेत मामूर व अबादान करनू सुखी असणे तनखादारानी गैरमाहसूल दूर फरमाविले असे दूर जाणिजे व माहिमात देसगत व देसकुलकर्णिगी व नाडगौडकी खासा देसाई अपुले खातिर करार करून करीत जाणे वेरिसदारासी कारबार करणे निसबत नाही व दखलही [होऊं] ने दणे हर हाल विलायेत मामुरी व अबादानी करून आपुले दौलतखो-[ही जाही] र करणे त्यावरून तुमचे सरफराजी असे व गैरमाहसूल......

[पाठीवर] तनखादारासी तनखा गैरमाहसूल दूर फरमाविले असे त्यासी आदा नव्हे तुमी खातिरजमा करून खुशीहाल असणे [नि *] मोर्तुब छ ७ माहे जिल्काद सन १०७२ [फा *] मुरत्तब शुदा

सु. १०६६, हि. १०७६ मोहरम २	१३८ अ	श. १५८७ अ. श्रावण शुद्ध ४ इ. १६६५ जुलै ६

२ रा अली आदिलशाह → रताजी देसाई कर्यात म्हसवड परगणे माण

उपर्युक्त परगण्यापैकीं कासेगाव कर्यात फरासखाना व वहली या खात्यांतील लोकांना मुकासा म्हणून चालू आहे. सध्या दरबाराच्या ध्यानास आलें कीं, नाइकजी पांढऱ्याचा जमातदार पुंजाजी यानें हरामजादगी करून व उपर्युक्त खात्यांतील लोकांच्या मुतालिकांना हाकून लावून ती कर्यात स्वतःच बळकावून बसला आहे. या बाबतींत दोन तीन वेळां फर्मानें सादर झालीं असतांही त्यांप्रमाणें तो व्यवस्था करीत नाहीं व जमातदारास ताकीद करीत नाहीं. जमातदाराचें काय हें धार्ष्ट्य ? आतां हें फर्मान पावतांच वरील कर्यातींतील गावें उपर्युक्त खात्याच्या लोकांना मुकासा आहेत असें समजून जमातदारास तात्काल तेथून हाकून लावावें. तो हरकत करील तर त्यास अशी तंबी द्यावी कीं तो पुनः हरकत करणार नाहीं आणि ठिकाणीं राहील. येवढेंच नव्हे तर उपर्युक्त गावें उपर्युक्त लोकांच्या मुतालिकांच्या ताब्यांत द्यावीं व तसा अर्ज इकडे पाठवावा. यांत त्याचा उत्कर्ष आहे. सु. १०६६, हि. १०७६ मोहरम २. हुप.

सु. १०६६, हि- १०७६ शव्वाल २५ } १३८ अ { श. १५८८ चैत्र वद्य १२ इ. १६६७ एप्रिल २१

२ रा अली आदिलशाह →रताजी देसाई कर्यात म्हसवड परगणे माण

कासेगांव कर्यातींतलीं गावें फर्रासखाना व वहेली या दोन खात्यांतील लोकांना मुकासा म्हणून चालू आहेत. सध्या दरबारच्या ध्यानांत आलें कीं, नायकजी पांडरे यांच्या पुंजाजी नामक एका जमातदारानें दांडगाईनें उठविलें आहे कीं, ही कर्यात नायकजीस मुकासा मिळाली आहे. म्हणून हुज्जतीशिवायच ती त्यानें ताब्यांत घेतली आहे आणि तिचा वसूल घेत आहे. तरी हें फर्मान मिळतांच त्यानें (रताजीनें) स्वतःची जमेत व स्वार घेऊन जावें, पुंजाजीस शिक्षा करून त्यास उपर्युक्त कर्यातीमधून हाकून लावावें. ती कर्यात उपर्युक्त दोन खात्याच्या लोकांच्या ताब्यांत द्यावी. आणि तसें केल्याचा अर्ज दरबारास पाठवून द्यावा. तसेंच व्यवस्थेच्या बाबत तेथील हवालदार जें सांगेल त्याप्रमाणें प्रयत्नपूर्वक करावें. सु. १०६६, हि. १०७६ जिल्हेज ८. हुप.

सु. १०६७, हि. १०७६ जिल्हेज ८ } १३८ इ { श. १५८८ ज्येष्ठ शुद्ध १० इ. १६६६ जून २

२ रा अली आदिलशाह →कर्यात म्हसवड परगणे माणचा देसाई रताजी

कासेगाव कर्यात फर्रासखाना व वहेली या खात्याच्या लोकांकडे मुकासा म्हणून चालू आहे. याबाबत त्यास फर्मान झालें होतें कीं, वरील कर्यात काबिज करून वरील लोकांच्या मुकाशांना द्यावी. त्याप्रमाणें त्यानें ती काबिज करून मुकाशांच्या ताब्यांत दिली. शाबास, शाबास, त्यानें राजनिष्ठेंत कसूर केली नाही. आतां त्याच्या उत्कर्षासाठीं म्हणून शाही पोशाख पाठविला आहे. तो घेऊन स्वतःस सन्मानित समजावें. आतां कर्यात मजकुरास बंडखोरांपासून कोणताही त्रास पोचूं देऊं नये. चुकीनें उपर्युक्त कर्यात नायकजी पांढऱ्याच्या मोकाशाकडे चालू केली आहे, पण ती त्याच्या ताब्यांत जाऊं देऊं नये. त्यास योग्य तंबी देऊन हाकून लावावें. कारण उपर्युक्त कर्यात उपर्युक्त खात्याच्या मुकाशांस मुकरर केली आहे. पांढऱ्याच्या निसबतीचा पुंजाजी कर्यात मजकुरांत दांडगाई करीत आहे. त्यास अशी तंबी द्यावी कीं, तो पुनः कधींही या विलायतेंत ढवळाढवळ न करतां ठिकाणीं राहील. यांत त्याचा उत्कर्ष आहे. सु. १०६६, हि. १०७६ जिल्हेज ८

सु. १०६६, हि. १०७७ मोहरम २९ } १३८ ई { श. १५८८ श्रावण शुद्ध १ इ. १६६६ जुलै २२

२ रा अली आदिलशाह →परगणे माणपैकीं म्हसवड कर्यातीचे देसाई रताजी

उपर्युक्त परगण्यापैकीं कासेगांव कर्यातींतील गांवें फर्रासखाना व वहली या खात्या-

मधील लोकांना मुकासा म्हणून फर्मानाप्रमाणें चालू आहे. सध्या दरबाराच्या ध्यानांत आलें कीं, उपर्युक्त कर्यात नायकजी पांढऱ्याच्या निसबतीचा पुंजाजी दांडगाईनें व बंडखोरीनें ताब्यांत घेऊन पैसा वसूल करीत आहे. याबाबत फर्मान सादर झाला होता कीं, पुंजाजीस उपर्युक्त कर्यातीमधून हाकलून लावून ती उपर्युक्त खात्यांच्या लोकांच्या ताब्यांत द्यावी-त्याप्रमाणें तू आपल्या जमेतीसह जाऊन त्यास शिक्षा केलीस व ती कर्यात त्यांच्या ताब्यांत दिलीस. आतां तुझ्या उत्कर्षासाठीं पोशाख पाठविला आहे. तो घेऊन व कृतार्थ होऊन पुढेंही मदतीचा नवा प्रयत्न करावा व उपर्युक्त कर्यातीमधील गावांची व्यवस्था लावावी. पुंजाजी असेल तेथें त्यास सजा करून हाकून लावावा व पुनः त्यास दखल होऊं देऊं नये. याबाबत बरी ताकीद जाणून पुन्हा फिर्याद येऊं देऊं नये. यांतच त्याचा उत्कर्ष आहे. सु. १०६६, हि. १०७७ मोहरम २९. हुप.

सु. १०६६, हि. १०७६ जवल ३० } १३९ { श. १५८७ मार्गशीर्ष शुद्ध ३ इ. १६६५ नोव्हेंबर २८

२ रा अली आदिलशाह → परगणे माण मधील कर्यातीचा देसाई रताजी

त्यानें पाठविलेला अर्ज दरबारास पोचला. त्यानें सर्व तऱ्हेनें स्वतःचें मनःसमाधान ठेवून स्वतःच्या जमेतीसह दरबारास यावें. हुजूर आल्यावर त्याचा उत्कर्ष होईल. याबाबत घडीचा दिरंग न करणें. सु १०६६, हि. १०७६ जवल ३०. हुप.

सु. १०६६, हि. १०७७ मोहरम ३ } १४० { श. १५८८ आषाढ शुद्ध ४ इ. १६६६ जून २६

२ रा आदिलशाह → परगणे माणचे देसाई रतोजी

सध्या दरबाराच्या ध्यानास आलें कीं, नरसोजी नावाच्या एका रयतानें जामदारखान्याच्या खात्यांतील पोरग्यांस मुकासा असलेल्या कासूळ परगण्यापैकीं मलागाव या गांवावर चूंगीचा दावा करून मौजे बेनूरचा पाटील यशवंतराव माणकोजी याच्या आसऱ्यानें त्याचे स्वार व प्यादे घेऊन उपर्युक्त खेड्यावर जाऊन २०९ गुरें आणि रयतेचा माल नेऊन खेडें खराब केलें आहे. उपर्युक्त खेडें उपर्युक्त पोरग्यांस मुकासा असतांना यशवंतराव माणकोजी व नरसोजी यांनीं असें करावें हें केवढें धार्ष्ट्य? आतां हें फर्मान पावतांच नरसोजीस वाजवी तंबी देऊन पळवून नेलेलीं गुरें व माल एकुणएक आणून उपर्युक्त खेड्याचा मुकद्दम व हुद्देदार यांच्या स्वाधीन करावा आणि तुमचा व हुद्देदारांचा अर्ज पाठवून द्यावा. तसेंच उपर्युक्त खेड्याच्या रयतेस अभय व दिलासा देऊन आबाद करावें कीं, तें खेडें पूर्वीहून अधिक आबाद होईल. नरसोजी व यशवंतराव यांस तात्काळ याच क्षणीं कैद करून प्याद्यांबरोबर हुजूर पाठवून द्यावें. यावर तुझा उत्कर्ष आहे.

याबाबत पुनः फिर्याद येऊं देऊं नये. सु. १०६६, हि. १०७७ मोहरम ३. हाजी खुर्रमीनुल शरीफैन हाजी शेख अब्दुल अली सरखैले ममालिक याच्या माहितीनें; याबाबत लाडले अलाउद्दीन खवास यास पाठविलें आहे·

सु. १०६७, हि. १०७७ रमजान १८ — १४१ — श· १५८८ फाल्गुन वद्य ४, इ. १६६७ मार्च ४

→ रताजी [माने]

सध्या दरबारास समजलें कीं, सीवाचे स्वार शहर अहसनाबादेपैकीं हिरापूर समतेंत येत आहेत. आतां हें फर्मान पावतांच सय्यिद असील जमातदार खासखैल आणि बजाजी व महदाजी यांजवळ जावें, सीवाच्या लोकांस योग्य तंबी द्यावी आणि स्वतःची राज्यनिष्ठा व्यक्त करावी. याबाबत उपर्युक्त जमातदार, बजाजी व महदाजी यांस फर्मानें गेलीं आहेत. सु. १०६७, हि. १०७७ रमजान १८. हुप.

हि. १०८४ शाबान १५ — १४२ — श. १५९५ कार्तिक वद्य १, इ. १६७३ नोव्हेंबर १५

सिकंदर आदिलशाह →सिद्दोजी बिन रतोजी माने नामजाद परगणे खटाव

अभयपत्रानुसार तू येऊन उपर्युक्त परगण्यांत राहिलास. शत्रूच्या लोकांनीं येऊन उपर्युक्त परगणा व ती बाजू यांस त्रास दिला तेव्हां तू आपल्या जमेतीनिशी श्रमसाहस करून शत्रूच्या लोकांना शिक्षा केलीस. ही वार्ता हुजूरला पोचून पसंतीस आली. आतां खूप उत्कर्षरूप शाही पोशाख तुजकडे पाठविला आहे. तू सर्व तऱ्हेनें मन संतुष्ट ठेवून वझीरे हुकूमत खव्वासखान यानें त्या तर्फेच्या महालांवर नेमलेले सुभेदार नागोजी व एसू पंडित यांस सामील होऊन स्वतःच्या जमेतीसह श्रमसाहस करून शत्रूच्या लोकांस शिक्षा करावी आणि असें करावें कीं, खटाव परगणा व ती तर्फ यांस शत्रूचा त्रास होणार नाहीं आणि ती बाजू आबाद होईल. यांत तुझा उत्कर्ष आहे. हि. १०८४ शाबान १५. हुप.

(आलमगीरी) जु. ४१ शाबान २१ — १४३ — श. १६१९ फाल्गुन वद्य ८, इ. १६९८ फेब्रुवारी २३

औरंगजेब → नागू माने

सध्या तर्बियतखानानें दरबारास अर्ज पाठविला आहे कीं, तुला सुदैवानें तुझ्या कसूरीविषयीं पश्चात्ताप होत आहे आणि तू बादशाही ताबेदारी पत्करून आणि प्राणा·

र्पणाची सेवा करून स्वतःचा उत्कर्ष करूं इच्छीत आहेस. म्हणून बादशाही कृपेनें तुझ्या अपराधांवर क्षमेचें पांघरूण घालण्यांत येत आहे आणि मूल्यवान ऐश्वर्य देत आहे. केलेल्या कृपेबद्दल धन्यवाद देऊन उंबरठ्यास सलाम करण्यासाठीं धावून यावें. म्हणजे कृपा होऊन उत्तम मन्सबीच्या योगानें डोकें वर काढलें जाईल. जु. ४१ शावान २१. असदखानाच्या मध्यस्थीनें.

(शाह आलमी) जु. १ सफर १७ — १४४ — श. १६२९ वैशाख वद्य ४, इ. १७०७ मे ९

नागू मान्या यानें जाणावें कीं, तुझ्या थांबून राहण्याच्या कारणाचा अर्ज नजरेखालून गेला. तुझ्या मागण्या लिहून वकिलाबरोबर पाठवाव्या म्हणजे हुजूरकडून त्यांचा विचार होईल. तुझीही प्रकृति सुधारली असेल तर स्वतःच्या ठाण्यावर आपला नायब नेमून स्वतःची योग्य ती जमेत व सरदार घेऊन दरबारच्या उंबरठ्यावर येऊन त्याचें चुंबन घ्यावें. म्हणजे कृपा होईल. जु. १ सफर १७.

(फर्रुखसियर) — १४५ — श. १६३५–४१, इ. १७१३–१९

→नागू मान्या याची बायको राधा

तू पाठविलेला अर्ज मिळाला व समजला. तूं आपलें मन सर्व तऱ्हेनें संतुष्ट ठेवून तात्काल स्वतःच्या पुत्रासह येथें यावें म्हणजे तुझ्या मागण्या पूर्ण होतील.

(आलमगीरी) जु. ४७ जखर २३ — १४६ — श. १६२५ आश्विन वद्य १०, इ. १७०३ आक्टोबर २४

→ खान

औरंगाबाद सुभ्यापैकीं परगणे नळदुर्गच्या रयतेनें समक्ष तक्रार केली कीं, सझावारखानाच्या जागीरीपैकीं गुंजोटी महालाचा अधिकारी यानें आपले स्वार व प्यादे यांपैकीं बरेच चोरांबरोबर देऊन पंधराशे रुपयांचा माल व गुरें गारद केलीं. यामुळें रयत परेशान आहे. तरी त्यानें वाजवी चौकशी करून न्याय व अन्यायाचें परिमार्जन होईल असे निवाडे करावे. म्हणजे पुनः फिर्याद येणार नाही. यांत कांहीं निराळें आढळल्यास हुजूरकडे लिहावें. जु. ४७ जखर २३.

(शाह आलमी) जु. १ मोहरम ५ } १४७ { श. १६२९ चैत्र शुद्ध ७ इ. १७०७ मार्च २९

→ नळदुर्ग किल्ल्याचा जमीदार नरसिंग

या दरबाराकडे पाठविलेली अर्जी नजरेखालून गेली आणि कामिलखानाच्या मध्यस्थीनें विनविलेल्या मागण्यांचा विचार केला. त्यानें बादशाही कृपेनें युक्त झालों असें समजून स्वतःच्या चाकरींत गढून जावें. जु. १ मोहरम ५.

(शाह आलमी) जु. २ (५?) रवल १२ } १४८ { श. १६३० ज्येष्ठ शुद्ध १४ इ. १७०८ मे २२

खाने खानान जफरजंग → नरसिंह

तुझें पत्र पावलें, सेवैकनिष्ठा, सद्भाव व सदुपाय हीं व्यक्त झालीं. आमचे (सैन्याचे) झेंडे यशस्वी रीतीनें नर्मदापार झाले. लवकरच दक्षिणेंत डेरे लागतील आणि बंडखोरांस साजेशी शिक्षा होईल. तू किल्ल्याचें रक्षण व चाकरीचीं कामें यांत खंबीर असावें. सैन्य तिकडे आल्यावर तुझें आचरण व तुझी सद्भावना यांस अनुरूप फळ तुला मिळेल. जुलूस २ रवल १.

(शाह आलमी) जु. २ रजब १६ } १४९ { श. १६३० आश्विन वद्य २ इ. १७०८ सप्टेंबर २०

→नरसिंगराव

कार्यासाठीं जमेत तयार करणें व बादशाही नावाजणीची तजवीज याविषयींचें पत्र पावलें व आशय समजला. हुकूम होतो कीं, सध्या आमचा मुक्काम नांदेड येथें आहे. थोडक्याच दिवसांत आमचे झेंडे हैद्राबादकडे फिरतील. त्यानें शांत मनानें आपल्या योग्य जमेतीसह हुजूरकडे यावें व दर्शन घ्यावें. परिस्थिति व लायकी यांस अनुरूप नावाजणी होईल. हुकुमाप्रमाणें अमल करावा. जु. २ रजब १६ रोजीं लिहिलें.

(शाह आलमी) जु. २ शाबान २४ } १५० { श. १६३० कार्तिक वद्य ११ इ. १७०८ आक्टोबर २८

अमीरुलउमरा नुस्रतजंग → नरसिंगराव

कामबक्षाच्या लोकांकडून तुळजापूर व इतर ठाणीं काबीज केल्याचा लेख पावला आणि पसंत पडला. इतरही ठाणीं कब्जांत आणावीं. तें पसंतीस येईल. त्यामुळें राज्यनिष्ठा व्यक्त होईल. जुलूस २ शाबान २४ रोजीं लिहिलें.

(शाह आलमी) जु. ३ मोहरम ३० } **१५१** { श. १६३१ अधिक वैशाख शुद्ध १ इ. १७०९ मार्च ३१

पहिला शाह आलम → नरसिंग

अमीरुलउमरा नुस्रतजंग याजकडे गुन्हामाफीची विनवणी करणारा लेख पाठविला ती हकीकत समजली. त्याच्या विनंतीवर कृपा झाली. त्याच्या उत्कर्षासाठीं पंजाचा फर्मान पाठविला आहे. सध्या औरंगबेगखान यास (नळदुर्गचा) किल्लेदार मुकरर केला आहे. त्याच्या हवाला किल्ला करावा. त्याच्या मताबाहेर जाऊं नये. मराठ्यांना किल्ला व पेठ यांच्या आसपास आसरा देऊं नये. हवालदाराचें किल्ल्यांत दाखल झाल्याचें पत्र आल्यावर पूर्वीप्रमाणें त्याजवर जमीदारीची, सात शती जात व दोनशे स्वार येवढ्या मनसबेची आणि त्याचा बाप हनवंतराव यास एकशती जात व एकशती स्वार या मनसबेची कृपा होईल. जु. ३ मोहरम ३०. आसफुद्दौला निजामुल्मुल्क याच्या मार्फतीनें.

(फर्रुखसियर) } **१५२** { श. १६३५–४१ इ. १७१३–१९

→ काकरंब्याचा ठाणेदार नरसिंगराव

अर्जदास्त पावली. आशय समजला. शत्रूचे लोक विजयी फौजेचा ताप सहन न होऊन नांदेड समत व वऱ्हाड इकडे भटकत आहेत. हें सैन्य अक्कलकोट तर्फेस जात आहे. आज याचा मुक्काम हलीखेड परगणे निलंगे याजवळच आहे. तेथेंच सैन्याचा तळ पडेल. त्यानें शांत मनानें आपल्या प्रदेशांत खबरदार असावें. यशस्वी फौज जवळ येईल तेव्हां चाकरी करावी. त्याच्या तजविजीनें त्या प्रदेशांतील बंडखोरांस चांगली तंबी देऊं.

(आलमगीरी) जु. २८ रजब ६ } **१५३** { श. १६०७ ज्येष्ठ शुद्ध ७ इ. १६८५ मे ३०

रूहुल्लाहखान → आलमेले परगण्याचा देशमूख जगदेव याची आई नीलव्वा.

पादशाही चाकरी करण्याच्या शर्तींवर नवाब उम्दतुल्मुल्क यांनीं रयतेची आबादानी करण्याविषयीं दिलेलें आश्वासन हें मजकडूनही दिलें आहे असें समजावें. संबद्ध महालांच्या आबादानीविषयीं समाधानी मनानें प्रयत्न करावा. पादशाही चाकरींत चित पद्धतीनें प्रगति करावी. हर तऱ्हेनें प्यादे जमा करावे. नसकची प्याद्याच्याउ मुख्यास पाच रुपये द्यावे, मिरध्यास (मीरदह) सहा आणि शंभरांच्या मुख्यास दहा रुपये ठरविले आहेत. प्याद्यांस तयार करून नारोजी रावो याजकडे पाठवावे. तो त्यांची पहाणी करून व खरेपणा पारखून आमच्याकडे पाठवील. जु. २८ रजब ६.

(आलमगीरी) जु. ३० मोहरम १३ } १५४ { श. १६०८ मार्गशीर्ष वद्य १ इ. १६८६ नोव्हेंबर २०

→ बक्षी उलमुल्क

या वेळीं जगदेवाची आई नीलव्वा हिनें जाहीर केलें कीं, आलमेले परगण्यांतील देवगावचा मोकदम गोविंदा यानें जगदेवाच्या जमीनदारीपैकीं तीन गावें फौजदार व जागीरदार यांशीं संगनमत करून ताराज केलीं आणि नकद, जिन्नस व अगणित गुरें लुटून नेलीं. तरी याबाबत चौकशी करून कायद्याप्रमाणें हकदारांचे हक्क त्यांस पोचवावे; म्हणजे ते फिर्याद येणार नाहींत. जु. ३० मोहरम १३.

(आलमगीरी) जु. ३० मोहरम १३ } १५५ { श. १६०८ मार्गशीर्ष वद्य १ इ. १६८६ नोव्हेंबर २०

विजापूर सरकारापैकीं आलमेले परगण्याचा देशमूख जगदेव याची आई नीलव्वा हिनें विनंति केली कीं, उपर्युक्त परगण्यांतील देउळगावचा मोकदम परगोंडा हा परगण्याच्या सरमोकदमीमध्यें गोंधळ उत्पन्न करून रयतेस त्रास देत आहे. त्याच्या तीन मनुष्यांस हिशेब ठेवूं देत नाहीं. आणि कांहीं बंडखोरांसह या गावावर येऊन त्या मनुष्यांच्या घरांतून नकद, जिन्नस व गुरें मिळून एक लाख रुपये त्यानें पळविले. तरी किफायतखानास हुकूम व्हावा कीं, तपास करून हक्कदारांचा हक्क त्यांस द्यावा. हुकूम झाला कीं, किफायतखानास पाठवावें. जु. ३० मोहरम १३.

(आलमगीरी) जु. ३० जवल ११ } १५६ { श. १६०९ चैत्र शुद्ध १३ इ. १६८७ मार्च १६

रूहुल्लाहखान → आलमेले परगण्याचे देशमूख नीला व जगदेव

तुझ्या विनंतीवरून कळविण्यांत येतें कीं, मन समाधानी ठेवून विजापुरास यावें. तेथें आल्यावर तुझ्या कित्येक मागण्यांचा निकाल होईल. हा लेख कौल समजून स्वतः हुजूरकडे यावें. बहूत काय लिहिणें. जु. ३० जमादिलावल ११.

(आलमगीरी) जु. ३९ शाबान १ } १५७ { श. १६१७ फाल्गुन शुद्ध २ इ. १६९६ फेब्रुवारी २४

हादीखान →दारुज्जफर (विजापूर) सरकार व सुभा यांतील आलमेले परगण्याचा देशमूख जगदेव

तू अधिकाऱ्यांची वाईट वागणूक व वाईट व्यवधानें यांचें भय घेतलें आहेस. म्हणून हें आश्वासनपत्र देत आहे. तू मन समाधानी ठेवून दिवाणाच्या कचेरींत येऊन हजर हो. तुला फर्जंद समजून पादशाही प्रदेशाची ज्यांत आबादी असेल तें अमलांत आणूं. जु. ३९ शाबान १.

(आलमगिरी) जु. ९ } हि. १०७७ रखर ११ } १५८ { श. १५८८ आश्विन शुद्ध १३ { इ. १६६६ सप्टेंबर ३०

मीर मुहम्मद शफी बनसाळे वगैरेचा ठाणेदार याचे गुमास्ते यांस दस्तक कीं, सीवा आपल्या मुलासह हुजूरहून पळाला आहे. या बाबतींत तो व त्याचा मुलगा यांस पकडण्याविषयीं हुकूम सुटला आहे. आणि येथून अहदी लोकांची नेमणूक केली आहे. तरी हें दस्तक पोहोचतांच स्वतःच्या गुमास्त्यांस ताकीद करावी कीं, एकमेकांची सोवत करून बनसाळ्याच्या बाबतींत खबरदार असावें. या बाबतींत ताकीद जाणावी. जु. ९, हि. १०७७ रखर ११.

(आलमगीरी) जु. १२ जवल १४ } १५९ { श. १५९१ आश्विन वद्य १ { इ. १६६९ सप्टेंबर ३०

औरंगजेब → बाळापूरचा जागीरदार अम्जद कादिरी साहेब.

सय्यिद मन्सूरखानानें बादशाहास विनंती केली कीं, कोणी जमीनदार राजा शिवाजीशीं संगनमत करून त्याच्या मध्यस्थीनें बादशाहाची भेट घेऊं इच्छीत आहे. मी व हिलालखान यांच्या मध्यस्थीनें त्या जमीनदारानें बादशहाची भेट घ्यावी असें मी घडवून देतों. तरी हुकूम होतो कीं, महाराजा जशवंतसिंह स्वतः मध्यें पडून आपलाच एक नोकर त्या जमीनदाराकडे पाठविणार आहे. तेव्हां जशवंतसिंहानें पाठविलेल्या मनुष्यास हुकूम सादर होईल कीं, त्यानें मन्सूरखान व हिलालखान यांच्यासह त्या जमीनदारास घेऊन यावें. जु. १२ जवल १४.

(आलमगीरी) जु. ४७ } मोहरम २ } १६० { श. १६२५ ज्येष्ठ शुद्ध ३ { इ. १७०३ मे ८

जुल्फिकारखान → अमरसिंघ

अमरसिंघ यांनीं जाणावें कीं, फरासखान्यांत मुंजाची आवश्यकता आहे. म्हणून लिहिलें जातें कीं, हा लेख पावल्यावर शक्य त्या रीतीनें व्यवस्था करावी. या बाबतींत ताकीद जाणावी. जु. ४७ मोहरम २. [पाठीवर*] मुंज वगैरेच्या मागणीबद्दल खान बहादुर नुसतजंगाचें पत्र जु. ४७ मोहरम ७ ला मिळालें.

(आलमगीरी) जु. ४८ } रमजान ७ } १६१ { श. १६२५ पौष शुद्ध ९ { इ. १७०४ जानेवारी ४

दंडराजपुरीसंबद्ध शकरखोऱ्यापैकीं बारा बैल येत आहेत. असें समजतें कीं, त्या साहेबाच्या ठाण्यावर कोणी त्यांना अडकविलें आहे. हे बैल सरकारपैकीं केशवदास

मेहत्यातर्फे इनायतुल्लाहखानाकडे जात आहेत. म्हणून आशा आहे कीं, सरकारच्या सर्व लोकांस ताकीद करून तो ते बैल आपल्या हद्दींतून सुरक्षितपणें पलीकडे पोचवील, म्हणजे ते उच्च लश्करास पावतील. अधिक काय तसदी द्यावी. [पाठीवर*] गुलाबराव वकील याचें महाजनांचे बैल बहादुरगडास पोचविण्याविषयीं पत्र. जु. ४८ रमजान ७.

(आलमगीरी) जु. ४९ रमजान २९ — १६२ — श. १६२६ माघ शुद्ध १ / इ. १७०५ जानेवारी १५

अब्दुल गफूरखान किल्लेदार अहमदनगर → ?

कोणीही आडकाठी न आणण्याच्या इशाऱ्यासह दारू घेऊन जाण्यासाठीं माणसें पाठविल्याविषयीं पत्र आलें तें पावलें. त्याप्रमाणें दारू खरेदी करून त्यांचे हवाला केली आहे. भरवसा आहे कीं, ते ती पोचवितील. आशा आहे कीं, सध्या पत्र पाठवून आपली हकीकत कळविली तशी नेहमी लिहीत जाल. जु. ४९ रमजान २९.

(अहमदशाह) जु. १ जिल्हेज १६ — १६३ — श. १६७० मार्गशीर्ष वद्य ३ / इ. १७४८ नोव्हेंबर २७

राजा बलवंतसिंगाचें कुशल असो. सध्या प्रकट झालें कीं, नारायण दीक्षित मरण पावले. त्यांचे मुलगे वासुदेव व बाळकृष्ण आणि पुतण्या केशवभट बनारसला राहतात. बाळाजी बाजीरावानें त्यांच्या विषयीं लिहिलें आहे. म्हणून लिहिलें जातें कीं, त्यांची विचारपूस व त्यांना साह्य करणें आवश्यक जाणावें. म्हणजे तें आनंदानें खैरातींत गढून जातील. गरजगो लोकांच्या (लबाडांच्या) बोलण्यावर विश्वास ठेवूं नये. यात्री व रहिवासी यांच्या बैतुलमालविषयीं दरगाहाच्या परवान्याप्रमाणें माफी दिलेली आहे. बैतुलमालच्या सेवकांना ताकीद करावी कीं, त्यांनीं कोणासही त्रास देऊं नये. जु. १ जिल्हेज १६.

---

१६४ — श. १६९३ चैत्र शुद्ध १२ ते मार्ग. वद्य १० / इ. १७७१ मार्च २७ ते डिसेंबर ३१

घोघा आणी भावनगर बंदराचा अधिकारी भवानसिंग याचा मुलगा रावळ अखेयजी → रावसाहेब (माधवराव बल्लाळ)

आपल्या सुदैवानें खंबायतचा नबाब मोमीनखान याच्या हातून घोघा किल्ला माझ्या सैन्यानें घेऊन आपल्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिला. सध्या इंग्रजांनीं तलाजा किल्ला कोळ्यांकडून जिंकून नबाब मोमीनखान याच्याकडे सुपूर्त केला आहे. पुरेशा

शिबंदीसह आपला अधिकारी घोघा किल्ल्याच्या संरक्षणास राहिला नाहीं तर तो पुन्हा परत घेतला जाईल अशी शंका येऊन मला काळजी वाटते. घोघा किल्ल्याचा बंदोबस्त चांगला ठेवावा अशी माझी आपणास विनंती आहे. देवीराम देवी यास आपणाकडे रवाना केलें आहे. तो आपणास सर्व वर्तमान साद्यंत सांगेल.

रवल २९ नंतर | १६५ | श. १६९८ ज्येष्ठ शुद्ध १
इ. १७७६ मे ८

नबाबसाहेब प्रकाशमान व शोभायमान असोत. सध्या हरी पंडिताचें पत्र आलें कीं, रवल २९ ला सखाराम हरी व मानाजी फाकडे व इतर सोबती आपली जमेत घेऊन रघुनाथरावापासून वेगळे होऊन या बाजूस आले. रघुनाथराव सुरतेस गेले. त्यांच्या बरोबर दोनशे सेवक व शिपाई आहेत. त्यांच्या मनांत काय आहे तें पहावें. इतर हकीकत, सखाराम पंडीत, बाळाजी पंडीत व किशनराव यांच्या लिहिण्यावरून उघड होईल. तें पत्र जिवाजी पंडीत आपणाकडे पाठवील.

---

१६६ | श. १६९९—१७००
इ. १७७७—१७७८

नबाब साहेबांचें कुशल असो. आपण हैदर नायकाच्या तंबीवर नजर देऊन हरी-पंडितासह उसंत न घेतां त्वरा करून या बाजूस आला. परंतु काळतोंड्या बंडखोर तिकडे पळाला. आतां पुढें येईल तर त्यास तंबी देणें आपणांस कठीण नाहीं. आम्हांस हें पूर्ण माहीत आहे कीं, तो केव्हांही मुकाबला करणार नाहीं. परंतु संधी साधून अनिष्ट हालचाली करील. आतांही जर सावनूरबंकापूरचा तसेंच अमीरउल् उमराचा मुलूख खराब करण्यांत तो गढून जाईल तर आपण त्या बाजूस जाऊन त्याचा नाश करण्यांत गढून जाल यांत संशय नाहीं. या बाजूनेंही फौज रवाना करण्याचा विचार आहे. उर्वरीत मजकूर जिवाजी रघुनाथ यास लिहिला आहे. तो आपणांस सांगेल.

---

१६७ | श. १७१०—१७१३
इ. १७८८—९१

सुरत येथील डच वखारीचा डायरेक्टर मार्टिन जॅान बोसमान→ रावसाहेब (सवाई माधवराव)

माझा प्रतिनिधि आपणांकडून निरोप, आपलीं पत्रें व मानाचीं वस्त्रें घेऊन आला. त्यानें मला फार आनंद झाला व आपली कंपनीबद्दल सद्भावना आहे याची

मला खात्री पटली. आमचीही आपल्याबद्दल तीच भावना आहे याची खातरजमा असो द्यावी. सालोसाल आपणास भेटीदाखल घोडे वा इतर वस्तू वा नकद या रूपानीं पाच हजार रुपये पोचवावेत अशी माझी इच्छा आहे. कंपनीच्या जहाजांना व मालवाहू गलबतांना मार्गाचे कौल मिळून त्यांचा प्रवास अडथळ्याशिवाय होण्यासाठीं दरोगे, सुभेदार, सरसुभेदार यांजकडून बावटा मिळण्याविषयीं कसें आचरण करावें याबाबत माझ्या प्रतिनिधींना सूचना केल्या आहेत. कौलपत्रांनीं दोन्ही पक्षांतील एकता अधिकाधिक वाढेल अशा दृष्टीनें तीं मिळावींत.

---

१६८ { श. १७०१ इ. १७७९

सुरत बंदरच्या फ्रेंच कंपनीचे डायरेक्टर जनरल यांचें कुशल असो.

तुम्ही, तुमचे बादशाह व आम्ही यांत दोस्ती, विश्वास व ऐक्य असून सुद्धा तुमच्याकडून पत्रें न आल्यामुळें आम्हांस समाधान वाटत नाहीं. उलट कमालीचें आश्चर्य वाटत आहे. आतां आपलें कुशल समजावें म्हणून फार उत्सुक आहोंत असें समजून वरचेवर पत्रें पाठवून आम्हांस कुशल कळवून समाधान देत असावें. या वेळीं फ्रेंच कंपनीचे डायरेक्टर जनरल शिवालियार यांनीं मीर जैनुल आबिदीन नावाच्या मनुष्यास तुमच्या बादशाहाच्या इच्छेनुरूप एक करारनामा देऊन पाठविलें. त्याचा आशय असा— आमची कर्तबगारी पाहून व आमच्या बादशाहाशीं सुलूख ठेऊन जर आमची मागणी केली आणि खर्चाची व इतर वस्तूंची मदत केली, तसेंच आम्हांस आपले सेवक व सदिच्छा बाळगणारे समजलात तर तात्काळ इंग्रजांना तंबी देऊन पुढें आपल्या सेवेस तत्पर राहण्यांत आम्ही सुख मानूं. या बाबतींत आम्ही बादशाहाकडून पक्कें वचन देत आहों. आणि दुसरें असें कीं आपली व आमची एकी. तसेंच आमची जमात, बादशाह व हिंदुस्थानांतील लोक यांतील करार पक्का होणें यांची खबर इंग्रजांना समजली तर ते नीट विचार करून पुढें येतील व तहाची विनंती करतील. तरी त्यांची विनंती मान्य करावयाची नाहीं. तुमची तयारी व इच्छा असेल तर फ्रेंच शिपाई सुरत बंदरांतील युद्धाच्या सामानासह कोणा तरी सरदाराच्या आधिपत्याखालीं आपल्या सेवेस येतील. या करारनाम्यासह खान सुसमयीं आमच्या सेवेस हजर झाला. आम्ही करारनामा आमचे नजरेखालीं घातला आणि त्यांतील सर्व आम्हांस तपशीलवार समजलें. त्यांतील मजकुरानें सुख वाटलें. फार दिवसांपासून इंग्रज कंपनीच्या सरदारांचें आमच्याशीं सख्य आहे व आमच्याविषयीं त्यांच्या मनांत सद्भाव आहे. आमच्याशीं झालेला करार ते पाळीत आहेत. परंतु एखादे वेळीं जेव्हां करार मोडून विरोधी भाव दाखविला तेव्हां तें ध्यानांत येतांच त्यांना तंबी देण्यासाठीं सरदारांची नियुक्ती करून वरचेवर त्यांचा मोड केला. हीं खबर कलकत्त्याच्या गव्हर्नराला कळतांच त्यानें कर्नल अप्टन यास वकिली करण्यासाठीं आमच्या—

कडे पाठविलें. त्यानें येशूच्या व धर्माच्या नांवानें करारनामा लिहून दिला आणि सलूक केला. पण थोड्या वेळांत पुन्हा त्यांनीं बंड उभारलें. त्याही वेळेस कृतकार्थाचें फळ त्यांस मिळालें. इंग्रजांची लाचारी व खजील होणें याची बातमी तुमच्याकडे आली असेल... बारकाईनें पाहतां इंग्रज लबाड, बेइमानी व संधीसाधू आहेत असें लक्षांत आलें. म्हणून त्यांचा नाश करण्याच्या इराद्यानें जमिनीवरून व हिंदुस्थानांतून त्यांना घालविण्याचा आम्ही बेत केला. हा जो बेत केला त्याप्रमाणें आमचे सरदार, नबाब आसफजाह (निजाम), मुधोजी भोसले व हैदर अलीखान यांनीं लढाई सुरू केली आहे. थोड्याच काळांत इंग्रजांस चारी बाजूंनीं जेरीस आणूं व त्यांच्या कृत्यांबद्दल त्यांना योग्य सजा देऊं आणि जमिनीवरून त्यांना हाकलून देत आहों. इंग्रजांनीं फ्रेंच लोक व त्यांचा बादशाह यांशीं तह करून फ्रेंचांच्या हिंदुस्थानांतील कोठ्या हस्तगत केल्या हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे. सध्या इंग्रज गर्वानें फुगले आहेत. तरीही फ्रेंच लोक हिंमत व शौर्य दाखवीत आहेत आणि हे त्यांच्या हिमतीस उचितच आहे. या वेळीं सर्व बाजूंनीं लढाईचा हंगाम आहे. या वेळीं तुमच्या लोकांच्या आगमनाची बातमी आली तर फार चांगलें होईल. असा समय प्रयत्न करूनही येणार नाहीं. आपण शहाणे, दूरदर्शी व त्यांचे कट्टे शत्रू आहां हें लिहिण्याची जरूरी नाहीं. त्याप्रमाणें उपर्युक्त खानानें तुमचें शौर्य व वचन पाळणें व तहाचा पक्केपणा आम्हांस सांगितला. म्हणून आपल्या विनंतीप्रमाणें खर्चाची व्यवस्था करण्याच्या करारनाम्याची याद खाशाच्या (आमच्या) शिक्क्यासह खानाबरोबर पाठविली आहे. आतां करारनाम्याची याद पोहोचतांच दोन हजार फ्रेंच शिपाई, लढाईचें सामान व अनुभवी सरदार यांसह ताबडतोब करारांतील तपशिलाप्रमाणें हुजुराकडे पाठवून दिले पाहिजेत. हें काम नजरेस आलें म्हणजे अधिक विश्वास निर्माण होईल आणि आपण (फ्रान्सचा बादशाह) व आम्ही यांत ऐक्य व दिलसफाई पक्की होऊन इंग्रजांना तंबी देऊन हाकून देण्याबाबत उपाययोजना होईल. आपली एकदिली व ऐक्य यांमुळें दोन्ही बाजूंच्या फायद्याचे पुष्कळ मनसुबे घडून येतील, या बाबतींत पुष्कळ मजकूर खानास सांगून पाठविला आहे. तो तुम्हास कळवील. तात्पर्य हें कीं, करारनाम्याप्रमाणें २००० शिपाई, लढाईचें सामान व सरदार रवाना करावें. अधिक काय लिहावें.

---

१६९ — श १७१०--११ / इ. १७८८--८९

रावसाहेबांचें कुशल असो.

मथुरा वगैरे किल्ल्यांच्या विजयाची माहिती असलेलें पत्र पोहचून आपणांस समाधान वाटलें असेल. हा विजय परमेश्वरी कृपा व आपली मदत यांचा परिणाम आहे. याच्या पूर्वीचीं पत्रें पाठविलीं तीं पोहचून आमची दोस्ती व कैफियत यांचा तपशील

हरी पंडीत व गोविंदराव यांच्या लिहिण्यावरून स्पष्ट झाला असेल. आपलें कल्याण व ऐश्वर्य यांची वाढ होवो अशी इच्छा आहे. लवकरच तुमची आमची भेट होईल. आमच्या मनात छक्केपंजे [असल्यास ते] आमची कैफियत व हरी पंडिताचें सांगणें यांवरून स्पष्ट होईल. या बाजूचे नजरेचे इतर जिन्नस उपर्युक्त पंडिताबरोबर पाठविले आहेत. ते स्वीकारून समाधान व्यक्त करावें. नेहमी स्वतःच्या लोकांच्या उत्तम कार्याची माहिती देणारीं पत्रें पाठविल्यानें आम्हांस अधिक समाधान होईल.

---

१७० (श. १७१३ आश्विन वद्य ७ / इ. १७९१ आक्टोबर १९)

रावसाहेबांचें कुशल असो.

आक्टोबर १८च्या रात्रीं नंदीदुर्ग उर्फ गर्दूनशिकोह या शत्रूच्या भरभक्कम व अजिंक्य किल्ल्यावर हल्ले करून आमच्या सैन्यानें तो सर केला. किल्ल्यांतील सैन्य भीतीनें पळून गेलें. रात्रीचे वेळीं कांहीं जण अंधारांत किल्ल्याच्या कंगोऱ्याला दोरी बांधून व तिला धरून खाली उतरले व फरारी झाले. कांहीं मारले गेले आणि किल्लेदार व कांहीं लोक कैद झाले. हा जो ताजा विजय झाला तो पुढील विजयांचा अग्रदूत आहे. याच्या योगानें आपल्याला आनंद होईल. हा किल्ला जिंकण्यास जरी कठीण होता तरी असा भक्कम किल्ला शत्रूच्या हातीं राहणें योग्य नव्हतें. त्या योगानें आपल्या गुरमकोंड्याहून येणाऱ्या व्यापाऱ्यांच्या दळणवळणांत व्यत्यय येऊन नुकसान झालें असतें. तें आपणा तिघांच्याही (इंग्रज, मराठे व निजाम) फायद्याचें नव्हतें. म्हणून आवश्यक प्रयत्न करून तो त्रास संपविला. आमचा असा विश्वास आहे कीं, लमाणांकडून आमच्याकडे धान्याची रसद पोहोचण्याबाबत अडचण होणार नाहीं आणि या मोहिमेचे उद्देश आपल्या इच्छेप्रमाणें फलद्रूप होतील. आशा आहे कीं, आपल्याकडून खुशालीचीं पत्रें येतील. अधिक काय लिहिणें.

टीपा

१-३९

(१) हे १-३९ कागद पानिपतपूर्व व पानिपतोत्तर काळांतील मुख्यतः शाहजहानाबाद म्हणजे दिल्ली येथून पाठविलेलीं व पेशव्यांकडे आलेलीं बातमीपत्रें अथवा अखबार आहेत. पेशव्यांकडे आलेले हे अखबार वस्तुतः एलिएनेशन कचेरींतील पेशवे दप्तरांत असावयास पाहिजे होते. पण इंग्रजपूर्वकाळांत एतद्देशीय सत्ताधाऱ्यांनी उत्पन्न केलेलीं बहुतेक सेवापदें आनुवंशिक बनत व त्यामुळें विशिष्ट पदाधिकारी या नात्यानें त्यांनीं केलेला किंवा त्यांजकडे आलेला पत्रव्यवहार अनेक वेळां त्यांच्या घरींच राही. नाना फडणीस, पेशव्यांचे दिल्ली व इतर ठिकाणचे वकील हिंगणे आणि हैद्राबादचे वकील काळे, शिंद्यांचे वकील गुळगुळे, त्यांचे एक कारभारी काळे (दाभोळकर), होळकरांचे दिवाण चंद्रचूड इत्यादींकडे आलेला बहुतेक पत्रव्यवहार त्यांच्या घराण्यांतच राहिला. तद्वत् पारसनिसांकडे आलेला कांहीं पत्रव्यवहार त्यांच्या घरीं, तर कांहीं पेशवे दप्तरांत राहिला. पुण्यांत राहणाऱ्या पारसनिसांच्या दोन घराण्यांतील कांहीं कागद फार म्हणजे सुमारें ४५वर्षांपूर्वी मंडळांत आणले होते. पुढें त्यांपैकीं कै. बाळासो पारसनीस यांनीं आपले कागद परत नेले. पण त्यांपैकीं कांहीं त्यांनीं मला प्रदान केले होते.शिवाय मंडळानें जुनीं पुस्तकें विकणारे श्री. पां. रा. ढमढेरे यांजकडून श. १८८१ (इ. १९५९) मध्यें कागदपत्रांचा गळाठा विकत घेतला त्यांत पुण्यांतीलच कोणत्या तरी पारसनीस घराण्याकडे मूलतः असलेलीं बातमीपत्रें मिळालीं. कै. बाळासो पारसनीस यांच्याकडे असलेला व त्यांनीं दाखविलेला फार्सी कागदांचा संग्रह महाराष्ट्र (पूर्वाच्या मुंबई) शासनानें विकत घेतला. तो संग्रह आतां महाराष्ट्र शासनाच्या मुंबईच्या पुराभिलेखागारांत आहे.

(२) एवंच, पेशव्यांच्या पारसनिसांकडे आलेले सरकारी कागदपत्र आतां एलिएनेशन कचेरींतील पेशवे दप्तर, मुंबईचें पुराभिलेखागार आणि भा. इ. सं. मंडळ या तीन ठिकाणीं विभागले गेले आहेत. कै. बाळासो सांगत कीं, रामडोह गांवीं आमच्या घरांत आणखीही फार्सी कागद आहेत. तसें असेल व त्यांत बातमीपत्रें असल्यास हा संग्रह ४ ठिकाणीं विभागला गेला आहे असें होईल. यांपैकीं येथें प्रसिद्ध होत असलेले ३९ व ऐतिहासिक फार्सी साहित्य, दुसरा खंड यांत 'काबूलचीं बातमीपत्रें' या मथळ्याखालीं प्रकाशित झालेले ५ मिळून ४४ कागद मी प्रसिद्ध केले आहेत. कै. जदुनाथ सरकार यांनीं पुराभिलेखागारांत असलेल्या फार्सी बातमीपत्रांपैकीं कांहीं कागदपत्र **पर्शियन रेकॉर्ड्स ऑफ मराठा हिस्ट्री** या नांवाखालीं दोन भागांत अनुवाद-

रूपानें प्रकाशित केले आहेत. याशिवाय, पेशवे दप्तरांतील कागदपत्रांपैकीं कांहीं बातमीपत्रें प्रो. (आता डॉ.) भ. द. वर्मा आणि डॉ. नाझिम यांनीं अनुक्रमें **न्यूज लेटर्स ऑफ दी मुघल कोर्ट** आणि **मिसलेनिअस पर्शिअन पेपर्स** या नांवांनीं प्रकाशित केलीं आहेत.

(३) येथें प्रकाशित होत असलेल्या बातमीपत्रांना फार्सीमध्यें अखबार ही संज्ञा आहे. त्या शब्दाचा यौगिक अर्थ बातम्या. या बातम्या ज्या काग़दावर लिहीत त्यालाही अखबार हीच संज्ञा आहे. जे अखबार मोगली दरबारांत तयार होत, त्यांना अखबारे दरबारे–मुअल्ला–पाला अशी संज्ञा होती. हे अखबार तसे नसल्यामुळें यांवर फक्त अखबार किंवा त्याचे बहुवचन अखबारात असें म्हटलें आहे आणि त्यांचें संपादनकार्य दिल्लीस चालत असल्यामुळें त्यांना कित्येक ठिकाणीं शाहजहानाबादेचे अखबार म्हटलें आहे.

(४) हे अखबार निरनिराळ्या पण साधारणतः ४० × १३ सेंटिमीटर लांबी-रुंदीचे व सामान्यतः सुरक्षित पण कुठें कुठें प्रारंभीं व शेवटीं पाणी लागून सडलेले आणि मधूनमधून कसरीनें खाल्लेले आहेत. हे कधीं कधीं छोटे म्हणजे सुमारें २०।२५ ओळींचे आणि कधीं कधीं फार मोठे म्हणजे ४ बंदांचे असतात. उदा.:—१५, १६, १७, १८ हा एकच अखबार ४ बंदांचा असून त्याच्या एकंदर ओळी १९३ आहेत. प्रत्येक ओळींत साधारणतः २० शब्द आहेत असें धरलें तर एकंदर अखबार सुमारें ४००० शब्दांचा होतो. यांतील अक्षर अतिशय बारीक व शिकिस्ता पद्धतीचें असल्यानें वाचण्यास दुर्बोध आहे.

(५) हे अखबार एका विशिष्ट पद्धतीनें लिहिले आहेत. याच्या अगदीं पहिल्या पानावर हा अखबार कुठला, कोणास पाठविलेला, कोणत्या तारखेपर्यंतची माहिती देणारा व किती पानांचा आहे हें सांगून प्रत्येक पानावर त्याचा क्रमांक घातला आहे. पहिल्या पानावर ग्राहकाचा, बहुधा त्याच्या उपाधींनीं उल्लेख केला आहे. नंतर पहिल्या परिच्छेदांत अगदीं लगतच्या पूर्वीच्या अखबारांत दिलेल्या माहितीचा सारांश देऊन तो पाठविल्याची तारीख नमूद केली आहे. या परिच्छेदावरून प्रस्तुत अखबाराच्या अगोदरच्या अगदीं लगतच्या अखबाराची तारीख व सार आपोआप कळून येतें. हा सारांश कधीं कधीं केवढा असतो हें क्र. ३३ च्या अखबारावरून लक्षांत येईल. हा अखबार सुमारें साडे तीन बंदांचा आहे. त्यांतील पहिल्या बंदाच्या छापील ७४ ओळी आहेत. पैकीं ४५ ओळी प्रस्तुत अखबारापूर्वीच्या लगतच्या अखबाराचा सारांश आणि २९ ओळी पुढील हक़ीक़त आहे. या सारांशावरून याच काळांत आणखी निदान १६ अखबार तरी पाठविले होते असें दिसतें. त्यांची नोंद पुढें दिलेल्या सूचींत विनाक्रमांक केली आहे. अशा अखबाराचा निर्देश त्याच्याच लगतच्या त्या खालच्या अखबारांत आला आहे. शिवाय येथें न नोंदलेले अखबार असतील ते निराळेच. कारण प्रत्येक वर्षाचे झाडून सारे अखबार मिळालेले नाहींत. या अखबारांपैकीं प्रत्येक पूर्ण आहे असें नाहीं.

उलट बहुतेक सर्व अपूर्ण आहेत. केवळ ८ व ९, १० व ११(?), १३ व १४, १५ ते
२९ व ३० एवढेच काय ते पूर्ण असून उरलेले अपूर्ण आहेत. त्यांतही गम्मत अशी
यांतील ३८ व ३९ हे अखबार एका पूर्ण अखबाराचें १ लें व ३ रें अशीं दोन प
असून त्यांचें मधलें पान मंडळानें इ. १९५९ मध्यें रद्दी विकत घेतली त्यांत मिळ
आहे. याचा अर्थ असा कीं, येथें जे अखबार अपूर्ण आहेत ते महाराष्ट्र सरकारच
दोन लेख्यशालांत असलेले अखबार तपासले असतां पूर्ण होण्याची शक्यता आहे. त
तपासणी केव्हां होईल ती होवो. येथें पूर्णापूर्ण अखबारांची सूची देऊन ठेवितों.
सूचीवरून कांहीं अखबारांचीं मुळांत किती पानें होतीं व त्यांपैकीं कोणतीं येथें प्रसि
झालीं हें समजतें. पण कांहींविषयीं तेंही समजत नाहीं. कारण तीं एक तर मधलींच प
आहेत किंवा पहिल्या पानावरील बंदांची संख्या सांगणारा मजकूर सडून गेला आ
तथापि क्र. १ ते ७ हे अखबार एकाच गटांतील दिसतात. पण त्यांचा पहिला
किंवा पहिलें पान अद्यापि मिळालेलें नाहीं.

क्र.	काल	पानाचा क्रम	क्र.	काल	पानाचा क्रम
१	जु. ३ जवल २;	मधलें	१७	जु. ५ रज्जब ३	४ पैकीं ति
२	जु. ३ जवल ३।४;	मधलें	१८	जु. ५ रज्जब ३	४ पैकीं चौ
३	जु. ३ जवल ५;	मधलें		जु. ५ रज्जब शेवट (२९)	
४	जु. ३ जवल ६;	मधलें	१९	जु. ६ शाबान १७	२ पैकीं पहि
५	जु. ३ जवल ९;	मधलें		हि. ११७४ सफर २७	
६	जु. ३ जवल ९;	मधलें	२०	हि. ११७४ जु. १ रवल १	पहि
७	जु. ३ जवल ९;	मधलें		हि. ११७४ शव्वाल २२	
	जु. २ जवल १८;	?	२१	हि. ११७४ जिल्काद ७	पहि
८	जु. २ जखर ८;	२ पैकीं पहिलें	२२	हि. ११७४ जिल्काद ७	मध
९	जु. २ जखर ८;	२ पैकीं दुसरें	२३	हि. ११७६ रमजान २	आंशिक दुस
	जु. २ जखर २१;		२४	हि. ११७६ रमजान २	आंशिक तिस
१०	जु. २ जखर २१ नंतर	२ पैकीं पहिलें	२५	हि. ११७६ रमजान ३०	४ पैकीं पहि
११	जु. २ रज्जब १;	२ पैकीं दुसरें		हि. ११७६ रमजान १४	
१२	जु. २ रज्जब ३;	मधलें	२६	हि. ११७६ रमजान ३०	४ पैकीं दुस
	जु. ५ रवल २०,		२७	हि. ११७६ रमजान ३०	४ पैकीं तिस
१३	जु. ५ रखर १८;	२ पैकीं पहिलें	२८	हि. ११७६ जिल्हेज २८	३ पैकीं पहि
१४	जु. ५ रखर १८;	२ पैकीं दुसरें		हि. ११७६ जिल्हेज ६	
	जु. ५ जखर ५		२९	हि. ११७७ मोहरम २०	२ पैकीं पहि
१५	जु. ५ रज्जब ३;	४ पैकीं पहिलें		हि. ११७६ जिल्हेज २८	
१६	जु. ५ रज्जब ३;	४ पैकीं दुसरें	३०	हि. ११७७ मोहरम २०	२ पैकीं दुस

क्र.	काल	पानाचा क्रम	क्र.	काल	पानाचा क्रम
३१	हि. ११७७ रखर ३ हि. ११७७ रवल १७	४ पैकीं पहिलें	३५	हि. ११७७ जिल्हेज २८ हि. ११७७ जिल्काद १९	३पैकीं पहिलें
३२	हि. ११७७ रखर ३	४ पैकीं दुसरें	३६	हि. ११७७ जिल्हेज २८	३ पैकीं दुसरें
३३	हि. ११७७ शाबान २९ कालनिर्देश नसलेला	३ पैकीं मधलें	३७	हि. ११७८ जवल २९ हि. ११७८ जवल १३	३ पैकीं पहिलें
३४	हि. ११७७ शव्वाल २ हि. ११७७ शाबान शेवट (३०)	३पैकीं पहिलें	३८	हि. ११७८ रमजान १७ हि. ११७८ शाबान २५	३ पैकीं पहिलें
			३९	हि. ११७८ रमजान १७	३पैकीं तिसरें

(६) प्रस्तुत बातमीपत्रें कोणाकडून आलीं बरें ? कै. सरकारांनीं हीं बातमीपत्रें मनसाराम नांवाच्या माणसाकडून आलीं, असें **पर्शियन रेकॉर्ड्स ऑफ मराठा हिस्ट्री** या मालेच्या पहिल्या खंडांत नमूद केलें आहे. डॉ. वर्मा व डॉ. नाझिम यांनीं मूळ प्रेषकां-विषयीं कांहींच लिहिलेलें दिसत नाहीं. मी येथें प्रसिद्ध केलेल्या ३९ अखबारांपैकीं २६ अखबारांवर आरंभीं **श्रीराम** असें देवतानाम नागरी लिपींत आलें आहे. यावरून प्रेषक हिंदू होता, हें उघड दिसतें. पण या अखबारांपैकीं कांहींवर फार्सी लिपीमध्यें खेमकरण मनसाराम असा चौकोनी शिक्का आहे. यामुळें यांचा प्रेषक खेमकरण मनसाराम हा स्वतः किंवा त्याचा वंशज यांपैकीं कोणी तरी असला पाहिजे. जदुनाथ सरकारांनीं दिलेलें नांव अर्धवट आहे, हें यावरून स्पष्ट होईल. हा खेमकरण मनसाराम किंवा त्याचा वंशज बातमीपत्रें पाठविण्याचें काम नेमकें केव्हांपासून करी, हें समजण्यास मार्ग नाहीं. विविध कालांतील बातमीपत्रांचीं हस्ताक्षरेंही विविध आहेत. तथापि त्यांवरून प्रेषकांच्या कालाविषयीं निश्चित सांगतां येण्यासारखें नाहीं.माझ्या कल्पनेप्रमाणें खेमकरण मनसाराम नांवाचीं बातम्या पुरविणारी एक पेढी असली पाहिजे. त्या पेढीचे नोकर बातमीदार वल्ख–बुखारा–कंदाहार–काबूलपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेले होते. त्यांजकडून आलेलीं बातमीपत्रें या पेढीच्या दिल्लीच्या मुख्य कचेरींत एकत्र केलीं जात व बातम्यांचें वर्गीकरण करीत. नंतर निरनिराळ्या दरबारांना त्यांच्या आवश्यकते-प्रमाणें बातम्या पुरविणारीं लहान मोठीं बातमीपत्रें तयार करून तीं त्या त्या दरबाराकडे पाठवीत. या कामाबद्दल त्या त्या दरबाराकडून उणाअधिक मोबदला मिळे. येथें प्रसिद्ध होत असलेल्या बातमीपत्रांत कांहीं ठिकाणीं यामुळेंच पैशाची मागणी केलेली दिसते. इतक्या जुन्या काळांत बातम्या पुरविणारी एखादी पेढी असूं शकेल कां अशी शंका येईल. पण आनंदजी कल्याणजी सारखी सावकारी पेढी सुमारें २०० वर्षांपूर्वींपासून चालत आलेली आपण पाहातों. मग खेमकरण मनसाराम याची बातमी पुरविणारी पेढी असण्यास काय हरकत आहे ? सारांश, मला तर असें दिसतें कीं प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया, रूटर वगैरे हिंदी–युरोपी पेढ्यांप्रमाणें खेमकरण मनसाराम ही एक अठराव्या शतकांतील बातम्या पुरविणारी पेढी होती असें म्हणतां येईल.

(७) हीं बातमीपत्रें कोणाकडे आलीं? याचें उत्तर हीं पेशव्यांकडे आलीं असें आहे. मात्र येथें कोणाही पेशव्याचें नाव न देतां पेशव्यांच्या मागें जीं गौरवार्थी विशेषणें लावीत त्यांनीं येथें पेशवा निर्दिष्ट आहे असें धरावयाचें आहे. हीं विशेषणें सर्वच पेशव्यांना सामान्यतः एकरूपच लावीत असल्यानें बातमीपत्र कोणत्या पेशव्यास उद्देशून लिहिलें आहे हें त्या बातमीपत्राच्या कालावरून ठरवावें लागतें.

(८) येथील बातमीपत्रांत सर्वांत जुनें बातमीपत्र जुलूस २ जखर ८ या तारखेचें (क्र. ८) आहे; तर शेवटचें हि. ११७८ रमजान १७ (शक १६८६ फाल्गून वद्य ३ = इ. १७६५ मार्च १०) या तारखेचें आहे. या अखबारांच्या कालनिर्देशांत कांहीं ठिकाणीं जुलूसचा निर्देश आहे, तर कांहीं ठिकाणीं हिजरी वर्षाचा निर्देश आहे. जुलूस हें राज्याभिषेकाचें वर्ष असल्यानें जुलूसचा निर्देश आल्यास तो कोणत्या बादशाहाला अनुलक्षून आहे, हें बातम्यांच्या तपशीलावरून ठरवितां येतें. येथें १ ते १९ हीं बातमीपत्रें दुसऱ्या आलमगीरच्या जुलूसचीं असून केवळ २० हें एकच बातमीपत्र दुसऱ्या शाह आलमचा जुलूस निर्देशिणारें आहे आणि पुढील सर्व हिजरी वर्षांचा उल्लेख करणारीं आहेत.

(९) या बातमीपत्रांत शेकडो मुसलमान उमराव व नोकर यांचे निर्देश आले आहेत. या सर्वांची माहिती देणें अशक्य आहे आणि तसा तिचा तादृश उपयोगही नाहीं. तथापि ज्यांचे निर्देश वारंवार येतात आणि ज्यांचा अनेकदां त्यांच्या नांवांऐवजीं त्यांच्या उपाधीनें किंवा पदवीनें उल्लेख केला जातो, त्यांजविषयीं येथें अगदीं थोडक्यांत ओळख करून देतों.

(१०) यांत सर्वाधिक निर्देश आले आहेत ते आनुवंशिक वजीराच्या वंशांतील स्त्रीपुरुष आणि पहिल्या निजामाचा नातू दुसरा गाझीउद्दीन यांचे. ते कधीं नावानें तर कधीं त्यांच्या पदव्यांनीं. ते सर्व निर्देश नीट समजावे म्हणून त्यांच्या वंशावळींतील स्त्रीपुरुषांचीं नावें व आपसांतील नातीं त्यांच्या पदव्यांसह पुढें देतों.

(१) बहाउद्दीन = गाझीउद्दीनचा भाऊ; पहिल्या निजामाचा चुलता.
(२) पहिला मुहम्मद अमीनखान = १ चा मुलगा; इतिमादुद्दौला.
(३) कमृद्दीन = २ चा मुलगा; इतिमादुद्दौला; खानखाना.
(४) शोलापुरी बेगम = ३ ची बायको.
(५) मीर मन्नू = ३ चा मुलगा; मुईनुल्मुल्क.
(६) मुघलानी बेगम = ५ ची बायको.
(७) उम्दा बेगम = ५ व ६ ची मुलगी; दुसऱ्या गाझीउद्दीनची बायको.
(८) दुसरा मुहम्मद अमीनखान = ५ व ६ चा मुलगा.
(९) इन्तिजामुद्दौला = ३ चा मुलगा; खानखाना.

(१०) मीर बक्ष = ३ चा मुलगा.

(११) अज्ञातनामा = ३ ची मुलगी; १ ल्या गाझीउद्दीनची बायको.

(११) याखालोखाल ज्यांचीं नातीं ठाऊक असावयास पाहिजेत असे स्त्रीपुरुष म्हणजे इ. १७२५ ते १७७० च्या दरम्यानचे मुघल बादशाह व त्यांची संतति. त्यांची येथें थोडक्यांत माहिती देतों.

(१) मुहम्मदशाह = औरंगजेबाचा पणतू, इ. १७१९–१७४८.

(२) मलिका झमानी = १ ची बायको.

(३) साहिबा महल = १ ची बायको.

(४) हजरत बेगम = १ ची मुलगी; अब्दालीची बायको.

(५) अहमदशाह = १ चा मुलगा.

(६) मुहतरमुन्निसा = ५ ची मुलगी.

(७) मुअज्जमाबादी बेगम = ८ ची आई.

(८) दुसरा आलमगीर = औरंगजेबाचा पणतु.

(९) गौहरुन्निसा–गौहरअफरूझ–झुहरा बेगम–मुहम्मदी बेगम = ८ ची मुलगी; अब्दालीचा मुलगा तैमूर याची एक बायको.

(१०) अज्ञातनामा = ८ ची मुलगी; अब्दालीची बायको.

(११) आली गौहर = ८ चा मुलगा; २ रा शाह आलम.

(१२) मीर्झा जवानबख्त = ११ चा मुलगा.

(१३) हिदायतबक्ष = ७ चा मुलगा.

(१४) मिर्झा बाबा = ८ चा जावई.

(१२) यांहूनही कमी निर्देश ज्यांचे येतात ते म्हणजे निजामाचे वंशज. त्यांची वंशावळ अशी—

(१) गाझीउद्दीन = फीरूझजंग=कुलीचखान; बहाउद्दीनचा भाऊ.

(२) आसफजाह = १ चा मुलगा; चिन्कुलीचखान–निजामुल्मुल्क.

(३) पहिला गाझीउद्दीनखान = २ चा मुलगा; इन्तिजामुद्दौल्याची वहीण याची बायको.

(४) दुसरा गाझीउद्दीन = ३ चा मुलगा; याच्या (१) मीर मन्नू व मुघलानी बेगम यांची मूलगी उम्दा बेगम व (२) गन्ना बेगम अशा दोन बायका; वझीर, बझीरुल ममालिक, वझीरुल मम्लिकत, इमाद, इमादुल्मुल्क इ. पदव्या.

(५) गन्ना बेगम = अलीकुली खान = छन्गा = शश अंगुश्तीची मुलगी = दुसऱ्या गाझीउद्दीनची बायको.

(१३) अखबारांचे अनुवाद येथें दिले आहेत त्यांनीं ७९ पृष्ठें व्यापिली आहेत. यांत अनेक घटना घडल्याचें सांगितलें आहे. पैकीं महत्त्वाच्या व कालयुक्त घटना येथें नमूद केल्या आहेत.

(१) जु. २ जवल २१, श. १६७७ माघ व. ७, इ. १७५६ फेब्रु. २२. नबाब व शाहजादा कूच करून पायल येथें मुक्काम करतात. बिकानेरचा राजा गजसिंग स्वतःच्या लग्नासाठीं जयपूरला येतो. कामाच्या जमीनदाराची मुलगी वधू म्हणून निश्चिति. राजा माधोसिंग नारनोळ सरकारच्या फौजदारीच्या बंदोबस्तासाठीं दलेलसिंग राजावतास पाठवतो.

(२) जु. २ जवल २५, श. १६७७ माघ व. ११, इ. १७५६ फेब्रु. २६. मालेजचा भिकन, बक्षखान संदल व रणजितसिंग नागरमल्लाच्या मध्यस्थीनें वजिरास भेटतात.

(३) जु. २ जवल अखेर (३०), श. १६७७ फाल्गुन शु. १, इ. १७५६ मार्च २. वजिरानें मुघलानी बेगमेस आणण्यासाठीं पाठविलेले जौहर वगैरे सतलजवर पोहोंचतात.

(४) जु. २ जखर १, श. १६७७ फाल्गुन शु. २, इ. १७५६ मार्च ३. नवाब जमीलुद्दीन, हकीम इबादुल्लाह इत्यादींस स्वागतास पाठवतो.

(५) जु. २ जखर २, श. १६७७ फाल्गुन शु. ३, इ. १७५६ मार्च ४. बेगम नवाबाच्या लश्करांत स्वतंत्र डेऱ्यांत येऊन राहते.

(६) जु. ३ रखर २७, श. १६७८ पौष व. १३, इ. १७५७ जाने. १८. इमाद, इन्तिजामुद्दौला व उबैदुल्लाहखान यांची अबदालीशीं भेट होण्यापूर्वी शाहवलीखानामार्फत बोलणीं होतात (५).

(७) जु. ३ रखर २८, श. १६७८ पौष व. १४, इ. १७५७ जाने. १९. अबदाली सोनीपतपलीकडून कूच करून मरोठ व नरेला यांमधें मुक्कामास येतो व शाहवलीखान, इमाद, इन्तिजाम, वगैरेंस अलग अलग भेटतो. प्रत्येकाशीं खलबत करतो. शाहवलीखान शेरजंगाची अबदालीशीं भेट घडवतो (५).

(८) जु. ३ रखर २९, श. १६७८ पौष व. ३०, इ. १७५७ जाने. २०. अबदाली अब्दुल अहदखान व नासिरखान यांस नसकची स्वारांबरोबर दिल्लीस जाण्यास फर्मावितो. नजीबखान जहानखानामार्फत अबदालीस भेटतो. अबदाली नजीबखानावर शहरची वसुली व किल्ल्याची बंदोबस्ती सोपवतो. अबदालीची फौज वझीराबादपासून कालापर्वत व तेथून मुहर्रमनगरची सराई व उबैदुल्लाहनगर वगैरेपर्यंत आणि जहानखानाची फौज कसबे बोनी ते यमुनेपलीकडे बदरपूरपर्यंत डेरे देते (५).

(९) जु. ३ जवल २, श. १६७८ माघ शु. ३, इ. १७५७ जाने. २३. नजीबखान अबदालीकडे जातो आणि मुजरा व खलबत करून परततो. अबदालीचा तुमरपूर गांवीं मुक्काम. तो जान्बाझखानास दिल्लीस पाठवितो, (१, २).

(१०) जु. ३ जवल ३, श. १६७८ माघ शु. ४, इ. १७५७ जाने. २४. हिंदुस्थानी उमराव अबदालीच्या भेटीस जातात. भेट व मुजरा करून परततात. इमाद अबदालीशीं ५० हजार रोख व ५० हजारांचें जवाहिर देण्याचा करार करतो. जहानखान अबदालीच्या सांगण्यावरून दिल्लीच्या किल्ल्यांत जातो, पाहणी करतो व परततो. जान्बाझखान किल्ल्याचा बंदोबस्त करतो. याकूब अलीखान, बापू पंडित, जुगुल किशोर व रामप्रसाद यांसह अबदालीकडे जातो व चार घटका रात्रीपर्यंत तेथें थांबून मुजरा न करतांच परततो. (२).

(११) जु. ३ जवल ४, श. १६७८ माघ शु. ५, इ. १७५७ जाने. २५. अबदालीचा लश्करी तळ तुमरपूर गावाजवळ असतो. त्याकडे पाठविलेले चार ख्वाजासरा व दोनशें स्वार तयारीसाठीं किल्ल्यांत येतात. जहानखान किल्ल्यांत येऊन बादशाही फरासखान्याच्या कोठ्या उघडवितो. नजीब वगैरे त्यास भेटतात व जाबसाल होतात. तो नजीबखानाच्या सांगण्याप्रमाणें दोन दोन हजार रुपये अबदालीच्या शाहवलीखान वगैरे चार वजिरांकडे पाठवतो (२, ३).

(१२) जु. ३ जवल ५, श. १६७८ माघ शु. ६, इ. १७५७ जाने. २६. जहानखान बादशाही हत्तीखान्यांतील ५० हत्तीणी अबदालीच्या लश्करांत पाहाणी करून पाठवितो व परत येतो. किल्ल्यांतील बादशाही शिलेखान्याच्या कोठ्या उघडून पाहाणी करून चिलखत, शमशेर, कपडे वगैरे आपल्या घरीं पाठविण्यास सांगून स्वतः तोरगडास जातो व दारूचीं पोतीं पाहून दिवाने आममध्यें येतो. निरनिराळ्या कारखान्यांचे कागद पाहून सरदारांशीं जाबसाल करतो. शाहवलीखान इमादचा साथी बहादुरखान यास अबदालीकडे घेऊन येतो. हिसार व नारनोळ जिल्ह्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं शाहाकडून त्याची नेमणूक करवतो. राजा बापू पंडित, शाहवलीखान व याकूब अलीखान यांमार्फत अबदालीची भेट घेतो. पंडित अबदालीस अर्ज करतो कीं, माझे मालक दोन लाख स्वारांनिशीं चाकरीस हजर आहेत. जहानखान अबदालीस भेटतो. अबदाली सरदारांस आज्ञा करतो कीं, आलमगीर बादशाहास दिल्लीहून घेऊन यावें. त्याप्रमाणें सरदारांची बादशाहाशीं भेट होते. अबदालीभेटीचें आमंत्रण दिलें जातें (३, ४).

(१३) जु. ३ जवल ६, श. १६७८ माघ शु, ७, इ. १७५७ जाने. २७. बादशाहाच्या प्रयाणाच्या तयारीची आज्ञा होते. अबदालीच्या भेटीस बादशाह जातो. सहा घटका जाबसाल होतो. हिन्दुस्थानचे राज्य तुम्हाकडेच राहूं द्या असें अबदाली बादशाहास सांगतो. सरकार इ. १७५७ जाने. २६ ही तारीख देतात. पण येथील तपशील एवढा स्पष्ट आहे कीं, सरकारांची तारीख चूक असली पाहिजे. फामुए २।६९.

(१४) जु. ३ जवल ७, श. १६७८ माघ शु. ८, इ. १७५७ जाने. २८. अबदाली किल्ल्यांत मोती महाल व हयातबक्षबाग यांमध्यें जनान्याच्या बंदोबस्तास राहतो. बादशाह महालांतच असतो (६).

(१५) जु. ३ जवल ८, श. १६७८ माघ शु. ९, इ. १७५७ जाने. २९. अबदाली दीवाने खासमधून दीवाने आममध्यें येतो. नादिरशाहाप्रमाणें खुर्चीवर बसतो. बादशाहही येतो. सरदारही येतात. खानखानाच्या अर्जावरून अबदालीची सादतखानास नसकचीबाशींचा दारोगा नेमून ताकीद होते कीं, लूटमार करणाऱ्यांस सजा द्या व शहराचें रक्षण करा. खानखाना अबदालीच्या हुकुमावरून रेतीमधील पुलाच्या तयारी-साठीं यमुनेवर जातो. अबदालीसाठीं खानखानानें लिहिलेला हस्बुलहुकूम घेऊन एक लेखक सूरजमल जाटाकडे जातो. राजा माधोसिंगाचा वकील मीर आफ्ताब पेशावरा-पासून अबदालीबरोबर असतो. अबदालीचा खाजासरा मुईनुल्मुल्कच्या बायकोकडे जाऊन हुकूम पोहोचवतो कीं तुम्ही पुढें लाहोरास रवाना व्हावे. बायको इमादकडे येते खानखाना काजी-मुफ्तींसह अबदालीस भेटून खालसा वतनाचे सर्फे खासचे महलासंबंधी कागद गुदरतो (६).

(१६) जु. ३ जवल ९, श. १६७८ माघ शु. १०, इ. १७५७ जाने. ३०. इमाद, शाहवलीखान, जहानखान, खानखाना वगैरे दिवाने खासमध्यें अबदालीस भेटतात. इमाद भेटीदाखल वस्तु देतो. अबदाली म्हणतो, 'तुला हिंदुस्थानची चाकरी फर्मावितों.' खानखाना वगैरे अबदालीकडून निरोप घेऊन आलमगीरकडे येऊन वाटाघाटी करतात. शाहवलीखान व जहानखानही आलमगीरबरोबर वाटाघाटी करतात. इमाद अबदालीचा निरोप घेऊन घरीं येतो व इतर उमरावांशीं वाटाघाट करतो (७).

(१७) जु. ५ रवल १८, श. १६८० कार्ति. व. ६, इ. १७५८ नोव्हें. २०. बादशाह व वजीरुलममालिक यांचे तालकटोऱ्याच्या बागेंत आगमन (१३).

(१८) जु. ५ रवल २१, श. १६८० कार्ति. व. ८, इ. १७५८ नोव्हें. २३. बादशाह व वजीरुलममालिक तालकटोऱ्याच्या बागेंतून शहराकडे परततात (१३).

(१९) जु. ५ रवल २५, श. १६८० कार्ति. व. १२, इ. १७५८ नोव्हें. २७. नागरमल सूरजमल जाटाचा उमराव लालसिंग याची नबाबाशीं भेट घडवतो (१३).

(२०) जु. ५ रवल २७, श. १६८० कार्ति. व. १४, इ. १७५८ नोव्हें. २९. शाहजादा आली गौहर नजीबखानासह गंगानदी ओलांडून दारानगरास पोचतो. (१४).

(२१) जु. ५ रखर ३, श. १६८० मार्ग शु. ५, इ. १७५८ डिसें. ५, मलिका जमानी वगैरे बेगमा झेलम ओलांडून गुजरात शाहदौलाजवळ पोहचतात (१४).

(२२) जु. ५ रखर ५, श. १६८० मार्ग शु. ८, इ. १७५८ डिसें. ७. मुघलानी बेगम लाहोरहून कूच करते (१४).

(२३) जु. ५ रखर ११, श. १६८० मार्ग शु. १३, इ. १७५८ डिसें. १३
नजीबखान दारानगराहून परत फिरतो (१४).

(२४) जु. ५ रखर १३, श. १६८० मार्ग. शु. १५, इ. १७५८ डिसें. १५.
जनकोजी शिंदे सेखावत रजपुतांच्या तालुक्यांपैकीं कांहींतून खंडणी घेऊन नारनोळ पासून पुढें दोन मजलींवर पोहोंचतो. शाहजादा आली गौहर संभालमध्यें येतो (१४).

(२५) जु. ५ जखर ३, श. १६८० माघ शु. ५, इ. १७५९ फेब्रु. २.
सरदारांचें वजीराबादेहून बुराडीला कूच (१५).

(२६) जु. ५ जखर ६, श. १६८० माघ शु. ८, इ १७५९ फेब्रु. ५.
राजा दिलेरसिंग व जलालुद्दौला यांना मराठे सरदार नबाबाकडे परत पाठवतात (१५).

(२७) जु. ५ जखर ११, श. १६८० माघ शु. १४, इ. १७५९ फेब्रु. १०
अंताजी पंडित व रूपराम यांची वजिराशीं भेट (१७).

(२८) जु. ५ जखर १२, श. १६८० माघ शु. १५, इ. १७५९ फेब्रु. ११.
रहमतखान रोहिला याचा वकील टेकचंद व मुनशी ...... माल वकिलाची भेट घेतात (१७).

(२९) जु. ५ जखर १३, श. १६८० माघ व. १, इ. १७५९ फेब्रु. १२.
नजीबखानाचा वकील बस्तावरसिंग व त्याचा जुना वकील मेघराज हे वजिराची भेट घेऊन त्याशीं बोलणीं करतात (१७).

(३१) जु. ५ जखर १४, श. १६८० माघ व, १, इ. १७५९ फेब्रु. १३.
मल्हाररावानें पाठविलेला वकील गणेश पंडित वजिराची भेट घेऊन त्याशीं खलबत करतो (१७).

(३२) जु. ५ जखर १५, श. १६८० माघ. व. २, इ. १७५९ फेब्रु. १४.
बहादुरगढचा जमीदार बहादुरखान याची वजिराशीं भेट. शाहजादा आली गौहर अलाहाबादजवळ झूशी येथें येतो (१७).

(३३) जु. ५ जखर १९, श. १६८० माघ व. ६, इ. १७५९ फेब्रु. १८
राजा बिजेसिंगाचा वकील रतिराम वजिरास भेटतो (१८).

(३४) जु. ५ जखर २०, श. १६८० माघ व. ७, इ. १७५९ फेब्रु. १९.
सलाबतजंगाचा वकील राजा रामनारायण वजिरास भेटतो. अंताजी पंडित व पुरुषोत्तम पंडित रामाजी पंडिताच्या मुलाखतीस जातात (१७).

(३५) जु. ५ जखर २२, श. १६८० माघ व. ९, इ. १७५९ फेब्रु. २१.
अंताजी पंडित व पुरुषोत्तम पंडित रामाजी पंडितास घेऊन वजिराच्या मुलाखतीस जातात (१७).

(३६) जु. ५ जखर २३, श. १६८० माघ व. १०, इ. १७५९ फेब्रु. २२. युसुफबेगखान शुजाउद्दौलाकडे रवाना होतो व ताकीद करतो कीं, कांहींही करून शाहजाद्यास पाटण्यास जाऊं देऊं नये. (१७).

(३७) जु. ५ जखर २४, श. १६८० माघ व. ११, इ. १७५९ फेब्रु २३. जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे ठाणेश्वर म्हणजे कुरुक्षेत्र येथें पोहोंचतात (१६).

(३८) जु. ५ जखर २५, श. १६८० माघ व. १२, इ. १७५९ फेब्रु २४. सावाजी पटेल सरहिंदजवळ पोहोंचतो (१५).

(३९) जु. ५ जखर २६, श. १६८० माघ व. १३, इ. १७५९ फेब्रु. २५. पुरुषोत्तम पंडित दिल्लीहून कूच करून यमुना ओलांडून लश्कराकडे रवाना होतात (१७).

(४०) जु. ५ रजब २३, श. १६८० फाल्गुन व. ९, इ. १७५९मार्च. २३. राजा माधोसिंग व सूरजमल जाट यांची भेट (१९).

(४१) जु. ५ शाबान १२, श.१६८१ चैत्र शु. १३, इ. १७५९ एप्रि. १०. जनकोजी शिंदे, दत्ताजी शिंदे, नारोजी शंकर यांचा वरील दिवसापर्यंत बहल्लपुरास मुक्काम (१९).

(४२) हि. ११७४ सफर २०, श. १६८२ भाद्र, व. ६., इ. १७६० सप्टें. ३०. भाऊसाहेब सैन्याच्या विजयाबद्दल कांहीं तोफगोळे सलीमगड किल्ल्यावरून नजीबखानाच्या फौजेंत सोडण्याचा हुकूम देतात. (२०).

(४३) हि. ११७४ सफर २३, श. १६८२ भाद्र. व. ९, इ. १७६० आक्टो. ३. अवदाली अहमदगंजेच्या पुढें दाखल होतो (२०).

(४४) हि. ११७४ सफर २४, श. १६८२ भाद्र व. १०, इ. १७६० आक्टो. ४. सुरजमल जाटाच्या मुलाखतीच्या हेतूनें शुजाउद्दौला नजीबखान व फौज यांसह स्वार होतो (२०).

(४५) हि. ११७४ सफर २९, श. १६८२ भाद्र. व. ३०, इ. १७६० आक्टो. ९. भाऊसाहेबांनीं धाकटा नाना, यकाजी पंडित, अनाजी व महिपतराव प्रभू चिटणीस यांना किल्ल्यांत पाठवून हुकुम केला कीं, शाहजाद्यास युवराज व आली गौहर यास वारस करून त्याच्या नांवानें शिक्का पाडावा (२०).

(४६) हि. ११७४ सफर शेवट (३०), श. १६८२ आश्वि. शु. १, इ. १७६० आक्टो. १०. शाह आलमचा मुलगा शाहजादा जवानबख्त खुर्चीवर बसतो. (२०).

(४७) हि. ११७४ रवल १, श. १६८२ आश्वि. शु. २, इ. १७६० आक्टो. ११. धाकटा नाना वगैरे कारभारी किल्ल्यांतील रंगमहालांत जातात (२०).

(४८) हि. ११७४ शव्वाल १८, श. १६८३ वैशाख व. ५, इ. १७६१ मे २४. इंग्रज कर्नल हजरताची भेट घेतो (२२).

(४९) हि. ११७४ शव्वाल १९, श. १६८३ वैशाख व. ६, इ १७६१ मे २५. फुलवाडीमध्यें शाह आलमचा मुक्काम (२२).

(५०) हि. ११७४ जिल्काद ४, श. १६८३ ज्येष्ठ शु. ६, इ. १७६१ जून ८. मूसाखान व ताज मुहम्मदखान हे बादशाहजाद्यांचा निरोप घेतात. जहांगीरखान दिलेरसिंगाच्या खर्चासाठी ५००० रुपये देऊन ताकीद करतो कीं, त्यास लवकर हुजुराकडे आणावें (२१).

(५१) हि. ११७६ शाबान ११, श. १६८४ फाल्गु. शु. १२, इ. १७६३ फेब्रु. २५. रोहिले सरदार हाफिझ रहमतखान व दूंदीखान यांच्या लश्करांतून कूच करतात (२३).

(५२) हि. ११७६ शाबान १२, श. १६८४ फाल्गु. शु. १३, इ. १७६३ फेब्रु. २६. शुजाउद्दौला मुलाखतीसाठीं नजीउद्दौलाच्या डेऱ्यांत जातो (२३).

(५३) हि. ११७६ शाबान १३, श. १६८४ फाल्गु. शु. १५, इ. १७६३ फेब्रु. २७. दूंदीखानाचें नजीबुद्दौलाच्या बोलाविण्यावरून गंगानदीच्या त्या बाजूकडून फौजेसह कूच (२३).

(५४) हि. ११७६ शाबान १४, श. १६८४ फाल्गुन व. १, इ. १७६३ फेब्रु. २८. नजीबुद्दौला व याकूब अलीखानयांसह दूंदीखान शुजाउद्दौलाच्या भेटीस येतो (२३).

(५५) हि. ११७६ शाबान १५, श. १६८४ फाल्गुन व. २, इ. १७६३ मार्च १. नजीबुद्दौला, दूंदीखान, याकूब अलीखान व नजीबखानाचे भाऊबंद शुजाउद्दौलाच्या मध्यस्थीनें बादशाहास भेटतात (२३).

(५६) हि. ११७६ शाबान २३, श. १६८४ फाल्गुन व. १०, इ. १७६३ मार्च ९. कनोजपलीकडून सरकारचे पुढील मुक्कामाचे तंबू शाहमदार दरग्याचे जवळच्या सखनपुराजवळ ६ कोस मार्गे जातात (२३).

(५७) हि. ११७६ शाबान २७, श. १६८४ फाल्गुन व. १४, इ. १७६३ मार्च १३. अबदालीचें अटक ओलांडून पलीकडे गमन (२५).

(५८) हि. ११७६ रमजान १८, श. १६८५ चैत्र व. ६, इ. १७६३ एप्रिल ३. केदारजी व महादजी शिंदे यांचे झाशीकडे कूच (२७).

(५९) हि. ११७६ रमजान २३, श. १६८५ चैत्र व. ११, इ. १७६३ एप्रिल ८. शुजाउद्दौला व नजीबुद्दौला यांचा वरील तारखेपर्यंत सिकंदरा बिलासपुराजवळ मुक्काम (२६).

(६०) हि. ११७६ **रमजान** २६, श. १६८५ चैत्र व. १३, इ. १७६३ **एप्रिल ११.** नजीबुद्दौल्याचा वकील मेघराज दिल्लीस पोहोंचतो व जाबिताखानाची भेट घेतो (२७).

(६१) हि. ११७६ **जिल्काद शेवट** (२९), श. १६८५ जेष्ठ शु. १, इ. १७६३ **जून १२.** नजीबुद्दौला नजीबाबादेस जातो (२८).

(६२) हि. ११७६ **जिल्हेज ४**, श. १६८५ ज्येष्ठ शु. ५, इ. १७६३ **जून १६.** जाबिताखानाचें नजीबाबादेस कूच. सुलतानाचें किल्ल्यांत आगमन (२८).

(६३) हि. ११७६ **जिल्हेज १६**, श. १६८५ ज्येष्ठ व. ३, इ. १७६३ **जून २८.** हजरत व शुजाउद्दौला यांचें अलाहाबादला आगमन (२९).

(६४) हि. ११७७ **मुहर्रम ११**, श. १६८५, आषाढ शु. १४, इ. १७६३ **जुलै २३.** सूरजमल भरतपूर किल्ल्यातून मथुरेस येतो (३०).

(६५) हि. ११७७ **मुहर्रम १५**, श. १६८५ आषाढ व. ३, इ. १७६३ **जुलै २७.** मल्हाररावानें नजीउद्दौलाचे नांवाचीं पत्रें देऊन पाठविलेले दोन कासिद दिल्लीस पोहोंचतात (३०).

(६६) हि. ११७७ **सफर १७**, श. १६८५ श्रावण व. ४, इ. १७६३ **ऑग २७.** या तारखेपर्यंत अबदालीचा कंदाहारला मुक्काम (३०).

(६७) हि. ११७७ **रबल १७.** श. १६८२ भाद्र. व. ३, इ. १७६३ **सप्टें. २५.** बादशाह नदीपलीकडील शुजाउद्दौलाच्या डेऱ्यांत जातो व त्या दोघांत नव्यानें करार होतो (३२).

(६८) हि. ११७७ **रबल २०**, श. १६८५ भाद्र. व. ६, इ. १७६३ **सप्टें. २८.** शुजाउद्दौला कासिमखानाच्या मदतीसाठीं बनारसकडे कूच करतो (३२).

(६९) हि. ११७७ **जखर २५**, श. १६८५ मार्ग. व. १२, इ. १७६३ **डिसें. ३१.** यमुनेपलीकडे दिल्लीपासून आठ कोसांवर गाझीउद्दीननगराजवळ सुरजमल व नजीबुद्दौला यांमध्यें लढाई होते. सुरजमल एकाएकी बाणानें मारला जातो (३३).

(७०) हि. ११७७ **रज्जब ९**, श. १६८५ पौष शु. १०, इ. १७६४ **जाने. १३.** अबदालीचें अटक अलीकडे आगमन (३३).

(७१) हि. ११७७ **शाबान २२**, श. १६८५ माघ व. ९, इ. १७६४ **फेब्रु. २५.** अटक अलीकडची फौज त्या बाजूला जाते (३४).

(७२) हि. ११७७ **शव्वाल शेवट** (२९), श. १६८६ चैत्र व. ३०, इ. १७६४ **मे १.** कलकत्त्यास इंग्रज व बादशाहा यांत लढाई (३५).

(७३) हि. ११७७ **जिल्काद १७**, श. १६८६ वैशाख व. ४, इ. १७६४ **मे १९.** नजीबुद्दौला रामडा घाटावर स्वतःच्या फौजेंत दाखल होतो (३६).

(७४) हि. ११७७ जिल्हेज ५, श. १६८६ ज्येष्ठ शु. ७, इ. १७६४ जून ६. नजीबुद्दौला यमुनेच्या पैलतीरीं दिल्लीपासून १२ कोसांवरील काढ येथें पोहोंचतो (३६).

(७५) हि. ११७७ जिल्हेज १२, श. १६८६ ज्येष्ठ शु. १४, इ. १७६४ जून १३. हरीसिंग, भिकन, निहालसिंग, करदारसिंग दिल्लीवालियान, गूजरसिंग हे सुमारें ३०,००० स्वार व पायदळ यांसह सतलज नदीच्या ऐल तीरावरील रुपडच्या घाटानें नदी ओलांडून सरहिंद परगण्यांत दाखल होतात. (३६).

(७६) हि. ११७७ जिल्हेज १८, श. १६८६ ज्येष्ठ व. ६, इ. १७६४ जून १९. शोलापुरी बेगमेच्या डेऱ्यांत शाही लश्करातील बकारखान मरण पावल्यानें त्या विषयीं फाते देण्यासाठीं नजीबुद्दौला जातो (३६).

(७७) हि. ११७८ रखर २७, श. १६८६ आश्विन व. १३, इ. १७६४ आक्टो. २३. शुजाउद्दौला व इंग्रज यांत मोठी लढाई होते. बादशाह व शुजा यांच्या फार मोठा पराभव व विध्वंस होतो (३७).

(७८) हि. ११७८ जवल १, श. १६८६ कार्तिक शु. ३, इ. १७६४ आक्टो. २७. अबदालीचें कंदाहारहून कूच; तो काबूलला जाण्याच्या हेतूनें एक मजलीवर डेरेदाखल होतो (३७).

(७९) हि. ११७८ जवल १२, श. १६८६ कार्तिक शु. १४, इ. १७६४ नोव्हें. ७. मल्हाररावाची जवाहरसिंग व इमादुल्मुल्क यांशीं भेट (३७).

(८०) हि. ११७८ जवल १३, श. १६८६ कार्तिक शु. १५, इ. १७६४ नोव्हें. ८. जसासिंग वगैरे सतलज ओलांडतात व सरहिंदच्या अलीकडे दोन मजलींवर अंबाला महालांत पोहोचतात (३७).

(८१) हि. ११७८ जवल २०, श. १६८६ कार्तिक व. ७, इ. १७६४ नोव्हें. १५. नजीबुद्दौल्यास नजीबाबादेहून मेरठमध्यें ५, ६ लाख रुपये आले होते. ते लुटण्यसाठीं पूल बांधून यमुना ओलांडून मराठी फौज नदीच्या त्या बाजूस कूच करते (३७).

(८२) हि. ११७८ शाबान १५, श. १६८६ माघ व. १, इ. १७६५ फेब्रु. ६. इंग्रज चुनारगड किल्ला जिंकतात (३९).

(८३) हि. ११७८ शाबान १७, श. १६८६ माघ व. ३, इ. १७६५ फेब्रु. ८. इंग्रज अलाहाबादचा किल्ला घेतात. तह झाल्यावर नजीबुद्दौला मल्हाररावाबरोबर जवाहिरसिंगाच्या डेऱ्यांत दाखल होतो (३८, ३९).

(८४) हि. ११७८ शाबान १९, श. १६८६ माघ व. ५, इ. १७६५ फेब्रु. १०. मल्हाररावाबरोबर नजीबचेंही इमादुलमुल्कच्या डेऱ्यांत आगमन (३८).

(८५) हि. ११७८ शाबान २०, श. १६८६ माघ व. ६, इ. १७
फेब्रु. ११. शाहदऱ्यापासून……मल्हारराव, जवाहिरसिंग व इमादुल्मुल्क यमुने
अलीकडे नाल्यावर डेरा देतात (३८).

(८६) हि. ११७८ शाबान २३, श. १६८६ माघ व. ९, इ. १७
फेब्रु. १४. मल्हारराव. जवाहिरसिंग व इमादुल्मुल्क नजीबुद्दौल्याच्या डेऱ्यांत जा
खलबत करतात (३८).

(८७) हि. ११७८ रमजान ४, श. १६८६ फाल्गुन शु. ५, इ. १७
फेब्रु. २५. नजीबुद्दौल्याचा वकील मेघराज व हाफिज रहमतखानाचा वकील केद
नाथ यांची अबदालीशीं भेट (३८).

(८८) हि. ११७८ रमजान ८, श. १६८६ फाल्गुन शु. ९, इ. १७
मार्च १. हाफिज रहमतखान, मुल्ला सरदारखान, व फत्तेखान हसनपूरला पोहोंचून शु
उद्दौल्यास भेटतात (३९).

(८९) हि. ११७८ रमजान १२, श. १६८६ फाल्गुन शु. १
इ. १७६५ मार्च ५. अबदालीचा सरहिंदच्या या बाजूस कोठाच्या समोर वसले
छटणपूर येथें वरील तारखेपर्यंत मुक्काम (३८).

(९०) हि. ११७८ रमजान १४, श. १६८६ फाल्गुन शु. १५, इ. १७
मार्च ७. महलदारखानाच्या गडापुढें अबदालीकडे जाण्याच्या हे
नजीबुद्दौला आपला पेशखाना व इतर सामान नमकमंडीला रवाना करतो (३९).

वर कालयुक्त घटना दिल्या आहेत. पण या अखबारांत कित्येक कालविर
घटनाही निर्दिष्ट आहेत. दोन्ही प्रकारच्या घटनांचा अभ्यास इतर साधनांच्या साह्य
करून त्याचा परिपाक अभ्यासकांपुढें ठेवणें हें संकलकाचें काम आहे.

४७, ४८, ४९, ५२

४७, ४८ हीं दोन फर्मानें मी अंदाजानें दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाच
कारकिर्दीत घातलीं. पण तीं मुहम्मद आदिलच्या कारकिर्दीत बसणार नाहींत अ
नाहीं. कारण ह्याचे कालनिर्देश फाटले आहेत व त्यांवर असलेला नाद आलिच्या
शिका मुहम्मदच्या आरंभींच्या फर्मानांवरही आढळतो. प्रस्तुत इब्राहीम भगं
आजारानें गेल्यावर मुहम्मद गादीवर आला. अशा संधिकाळांत पूर्वी पुष्कळ वेळा ब
होत. तद्वत या चार फर्मानांत निर्देशिलेलीं बंडें असावीं. हीं फर्मानें देसायास आ
आहेत. तेव्हां बंडें त्याच्या आसपासची असण्याची शक्यता आहे.

७१

या फर्मानांत आलेली माहिती महत्त्वाची आहे. असें दिसतें कीं हिन्दू लिंग
यतावर गणाचारी या नावाचा कर पूर्वी बसविला होता. तो वर्षानुवर्ष वसूल हो

असतां कांहीं कारणानें तहकूब केला गेला आणि त्याच्या ऐवजीं खानाखूशी नावाचा कर बसविला गेला. हा कर संदलापूर म्हणजेच सोलापूर मामल्यांत जे कसबे, जीं खेडीं ज्या पेठा व जे बाजार अस्तित्वांत होते त्यांतील सर्व लिंगायतांवर बसविला गेला. हा कर जिझियाप्रमाणें दर डोई होता कीं दर बिऱ्हाडास होता हें या फर्मानावरून समजत नाहीं. मी खानाखूशी या शब्दांतील खाना या शब्दावरून हा कर प्रत्येक स्वतंत्र बिऱ्हाडावर होता असें धरलें आहे. पण आपण म्हणतो खानेसुमारी आणि ती असते शिरगणती त्याप्रमाणें येथें असणें शक्य आहे. या कराच्या वसुलीसाठी लिंगायतांचे त्यांच्या आर्थिक मातबरीप्रमाणें चार वर्ग केले होते. पहिल्या प्रतीच्या लिंगायतास होनाची किंमत ४ रुपये धरल्यास दीड रुपया, दुसऱ्या प्रतीच्या लिंगायतास १ रुपया, तिसऱ्या प्रतीच्या लिंगायतास ७५ पैसे व चौथ्या प्रतीच्या लिंगायतास २५ पैसे कर होता. हा कर सध्या बहुतांश लिंगायत व्यापारी असल्यामुळें त्यांजवर बसविला होता असें म्हणावें तर शेकडों लिंगायत जमीन कसणारे होते व आहेत. हा कर केवळ सोलापूर मामल्यापुरता होता कीं सर्वच विजापुरी मामल्यांतील लिंगायतांवर होता हें या फर्मानावरून समजत नाहीं. परंतु गणाचारी कराचा निर्देश मिरजेकडील एका कागदांत आल्याचें मला स्मरतें. त्यावरून हा कर आदिलशाही अमलाखालच्या सर्वच लिंगायतांवर होता असें समजण्यास हरकत नाही. लिंगायतांवर जुना गणाचारी किंवा नवा खानाखूशी हा कर कां बसविला गेला याचें कारण आज तरी समजत नाही.

९१

या फर्मानाचा काळ सु. १०६०, हि. १०७० शव्वाल (= श. १५८२ ज्येष्ठ शु. ५, इ. १६६० जून ३) हा आहे. पन्हाळ्याच्या वेढ्यानंतर लौकरच सीदी जौहर आदिलशाहीविरुद्ध बंड करून उठला. या वेळीं, अर्थात प्रस्तुत फर्मानाच्या वेळीं तो आदिलशाहातर्फे शिवाजीविरुद्ध पन्हाळ्याचा वेढा चालविण्यांत गुंतला होता; आदिलशाहीशीं त्याचें सख्य होतें. यामुळें या फर्मानांत त्याला अनुकूल अशा प्रकारची मुकाशाची व्यवस्था केली आहे.

९२

मुघल राजवटींत गांवोगांव निरनिराळ्या श्रेणीचे वाकेनिगार आणि खुफियानवीस असत. पहिल्याचें काम गांवामध्यें जें कांहीं घडत असेल त्याचा उघड वृत्तांत वरच्या अधिकाऱ्यांकडे पाठवून देणें हें असे. तर खुफियानवीसाचें काम गांवोगांवच्या घटनांचे तसेंच सरकारी अधिकाऱ्यांच्या कृत्यांचे वृत्तांत गुप्तपणें वरच्या अधिकाऱ्यांतर्फे बादशाहापर्यंत पोहोंचविण्याचें असे. यांपैकीं वाकेनिगाराचें काम आदिलशाही अमलांतही चाले असें या फर्मानावरून दिसून येतें.

९७

यांत दुसरा अली आदिलशाह यानें मलनाड किंवा इक्केरी येथील राजा भद्रप्प नायक याजविरुद्ध काढलेल्या स्वारीची हकीकत आहे. त्यासाठीं आदिलशाही सैन्य अनंतपूरच्या मैदानांत जमा झाल्याचें, भद्रप्प नायकाचा किल्ला जिंकण्यांत आल्याचें आणि भद्रप्प नायक पळून गेल्याचें या फर्मानांत सांगितलें आहे.

केळदिनृपविजय ग्रंथांत भद्रप्प नायक मरण पावल्यावर त्याचा थोरला भाऊ सोमशेखर हा श. १५८६ शोभकृत् संवत्सर फाल्गून शु. १० (=इ. १६६३ फेब्रुवारी ७) या दिवशीं गादीवर बसला अशी माहिती दिली आहे. पण प्रस्तुत फर्मान सु. १०६४, हि. १०७४ रबिलाखर १० (=१५८५ कार्तिक शु. ११, इ. १६६३ नोव्हेंबर १) म्हणजे केळदिनृपविजयांत दिलेल्या कालाहून सुमारें नऊ महिन्यांनंतरचें आहे. आणि त्यांत भद्रप्प नायक पळून गेल्याचें सांगितलें आहे; तेव्हां केळदिनृपविजयांतील माहितींत चूक झाली आहे असें वाटतें.

१००

हें फर्मान अंदाजानें दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाच्या कारकिर्दींत घातलें आहे. याचा काळ फाटण्यामध्यें गेला आहे. यामुळें असें करावें लागलें.

१०२

हें फर्मान दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाच्या कारकिर्दींतील असून त्यांत आलमेले परगण्याचा देसाई यानें एका मोहिमेंत जी कामगिरी बजावली त्याबद्दल त्यास आलमेले परगणा मुकासा दिला आहे. या मोहिमेचें स्वरूप आज तरी अज्ञात आहे. कदाचित १०० क्रमांकाचें फर्मान या फर्मानाच्या कांहीं दिवस अगोदरचें असण्याचा संभव आहे.

१०३

या फर्मानांत रणसिंगारखान याजबरोबर मोहिमेवर मुद्दाम पाठविलेला सरदार मुहम्मदखान यास पाहुणचाराच्या निमित्तानें बोलावून तो व त्याचे कांहीं लोक यांस गुरसिदाच्या कारभाऱ्यांनीं दग्यानें कैद केलें असें सांगितलें असून त्यांस सोडून देण्याबद्दल आज्ञापिलें आहे. ही मोहीम कोणती हें अज्ञात आहे. पण क्र. १०२ मध्यें निर्दिष्ट केलेली मोहीम या वेळींही चालू असण्याची शक्यता आहे. कांहीं तरी गैरसमजानें गुरसिदाच्या कारभाऱ्यांनीं मुहम्मदखान व इतर यांस पकडलें असावें. क्र. १०२ व १०३ यांमध्यें सारें सहा महिन्यांचें अंतर असल्यामुळें हे दोन्ही लेख एकाच मोहिमेंतील असण्याची शक्यता अधिक वाटते.

१०४

या द्वैभाषिक फर्मानांत गुरसिदाचा मुलगा मल्लिकार्जुन यानें बंडखोरांचा पाडाव केल्याचें आणि त्यांपैकीं एक सरलश्कर चंगीझखानाचा मुलगा व आगा मुराद यास

परास्त केल्यामुळें या कामगिरीबद्दल पोषाख पाठविला आणि असेंच राज्यनिष्ठेमध्यें गढून असावें असेंही सांगितलें आहे. चंगीझखान निजामशाहीमध्यें एक सरदार होता हें आपणांस ठाऊक आहे. तेव्हां त्याचा मुलगा आगा मुराद हाही निजामशाही सरदार असला पाहिजे. या फर्मानाच्या कालाच्या सुमारास निजामशाही व आदिलशाही यामध्यें झगडा सुरू होता आणि मलिकंबरानें सोलापुरास वेढा घालणें ही त्यांतीलच एका घटना होती. मलिकंबरालाही एका लेखांत चंगीझखानी म्हटलें आहे.

१०५,१०६

आलमेले परगण्याचा बहुधा कायम होऊं घातलेला देसाई गुरुसिद्ध यानें जागीर किंवा वतन आपणांस मिळावें म्हणून १५००० होन नजराणा दोन सालांत वार्षिक हप्तेबंदीनें देईन असें कबूल केलें होतें. पण असें दिसतें कीं, ही रक्कम भारी असल्यामुळें त्यास हिचा ठरलेला हप्ताही वेळेवर देतां येईना. यामुळें हीं दोन फर्मानें निघालीं आहेत. वतन मिळविण्याकरतां त्यावेळचे लोक केवढी मोठी रक्कम कबूल करीत हें या दोन फर्मानांवरून चांगलें लक्षांत येतें.

१०७

या फर्मानांत आलेला कृष्णाजी भोसले हा कोठला व त्यानें कसली हरामखोरी केली हें समजेल तर बरें होईल.

११०

पूर्वीं किंवा अजूनही नदी उतरण्याकरतां ज्याप्रमाणें होड्या व काहिली वापरतात त्याप्रमाणें टोकरेही वापरतात. या शब्दाचा तात्काल लक्षांत येणारा अर्थ मोठी पाटी किंवा हारा हा आहे. पण येथें टोकरा म्हणजे नदी उतरून जाण्याकरतां कातडें व बांबूच्या कांबी यांच्या सहाय्यानें बनविलेला हारा असा आहे.

११३

हें फर्मान हि. १०५१ जिल्काद ९ (श. १५६३ माघ शु. १० = इ. १६४२ जानेवारी ३०) या कालाचें असून यांत शहाजीला फर्जंद म्हणून संबोधिलें आहे. शहाजीस फर्जंद म्हणून संबोधिल्याचें सर्व प्राचीन फर्मान हेंच असावें. यांत रणदुल्लाहखान यास सिपहसालार, मदारे महाम व सरलश्कर अशा तीन उपाधींनीं संबोधिलें आहे. हा शहाजीची शिफारस करण्याचा एकही प्रसंग फुकट दवडीत नाहीं असें येथें सांगितलें आहे. शहाजी आणि रणदुल्लाहखान यांची दाट मैत्री होती अशा विषयीं इतरत्रही उल्लेख आले आहेत. तथापि शिवभारत शहाजीनें रागावून एकदां रणदुल्लाहशींही पंढरपुराजवळ लढाई करून त्यास जिंकलें असें सांगतें.

शहाजी आणि रणदुल्लाहखान यांचा प्रथम संबंध शहाजी श. १५५७–५८ मध्यें (इ. १६३५–३६) माहुलीच्या वेढ्यांत अडकला असतां आला. त्या वेळीं रणदुल्लाहखान

आणि कान्होजी जेधे यांच्या मध्यस्थीनें शहाजी लढाई थांबवून आणि मु
विजापूरकर यांशीं तह करून कायमचा विजापूरकरांकडे गेला. तदनंतर पांचच वर्षांनी
पत्र लिहिलें आहे. येथें कर्नाटकाची सदार, सरलश्करी रहिमतखान खुदावंदख
गाझीखान व अफजलखान यांस दिल्याचें सांगितलें आहे. यावरून सरलश्कर हा निद
दुय्यम दर्जाचा हुद्दा आहे असें समजण्यास हरकत नाही.

११४

या फर्मानांत सांगितल्याप्रमाणें शहाजीनें आदिलशाही सुलतान दुसरा अली य
कर्नाटकच्या परिस्थितीविषयीं माहिती दिली तेव्हां त्यानें अपेक्षा धरली असावी
आपणासच कर्नाटकाची सुभेदारी मिळेल. पण ती सुभेदारी कुप्रसिद्ध अफजलखान
मिळाली. शहाजीच्या प्रसिद्ध कैदेच्या वेळीं त्यास पकडण्यामध्यें अफजलखानानें पुढाक
घेतला होता. कनकगिरीच्या लढाईंत शहाजीचा थोरला मुलगा संभाजी हा अफज
खानाच्या योजनेमुळें मारला गेला अशी शहाजीकडील लोकांची समजूत झाली हो
यामुळें शहाजी आणि अफजलखान यांत सौरस्य नव्हतें. तरीहि शहाजी व अफजलख
यांस एकमेकांशीं सौरस्य ठेवून एक दिलानें काम करण्यास या फर्मानांत सांगित
आहे. याचा नेमका परिणाम काय झाला हें या फर्मानावरून समजत नाहीं.

११५

हें फर्मान द्वैभाषिक असून फार्सीच्या खालीं असलेला मजकूर बहुधा कानडी
असावा. फर्मानाचा ग्राहक चोक्कलिंगप्प हा त्या वेळीं जिवंत होता हें इतर पुराव्य
वरून सांगतां येतें. या फर्मानांत मदुरा आणि तंजावर या बाजूची सदार शहाजी भोस
याजवर टाकली असली तरी त्या बाजूची सरलश्करी हसन अंबरखान यास दिल्या
सांगितलें आहे. या नेमणुकीवरून असें वाटतें कीं, वरील बाजूचें मुलकी काम शहाजीक
सोपवून लश्करी काम हसन अंबरखानाकडे दिलें. या दोहोंमध्यें वरिष्ठ कोण हें समजत नाह
तथापि ११३ व ११५ या दोन फर्मानांवरून सरलश्करीचा अधिकार शहाजीस दि
गेला नाहीं एवढें स्पष्ट होतें. दुसऱ्या इब्राहीम आदिलशाहाच्या कारकिर्दीच्या शेवटीं शेव
शहाजी कांहीं काळ सरलश्कर होता; पण तो अधिकार नंतर मरेतों पुन्हा शहाजी
मिळाल्याचें दिसत नाहीं.

११६

श. १५८९ माघ शुद्ध ६ (इ. १६६४ जानेवारी २३) रोजीं शहाजी मर
पावला (शिचप्र पृ. ५१). ही बातमी विजापुरास जातांच त्याचा दक्षिणेकडी
जागिरीचा वारस एकोजी भोसले यास हें सांत्वनपर पत्र लिहिलें आहे.

११७–११९

शहाजी मेल्यावर त्याच्या जागिरीची विल्हेवाट कशी लावावयाची असा प्रश
आदिलशाही सुलतान दुसरा अली यापुढें उभा राहिला. शहाजीच्या जागिरीपैकीं कांह

भाग व त्यावरील अधिकार त्याच्या मुलांच्या समाईक मालकीचे होते. ती समाईक मालकी काढून ती एकोजी भोसले या एकट्याचीच केल्याचें पहिल्या दोन फर्मानांत सांगितलें आहे. तिसऱ्या फर्मानांवरून असें दिसतें कीं, कोणा अअतमादरावाचे बंधू केशवराव, नारो पंडीत, श्रीनिवासराव व पुरुषोत्तमराव यांजकडे दक्षिण हिंदुस्थानांतील कांहीं प्रदेश मुकासा म्हणून असतां तो मुकासा काढून खवासखानास दिला होता. आतां त्याजकडूनही तो काढून तो प्रदेश व त्याशिवाय आणखी कांहीं प्रदेश व गांवें एकोजीस इनाम दिलीं. क्र. ११७ ते ११९ यांमधील कित्येक गावांचीं शुद्ध नांवें देणें फार्सी लिपीच्या सदोषत्वामुळें कठीण झालें आहे. तेव्हां यांतील कांहीं गांवांच्या नावांचे शुद्ध उच्चार मी दिलेल्या उच्चारांहून निराळे असण्याचा संभव आहे.

१२०–१२२

या तिन्ही फर्मानांचा काल एकच असून यांत एकच विषय आला आहे. १२१ व १२२ हीं दोन फर्मानें द्वैभाषिक आहेत. म्हणजे मुख्य फर्मान फार्सीत लिहून त्याचा सारांश कानडींत दिला आहे. हीं फर्मानें अनुक्रमें मिर्झा मुराद अली बेग, कोनेटी नायक व म्हैसूरचा सत्ताधारी (कंठीरव नरसराज) यांस उद्देशून लिहिलीं आहेत. पहिल्या फर्मानांत मिर्झा मुराद अली बेग व शहाजी या दोघांनीं एक दिलानें काम करावें असें सांगितलें आहे; तर पुढल्या दोहोंमध्यें त्या प्रदेशावर नेमलेला लश्करी अधिकारी अफजलखान व शहाजी या दोघांच्या आज्ञेंत रहाण्याबद्दल कोनेटी नाइक व (कंठीरव नरसराज) यांस उपदेशिलें आहे. क्र. ११४ प्रमाणेंच येथेंही आपसांत सौरस्य नसलेल्या अफजलखान-शहाजीस एकत्र आणलें आहे. कंठीरव नरसराज हा म्हैसूरच्या ओडेयर घराण्यापैकीं असून याचा समय श. १५६० ते १५८१ (इ. १६३८-१६५९) असा समजला जातो. कोनेटी नायक याचा नेमका प्रदेश व समय कोणता हें बराच प्रयत्न करूनही न समजल्यामुळें याविषयीं अधिक परिचय करून देतां येत नाहीं.

१२३,१२४

या दोन फर्मानांच्या कालामध्यें सुमारें २२ वर्षांचें अंतर असलें तरी तीं हनुमंता देसाई या एकाच मनुष्यास उद्देशून आहेत. पहिल्यामध्यें मुहम्मदनगर म्हणजेच कर्नूलच्या स्वारींत आणि दुसऱ्या फर्मानांत कोणत्या तरी अनिश्चीत स्वारींत त्यानें चांगलें काम केल्याचें सांगितलें आहे.

१२५

या फर्मानाच्या काळीं औरंगजेबाची दक्षिणेवरील स्वारी सुरू होती. या फर्मानाच्या सुमारास औरंगजेबाचा मुलगा मुअज्जम आपल्या सरदारांसह बेळगाव जिल्ह्यांत हालचाली करीत होता. त्याचे कांहीं सरदार विजापूरच्या जवळ गेले असावेत.

१२६

या फर्मानांत उल्लेखलिला बाबाजी भोसले याचा आज तरी अधिक परिचय देतां येत नाही.

१२७–१२९

हे तीनही कागद विजापुरी सुलतान पहिला अली आदिलशाह यानें सोडले आहेत. शाहदुर्ग म्हणजेच नळदुर्ग. हा किल्ला नव्यानें बांधला असतां मुद्गल बाबजी किंवा मुद्गल बाबूजी यानें जें सहाय्य केलें त्याबद्दल त्या किल्ल्याच्या आसपासच्या प्रदेशावरील देशमुखी, चौधरकी, देशकुळकर्णकी, महाजनकी व सरदेशमुखी हे हक्क या मुद्गल बाबूजीस दिले असल्याचें यांत नमूद आहे. हे तिन्ही लेख फार्सी व मराठी–मोडी असे द्विभाषिक व द्विलिपिक असून पहिला अभयपत्र आहे, तर दुसरे दोन फर्मानें आहेत. शकाच्या १५ व्या शतकांतील ४ थ्या पावक्यांत राजदरबारची मराठी भाषा कशी होती हें समजण्याच्या दृष्टीनें हे फार महत्वाचे आहेत. हे तीनही कागद अस्सल असल्यामुळें त्यांतील भाषेंत भिन्न भिन्न काल, स्थल व व्यक्ती यांच्या योगानें होणारा बदल झालेला नाहीं. १२८ व्या लेखांत दिलेला पहिल्या ५ ओळींचा मजकूर मोडींत लिहिला असला तरी भाषेच्या दृष्टीनें तो मराठी नाहीं. कारण या पाच ओळींत विशेषनामाशिवाय एकही मराठी शब्द आलेला नाहीं. याच १२८ व्या लेखांत किश्वरखान, दिलावरखान, कामिलखान, अब्दुल हुसैनखान, फकीरुल्मुल्क व धोंडी हणमंतराव हे चार तत्कालीन उमराव उल्लेखिलेले आहेत. यांतील किश्वरखान हा मुख्य प्रधान होता हें या तीनही कागदांवरून स्पष्ट होत आहे. कामिलखान, दिलावरखान व फकीरुल्मुल्क हे या लेखांच्या समयीं विजापूरच्या दरबारांत उमराव होते हें फिरिश्ता व तब्रातबा यांच्या ग्रंथांवरून दाखवतां येतें. धोंडी हणमंतराव व अब्दुल हुसेन मुजुमदार हे नव्यानेंच आपल्यापुढें येत आहेत.

१३०

गेल्या ३ लेखांप्रमाणें नळदुर्ग किल्ल्याच्या आसपासच्या प्रदेशाची देशमुखी, सरदेशमुखी, देशकुलकर्णकी, महाजनकी आणि चौधरकी हे हक्क जरी मुद्गल बाबजी यास वंशपरंपरेनें होते तरी सुमारें १५ वर्षांनंतर विसो सुरो तुकोल यानें कांहीं गडबडगुंडा करून त्यांपैकीं देशमुखी व देशकुलकर्णकी हे हक्क आपणांकडे करून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हां ते परत मिळविण्याकरितां मुद्गल बाबजीस तत्कालीन विजापुरी सत्तेला एकदांच ३०० होन व लवाजम्याची चौथाई एवढी नजर देण्याचें कबूल करावें लागलें. पण प्रत्यक्ष फर्मानांत हुकूम देतांना प्रतिवर्षीं १५० होन देत जावे असें सांगितलें आहे. या दोहोंचा मेळ कसा घालावयाचा हें लक्षांत येत नाहीं.

१३१

यामध्यें हकीकत दिली आहे तीवरून असें दिसतें तें कीं, १२७ ते १२९ या लेखांचा समय व हि. ९९० यांमध्यें जो १८ वर्षांचा काळ गेला त्यांत नळदुर्ग किल्ल्याला शत्रू म्हणजे निजामशाह व कुतुबशाह यांनीं वेढा घातला असतां मुधो बावजीनें विजापूरकरांस पुष्कळ सहाय्य केलें. यामुळें विसो सुरो तुंकोल यानें जो गडबडगुंडा केला होता तो रद्द केला. पण आतां या फर्मानाच्या वेळीं याच मुधो बाबजीनें चार हप्त्यांत २०० होन नजर देण्याचें कबूल केलें.

इ. १५८० ते १५८२ या अवधींत नळदुर्ग किल्ल्याच्या आसमंतांत घडलेल्या कित्येक घटनांची हकीकत तबातबा व फिरिश्ता या दोन्ही इतिहासकारांनीं दिली आहे.पण येथें निर्देशिलेली घटना त्यांतील शेवटची असावी. पूर्वोक्तानें हि. ९८९ रमजानच्या अखेरीस या किल्ल्यास वेढा पडला असें सांगितलें आहे. पण या वेढ्याचा जो तपशील दिला आहे त्यावरून तो हि. ९८९ ऐवजीं हि. ९९० मध्यें घातला गेला असें दिसतें. म्हणून वेढयाचा प्रारंभ हि. ९९० रमजान अखेर = इ. १५८२ आक्टोबर १८ ला झाला असें ठरतें. निजामशाह व कुतुबशाह यांचीं वेढयांत गुंतलेलीं सैन्यें हि. ९९१ मोहरमच्या मध्यास (इ. १५८३ जानेवारी २९) आपापल्या प्रांतांत जाण्यासाठीं विभक्त झालीं. पण तसें करण्यापूर्वीं सुमारें वीस दिवस भीमेच्या काठीं तळ देऊन राहिलीं होतीं. तेव्हां हा वेढा निदान हि. ९९० जिल्हेज २४ (इ. १५८३ जानेवारी ९) रोजीं उठविला असें ठरतें. वेढा उठल्यावर सुमारें एक महिन्यानें हें फर्मान सुटलें. वजीरुलममालिकाचा येथें किल्लेदार म्हणून उल्लेख आहे (बुर्हान-इ-मासिर मूळ ५१२-५३५; इंग्रजी अनुवाद इंडियन अँटिक्वेरी खंड ५१ पृ. ७१-७३,१२९-१३१, १९८-२०१; फिरिश्ता-नवल किशोर प्रत खंड २ पृ. ४७-५४; ब्रिग्ज-इंग्रजी अनुवाद खंड ३, पृ. १४६-१५४,

नळदुर्ग किल्ल्याची बांधणी, त्यास शत्रूचा वेढा पडणें व विसो सुरोनें मिराशींत अडथळा आणणें अशा तीनही बाबींचा या फर्मानांत उल्लेख आहे. याशिवाय विसोसुरोनें पुन्हा नव्यानें उत्पन्न केलेल्या अडथळ्याचाही उल्लेख केला आहे. तथापि त्या अडथळ्यास न जुमानतां मुधो बाबजीची मिरास त्याजकडे चालविण्याबद्दल सांगितलें आहे.

१३८ अ ते इ

हीं चारही फर्मानें एकाच विषयासंबंधीं आहेत. कासेगांव कर्यातीचा वसूल फरासखाना व वहली या खात्याकडील लोकांच्या खर्चाकडे लावून दिला होता. त्या-प्रमाणें कांहीं वर्षें तो खर्चही झाला. पण विजापूर दरबारचा एक मुकासदार नायकजी पांढरे याचा सेवक पुंजाजी यानें या दोन खात्यांच्या वसुली अधिकाऱ्यांना हाकलून लाविलें आणि त्या कर्यातीचा वसूल पांढऱ्यांच्या नावानें आपल्याकडेच घेतला. दोघांनाही

२।३ वेळां ताकीद केली असतां त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. म्हणून म्हसवडचा देसाई रताजी माने यास पुंजाजीस हाकलून देऊन ती कर्यात वरील दोन खात्यांच्या वसुली अधिकाऱ्यांकडे द्यावी आणि पुंजाजीस पुन्हा तो त्रास देणार नाहीं एवढी जबर शिक्षा करावी असा हूकूम दिला. वरील ४ फर्मानांपैकीं १३८ अ मध्यें वरील माहिती आहे. हें फर्मान सुटून ९ महिने झाले तरी रताजी मान्यानें कांहीं हालचाल न केल्यानें वरील आशयाचेंच नवें फर्मान पुन्हा पाठविलें. तें १३८ आ होय. हें फर्मान आल्यावर मात्र रताजी मान्यानें पुंजाजीस हाकलून दिलें आणि ती कर्यात वरील खात्याच्या मोकाशांच्या ताब्यांत दिली. वास्तवीक ही कर्यात चुकीनें नाइकजी पांढऱ्यास मोकासा म्हणून दिली गेली होती; तेव्हां ती पांढऱ्याच्या ताब्यांत जाऊं देऊं नये; तसेंच ही कामगिरी बजाविल्याबद्दल त्यास शाही पोषाक देऊन त्याचा सन्मान केला आहे असें १३८ इ मध्ये सांगितलें आहे. हें पुंजाजीला हांकून लावणें तात्पुरतें ठरू नये म्हणून पुंजाजीस हाकून लावण्याबद्दल १३८ ई या फर्मानानें पुन्हा आज्ञा केली आहे. शिवाय शाही पोषाक पाठवून त्याचा सन्मान केल्याचें पुन्हा नमूद केलें आहे.

१४१

अहसनाबाद (गुलबर्गा) शहरानजीकची हिरापूर संमत लुटण्याचा शिवाजीच्या घोडदळाचा प्रयत्न असल्याचें समजल्यावरून दुसऱ्या अली आदिलशाहानें त्यावर सरकारी रिसाल्याचा अधिकारी असील आणि बजाजी व महादजी (फलटणचे निंबाळकर) यांना पाठविलें आणि रताजीनें त्यांजकडे जाऊन व शिवाच्या घोडेस्वारांना तंबी देऊन आपली राजनिष्ठा प्रकट करावी असें या व उपर्युक्त लोकांना धाडलेल्या फर्मानांत सांगितलें होतें. आजवर प्रकाशित झालेल्या पत्रव्यवहारांत शिवाजीच्या घोडेस्वारांची ही हालचाल नोंदलेली दिसत नाहीं. म्हणून ही एक नवीन माहिती आहे असें समजण्यास हरकत नाहीं. असीलविषयीं आपणांस कांहींही अधिक माहिती नाहीं. पण बजाजी हा शिवाजीची ज्येष्ठ भार्या सईबाई हिचा भाऊ आणि बजाजीचा मुलगा महादजी हा शिवाजीचा जावई हें आपणांस माहीत आहे. सर जदुनाथ सरकार यांच्या **शिवाजी अँड हिज टाईम्स** या पुस्तकांतील हफ्त अंजुमन ग्रंथांतल्या उताऱ्यांवरून आपणांस खालील माहिती मिळते. श. १५८८ च्या कार्तिक–मार्गशीर्षांत (इ. १६६६ चा नोव्हेंबर) आदिलशाहास मिळालेला बजाजी नायक व मुघल सेनानायक यांचे कांहीं किरकोळ खटके उडाले. ह्या फर्मानामुळें स्पष्ट होतें कीं, इ. १६६७ मार्चपर्यंत महादजी आणि त्याचा बाप बजाजी हे आदिलशाहीच्या बाजूस आहेत. या वेळीं शिवाजीचें घोडदळ मुघल सेनानी जयसिंग याच्या बाजूनें कीं स्वतंत्रपणें विजापुरी प्रदेशावर हल्ला करीत आहे हें स्पष्ट नाहीं.

रताजी माने वरील फर्मानाप्रमाणें या विजापुरी सरदारांना मिळाला कीं नाहीं याची मला शंका आहे. हें फर्मान त्यास मिळण्याचें किंवा मिळून त्याचा उपयोग

करण्याचे आंतच तो मेला असावा असें माझें अनुमान आहे. कारण रताजीचा मुलगा सिदोजी याला दोन विजापुरी सरदारांनीं दिलेलीं आश्वासनपत्रें उपलब्ध असून सु. १०६७ जिल्काद ११ व २९ (श. १५८९ वैशाख शुद्ध १२ व ज्येष्ठ शुद्ध १ = इ. १६६७ एप्रिल २५ मे व १३) च्या या पत्रांत खालील माहिती आहे. रताजी माने राजनिष्ठ असतांही त्याजवर खिज्रखान पन्नीच्या लोकांनीं हल्ला केला व त्याला ठार केलें आणि पुरावा म्हणून त्याचें डोकें कापून त्या अधिकाऱ्याकडे धाडलें. साहजिकच भयग्रस्त झालेला रताजीचा मुलगा सिदोजी परागंदा झाला आणि म्हसवड गाव समाविष्ट असलेल्या माण परगण्यांतील जमिनीची लावणी-संचणी पाहण्यास कोणी उरलें नाहीं. म्हणून वरील आश्वासनपत्रें त्यास दिलीं गेलीं. प्रस्तुत फर्मान श. १५८८ फाल्गुन वद्य ४ (इ. १६६७ मार्च ४) चें असून तें रताजीला साधारणपणें वद्य १० (मार्च १०) चे सुमारास मिळालें असेल व त्याप्रमाणें तो आपल्या सैन्यासह निघालाही असेल; पण खिज्रखानाच्या लोकांस तो वंडखोर असल्याचा संशय येऊन त्यांनीं त्यास ठार केलें असें दिसतें. त्याला हें फर्मान मिळून तें त्याजवळ असतें, तर हा प्रसंग ओढवला नसता. म्हणून मला शंका येते कीं, या फर्मानाचा उपयोग करण्याच्या अगोदरच कांहीं गैरसमजुतीनें रताजी मारला गेला (शिचसा ४।७५८,८४२).

१४२

या फर्मानांत उल्लेखिलेले नागोजी व येसू पंडित यांची अधिक माहिती सध्या तरी मला कोठें आढळली नाहीं. आदिलशाही प्रधान खव्वासखान नवा नाहीं. श. १५८६ च्या कार्तिकांत (इ. १६६४ नोव्हेंबर) शिवाजी कुडाळच्या स्वारीवर गेला असतां हा विरोध करण्यासाठीं आला होता. पण विरोध न करतां पळून गेला. येथें शत्रू म्हणजे शिवाजी कीं मुघल हें स्पष्ट नाहीं.

१४३

औरंगजेबानें जु. ४१ शाबान २१ (श. १६१९ फाल्गुन वद्य ८, इ. १६९८ फेब्रुवारी २३) या दिवशीं सिदोजी माने याचा मुलगा नागोजी याला तर्बियतखान याच्या मध्यस्थीनें धाडलेलें हें फर्मान आहे. नागोजीनें मुघल बादशाहाशीं एकनिष्ठ राहण्याची हमी दिल्यास दुर्वर्तनाची त्याला क्षमा होऊन त्यास मुघल सैन्यांत योग्य अशी जागा देण्याचें आश्वासन यांत दिलें आहे. धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्या लढाईंत नागोजीचा मेहुणा अमृतराव निंबाळकर मेल्यावर त्यानें मराठ्यांची बाजू सोडली असें वाटतें. लुत्फुल्लाहखानाच्या पत्राच्या मराठी रूपांतरावरून (सनदापत्रें पृ. ८५।६०) अमृतरावानेंच त्याला मुघलांकडून प्रथम सुरक्षितपणा व चांगली वागणूक मिळेल अशी हमी दिली होती असें दिसतें; पण या फर्मानांत तर्बियतखानानें दरबारांत नागोजीबद्दल रदबदली केल्याचें सांगितलें आहे.

१४४

हें फर्मान बहुधा अअजमशाह किंवा कामबक्ष याच्या जु. १ सफर १७ (श. १६२९ वैशाख वद्य ४, इ. १७०७ मे ९) चें व नागू मान्याला लिहिलें आहे. त्यांत त्याला त्याच्या मागण्या वकिलामार्फत गुदरव्या. म्हणजे त्याचा योग्य तो निकाल करणें ठीक होईल; त्यानें आपल्या कामावर एक प्रतिनिधी ठेवून दरबारास आपलें सैन्य व सहाय्यक यांचेसह प्रकृतीस आराम मिळाल्यावर यावें असेंही कळविलें आहे. यावेळीं औरंगजेब मरून त्याच्या मुलांत गादीच्या वारसाविषयीं भांडणें चालू झालीं होतीं.

१४५

प्रस्तुत पत्र फर्रुखसियरच्या वेळचा (श. १६३५-४१, इ. १७१३-१९) अमीरुल उमरा फीरूझ जंग यानें धाडल्याचें पत्राच्या वेष्टनपट्टीवर शिक्का आहे त्यावरून ठरतें. फर्रुखसियर गादीवर आल्यावर त्यानें सय्यिद बंधूंपैकीं हुसेन अलीखान यास उम्दतुल्मुल्क, अमीरुलउमरा, बहादुर, फीरूझजंग, सिपह सरदार (सालार?) या पदव्या व त्यांचें काम दिलें (**इर्विन-लेटर मुघल्स** १।२५८). हीच व्यक्ती येथें विवक्षित असण्याचा संभव आहे.

१४६

या पत्राचें आवरण व त्यावरील वेष्टनपट्टी दोन्ही उपलब्ध नसल्यामुळें पत्राचे प्रेषकग्राहक समजत नाहींत.

१४७

मी या पत्रांतील जुलूस वर्ष पहिल्या शाह आलमचें धरलें आहे. पण तें त्याचें प्रतिस्पर्धी अअजमशाह व कामबक्ष यांपैकीं कोणाचेंही असूं शकेल.

१४८–१५०

हे तिन्ही कागद पहिल्या शाह आलमच्या पक्षाच्या सरदारांनीं लिहिले आहेत याविषयीं शंका नाहीं. क्र. १४८ च्या प्रेषकाच्या पूर्ण पदव्या खाने खानान, खाने जहान बहादुर, जफरजंग, कोकलताश अशा इतरत्र दिल्या आहेत. पण या पत्राच्या शिक्क्यांत कोकलताश व खाने जहान या पदव्या नाहींत. या पदव्या धारण करणारे दोन मुघल सरदार होऊन गेले. पहिला सरदार दक्षिणेंत बहादुरखान या नांवानें ओळखला जाई. पण तो हि. ११०९ (इ. १६९७) मध्यें मेल्यानें तो येथें विवक्षित नाहीं. येथें दुसरा सरदार अभिप्रेत आहे. तो हि. ११२५ (इ. १७१३) मध्यें वारला (बील-ऑन ओरिएंटल बायाग्राफिकल डिक्शनरी पृ. २१४) यांत नर्मदा उतरल्याचा दिनांक नाहीं. पण तो इ. १७०८ मे १७ आहे (इर्विन-**लेटर मुघल्स** खंड १, पृ. ५०). क्र. १४९ मध्यें पहिल्या शाह आलमचा नांदेडला त्याच्या जु. २ रज्जब १६ (श. १६३०

आश्विन वद्य २, इ. १७०८ सप्टेंबर २०) या दिवसाच्या आसपास मुक्काम होता असें सांगितलें आहे. खाफीखानानें हा मुक्काम दिला आहे. पण दिनांक दिलेला नाहीं. तो येथें मिळतो (मुन्तखबुल्लुबाब मूळ खंड २, पृ. ६१९; इलियट अँड डौसन ७।४०६.) क्र. १५० चा प्रेषक अमीरुलउमरा, नुस्रतजंग आहे. प्रसिद्ध मुघली सरदार जुल्फिकारखान याच्या या पदव्या आहेत.

१५१

क्र. १५० मध्यें नमूद केलेली कामगिरी केल्यामुळें जुल्फिकारखानानें पहिल्या शाह आलमकडे नरसिंहाचे गुन्हे माफ करण्याची विनंति केल्यावरून तसें केल्याचें त्यास फर्मान धाडलें गेलें. यांत नळदुर्गची किल्लेदारी औरंगबेगखान यास दिली आहे व मराठ्यांना त्या बाजूस आसरा देऊं नये म्हणून फर्माविलें आहे.

१५२

या पत्राचा प्रेषक कोण व याचा काल कोणता? पत्राची वेष्टनपट्टी व आवरण दोन्ही न मिळाल्यानें हें पत्र अंदाजानें फर्रुखसियरच्या कारकिर्दींत घातलें आहे. तो काळ बदलतां येईल.

१५३

विजापूर इ. १६८६ सप्टेंबर १३-१४ ला औरंगजेबाच्या हातीं पडलें तरी त्याच्या भोवतालचा प्रदेश बरेच दिवस अगोदर औरंगजेबाच्या ताब्यांत आला होता. त्याचें हें पत्र द्योतक आहे.

१५४–१५५

क्र. १५४ च्या पाठीवर रूहुल्लाहखान हें नाव लिहिलें आहे. आणि ग्राहक बक्षीउल्मुल्क आहे. तेव्हां प्रेषक रूहुल्लाहखान आहे यांत शंका नाहीं. त्यानें सोडलेल्या पत्रास मुख्य प्रधानाच्या पत्राप्रमाणेंच हस्बुल्हुक्म हेंच पारिभाषिक नाव होतें असें क्र. १५५ वरून लक्षांत येतें. क्र. १५४ चें पत्र मिळतांच त्याची त्वरीत अमलबजावणी व्हावी म्हणून क्र. १५५ हें पत्र धाडलें आहे; पण तें नकल असल्यानें ह्यांत गोविंदा व देवगाव या ऐवजीं चुकीनें परगोंडा व देउळगाव अशीं नावें लिहिलीं गेलीं.

१५८

या लेखांत आलेला गावाच्या नावाचा उच्चार मी बनसाळे असा दिला आहे. पण फार्सी लिपीच्या सदोषत्वामुळें ह्या शब्दाचे आणखी कित्येक उच्चार होणें शक्य आहे.

१५९

या फर्मानाच्या वेळीं औरंगजेब व शिवाजी यांचा सलोखा होता. तेव्हां शिवाजीच्या मध्यस्थीनें एखाद्यानें औरंगजेबाशीं संपर्क साधणें अनैसर्गिक नाहीं पण

औरंगजेबास असा संपर्क पसंत नव्हता. तो हा संपर्क जशवंतसिंह राठोड याच्या करवीं साधूं देण्याचें पसंत करीत आहे.

१६३

हा परवाना तत्कालीन बनारसचा सुभेदार सफ्दरजंग यानें दिलेला आहे. नारायण दीक्षित पाटणकर श. १६७० कार्तिक शुद्ध १४ (इ. १७४८ ऑक्टोबर २४) रोजीं वारले. त्यांना केशवभट नांवाचा पुतण्या होता. त्याचें नांव नारायण दीक्षितांचे वंशावळींत नाहीं. पण त्यांना तीन थोरले बंधू असल्याचें तींत दाखविलें आहे. त्यांपैकीं कोणाचा तरी हा मुलगा असेल. बळवंतसिंग हा काशीच्या सध्याच्या महाराजांचा पूर्वज. मराठी पत्रांत त्यास बळवंडसिंग म्हणून संबोधिलें आहे.

१६४

बडोदें राज्य दप्तरांतील वेचे खंड २ ले. २१ चा काळ शु. ११७१ जिल्हेज १० (श. १६९३ चैत्र शुद्ध १२, इ. १७७१ मार्च २७) असून त्यांत इंग्रजांनीं तळाजें ठाणें घेतल्याचा निर्देश आहे. पण कॅप्टन विल्बरफोर्सकृत काठेवाडचा इतिहास या ग्रंथांत निराळीच हकीकत दिली आहे. तो म्हणतो इ. १७७१ मध्यें ब्रिटिशांनीं अखेराजजीच्या साह्यानें तळाजें जिंकल्यावर तें ठाणें अखेराजला बक्षीस द्यावें अशी त्यांची इच्छा होती. पण तें घेण्याचें त्यानें नाकारल्यानें त्यांनीं तें मोमीनखानास दिलें (पृ. १३७,१३८,१४०,१४१). अखेराजजीच्या मदतीनें घेतलेलें ठाणें अखेराज आपल्या ताब्यांत घेण्याचें नाकारील हें विचित्र वाटतें. पण तेथें घोघा ठाणें अखेराजनें मोमीनखानाकडून घेतल्याचा निर्देश नाहीं. तो या पत्रांत आहे. अखेराज श. १६९३ मार्गशीर्ष, इ. १७७१ डिसेंबर अखेर मेला. तेव्हां घोघा व तळाजें याबाबतच्या हालचाली त्यापूर्वी झाल्या येवढें निश्चित.

१६५

या पत्राचें आवरण व वेष्टनपट्टी यांच्या अभावीं ग्राहकांचा पत्ता लागत नाहीं. रघुनाथरावानें सुरतेस इंग्रजांचा आश्रय घेतला तो श. १६९८ (इ. १७७६) मध्यें ऐवढें पक्कें आहे. ह्या वर्षी रवल २९ नंतर लवकरच हें पत्र धाडलें असून या तारखेला सखाराम हरी (गुप्ते), मानाजी फाकडे (शिंदे) व इतर यांनीं रघुनाथरावाची बाजू सोडल्याचें सांगितलें आहे. खरेशास्त्रीकृत ऐलेस खंड ५, ले. १८४६ हा याबाबत फार उपयुक्त आहे. यावर पैवस्तीची तारीख संपूर्ण असून शिवाय यांत प्रेषणमितीही आहे. पत्रगर्भांत सखाराम हरी, मानाजी फाकडे व लहानमोठे सरदार हरिपंत फडक्यास येऊन भेटले आणि दादासाहेब (रघुनाथराव) सुरतेस रघुनाथपुऱ्यांत जाऊन राहिले म्हणून सांगितलें आहे. तेव्हां दोन्ही पत्रांचा मेळ उत्तम बसतो.

१७०

प्रस्तुत पत्र पेशव्यांकडे आलें आहे, हें रावसाहेबांचें कुशल असो या वाक्यावरून स्पष्ट होतें; तें कोणा इंग्रजानें पाठविलें आहे, हें ऑक्टोबर १८ या ख्रिस्ती कालनिर्देशावरून उघड होतें. या पत्रांत त्रिकूटाचा उल्लेख आहे. हें त्रिकूट म्हणजे पेशवे, निजाम व इंग्रज यांचा संघ असें मानलें असतां या पत्राचा उत्तम उलगडा होतो. प्रसिद्ध श्रीरंगपट्टणच्या स्वारींत उपर्युक्त त्रिकूट विरुद्ध टिपू असे दोन पक्ष होते. ज. मेडोजनें नंदिदुर्ग किल्ला लॉर्ड कॉर्नवालिसच्या आधिपत्याखालीं निघालेल्या स्वारींत कसा घेतला आणि त्या घटितांत कोणती कामगिरी बजाविली याचें वर्णन विल्क्सनें आपल्या **हिस्ट्री ऑफ म्हैसूर** या पुस्तकांत केलें आहे (२।२२). तेथें इ. १७९१ आक्टोबर १९ मोठी पहाट हा घटिताचा प्रारंभकाल म्हणून दिला आहे. पण या पत्रांत तसेंच एन्. बी. रे संपादित **दि अलाइज् वॉर वुइथ् टिपू सुलतान (पूना रेसिडेन्सी कॉरेस्पॉण्डन्स खंड ३)** यांतील ले. ३८१ मध्यें आक्टोबर १८ची रात्र हा या घटिताचा समय दिला आहे.

ऐ. फा. सा. खंड ५, भाग १ यांत प्रकाशित झालेल्या क्र. १२१ व १२२ या फर्मानांत फार्सी पाठाच्या खालीं पुढील कानडी मजकूर आहे. याचा आशय मराठी अनुवादांत दिल्याप्रमाणें आहे, म्हणून येथें त्याचा निराळा अनुवाद दिला नाहीं. फक्त पाठ दिला आहे.

१२१

ದರ್ ಫರ್ಮಾನ ಹುಮಾಯುನು ಶರಫ ಸದೂರ ಯಾಪ್ತ ಅಂ ಕ್ಕಿ ಜುಬ್ದತುಲ ಆಮಾಸಿಲ ವಲ ಆಶಬಾಹ ಕೊನೆಟಿ ನಾಯ್ಕಗೆ ಬಯಿನಾಯಾತ ಬೆಗಾಯತ ಶಾಹನಾ ನವಾಜಿಸ ಯಿಲತಿಫಾತ ಖುಸರವಾನಾ ಮುಮತಾಜ ವ ಸರಫರಾಜ ಬುದಾ ಬಿದಾನದ ಕ್ಕೆ ಸಾಂಪ್ರತ ಹುಜುರಿಂದ ಯಿಜತ ಸುಜಾಆತ ದಸ್ತಗಾಹ ಮಿಜಾಜಿದಾನಿ ಕಾರಾಗಾಹ ವುಮದ್ದೈ ವಜಿರಾಯ ವುಜಾಮ ಜುಬ್ದೈ ವುಮರಾಯ ಕಿರಾಂ ನಾಹಂಗ ದರಿಯಾಯ ಮರ್ದಿ ವ ಮರ್ದಾನಗಿ ಗಂಷ್ವರ ಕಾನ ಫಿರೋಜಮುಂದ್ದಿ ವ ಫರ್ಜಾನಗಿ ಫಾರಿಸ ಮಿಜಮಾರ ಸುಜಾಆತ ಮುಬಾರಿಜ ಮೈದಾನ ಶಾಹಂಮತ ಶಾಯಿಸ್ತೆ ಫಿರಾವಾ ಆತಿಫತ ವ ತಾಹಸಿ ಸಜಾವಾರ ಹಜಾರಾ ಮುರಾಹಂಮತ ಆಫರಿ ಖಾನ ಆಲಿಶಾನ ಯೆಕಬಾಲ ನಿಶಾ ಫರಜಂದ ರಸಿದ ಸಿಫೆ ಸಾಲಾರ ದೌರಾಗರ ಅಜುರ್ ಕುನದ ಸಿಫಿಹರ ಆಲಾ ಫಜಲಾ ಫಜಲಾ ವ ಫಜಲ ಆಫಜಲ ಆಜಹರ ಮುಲಕ್ಕೆ ಬಜಾಯ ತಸಬಿಯ ಆವಾಜು [ಆ]ಯುದ ಕ್ಕೆ ಆಫಜಲ ಆಫಜಲ ಖುಲಾಸೆ ನೆಕ ಖಾಹಾನಿ ಮುಲ್ಕುಗಿರ ವ ಕೆಶ್ವರ ಸಿತಾ ಆಫಜಲಖಾನ ಮಾಹಂಮದಶಾಹಿಗೆ ಮಾಹರ್ಬಲಸಹಿತ ಆ ಪ್ರಾಂತ್ಯಕ್ಕೆ ಕಳಿಹಿಸಿ ಯಿಧೆವೆ ಸುಜಾಆತ ಯಿಜತ ದಸ್ತಗಾಹ ವುಮದ್ದೈ ದೌಲತಖಾಹಾನಿ ವಫಾಕೆಶ ಖುದವೈ ಹವಾಖಾಹಾನಿ ಖೈರಆಂದೆಶ ಜುಬ್ಬತುಲ ಕಬಾಯಿಲ ವಲ ಆಖವಾ ಖುಲಾಸಿತುಲ್ಲ ವಲ ಆಕರಾ ರುಕುನುಲ ದೌಲತುಲ ಕಾಹಿರಾ ಮಹಾರಾಜ ಫರ್ಜಂದಿ ಶಾಹಜಿ ಬೊಸಲೆರು ಆ ಪ್ರಾಂತದಲ್ಲಿ ಯಿಥಾರೆ ಆದರೆ ಖಾನ ಮುಶಾರ ನಲ್ಲೆರು ವ ರಾಜಾ ಮುಶಾರನಲ್ಲೆರು ಯಿವರ ಯಿಬ್ಬರ ಅಂಕಿತದೊಳಗಿದ್ದು ದೌಲತಖಾಹಿ ಶಾ ವೆ ಮಾ — ವ — ಹಬಿಕೆ ಅವರ ಮಾತುಗಳ ಕೆಳವೆ ಯಿದ್ದಲಿ ನಿಂಮ ಹಿತವದೆ ತೆರಿಖ ೨೨ ಮಾಹೆ ಶಾಬಾನ ಸಂನ ೧೦೬೮ ಪ॥ ಹು॥ ಖುರಸಿದ ಜುಹುರು ಆಶರಫ ಅಕದಶ ಹುಮಾಯು

परिशिष्ट अ

१२२

ಫರ್ಮಾನ ಹುಮಾಯುನು ಶರಫ ಸದೂರ ಯಾಪ್ತ ವುಂ ಕಿ ಯಿಜತ ವ ರಫಆತೆ ಡಸ್ತಗಾಹ ಸುಜಾಆತ ವಾ ಶಾಹಮತ ಯಿಂತ್ತಿಬಾಹ ಜುಬ್ದತುಲ ಆಮಾಸಿಲ ವಲ ಆಶಬಾಹ ಶಾಮಿಲುಲ್ಲ ಶಿಯಮ ವಲ್ಲ ಯಾತಿಬಾರ ಮೈಸೂರ ನರಸರಾಜಗೆ ಬಯಿ-ನಾಯಾತ ಬೆಗಾಯಾತ ಶಾಹನಾ ನವಾಜಿಸ ಯಿಲತಿಫಾತ ಖುಸರವಾನಾ ಮುಪ್ತಹಿಜ ವ ಮುಸುಹುರುರ ಬುದಾ ಬಿದಾನದ ಕ್ಕೆ ಸಾಂಪ್ರತ ಹುಜುರಿಂದ್ದ ಯಿಜತ ಸುಜಾಅತ ದಸ್ತಗಾಹ ಮಿಜಾಜಿದಾನಿ ಕಾರಾಗಾಹ ವುಮದ್ದೈ ವಜಿರಾಯ ವುಜಾಮ ಜುಬ್ದೈ ವುಮರಾಯ ಕಿರಾಂ ನಾಹಂಗ ದರಿಯಾಯ ಮರ್ದಿ ವ ಮರ್ದಾನಗಿ ಗಂವ್ಹರ ಕಾನ ಫಿರೊಜಮುಂದ್ದಿ ವ ಫರ್ಜಾನಗಿ ಫಾರಿಸ ವಿಜಮಾರ ಸುಜಾಆತ ಮಬಾರಿಜ ಮೈದಾನ ಸುಜಾಆತ ಶಾಹಮತ ಶಾಯಿಸ್ತೆ ಫಿರಾವಾ ಆತಿಫತ ವಾ ತಾಹಸಿ ಸಜಾವಾರ ಹಜಾರಾ ಮರಾಹಂಮತ ಆಫರಿ ಖಾನ ಆಲಿಶಾನ ಯಿಕಬಾಲನಿಶಾ ಫರಜಂದ ರಸಿದ ಸಿಫೆ-ಸಾಲಾರ ದೌರಾ ಗರ ಆರ್ಜು ಕುನದ ಸಿಫೆಹರ ಆಲಾ ಫಜಲ ಫಜಲಾ ವ ಫಜಲ ಆಫಜಲ ಆಜ ಹರ ಮುಲ್ಕಿ ಬಜಾಯ ತಸಬಿಯ ಆವಾಜಾಯದ ಕ್ಕೆ ಅಫಜಲ ಆಫಜಲ ಖುಲಾಸೆ ನೆಕಖಾಹಾನಿ ಮುಲ್ಕುಗಿರ ಕೆಶ್ವರಸಿತಾ ಆಫಜಲಖಾನ ಮಾಹಂಮದಶಾಹಿಗೆ ಮಾಹರ್ಬಲಸಹಿತ ಆ ಪ್ರಾಂತ್ಯಕ್ಕೆ ಕಳಿಹಿಸಿ ಯಿಥೆವೆ ಸುಜಾಆತ ಯಿಜತ ದಸ್ತಗಾಹ ವುಮದ್ದೈ ದೌಲತಖಾಹಾನಿ ವಫಾಕೆಶ ಖುದವ್ಸೆ ಹವಾಖಾಹಾನಿ ಖೈರಆಂದೆಶ ಜುಬ್ದತುಲ್ಲ ಕಬಾಯಿಲ ವಲ ಅಖವಾ ಖುಲಾಸಿತುಲ್ಲ ವಲ ಆಕರಾ ರುಕುನುಲ ದೌಲತುಲ ವಲ ಆಕರಾ ಮಾಹರಾಜ ಸರ್ಜಂದಿ ಜಾ (ಶಾ) ಹಜಿ ಬೊಸಲೆರು ಆ ಪ್ರಾಂತ್ಯದಲ್ಲಿ ಯಿಥಾರೆ ಆದರೆ ಖಾನ ಮಶಾರನುಲ್ಲೆರು ರಾಜಾ ಮಶಾರನುಲ್ಲೆರು ಯಿವರ ಯಿಬರ ಸಂಬದು ಕೂಟಸ್ತರಾಗಿ ಯಿವರ ವಿದ್ದಮಾನದಿಂದ ದೌಲತಖಾಹಿ ಮಾಡಿದಲ್ಲಿ ನಿಂಮ ವುತ್ತರ ... ತೆರಿಖ ... ಮಾಹೆ ಶಾಬಾನ ಸಂನ ೧೦೬೮ ಪ॥ ಹು॥ ಖುರಸಿದ ಜುಹುರು ಅಶರಫ ಅಕದಸ ಹುಮಾಯುನು ಆಲಾ.

परिशिष्ट आ

या भागांत प्रकाशित झालेल्या पत्रांचा कालानुक्रम

४०; शु. ९६४; १४८५।८६; १५६३।६४.

१२७; हि ९७२ रवल २३; १४८६ कार्तिक वद्य १०; १५६४ आक्टोबर २९.

१२८; हि ९७२ रवल २६; १४८६ कार्तिक वद्य १३; १५६४ नोव्हेंबर १.

१२९; हि ९७२ रवल २८; १४८६ कार्तिक वद्य ३०; १५६४ नोव्हेंबर ३.

४१; हि ९७६ रखर ७; १४९० भाद्रपद शुद्ध ९; १५६८ सप्टेंबर २९.

१३०; शु ९७९ हि. ९८९ सफर ११; १५०३ चैत्र शुद्ध १२; १५८१ मार्च १७.

४२; हि ९८९ रमजान २; १५०३ आश्विन शुद्ध ३; १५८१ सप्टेंबर ३०

४३; हि ९९० मोहरम १; १५०३ माघ शुद्ध २; १५८२ जानेवारी २६.

४४; हि ९९० शव्वाल ९; १५०४ कार्तिक शुद्ध ११; १५८२ आक्टोबर २७.

१३१; हि ९९१ मोहरम २४ (२५); १५०४ माघ वद्य १० (११); १५८३ फेब्रुवारी ७ (८)

४५; हि ९९४ जवल २२; १५०८ वैशाख वद्य८; १५८६ मे १

४६; हि ९९७ जवल ११; १५११ वैशाख शुद्ध १२; १५८९ एप्रिल १७.

३२; शु १००५; हि १०१४ जवल १६; १५२७ आश्विन वद्य २; १६०५ सप्टेंबर १९.

१३३; शु १००९; हि १०१७ जिल्काद २; १५३० माघ शुद्ध ३; १६०९ जानेवारी २८.

१०१ शु १०१७; हि १०२६ जिल्काद ८; १५३९ कार्तिक शुद्ध ९; १६१७ आक्टोबर २८.

१०२; हि १०३४ रमजान १७ (नंतर); १५४७ ज्येष्ठ वद्य ३; १६२५ जून १३.

१०३ हि १०३५ रवल १५; १५४७ मार्गशीर्ष वद्य २; १६२५ डिसेंबर ५.

१०४; हि १०३५ रखर २४; १५४७ पौष वद्य १०; १६२६ जानेवारी १३.

१०५; हि १०३६ जिल्काद २६; १५४९ अ. श्रावण वद्य १२; १६२७ जुलै २९.

४८, ९९, १००, १०६, १३४ दुसरा इब्राहीम आदिलशाह याची कारकिर्द

१०७; शु १०२७ नंतर; हि १०३७ मोहरम २०; १५४९ भाद्रपद वद्य ७; १६२७ सप्टेंबर २१.

१३५; शु १०३७; हि १०३७ (१) जखर; १५४९ माघ; १६२८ फेब्रुवारी

१०८; शु १०२९ नंतर; हि १०३८ सफर २९; १५५० कार्तिक शुद्ध १; १६२८ आक्टोबर १८.

४९; हि १०३८ रवल ६; १५५० कार्तिक शुद्ध ७; १६२८ आक्टोबर २४

१०९; हि १०३८ रखर २; १५५० मार्गशीर्ष शुद्ध ३; १६२८ नोव्हेंबर १९.

५०; हि १०३८ रखर ११; १५५० मार्गशीर्ष शुद्ध १२; १६२८ नोव्हेंवर २८

५१; शु १०२९; हि १०३८ रखर १३; १५५० मार्गशीर्ष शुद्ध १४; १६२८ नोव्हेंवर ३०.

११०; शु. १०२९; हि १०३८ शव्वाल २६; १५५१ ज्येष्ठ वद्य १३; १६२९ जून ९.

१११; शु. १०२७ नंतर; हि १०३८ जिल्हेज २७; १५५१ श्रावण वद्य १४; १६२९ ऑगस्ट ७.

५२; हि १०३९ सफर २८; १५५१ आश्विन वद्य ३०; १६२९ आक्टोबर ६.

१२६; शु. १०३५; हि १०४४ जखर ९; १५५६ मार्गशीर्ष शुद्ध १२; १६३४ नोव्हेंबर २१.

११२; शु १०३७ नंतर; १०४७ सफर १४;१५५९ आषाढ शुद्ध १५; १६३७ जून २७.

५३; शु १०३८; हि १०४८ रवल १७; १६६० अ. श्रावण वद्य ३; १६३८ जुलै १९

५४; शु १०४०; हि १०५० जवल २६; १५६२ भाद्रपद वद्य १३; १६४० सप्टेंबर ३.

५५; शु १०४१; हि १०५० शव्वाल १५;१५६२ मार्गशीर्ष वद्य १; १६४० नोव्हेंबर १९

५६; शु १०४१ हि १०५० शव्वाल २२; १५६२ माघ वद्य ८; १६४१ जानेवारी २४

५७ शु १०४१; हि १०५० शव्वाल २३; १५६२ माघ वद्य ९; १६४१ जानेवारी २५

५८; शु १०४१; हि १०५० जिलकाद २३; १५६२ फालगुन शुद्ध ४;१६४१ फेब्रुवारी ३

१३६; शु १०४२; हि १०५१ शाबान; १५६३ कार्तिक; १६४१ नोव्हेंबर.

५९; शु १०४२; हि १०५१ शव्वाल २७; १५६३ पौष वद्य १४; १६४२ जानेवारी १९.

११३; हि. १०५१ जिल्काद ९; १५६३ माघ शुद्ध १०; १६४२ जानेवारी ३०

६० शु १०४३; हि १०५२ रजब २९; १५६४ कार्तिक शुद्ध १; १६४२ फेब्रुवारी ३.

६१; शु १०४३; हि १०५३ रखर २४; १५६५ आषाढ वद्य ११; १६४३ जुलै २.

६३; शु १०४४; हि १०५३ जिल्काद २९; १५६५ फालगुन शुद्ध १; १६४४ जानेवारी ३०

१२३; शु १०४४; हि १०५४ सफर १२; १५६६ चैत्र शुद्ध १४; १६४४ एप्रिल १०.

६४; १०४५; हि १०५४ रमजान १४; १५६६ कार्तिक वद्य १; १६४४ नोव्हेंबर ५.

६५; शु १०४५; हि १०५४ रमजान २८; १५६६ कार्तिक वद्य १४; १६४४ नोव्हेंबर १८.

६६; शु १०४६; हि १०५५ रमजान १५; १५६७ कार्तिक वद्य २; १६४५ आक्टोबर २६

६७; शु १०४६; हि १०५५ जिल्काद २९; १५६७ माघ शुक्ल १; १६४६ जानेवारी ७.

६८; शु १०४६; हि १०५६ सफर; १५६८ चैत्र; १६४६ मार्च.

६९; शु १०४७; हि १०५६ रबल ३०; १५६८ ज्येष्ठ शुद्ध ३; १६४६ मे ७.

७०; शु १०४७; हि १०५७ रखर २३; १५६९ वैशाख वद्य १०; १६४७ मे १९.

७१; शु १०४८; हि १०५७ जवल;१ १५६९ ज्येष्ठ शुद्ध ३; १९४७ मे २६.

७२; शु १०४८; हि १०५८ रखर १२; १५७० वैशाख शुद्ध १४; १६४८ एप्रिल २६.

७३; शु १०४९; हि १०५८ शव्वाल १७; १५७० कार्तिक वद्य ३; १६४८ आक्टोबर २४.

७४; शु १०४९; हि १०५९ शाबान ५; १५७१ श्रावण शुद्ध ७; १६४९ आगस्ट ४.

७५; शु १०५०; हि १०६० मोहरम २१; १५७१ पौष वद्य ७; १६५० जानेवारी १४.

७६; शु १०५०; हि १०६० जवल १९; १५७२ वैशाख वद्य ६; १६५० मे ११.

७७; शु १०५१; हि १०६१ जवल ४; १५७३ वैशाख शुद्ध ५; १६५१ एप्रिल १५.

७८; शु १०५१; हि १०६१ रमजान १०; १५७३ भाद्रपद शुद्ध ११; १६५१ आगस्ट १७

७९; शु १०५१; हि १०६१ शव्वाल ८; १५७३ आश्विन शुद्ध १०; १६५१ सप्टेंबर १४

८०; शु १०५२; हि १०६२ रबल ९; १५७३ फाल्गुन शुद्ध १०;१६५२ फेब्रुवारी ९

८१; शु १०५३; हि १०६२ जिल्हेज १९; १५७४ कार्तिक वद्य ६; १६५२ नोव्हेंबर ११.

८२; शु १०५३; हि १०६३ सफर २४; १५७४ पौष वद्य ११; १६५३ जानेवारी १५.

८३; शु १०५३; हि १०६३ जवल ४; १५७५ चैत्र शुद्ध ६; १६५३ मार्च २४.

८४; शु १०५४; हि १०६४ मोहरम १९; १५७५ मार्गशीर्ष वद्य ६; १६५३ नोव्हेंबर ३०.

८५; शु १०५४; हि १०६४ रज्जब २३; १५७६ ज्येष्ठ वद्य ८; १६५४ मे २९.

८६; शु १०५६; हि १०६६ रमजान २२; १५७८ आश्विन वद्य ८; १६५६ जुलै ५.

४७; (मुहम्मद आदिलशाह ?)...... १४.

८७; शु १०५८; हि १०६८ रखर ४;. १५७९ पौष शुद्ध ६; १६५७ डिसेंबर ३०.

११४; हि १०६८ जवल ६; १५७९ मार्गशीर्ष शुद्ध ७; १६५८ जानेवारी ३०.

८८; शु १०५८; हि १०६८ जखर २९; १५८० चैत्र शुद्ध १; १६५८ मार्च २४.

१२०—१२२ हि १०६८ शावान२२;१५८० वैशाख वद्य १०;१६५८ मे १६.

८९; हि १०६९ जिल्हेज २; १५८१ भाद्रपद शुध्द ३; १६२९ आगस्ट ११.

९०; शु १०६०; हि १०७० जवल ८; १५८१ मागशीर्ष शुध्द १०; १६६० जानेवारी ११.

९१; शु १०६० हि १०७० शव्वाल ४; १५८२ ज्येष्ठ शुध्द ५; १६६० जून ३.

९२; शु १०६० हि १०७० शव्वाल १५; १५८२ ज्येष्ठ वद्य १, १६६० जून १४.

११५; हि १०७१ जवल २२; १५८२ पौष वद्य ९; १६६१ जानेवारी १४.

९३; शु १०६२; हि १०७२ रवल १९; १५८३ कार्तिक वद्य ६; १६६१ नोव्हेंबर २.

९४; शु १०६२ हि १०७२ शावान ५; १५८४ चैत्र शुध्द ७; १६६२ मार्च १६.

१३७; शु १०६२; हि १०७२ जिल्काद ७; १५८४ आषाढ शुध्द ८; १६६२ जून १४.

९५; शु १०६२; हि १०७३ मोहरम ७; १५८४ भाद्रपद शुद्ध ८; १६६२ आगस्ट १२.

९६; शु १०६३; हि १०७३ रज्जब १५; १५८४ फाल्गुन वद्य २; १६६३ फेब्रुवारी १४

९७; शु १०६४; हि १०७४ रखर १०; १५८५ कार्तिक शुद्ध ११; १६६३ नोव्हेंबर १.

११६; हि १०७४ रज्जब ११; १५८५ माघ शुद्ध १३; १६६४ जानेवारी ३०.

११७–१८; शु १०६४; हि १०७४ जिल्काद १६; १५८६ ज्येष्ठ वद्य ३; १६६४ जून १.

१८; शु १०६४; हि १०७४ जिल्हेज १४; १५८६ आषाढ वद्य १; १६६४ जून २९.

१३८; शु १०६६; हि १०७६ मोहरम २; १५८७ अ. श्रावण शुद्ध ४; १६६५ जुलै ६.

१३९; शु १०६६; हि १०७६ जवल ३०; १५८७ मार्गशीर्ष शुद्ध २; १६६५ नोव्हेंबर २८.

१२४; शु १०६६; हि १०७६ शावान १६; १५८७ माघ वद्य २; १६६६ फेब्रुवारी ११.

१४०; शु १०६६ ; हि १०७७ मोहरम ३; १७८८ आषाढ शुद्ध ४; १६६६ जून २६.

१५८; जु. ९ (आलमगीर १) रवल ११; १५८८ अश्विन शुद्ध १३; १६६६ सप्टेंबर ३०.

१४१; शु १०६७; हि १०७७ रमजान १८; १५८८ फाल्गुन वद्य ४; १६६७ मार्च ४.

१५९; जु. १२ (आलमगीर १) जवल १४; १५९१ आश्विन वद्य १; १६६९ सप्टेंबर ३०.

११९; हि १०८२ जखर १६; १५९३ आश्विन वद्य ३; १६७१ आक्टोबर १०.

१४२; हि १०८४ शावान १५; १५९५ कार्तिक वद्य १; १६७३ नोव्हेंबर १५.

१२५; शु १०८४; हि १०९५ जवल १९; १६०६ वैशाख वद्य ६; १६८४ एप्रिल २५.

१५३; जु. २८ (आलमगीर १) रज्जव ६; १६०७ ज्येष्ठ शुद्ध ७; १६८५ मे ३०.

१५४–५५; जु. ३० (आलमगीर १) मोहरम १३; १६०८ मार्गशीर्ष वद्य १; १६८६ नोव्हेंबर २०.

१५६ जु. ३० (आलमगीर१) जवल ११; १६०९ चैत्र शुद्ध १३; १६८७ मार्च १६.

१५७; जु. ३९ (आलमगीर१) शावान१; १६१७ फाल्गुन शुद्ध२; १६९६ फेब्रुवारी २४

१४३; जु ४१ (आलमगीर१) शावान२१; १६१९ फाल्गुन वद्य८; १६९८ फेब्रुवारी २३

१६०; जु ४७ (आलमगीर १) मोहरम २; १६२५ ज्येष्ठ शुद्ध ३; १७०३ मे ८

१४६; जु ४७ (आलमगीर१) जखर २३; १६२५ आश्विन वद्य १०; १७०३ आक्टोबर २४.

१६१ जु ४८ (आलमगीर १) रमजान ७; १६२५ पौषशुद्ध ९; १७०४ जानेवारी४

१६२;जु ४९ (आलमगीर १) रमजान २९; १६२६ माघ शुद्ध१; १७०५ जानेवारी १५

१४७; जु१ (शाह आलम १) मोहरम ६; १६२९ चैत्र शुद्ध ७; १७०७ मार्च २९

१४४; जु१ (शाह आलम१) सफर १७; १६२९ वैशाख वद्य ४; १७०७ मे ९

१४८; जु २ (शाह आलम १?) खल १२; १६३० ज्येष्ठ शुद्ध १४; १७०८ में २२

१४९; जु २ (शाह आलम१) रज्जब १६; १६३० आश्विन वद्य२; १७०८ सप्टेंबर २०

१५०; जु २ (शाह आलम१) शाबान २४;.१६३० कार्तिक वद्य ११; १७०८ आक्टोबर २८

१५१; जु ३ (शाह आलम१) मोहरम ३; १६३० चैत्र शुद्ध ४; १७०९ मार्च ४

१७१३–१७१९

१४५; १५२ (फर्रुखसियर)

१६३; जु. १ (अहमदशाह) जिल्हेज १६; १६७० मार्गशीर्ष वद्य ३; १७४८ नोव्हेंबर २७

८,९; जु २ (आलमगीर २) जखर ८; १६७७ फाल्गुन शुद्ध ९; १७५६ मार्च१०

१०; जु २ (आलमगीर २) जखर २१; (नंतर) १६७७ फाल्गुन वद्य ८; १७५६ मार्च २३.

११; जु २ (आलमगीर २) रज्जब १ नंतर ?; १६७८ चैत्र शुद्ध ३; १७५६ एप्रिल २.

१२; जु २ (अलमगीर २) रजब ३; १६७८ चैत्र शुद्ध ५; १७५६ एप्रिल ५.

१; जु ३ (आलमगीर २) जवल १ शनिवार; १६७८ मार्गशीर्ष शुद्ध २; १६५७ जानेवारी २२.

२; जु ३ (आलमगीर २) जवल ४ मंगळवार; १६७८ मार्गशीर्ष शुद्ध ५; १७५७ जानेवारी २५.

३; जु ३ (आलमगीर २) जवल ५ बुधवार; १६७८ मार्गशीर्ष शुद्ध ६; १७५७ जानेवारी २६.

४; जु ३ (आलमगीर २) जवल ६; १६७८ मार्गशीर्ष शुद्ध ७; १७५७ जानेवारी २७.

५–७; जु ३ (आलमगीर २) जवल ९; १६७८ मार्गशीर्ष शुद्ध १०; १७५७ जानेवारी ३०.

१३, १४; जु ५ (आलमगीर २) रखर १८; १६८० मार्गशीर्ष वद्य ५; १७५८ डिसेंबर २०.

१५-१८; जु ५ (आलमगीर २) रज्जव ३; १६८० फाल्गुन शुद्ध ५; १७५९ मार्च ३.

१९; जु ६ (आलमगीर २) शाबान १७; १६८१ चैत्र वद्य ३; १७५९ एप्रिल १५.

२०; जु १ (शाह आलम २) रवल १ नंतर; १६८२ अश्विन शुद्ध २; १७६० आक्टोबर ११.

२१, २२; हि ११७४ जिल्काद ७; १६८३ ज्येष्ठ शुद्ध ९; १७६१ जून ११.

२३, २४; हि ११७६ रमजान २; १६८५ चैत्र शुद्ध ४; १७६३ मार्च १८.

२५-२७; हि ११७६ रमजान ३०; १६८५ वैशाख शुद्ध २; १७६३ एप्रिल १५.

२८; हि ११७६ जिल्हेज २८; १६८५ ज्येष्ठ वद्य १४; १७६३ जुलै १०.

२९, ३०; हि ११७७ मोहरम २०; १६८५ आषाढ वद्य ७; १७६३ ऑगस्ट १.

३१, ३२; हि ११७७ रखर ३; १६८५ आश्विन शुद्ध ५; १७६३ आक्टोबर ११.

३३; हि ११७७ शाबान २९; १६८५ फाल्गुन शुद्ध १; १०६४ मार्च ३.

३४; हि ११७७ शव्वाल २; १६८६ चैत्र शुद्ध ३; १७६४ एप्रिल ४.

३५, ३६; हि ११७७ जिल्हेज २८; १६८६ ज्येष्ठ वद्य ३०; १७६४ जून २९.

३७; हि ११७८ जवल २९; १६८६ मार्गशीर्ष शुद्ध १, १७६४ नोव्हेंबर २४.

३८, ३९; हि ११७८ रमजान १७; १६८६ फाल्गुन वद्य ३; १७६५ मार्च १०

१६४; १६९३ चैत्र शुद्ध १२ ते मार्गशीर्ष वद्य १०; १७७१ मार्च २७ ते डिसेंबर ३१

१६५; रवल २९ नंतर; १६९८ ज्येष्ठ शुद्ध १; १७७६ मे ८

१६६; —; १६९९-१७००; १७७७-१७७८

१६८; —; १७०१; १७७९

१६९; —; १७१०--११; १७८८-१७८९

१६७; —; १७१०--१३; १७८८-१७९१

१७०; —; १७१३ आश्विन वद्य ७; १७९१ ऑक्टोबर १९

- सूची -

[सूचींतील आंकडे पृष्ठांचे आहेत.]

आ

घ

च

छ

ज

ल

व

श

स

ह

५५५

शोध

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
११	२९	असलेल्या	होऊं घातलेल्या
७२	९	अलीसिंग	अलासिंग
८६	१३	जोलाई आपत्रीमुळें	जुलाही आपत्तीमुळें
९२	५	लिंगदार शब्द ओळीच्या आरंभीं घ्यावा.	
९८	१४	कंरजवड कडवचूर	करंजवड किंवा कडवचूर
१०९	११	सर्वांची	सर्वांची त्याजवर
,,	१३	तो	त्याचा
११२	२१	निसबती	निसबती नाहीं
११९	२	१६६७	१६६६
,,	२२	आहे	होती
१२०	२०	जामदार	फरांस
१२३	१४	रवल १	रवल १२
१२५	१६	‘ द्यावा ’ पुढें ‘ जु. ३० मोहरम १३ चा ’ हे शब्द घ्यावे.	

१६१ वरील ‘ परिशिष्ट अ ’ हा मथळा पृ. १६० वर आरंभीं घ्यावा.